विक्तर द्रागुन्स्की

देनीसच्या गोष्टी

विक्तर द्रागुन्स्की

डेनीसच्या गोष्टी

विक्तर द्रागुन्स्की

डेनीसच्या गोष्टी

रादुगा प्रकाशन
मॉस्को

अनुवाद : अनिल हवालदार
सजावट : यू० इवानोव

Виктор Драгунский

ДЕНИСКИНЫ РАССКАЗЫ

на языке маратхи

Victor Dragunsky

THE ADVENTURES OF DENNIS

in Marathi

© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८५
सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-000235-4

अनुक्रमणिका

वीस वर्षे पलंगाखाली

मला काय आवडते ९
...आणि मला काय आवडत नाही ! . १२
जेव्हा मी लहान होतो . . १२
काहीही बदलता येत नाही . १५
इवान कझ्लोवस्कींची कीर्ती . . . १९
"कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय..." २३
चित्त्यावरचे हिरवे ठिपके . ३१
आणि आम्हीसुद्धा ! . ३७
रहस्याला वाचा फुटते ! . ४१
नजर ठेवणारी दुर्बीण . . . ४५
मृत्युगोलातील फटफटीवरची कसरत . ५०
सिंगापूरबद्दल मला सांगा ! ५५
विनोदबुद्धी असावी . ६१
छू: मंतर ! . ६५
दीडशहाणा प्रोफेसर ७१
पोहण्यात तिसरा नंबर ७५
सर्कसवाल्यांनो, आम्ही तुमच्यापेक्षा कमी नाही ! . ७७
हेराचा मृत्यू . . ८५
बूट घातलेला बोका . ९३
बरोब्बर २५ किलो ९८
घराला लागलेली आग अथवा बर्फावरचा पराक्रम . १०४
जर . १११
चतुर उपाय . ११४
कोंबडीचे सार . ११८
शिलेदार १२४
कुत्रा-चोर . १२९

वरून खालपर्यंत, मागे-पुढे ! १३५
मुल्य नद्या . . . १४१
बुद्धिबळपटूंची टोपी १४४
स्वतंत्र गोर्बूश्का १४९
प्राणी-संग्रह १५६
लठ्ठ थापाडी १५९
एका थेंबात घोडा ठार ! . १६३
वीस वर्षे पलंगाखाली . १६५

चेंडूवरील मुलगी

निळ्या आकाशात लाल फुगा . . १७३
"तो जिवंत आहे आणि चमकतोय..." १७७
जुना खलाशी . . १८०
कलिंगडांची गल्ली . १८७
निळी कट्यार . . १९२
निळ्या चेहऱ्याचा माणूस . . . १९५
सादोवाया रस्त्यावरील मोठी वाहतूक . २०२
चाके वाजतात खाड-खाड . २१०
पाथरवट दगड तासतात . २१६
बालपणचा मित्र . २२२
माझी बहीण क्सेनिया . २२५
चेंडूवरील मुलगी . २३०

पलंगाखाली वीस वर्षे

मला काय आवडते ...

बाबांच्या गुडघ्यांवर पालथे पोटावर पडायला आणि तारेवर वाळत घातलेल्या चादरीप्रमाणे हातपाय पसरून त्यांच्या गुडघ्यांवर झोके घ्यायला मला फार आवडते. आणखी मला सोंगट्या, बुद्धिबळ व डोमिनो खेळायला खूप आवडतो. मात्र मी जिंकत असलो तरच. जर जिंकत नसेन तर खेळ नको.

डबीत किडा कसा खुडखुड आवाज करतो हे ऐकायला मला आवडते. आणि सुटीच्या दिवशी बाबांच्या पलंगावर बसून त्यांच्याशी कुत्र्याबद्दल गप्पा मारायला मला आवडते. आम्ही मोठ्या घरात रहायला गेलो म्हणजे कुत्रा विकत घेणार आहोत. त्याला शिकवणार आहोत, खाऊ घालणार आहोत. आमचा कुत्रा खूप मजेदार आणि हुशार होईल. तो साखरेचे खडे चोरील आणि त्याने केलेली घाण मी स्वतः स्वच्छ करीन. विश्वासू कुत्र्याप्रमाणे तो नेहमी माझ्यामागून फिरेल.

मला टेलीव्हिजन बघायला आवडतो. कार्यक्रम कोणताही असो. नुसता नक्षा असला तरीही चालतो.

आईच्या कानात नाकाने हवा सोडायला मला आवडते. विशेषतः मला गाणे म्हणायला आवडते आणि तेसुद्धा खूप मोठ्यांदा.

लाल सैनेतील घोडेस्वारांच्या लढायांमधील विजयाच्या गोष्टी मला फार फार आवडतात.

आरशासमोर उभे राहून तोंडे वेडीवाकडी करायला आवडते. जणू कळसूत्री बाहुल्यांच्या थिएटरमधील पेत्रुश्का. आणि माकडेसुद्धा मला खूप आवडतात.

कांचीलच्या गोष्टी वाचायला आवडते. कांचील एक छोटे, चतुर आणि खोडकर हरण आहे. त्याचे डोळे [illegible] आहेत. शिंगे छोटी आहेत आणि चमकदार गुलाबी खूर आहेत. आम्ही जेव्हा मोठ्या घरात रहायला जाऊ, तेव्हा आम्ही स्वतःसाठी एक कांचील विकत घेऊ. ते आमच्या न्हाणीघरात राहील.

आणखी मला उथळ पाण्यात पोहायला आवडते. कारण तेथे वाळूचा तळ हातांनी धरता येतो.

मिरवणुकांमध्ये लाल झेंडे फडकावायला आणि जोराने शिंग वाजवायला मला आवडते.

टेलीफोन करायला खूप आवडते.

ठोकाठोक आणि कापाकापी करायला मला आवडते. जुन्या काळातील योद्ध्यांची डोकी व रानगवे मी चिकणमातीपासून बनवू शकतो. जंगली ग्राउस पक्षी आणि झारची मोठ्ठी तोफ मी बनवलीय. ह्या सगळ्या वस्तू लोकांना भेट म्हणून द्यायला मला आवडते.

जेव्हा मी वाचत असतो तेव्हा मला भाजक्या पावाचा तुकडा किंवा दुसरे काहीतरी चघळायला आवडते.

पाहुणे मला आवडतात.

आणखी मला गवती साप, सरडे व बेडूक आवडतात. ते खूप चपळ आहेत. मी त्यांना पकडून खिशात घेऊन फिरतो. मी जेवत असताना टेबलावर गवती साप पडलेला पहायला मला आवडते. जेव्हा आजी बेडक्यांबद्दल किंचाळून म्हणते: "उचला तो घाण!" – आणि खोलीतून बाहेर पळते, तेव्हा मला खूप मजा वाटते. अशा वेळी हसून हसून माझा जीव बेजार होतो.

मला हसायला आवडते... कधी कधी मला अजिबात हसावेसे वाटत नाही, पण तरीही मी स्वतःला हसायला लावतो. स्वतःवर हसायची बळजबरी करतो आणि पाच मिनिटांनंतर खरोखरीच गंमत वाटू लागते व मी खो खो हसू लागतो.

मला खूप छान वाटत असते तेव्हा मला उड्या मारायला आवडते. एकदा मी बाबांबरोबर प्राणी संग्रहालयात चाललो होतो तेव्हा रस्त्यावर मी बाबांभोवती उड्या मारू लागलो. बाबांनी विचारले:

"तू उड्या का मारतोस?"

मी म्हणालो:

"मी उड्या मारतोय, कारण तुम्ही माझे बाबा आहात!"

त्यांना समजले.

प्राणी संग्रहालयात जायला मला आवडते. तेथे मजेदार हत्ती आहेत. आणि हत्तीचे एक पिलू आहे. जेव्हा आम्ही मोठ्या घरात रहायला जाऊ, तेव्हा आम्ही हत्तीचे पिलू विकत घेणार आहोत. मी त्याच्यासाठी गॅरेज बांधणार आहे.

मोटारीचे इंजिन जेव्हा चालू असते तेव्हा मोटारीपाठी उभे राहून पेट्रोलचा वास घ्यायला मला खूप आवडते.

कॅफेमध्ये जायला मला आवडते – तेथे आईस्क्रीम खायला आणि त्यावर सोडा प्यायला. सोडा प्यायला म्हणजे नाकात झिणझिण्या येतात व डोळ्यांमध्ये पाणी उभे राहते.

जेव्हा मी कॉरीडॉरमधून धावतो तेव्हा जोरात पाय आपटून मोठे आवाज करायला मला आवडते.

घोडे फार आवडतात मला. त्यांचे चेहरे किती सुंदर आणि प्रेमळ असतात.

मला आणखी खूप खूप गोष्टी आवडतात.

...आणि मला काय आवडत नाही!

मला सर्वांत काय आवडत नसेल तर ते दातांच्या डॉक्टरकडे जाणे. दातांच्या दवाखान्यातील ती खुर्ची नजरेला पडली म्हणजे जगाच्या दुसऱ्या टोकापर्यंत पळत जायची इच्छा होते. आणखी मला आवडत नाही जेव्हा पाहुणे येतात तेव्हा खुर्चीवर उभे राहून कविता म्हणणे.

आई-बाबा नाटकाला जातात तेव्हा मला आवडत नाही.

किंचित उकडलेल्या अंड्यांना ग्लासात घालून त्यात पावाचे तुकडे भिजवतात आणि ते खायला लावतात, तेव्हा मला अगदी असह्य होते. मला त्याचा तिटकारा आहे.

आणखी मला आवडत नाही जेव्हा आई माझ्याबरोबर फिरायला येते आणि अचानक रोझामावशी भेटते तेव्हा! त्या दोघी एकमेकींशी गप्पा मारण्यात अगदी रंगून जातात आणि मी काय करावे ते मला समजेनासे होते

नव्या सूटात वावरायला मला आवडत नाही – त्यात मला अवघडल्यासारखे वाटते

जेव्हा आम्ही लाल आणि पांढऱ्या सैनिकांचा खेळ खेळतो, तेव्हा पांढरा सैनिक व्हायला मला आवडत नाही. अशा वेळी मी चक्क खेळातून बाहेर पडतो! आणि जेव्हा मी लाल सैनिक असतो, तेव्हा कैदी व्हायला मला आवडत नाही. कसेही करून मी पळून जातो.

मला आवडत नाही, जेव्हा मला हरवतात. वाढदिवसाच्या वेळी गारी-गारी-भिंगोऱ्या खेळायला मला आवडत नाही. मी काही लहान नाही.

फार शहाणपणाचा आव आणणारे लोक मला आवडत नाहीत.

जेव्हा बोट कापते तेव्हा त्यावर आयोडिन लावायला मला मुळीच आवडत नाही.

मला आवडत नाही की, आमचे कॉरीडॉर फार अडगळीचे आहे आणि मोठी माणसे दर मिनिटाला इकडे-तिकडे धावपळ करतात, कुणी तवा घेऊन, कुणी चहाची किटली घेऊन आणि ओरडतात:

"मुलांनो, पायांखाली घुटमळू नका! सांभाळ, माझ्या हातात तापलेलं भांडं आहे!"

जेव्हा मी झोपत असतो तेव्हा शेजारच्या खोलीत सगळ्यांनी मिळून गाणी म्हटलेली मला आवडत नाही.

रेडिओवर लहान मुले-मुली मोठ्यांच्या आवाजात बोलतात हे मला मुळीच आवडत नाही!

शाईच्या डागावर काही उपाय नाही हे मला आवडत नाही!

जेव्हा मी लहान होतो

जेव्हा मी लहान होतो, तेव्हा मी नीट चावून खायचा नाही. नेहमी गालात घास धरून ठेवायचा. आणि आई नेहमी सांगायची: "नीट चावून खा!"

आणि मी खात असताना आई मला गोष्टी सांगायची.

एकदा तिने मला लाल कुंचीवाल्या मुलीची गोष्ट सांगितली :

"एक होती लाल कुंचीवाली मुलगी.. नीट चावून खा!"

आणि मी चावून खायचा. आई पुढे म्हणाली

"तिनं समोसे बनवले आणि ती आजीकडे गेली.. छान चावून खा!"

मी परत चावून चावून घास गिळला. आई पुढे :

"आणि लांडग्यानं आजीला गिळून टाकलं... चाव, चाव! नीट चावलंस? आणि लाल कुंचीवाल्या मुलीलाही त्यानं गिळलं."

मी आज्ञाधारकपणे रवंथ करत होतो.

"एवढ्यात तिथं शिकारी आले!" आई पुढे सांगू लागली. "चाव, चावून खा! नीट चावलंस? त्यांनी तो दुष्ट लांडगा ठार केला! मग त्याचं पोट कापलं आणि त्यातून आजी व लाल कुंचीवाली मुलगी बाहेर पडल्या! अगदी जिवंत आणि ठणठणीत!"

मी म्हणालो

"म्हणजे लांडग्यानं त्यांना नीट चावून खाल्लं नाही तर!"

काहीही बदलता येत नाही

मला केव्हाच लक्षात आले आहे की, मोठी माणसे लहान मुलांना अगदी मूर्ख प्रश्न विचारतात जणू त्यांनी सर्वांनी मिळून ते ठरवले आहेत. असे आढळते की, त्या सर्वांनी सारखेच प्रश्न पाठ केले आहेत आणि सर्व मुलांना ओळीने तेच ते प्रश्न ती मोठी माणसे विचारतात. ह्या गोष्टींची मला इतकी सवय झालीय की, जर एखाद्या मोठ्या माणसाशी माझी पहिल्यांदाच ओळख करून देण्यात आली, तर पुढे काय होणार हे मला आधीच माहीत असते. ते असे घडते :

दारावरची घंटा वाजते, आई दार उघडते. खूप वेळपर्यंत न समजण्यासारखी बडबड चालते आणि मग एक नवा मोठा माणूस खोलीत येतो. तो स्वतःचे हात चोळील. मग कान, मग नाक. जेव्हा तो डोळ्यांवर चष्मा ठेवील, तेव्हा मला तो पाहील आणि मी ह्या जगात राहतोय हे जरी त्याला फार पूर्वीपासून माहीत असले व माझे नांव काय हे त्याला उत्तम ठाऊक असते, तरी तो माझे खांदे गच्च पकडतो, अगदी चांगले दुखेपर्यंत त्यांना दाबतो, स्वतःपाशी मला खेचून घेतो आणि म्हणतो :

"तर, देनीस, तुझं नांव काय?"

अर्थात, मी जर उद्धट माणूस असतो, तर मी त्याला सांगितले असते :

"तुम्हाला स्वतःला ठाऊक आहे! आत्ताच तर तुम्ही माझ्या नांवानं मला हाका मारलीत, उगाच बावळटपणाचा आव का आणताय?"

पण मी सभ्य आहे. म्हणून मी बहाणा करतो की, मी तसे काही ऐकले नाही, मी फक्त वाकडे स्मित करतो आणि एका बाजूला डोळे फिरवत उत्तर देतो :

"तेवीस."

तो पुढचा प्रश्न टाकतो :

"तुझं वय किती ?"

जणू काही त्याला दिसत नाही की, मी ना तीस वर्षांचा, ना चाळीस ! माझी उंची किती आहे हे त्याला दिसतेय, त्याअर्थी त्याला समजले पाहिजे की, माझे वय जास्तीत जास्त सात, किंवा फार फार तर आठ – मग कशाला विचारायचे ? पण त्याच्या स्वतःच्या मोठ्या माणसाच्या कल्पना असतात, सवयी असतात आणि तो मला पुढे छळत राहतो :

"आँ ? किती वर्षं तुला ? आँ ?"

मी त्याला सांगीन :

"साडेसात."

इथे तो डोळे मोठ्ठे करतो आणि जणू काही मी त्याला सांगितले की, काळच मला एकशे एकसष्टावे वर्ष लागले अशा थाटात दोन्ही हातांनी डोके गच्च धरतो. एकाच वेळी तीन दात दुखत असल्याप्रमाणे तो अक्षरशः कण्हतो :

"अयाई ग ! साडेसात ! अयाई ग !"

पण त्याची कणव येऊन मी रडू नये आणि तो थट्टा करतोय हे मला समजावे म्हणून अखेर तो कण्हायचा थांबतो मला चांगले दुखेल इतक्या जोराने तो आपली दोन बोटे माझ्या पोटात खुपसतो आणि जोरात ओरडतो :

"लौकरच सैन्यात भरती होणार ? आँ ?"

मग तो खेळाच्या सुरुवातीकडे परत वळतो. डोके हलवत आई-बाबांना म्हणतो :

"कमाल आहे, कमाल आहे ! एवढ्यात... साडेसात ! एवढ्यात !" आणि माझ्याकडे वळून पुढे म्हणतो : "अगदी एवढा छोटासा होतास तेव्हा पाहिला होता."

आणि तो हवेत वीस सेंटीमीटर मोजतो पण मला नक्की माहीत आहे की, त्या वेळी माझी लांबी एक्कावन्न सेंटीमीटर होती. आईपाशी तसा कागदसुद्धा आहे. कायदेशीर. पण ह्या मोठ्या माणसाच्या बोलण्याचा मी राग मानून घेत नाही. ते सगळे तारखेच. आता मला ठाम माहीत आहे की, त्याने विचारात पडले पाहिजे. आणि तो विचारात पडतो. अगदी खूप. तो स्वतःच्या छातीवर डोके टेकतो अगदी झोपला असे भासते. इथे मी त्याच्या हातून सुटण्याची हळूच धडपड करू लागतो. पण तो झोपलेला नव्हता फक्त मोठा माणूस आठवत होता की, त्याच्या खिशात आणखी कोणते प्रश्न होते. त्याला ते आठवतात आणि अखेरीस आनंदाने स्मित करत तो विचारतो

"अरे हो ! तू मोठेपणी कोण होणार ? आँ ? कोण व्हायची तुझी इच्छा आहे ?"

खरे सांगायचे तर मला गुंफा-संशोधक व्हायचे आहे, पण ह्या नव्या मोठ्या माणसाला



हे उत्तर नीरस वाटेल ह्याची मला जाणीव आहे. त्याला माझे उत्तर समजणार नाही, अपरिचित वाटेल. तर तो गोंधळून जाऊ नये म्हणून मी त्याला उत्तर देईन:

"मला आईस्क्रीमवाला व्हायचंय... त्याच्यापाशी नेहमी चिक्कार आईस्क्रीम असतं!"

नव्या मोठ्या माणसाचा चेहरा ताबडतोब उजळतो. सर्व ठीक, सर्व काही त्याच्या इच्छे-प्रमाणे चालले आहे, सर्व सुरळीत आहे. म्हणून तो माझ्या पाठीवर थाप मारतो – पाठ भरपूर दुखते – आणि वडीलधाऱ्या आवाजात म्हणतो:

"बरोब्बर! असं पाहिजे! शाब्बास!"

आणि इथे मी स्वतःच्या भाबडेपणाने विचार करतो की, आता सर्व संपले आणि थोड्याशा धिटाईने त्याच्या तावडीतून सुटण्याची खटपट करू लागतो. कारण माझ्यापाशी मुळीच सवड नाही, अजून गृहपाठ करायचा आहे आणि एकूण हजार उद्योग तटून पडलेले असतात. पण माझा मुक्ततेचा प्रयत्न त्याच्या ध्यानात येतो आणि त्या प्रयत्नाला तो मुळातून हाणून पाडतो. तो मला पायांनी आवळतो आणि हात गच्च पकडून धरतो. थोडक्यात, तो शारीरिक बळाचा वापर करतो आणि जेव्हा मी थकून माझी धडपड थांबवतो, तेव्हा तो मला मुख्य प्रश्न टाकतो:

"सांग बघू, माझ्या मित्रा..." जणू काही त्याच्या घशात साप वळवळतोय अशा धूर्तपणे तो म्हणतो, "सांग बघू, तुला जास्त कोण आवडतं? बाबा किंवा आई?"

मूर्ख प्रश्न. त्यात आणखी वाईट म्हणजे आई आणि बाबा असे दोघे समोर असताना. त्यातून सुटका करून घेणे आवश्यक ठरते.

"मिखाईल ताल्," मी म्हणेन.

तो खदखदा हसतो. असल्या चक्रम उत्तरांना ऐकले म्हणजे का कुणास ठाऊक, तो खूप खूष होतो. शंभर वेळा तो परत परत म्हणतो:

"मिखाईल ताल्! हा-हा-हा! कोणता? आँ? आता ह्यावर तुम्ही काय बोलणार, सुखी आई-बापांनो?"

आणि आणखी अर्धा तास तो हसत राहील. आई व बाबासुद्धा हसतील. मला त्यांची आणि स्वतःची लाज वाटेल. मी स्वतःशी प्रतिज्ञा करीन की, नंतर, हा भयानक प्रसंग संपल्यानंतर, नकळतपणे बाबांसाठी आईचा पापा घेईन आणि आईसाठी बाबांचा पापा घेईन. कारण त्या दोघांवरही माझे सारखेच प्रेम आहे. सा-र-खे-च! अगदी शप्पत! खरे तर ही एक साधी बाब आहे. पण मोठ्यांचे का कुणास ठाऊक, समाधान होत नाही. ह्या प्रश्नाचे प्रामाणिक आणि अचूक उत्तर देण्याचा मी अनेक वेळा प्रयत्न केला, पण नेहमी असे आढळले की, ह्या उत्तराने मोठे लोक नाराज झाले. जणू त्यांचा काहीतरी अपेक्षाभंग व्हायचा. त्या सर्वांच्या डोळ्यांमध्ये एकच भाव आढळतो: "अ रे रे, किती सामान्य उत्तर! तो आईवर आणि बाबावर सारखंच प्रेम करतो! किती नीरस पोरगा!"

म्हणून मी त्यांना मिखाईल ताल्बद्दलची थाप मारतो. खुशाल हसोत. तोवर माझ्या नव्या ओळखीच्याच्या पोलादी मिठीतून सुटण्याचा मी आणखी एकदा प्रयत्न करतो. पण छेः! तो

भलताच भक्कम. आता तो मला आणखी एक प्रश्न विचारणार. पण त्याच्या स्वरावरून मी तर्क करतो की, मामला संपत आला आहे. हा प्रश्न अत्यंत हास्यास्पद असणार. जेवणाच्या शेवटी गोड खायला देतात तसा. आता त्याच्या चेहऱ्यावर एकदम भीतीचा भाव उमटेल:

"आज तू तोंड का धुतलं नाहीस?"

अर्थात मी तोंड धुतलेले असते, पण तो कुठे चाललाय हे मला छान माहीत असते.

ह्या, जुनाट, अनेकवार खेळलेल्या खेळाला परत खेळण्याचा त्यांना कंटाळा कसा येत नाही?

पण उगीच लांबड नको म्हणून मी चेहरा पकडून म्हणतो:

"कुठं? काय? कुठं?"

अगदी अचूक! नेमके! मोठा माणूस तात्काळ तो शिळा-उष्टा विनोद करील:

"डोळ्यांचं काय?" धूर्तपणे तो विचारील. "असे काळे डोळे का? त्यांना धुतलं पाहिजे! ताबडतोब न्हाणीघरात जा!"

आणि अखेर तो मला मोकळा सोडतो! मी स्वतंत्र होतो आणि माझ्या उद्योगांकडे वळू शकतो.

छे:, ह्या नव्या ओळखी मला फार अवघड जातात! पण काय करणार? सर्व मुलांना ह्यातून पार पडावे लागते! ना मी पहिला, ना शेवटचा...

यात काहीही बदल करता येत नाही.

इवान कझ्लोवस्कींची कीर्ती

माझ्या प्रगती-पुस्तकात सर्व "उत्तम" शेरे आहेत. फक्त शुद्धलेखनात "चांगला" शेरा आहे. शाईचा डाग पाडला म्हणून. काय करावे मला समजत नाही! माझ्या पेनमधून नेहमी शाईचे डाग पडतात. मी फक्त निबाचे टोक शाईत बुडवतो, पण तरीही डाग पडतातच! अगदी आश्चर्यकारक आहेत हे डाग! एकदा मी आख्खे पान अगदी स्वच्छ, स्वच्छ लिहिले. "उत्तम" शेरा मिळणार अशी मला पूर्ण खात्री होती. सकाळी माझ्या शिक्षिका राईसा इवानोवना यांना मी ते पान दाखवले. पण बघतो तर पानाच्या ऐन मध्यभागी शाईचा डाग! कुठून आला? काल तर नव्हता! कदाचित दुसऱ्या पानावरून पाझरत आला? माहीत नाही...

तर असे मला सगळ्या विषयांमध्ये "उत्तम" शेरे आहेत. पण गाण्यात मात्र "बरा" त्याची हकीकत अशी. आमचा गाण्याचा धडा चालला होता. सुरुवातीला आम्ही सर्वांनी मिळून 'मैदानात उभे भोजाचे झाड' हे गाणे म्हटले. खूप छान वाटले. पण गायन मास्तर बरीस सेर्गेयेविच सतत कपाळाला आठ्या घालून ओरडत होते:

"स्वर लांबवा, मित्रांनो, स्वर लांबवा!.."

तेव्हा आम्ही स्वर लांबवू लागलो, पण बरीस सेर्गेयेविच हात आपटून म्हणाले :

"अगदी मांजरांची मैफल भरल्यासारखं वाटतंय! आता मी तुम्हा ए-के-क-टया-कडून म्हणवून घेतो!"

म्हणजे प्रत्येकाने स्वतंत्रपणे गाणे म्हणणे आले.

बरीस सेर्गेयेविचनी मीषाला बोलावले.

मीषा पियानोपाशी गेला व बरीस सेर्गेयेविच यांच्या कानात काहीतरी पुटपुटला.

तेव्हा बरीस सेर्गेयेविच वाजवू लागले आणि मीषा हळू आवाजात गाऊ लागला :

पातळ बर्फाच्या थरावर
पांढरे हिमकण सांडले...

मीषा फार गंमतीदार गात होता! आमचे मांजराचे पिलू मूर्झिक मी जेव्हा किटलीत कोंबू लागतो, तेव्हा ते जसे ओरडते, तसा तो ओरडत होता. गाणे काय असे म्हणतात? अजिबात काही ऐकू येत नव्हते. मला गप्प राहणे अशक्य झाले आणि मी खो खो हसलो.

तेव्हा बरीस सेर्गेयेविचनी मीषाला "उत्तम" शेरा लिहिला आणि माझ्याकडे नजर टाकली. ते म्हणाले :

"ए हसणाऱ्या, चल ये बघू!"

मी घाईने पळत पियानोपाशी गेलो.

"तर, आपण काय म्हणणार आहात?" बरीस सेर्गेयेविचनी नम्रपणे विचारले.

मी म्हणालो :

"यादवी युद्धाचं गाणं – 'घेऊन जा बुद्योन्नी, आम्हा रणांगणी.'"

बरीस सेर्गेयेविचनी मान हलवली व ते पियानो वाजवू लागले. पण मी त्यांना ताबडतोब थांबवले :

"जरा आणखी मोठ्यांदा वाजवा!" मी म्हणालो.

बरीस सेर्गेयेविच म्हणाले :

"मग तुझा आवाज ऐकू येणार नाही!"

पण मी म्हणालो :

"येईल. नक्की ऐकू येईल!"

बरीस सेर्गेयेविच वाजवू लागले आणि मी एक खोल श्वास छातीत भरून माझे आवडते गाणे गाऊ लागलो :

निरभ्र नभात उंच उंच
फडकतो लाल झेंडा...

मला हे गाणे फार आवडते. ते गाताना माझ्या नजरेसमोर निळे निळे आकाश उभे राहते,

उकाडा जाणवतो, घोडे चौखूर दौडत असतात, त्यांचे जांभळे सुंदर डोळे चमकत असतात आणि आकाशात लाल झेंडा फडकत असतो.

ह्या ठिकाणी अत्यंत आनंदापायी मी डोळे गच्च मिटले आणि खच्चून जोराने किंचाळलो:

चौफेर फेकले आम्ही घोडे
शत्रूच्या अंगावरती!
उडाली घनघोर रणधुमाळी...

मी चांगलाच ओरडत होतो. बहुधा पलिकडच्या रस्त्यापर्यंत माझा आवाज ऐकू जात होता:

जणू हिमानीसारखे
आम्ही पुढे दौडतोय!... हुर्रा!...
लाल सैनिकांचा नेहमीच जय होतो!!
वैऱ्यांनो, माघारी फिरा! शरण या!!!

माझ्या पोटाला मी मुठींनी आवळून धरल्यामुळे आवाज आणखी मोठा बनला, अगदी फुटायच्या बेतात होता:

आम्ही क्रिमिया जिंकला!

इथे मी गाणे थांबवले, कारण माझ्या सबंध अंगाला दरदरून घाम फुटला होता व माझे पायांचे गुडघे थरथरत होते.

बरीस सेर्गेयेविच पुढे वाजवत राहिले, पण ते पियानोवर अक्षरशः ओणवे झाले होते आणि त्यांचेही खांदे थरथरत होते...

मी म्हणालो:

"कसं काय वाटलं?"

"अद्भुत!" बरीस सेर्गेयेविचनी कौतुक केले.

"छान गाणं आहे ना?" मी विचारले.

"छान आहे," बरीस सेर्गेयेविच म्हणाले आणि त्यांनी रुमालाने डोळे मिटून धरले.

"फक्त एवढंच वाईट की, तुम्ही फार हळू वाजवलंत बरीस सेर्गेयेविच," मी म्हणालो, "यापेक्षा आणखी मोठ्यांदा वाजवता येईल."

"ठीक आहे, मी लक्षात ठेवीन," बरीस सेर्गेयेविच म्हणाले. "पण मी एक वाजवत होतो आणि तू थोडंसं वेगळंच गात होतास, हे तुझ्या लक्षात आलं नाही?"

"नाही," मी म्हणालो. "माझ्या हे लक्षात आलं नाही! पण ते महत्त्वाचं नाही. आणखी मोठ्यांदा वाजवायला पाहिजे होतं."

"ठीक आहे," बरीस सेर्गेयेविच म्हणाले, "ज्याअर्थी तुझ्या काहीही ध्यानात आलं



नाही, तर तुला "बरा" असा शेरा देतो. प्रयत्न केल्याबद्दल."

फक्त "बरा"? मी चक्क दचकलो. असे कसे शक्य होते? "बरा" म्हणजे अगदीच कमी! मीष्का हळू गायला आणि त्याला "उत्तम" शेरा मिळाला...

मी म्हणालो:

"बरीस सेर्गेयेविच, मी थोडी विश्रांती घेतली म्हणजे याहून मोठ्यांदा गाणं म्हणू शकेन. तुम्ही शंका बाळगू नका. आज माझी न्याहरी चांगली झाली नाही. नाहीतर मी असं गाऊ शकतो, की सगळ्यांचे कान बधीर होतील. मला आणखी एक गाणं येतं. जेव्हा घरी मी ते म्हणू लागतो, तेव्हा काय घडलं म्हणून शेजारी धावत येऊन विचारू लागतात."

"कोणतं गाणं?" बरीस सेर्गेयेविचनी विचारले.

"फार दुःखी आहे," मी म्हणालो आणि गाऊ लागलो:

मी तुमच्यावर प्रेम केलं:
कदाचित अजूनही प्रेम घडेल...

पण बरीस सेर्गेयेविच घाईघाईने म्हणाले:

"बरं, बरं, पुढच्या वेळी आपण ह्याचा निर्णय करू."

आणि तेवढ्यात तास संपल्याची घंटा झाली.

आई खालच्या मजल्यावर माझी वाट पहात उभी होती. आम्ही घरी जायला निघालो तेव्हा बरीस सेर्गेयेविच आमच्यापाशी आले.

स्मित करत ते माझ्या आईला म्हणाले: "शक्य आहे की तुमचा मुलगा पुढं लोबाचेवस्की अथवा मेन्देलेयेवएवढा प्रसिद्ध होईल. तो सूरीकोव अथवा कोल्त्सोवएवढा मोठा होऊ शकेल. जर तो निकोलाय मामाय अथवा दुसऱ्या एखाद्या मुष्टीयोद्ध्याप्रमाणं देशभर गाजला, तर मला त्याचं मुळीच आश्चर्य वाटायचं नाही. पण एक मात्र मी तुम्हाला ठामपणं सांगू शकतो: इवान कझ्लोवस्की या गायकाची कीर्ती त्याला कधीही लाभणार नाही. कधीही नाही!"

आई शरमेने लालबुंद झाली आणि म्हणाली:

"आत्ता काहीच सांगता येत नाही याबद्दल! पुढं पाहू!"

आम्ही घरी जात असताना माझ्या मनात सतत विचार येत होता:

"खरंच कझ्लोवस्की माझ्यापेक्षा जास्त मोठ्यांदा गातो काय?"

"कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय..."

मधल्या सुटीत आमची बालवीर पथकाची पुढारी ल्यूस्या माझ्यापाशी धावत आली आणि मला म्हणाली:

"देनीस, तू गाण्याच्या कार्यक्रमात भाग घेऊ शकशील? दोन मुलांच्या विनोदी गाण्याचा एक कार्यक्रम बसवायचा आम्ही ठरवलंय. तुझी इच्छा आहे?"

मी म्हणालो:

"माझी खूप इच्छा आहे! पण हे विनोदी गाणं कसलं?"

ल्यूस्या म्हणाली:

"आपल्याकडं खूप उणीवा आहेत... उदाहरण द्यायचं तर अभ्यासात कच्च्या असलेल्या किंवा आळशी मुलांना सुधारलं पाहिजे. समजलं? त्यांची अशी टिंगल करायची की, सगळीजणं हसली पाहिजेत आणि ती मुलं शुद्धीवर आली पाहिजेत."

मी म्हणालो:

"ती मुलं काही दारुडी नव्हेत, फक्त आळशी आहेत."

"तसं म्हणायची एक रीत आहे: शुद्धीवर आली पाहिजेत!" ल्यूस्या हसत म्हणाली. "पण प्रत्यक्षात ही मुलं गंभीरपणं स्वतःबद्दल विचार करतील, त्यांना लाज वाटेल आणि ती आपल्या चुका सुधारतील. समजलं? तर उगीच लांबड लावू नको: इच्छा असेल तर हो म्हण, नसेल इच्छा – नाही म्हण!"

मी म्हणालो:

"ठीक आहे. मी तयार आहे!"

तेव्हा ल्यूस्याने विचारले:

"तुला जोडीदार आहे?"

"नाही."

ल्यूस्या चकित होऊन म्हणाली:

"तू मित्राशिवाय कसा काय जगतोस?"

"मला मित्र आहे. मीष्का. पण जोडीदार नाही."

ल्यूस्या परत हसून म्हणाली:

"ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ जवळ जवळ एकच. तुझ्या मीष्काला संगीताची जाण आहे?"

मी म्हणालो:

"नाही. तो साधा आहे."

"गाणं म्हणू शकतो?"

"फार हळू. पण मी त्याला मोठ्यांदा गाणं म्हणायला शिकवीन. तू चिंता करू नको."

आता ल्यूस्या आनंदून म्हणाली:

"धडे संपल्यानंतर त्याला छोट्या हॉलमध्ये घेऊन ये. तिथं तालीम होईल!"

आणि मी चारही दिशांना मीष्काचा शोध घेऊ लागलो. तो कँटीनमध्ये उभा होता आणि कबाब खात होता.

मी म्हणालो:

"मीष्का, विनोदी गाणं म्हणायची इच्छा आहे?"

तो म्हणाला:

"जरा थांब, मला खाऊन संपवू दे."

मी उभा राहून तो कसे खातो ते पाहू लागलो. तो स्वतः अगदी छोटा होता आणि कबाब त्याच्या मानेपेक्षा जाड होता. त्याने हा कबाब हातात धरला होता व सुरीने न कापता तसाच आख्खा तोंडात घालत होता. जेव्हा तो कबाबाचा चावा घेत होता, तेव्हा कबाबाचे आवरण तडकायचे आणि आतून गरम, खमंग वासाचा रस बाहेर पाघळायचा. ते पाहून माझ्या तोंडालाही पाणी सुटले आणि कॅंटीनच्या कात्या मावशीला मी म्हणालो:

"मलाही एक कबाब लौकर द्या!"

आणि कात्या मावशीने ताबडतोब मला बशीत एक कबाब दिला. मीष्काने माझ्याआधी कबाब खाऊन संपवू नये म्हणून मी माझा कबाब खाण्याची घाई केली, कारण मला एकट्याला तो कबाब तेवढा चवदार वाटला नसता. तर मीसुद्धा माझा कबाब हातात धरला आणि वेष्टन न काढता चावा मारला. माझ्या कबाबामधूनही गरम खमंग रस ओघळू लागला. कबाब चघळून खात असताना आम्ही दोघे एकमेकांकडे पाहून हसत होतो आणि गरम कबाबांमुळे आमच्या हातांची बोटे भाजत होती.

मग मी त्याला विनोदी गाण्याबद्दलची सगळी हकीकत सांगितली. तो कबूल झाला. धडे संपायची आम्ही अधीरपणे वाट पहात होतो. शाळा सुटताच तालमीसाठी आम्ही छोट्या हॉलकडे धाव घेतली.

तेथे आमची पुढारीण ल्यूस्या बसली होती आणि तिच्याशेजारी एक मुलगा बसला होता. तो बहुधा चौथीच्या वर्गातील असावा. तो मुळीच सुंदर नव्हता, त्याचे कान छोटे होते आणि डोळे मोठ्ठे बटबटीत होते.

ल्यूस्या म्हणाली:

"हे पहा ते! ओळख करून घ्या: हा आपला शाळेचा कवी, आंद्रेय शेस्ताकोव."

आम्ही म्हणालो:

"राम राम!"

आणि आम्ही तोंडे फिरवली, त्याने फार भाव खाऊ नये म्हणून.

कवी ल्यूस्याला म्हणाला:

"हे गाणं म्हणणार आहेत काय?"

"हो."

तो म्हणाला:

"ह्यापेक्षा मोठी मुलं नाही सापडली?"

ल्यूस्या म्हणाली:

"उलट आपल्याला हवी तशीच मिळालीत!"

तेवढ्यात आमचे गायन-मास्तर बरीस सेर्गेयेविच तेथे आले. ते थेट पियानोकडे गेले:

"तर, सुरू करू या! कविता कुठं आहे?"

आंद्रयूष्काने खिशातून कसलातरी कागदाचा कपटा बाहेर काढत म्हटले:

"ही घ्या. गाढव, आजोबा आणि नातू ह्यांच्याबद्दलच्या मार्शाकच्या कवितेचा ताल आणि छंद यावर मी माझी कविता बेतलीय – 'कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय ...'"

बरीस सेर्गेयेविचनी डोके हलवून म्हटले:

"वाच मोठ्यांदा!"

आन्द्रयूष्का वाचू लागला:

वास्याचे बाबा आहेत गणितात हुषार,
शिकतात वास्यासाठी बाबा वर्षभर.
कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय,
गणितं सोडवायची बाबांनी आणि भाव खायचा वास्यानं?

मीष्का आणि मी खी खी हसलो खरेच, मुले अनेकदा आपल्या आई-वडिलांना गृहपाठ करायला सांगतात आणि नंतर शिक्षकांसमोर भरपूर भाव खातात. पण वर्गात फळ्यापाशी त्यांना बोलावून प्रश्न विचारले म्हणजे मात्र ठण ठण बोंब – "कच्चा" असा शेरा मिळतो! सर्वांना माहीत होते. शाब्बास आन्द्रयूष्का, मस्त पकडले!

आन्द्रयूष्का पुढे गंभीरपणे वाचत होता:

खडूचे चौकोन पसरलेत रस्ताभर,
मान्या आणि तान्या त्यावर मारताहेत उड्या.
कुठं असं दिसलंय, कुठं असं पाहिलंय,
काचा-पाण्याच्या खेळापायी शाळेला दांडी?

परत मस्त. आम्हाला कविता खूप आवडली. हा आन्द्रयूष्का खरोखरच हुषार होता, पूष्कीनसारखा!

बरीस सेर्गेयेविचनी कविता ऐकल्यावर म्हटले:

"ठीक आहे, वाईट नाही! संगीत अगदी साधं असेल, ह्या अशासारखं काहीतरी." आणि त्यांनी आन्द्रयूष्काची कविता घेऊन हळू आवाजात पियानो वाजवत सर्व ओळी म्हटल्या.

चाल फार छान वाटली आणि आम्ही आनंदाने टाळ्या पिटल्या.

बरीस सेर्गेयेविच म्हणाले:

"तर, कोण गाणार आहेत?"

ल्यूस्याने माझ्याकडे आणि मीष्काकडे बोट दाखवले.

"हे बघा!"

“अस्सं,” बरीस सेर्गेयेविच म्हणाले, “मीष्काला तालाचा चांगला कान आहे... पण देनीस मात्र सुरात गात नाही!”

मी म्हणालो:

“पण मी मोठ्यांदा गाऊ शकतो.”

संगीताच्या साथीवर आम्ही ह्या ओळी परत परत म्हणू लागलो. निदान पन्नास किंवा हजार वेळा आम्ही त्या ओळी परत परत म्हटल्या. मी खूप मोठ्यांदा ओरडत होतो व सगळेजण मला शांत करायचा प्रयत्न करत होते आणि ताकीद देत होते:

“तू घाबरू नको! हळू म्हण! शांतपणं! एवढ्या मोठ्यांदा ओरडू नको!..”

आन्द्र्यूष्का विशेष चिडला होता. त्याने मला पुरते अस्वस्थ केले. पण मी मोठ्यांदाच गात होतो, हळू आवाजात गाण्याची माझी इच्छा नव्हती, कारण मोठ्यांदा गातात तेव्हाच ते अस्सल गाणे!

...एक दिवस मी शाळेत आलो तेव्हा वार्ताफलकावर जाहीर सूचना मला दिसली:

जाहीर सूचना!
आज मोठ्या सुटीत छोट्या हॉलमध्ये
कार्यक्रम सादर करत आहेत
“बालवीरांचे औपरोधिक गाणे!”
गायक – पहिलीमधील दोन मुलगे!
सर्वांनी अवश्य यावे!

माझ्या काळजाचा ठोका चुकला. मी वर्गात धावलो. तेथे मीष्का बसला होता व खिडकी-बाहेर पहात होता. मी म्हणालो:

“आज आपला कार्यक्रम आहे!”

मीष्का एकदम तोंडातल्या तोंडात बरळला:

“माझी इच्छा नाही गायची...”

मी थक्क झालो. इच्छा नाही म्हणजे? आम्ही किती तालमी केल्या? ल्यूस्या आणि बरीस सेर्गेयेविच काय म्हणतील? आन्द्र्यूष्का? शिवाय सर्व मुलांनी कार्यक्रमाची जाहिरात वाचलीय आणि सगळेजण नक्की येणार! मी म्हणालो:

“तुला काय वेड लागलं? लोकांना खोटं पाडतोस?”

मीष्का तक्रारीच्या सुरात म्हणाला:

“माझ्या पोटात दुखायला लागलंय.”

मी म्हणालो:

“भीती वाटतेय म्हणून असं होतंय. माझ्यासुद्धा पोटात दुखतंय, पण मी गाणं म्हणायला नकार देत नाही!”

मीष्का विचारात गढल्यासारखा दिसत होता. मोठ्या सुटीत सर्व मुले छोट्या हॉलमध्ये धावली. मी आणि मीष्का मात्र सर्वांच्या मागून रडतखडत चालत होतो. कारण माझीसुद्धा गाण्याची इच्छा एकदम नाहीशी झाली होती. तेवढ्यात ल्यूस्या आमच्या दिशेने धावत आली. तिने आमचे हात गच्च पकडले व आम्हाला ती खेचत नेऊ लागली. माझे पाय बाहुलीप्रमाणे एकदम मऊ बनले होते आणि मीष्काच्या पोटदुखीचा संसर्ग मलाही बाधला होता.

हॉलमध्ये पियानोपाशी मोकळी जागा राखून ठेवलेली होती व सर्व वर्गांमधल्या मुलांनी, शिक्षकांनी भोवती गर्दी केली होती.

मी आणि मीष्का पियानोपाशी उभे राहिलो.

बरीस सेर्गेयेविच एव्हाना पियानोजवळ बसले होते आणि ल्यूस्याने अस्सल निवेदिकेच्या आवाजात जाहीर केले:

"बालवीरांचा उपहासात्मक कार्यक्रम सुरू होत आहे. आजच्या दिवसांमधल्या विषयांवर. लेखक, आंद्रेय शेस्ताकोव. जागतिक कीर्तीचे विनोदी नट मीषा आणि देनिस सादर करत आहेत!"

मी आणि मीष्का थोडेसे पुढे सरकलो. मीषाचा चेहरा भिंतीसारखा पांढरा पडला होता. माझ्या तोंडाला कोरड पडली होती आणि जिभेवर काटे फुलल्याचा भास होत होता.

बरीस सेर्गेयेविच पियानो वाजवू लागले. सुरुवात मीष्काने करायची होती, कारण पहिल्या दोन ओळी त्याने म्हणायच्या व नंतरच्या दोन ओळी मी म्हणायच्या असे ठरले होते. तर बरीस सेर्गेयेविच पियानो वाजवू लागले आणि मीष्काने डावा हात वर उचलला – ल्यूस्याने त्याला शिकवले होते त्याप्रमाणे – आणि आता तो गाणे म्हणायला सुरवात करणार होता, तेवढ्यात त्याला उशीर झाला आणि तो ताळ्यावर येईपर्यंत माझी वेळ येऊन ठेपली होती. संगीताप्रमाणे. पण मीष्काने उशीर केला होता म्हणून मी माझ्या ओळी गायल्या नाहीत. काय अर्थ होता!

मीष्काने हात खाली केला.

बरीस सेर्गेयेविचनी मोठ्यांदा आणि सावकाशपणे परत वाजवायला सुरुवात केली. तीनदा त्यांनी ठरल्याप्रमाणे पट्टीवर बोट आपटले आणि चौथ्यांदा मीष्काने परत हात वर उचलला व अखेरीस तो गाऊ लागला:

> वास्याचे बाबा आहेत गणितात हुषार,
> शिकतात वास्यासाठी बाबा वर्षभर.

मी पटकन सूर पकडून जोरात ओरडलो:

> कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय,
> गणितं सोडवायची बाबांनी आणि भाव खायचा वास्यानं?

हॉलमध्ये असलेले सगळे खो खो हसू लागले आणि त्यामुळे माझ्या छातीवरचे दडपण हलके झाले. बरीस सेर्गेयेविच पुढे वाजवू लागले. त्यांनी परत तीनदा पट्टीवर बोट आपटले, चौथ्यांदा मीष्काने अचूकपणे डावा हात वर उचलला व अचानक पहिल्याच ओळी तो परत गाऊ लागला :

वास्याचे बाबा आहेत गणितात हुषार,
शिकतात वास्यासाठी बाबा वर्षभर.

तो चुकला होता हे माझ्या पटकन ध्यानात आले! पण आता असे घडले होते म्हणून मी ते कडवे शेवटपर्यंत गाण्याचे ठरवले. पुढचे पुढे. तर मी गाऊ लागलो :

कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय,
गणितं सोडवायची बाबांनी आणि भाव खायचा वास्यानं?

देवाची कृपा—हॉलमध्ये शांतता टिकली. सर्वांच्या ध्यानात आले की, मीष्का चुकला होता आणि त्यांनी विचार केला होता : "त्यात काय विशेष, अशी चूक होते कधी कधी. गाऊ दे त्याला पुढे!"

पण दरम्यान संगीत पुढे पुढे धावत होते. मीष्काचा चेहरा काहीसा हिरवा दिसू लागला होता.

त्याने सुरुवात करण्याच्या जागी संगीत पोहोचले तेव्हा त्याने परत डावा हात वर केला आणि ग्रामोफोनची सुई अडकलेल्या तबकडीप्रमाणे तिसऱ्यांदा तो गाऊ लागला :

वास्याचे बाबा आहेत गणितात हुषार,
शिकतात वास्यासाठी बाबा वर्षभर.

त्याच्या टाळक्यावर एखादी जड वस्तू मारण्याची मला जबरदस्त इच्छा झाली होती आणि म्हणून मी संतापाने किंचाळलो :

कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय,
गणितं सोडवायची बाबांनी आणि भाव खायचा वास्यानं?

"मीष्का, तू अगदीच कामातून गेलास! तिसऱ्यांदा त्याच त्याच ओळी काय उगाळतोस? पोरींबद्दलच्या ओळी म्हण!"

मीष्का उर्मटपणे उत्तरला :

"तू मला शिकवायची गरज नाही!" आणि आर्जवी सुरात बरीस सेर्गेयेविचना म्हणाला : "बरीस सेर्गेयेविच, मी तयार आहे. पुढे वाजवा!"

बरीस सेर्गेयेविच वाजवू लागले. मीष्का अचानक धीट दिसू लागला. त्याने परत डावा हात वर उचलला आणि चौथ्यांदा त्याच ओळी तो म्हणू लागला :

वास्याचे बाबा आहेत गणितात हुषार,
शिकतात वास्यासाठी बाबा वर्षभर.

सबंध हॉलमध्ये हसण्याचा एकच कल्लोळ उठला त्या गर्दीत मला आन्द्रचूष्काचा केविलवाणा चेहरा दिसला. ल्यूस्या लालबुंद बनली होती आणि विस्कटलेल्या अवतारात गर्दीतून वाट काढत आमच्या दिशेने येत होती. आणि स्वतःवरच चकित झाल्याप्रमाणे मीष्का तोंडाचा आ वासून उभा होता. दरम्यान मी माझे अर्धे कडवे खच्चून बोंबलत होतो:

कुठं असं दिसलंय, कुठं असं ऐकलंय,
गणितं सोडवायची बाबांनी आणि भाव खायचा वास्यानं?

आता काहीतरी भयंकर घडत होते. हसण्याची लागण सबंध हॉलभर पसरली होती मीष्काचा रंग आता हिरव्याऐवजी जांभळा बनला होता. आमच्या ल्यूस्याने त्याचा हात पकडून त्याला स्वतःकडे खेचले. ती ओरडली:

"देनीस, तू एकटाच गाणं म्हण! आपली लाज घालवू नको!.. गा पुढं!.."

मी पियानोपाशी उभा राहिलो आणि आमची अब्रू राखण्याचा निर्णय केला. मला आता कसलीही भीती वाटत नव्हती. ठेका येताच का कुणास ठाऊक, मी डावा हात वर उचलला आणि अगदी अनपेक्षितपणे गाऊ लागलो:

वास्याचे बाबा आहेत गणितात हुषार,
शिकतात वास्यासाठी बाबा वर्षभर.

पुढे काय घडले ते मला नीटसे आठवत नाही. भूकंपासारखे काहीतरी झाले होते. मला वाटले, कोणत्याही क्षणी मी जमिनीखाली गडप होणार, पण भोवती सर्वांची हसून हसून मुरकुंडी वळली होती.

ह्या नतद्रष्ट गाण्यापायी मी मेलो कसा नाही ह्याचे मला आश्चर्य वाटते. जर सुटी संपल्याची घंटा वाजली नसती, तर बहुधा मी मेलो असतो...

यापुढे कधीही विनोदी गाणी म्हणणार नाही!

चित्त्यावरचे हिरवे ठिपके

मी, मीष्का आणि आल्योन्का घरव्यवस्थापन कचेरीजवळ वाळूत बसलो होतो आणि अंतराळयान सोडण्यासाठी वाळूत खड्डा खणत होतो. आम्ही एव्हाना खळगा बनवला होता आणि अग्निबाणासाठी मधे मोकळी जागा सोडून भोवती विटांचे व काचांचे तुकडे बसवले होते. मी एक बादली आणली व तिच्यात सर्व उपकरणे भरली.

मीष्का म्हणाला :

"अग्निबाणाखाली एक बोगदा खणला पाहिजे, म्हणजे अग्निबाण उडायच्या वेळी धूर ह्या बोगद्यातून बाहेर जाईल."

आम्ही परत खणाखणी सुरू केली आणि खूपच लौकर दमलो, कारण तेथे खूप दगड होते.

आल्योन्का म्हणाली :

"मी दमले! विश्रांती!"

मीष्का म्हणाला :

"अगदी बरोबर! विश्रांती!"

आणि आम्ही बसून विश्रांती घेऊ लागलो.

तेवढ्यात कोस्तिक तेथे आला. तो एवढा हडकुळा बनला होता की त्याला ओळखणे अवघड ठरले होते. त्याचा चेहरा अगदी पांढराफटक दिसत होता. तो आमच्यापाशी येऊन म्हणाला :

"सलाम, दोस्तांनो!"

आम्ही सगळे म्हणालो :

"सलाम, कोस्तिक!"

तो आमच्यापाशी हळूच बसला.

मी म्हणालो :

"तू एवढा हडकुळा का झालास कोस्तिक? अगदी हाडांचा सापळा!.."

तो म्हणाला :

"मला गोवर आला होता."

आल्योन्काने मान वर केली :

"आता तू बरा झालास?"

"हो," कोस्तिक म्हणाला. "आता मी पूर्ण बरा झालोय."

मीष्का कोस्तिकपासून दूर होत म्हणाला :

"मला लागण होणार नाही?"

कोस्तिक हसून म्हणाला :

"नाही होणार, तू घाबरू नको. माझा संसर्ग बाधणार नाही. काल डॉक्टर म्हणाले की, आता मी इतर मुलांमध्ये मिसळू शकतो."

मीष्का परत जवळ सरकला आणि मी विचारले :

"आजारी होतास तेव्हा खूप दुखत होतं?"

"नाही," कोस्तिक उत्तरला. "दुखत नव्हतं. पण खूप कंटाळा यायचा. बाकी विशेष नाही. मला प्रत्येकजण चिकटचित्रं भेट म्हणून देत होता आणि मी सारा वेळ ती चित्रं चिकटवत होतो. अगदी वैतागलो."

आल्योन्का म्हणाली :

"खरंच, आजारी पडणं छान असतं! आपण आजारी पडलो म्हणजे नेहमी काहीतरी भेटी मिळतात."

मीष्का म्हणाला :

"आजारी नसतानासुद्धा भेटी मिळतातच. वाढदिवसाच्या वेळी किंवा नव्या वर्षाच्या सणात."

मी म्हणालो :

"आणखी भेटी मिळतात जेव्हा "उत्तम" शेरा मिळवून दुसऱ्या वर्गात जातोस."

मीष्का म्हणाला :

"मला नाही मिळत भेटी. कारण सगळ्या विषयात फक्त "बरा" शेरा! पण जेव्हा गोवर येतो तेव्हा काहीही खास भेटवस्तू मिळत नाही, कारण नंतर सगळी खेळणी जाळून टाकावी लागतात. फार वाईट आजार आहे गोवर. मुळीच फायद्याचा नाही."

कोस्तिकने विचारले : "म्हणजे, चांगले आजार असतात?"

"हो तर," मी म्हणालो, "किती नांवं घेऊ? उदाहरणार्थ, कांजिण्या. फार छान, मजेदार आजार. मी जेव्हा कांजिण्यांनी आजारी होतो, तेव्हा माझ्या अंगावरच्या प्रत्येक कांजणीला हिरवं औषध माखलं होतं. मी चित्त्यासारखा दिसत होतो. बोला, काय वाईट आहे?"

"अर्थातच छान आहे," कोस्तिक म्हणाला.

आल्योन्का माझ्याकडे टक लावून पहात म्हणाली :

"अंगावर पुरळ उमटतो, तोसुद्धा सुंदर आजार आहे."

मीष्का खूप हसला :

"काय पण बोलते : "सुंदर" म्हणे! दोन-तीन ठिपके फासतात, तेवढ्यात सुंदरपण खलास! नाही, पुरळ अगदीच फालतू आजार. मला सर्वांत जास्त आवडतो फ्लू ताप. फ्लू ताप चढला म्हणजे चहा आणि रास्बेरीचा मुरंबा देतात. पाहिजे तेवढा खावा. अगदी विश्वास बसत नाही. एकदा मी फ्लू तापानं आजारी होतो तेव्हा मुरंब्याची आख्खी बरणी फस्त केली. आई अगदी थक्क झाली. म्हणाली : 'बघा, पोराला फ्लू ताप चढलाय, अडतीस अंश सेंटीग्रेड ताप आहे, पण भूक पहा!' त्यावर आजी म्हणाली : 'फ्लू तापाचे वेगवेगळे प्रकार असतात. ह्याच्या तापाचा हा नवाच प्रकार दिसतोय. त्याला आणखी द्या खायला. त्याच्या शरीराची ती मागणी आहे.' मला त्यांनी आणखी मुरंबा दिला, पण मला अधिक खाता येईना. फार वाईट वाटतं... कदाचित फ्लू तापामुळं मी जास्त खाऊ शकलो नाही."

मीष्काने गालावर हाताची मूठ टेकवली आणि तो विचारात पडला. मी म्हणालो :

"फ्लू ताप अर्थातच छान आजार आहे, पण मी टॉन्सिलबरोबर त्याची मुळीच तुलना करणार नाही."

"त्यात काय विशेष?"

"विशेष म्हणजे," मी म्हणालो, "जेव्हा टॉन्सिल कापतात, तेव्हा नंतर आईस्क्रीम खायला देतात. तुझ्या मुरंब्यापेक्षा हे कितीतरी छान!"

आल्योन्का म्हणाली:

"टॉन्सिल कशा होतात?"

मी म्हणालो:

"सर्दीपासून. टॉन्सिलच्या गाठी नाकात उगवतात, अळंब्यांप्रमाणं. कारण नाकात ओल असते."

मीष्का उसासा टाकून म्हणाला:

"सर्दी हा आजार अगदी भिकार आहे. नाकात कसलेतरी थेंब टाकतात आणि मग नाक जास्तच वाहायला लागतं."

मी म्हणालो:

"रॉकेल प्यायचं अशा वेळी. म्हणजे तोंडाला वास येत नाही."

"रॉकेल कशाला प्यायचं?"

मी म्हणालो:

"प्यायचं नाही, तोंडात धरून ठेवायचं. जादूगार असं तोंडात रॉकेल भरून घेतो. मग जळती काठी हातात धरतो आणि तिच्यावर चूळ मारतो! आगीचं खूप सुंदर कारंजं उडतं! अर्थात जादूगाराला त्यातलं गुपित माहीत असतं. ती युक्ती माहीत नसली तर काहीही जमणार नाही."

"सर्कसमध्ये बेडूक गिळून दाखवतात," आल्योन्का म्हणाली.

"हो, हो," कोस्तिक म्हणाला, "घुशीसुद्धा खातात! लोकांनी हसावं म्हणून!"

"आणि सुसरीसुद्धा!" मीष्काने भर घातली.

माझी हसून मुरकुंडी वळली. किती खोटेपणा! सुसरी टणक कातडीपासून बनवलेल्या असतात हे सर्वांना ठाऊक आहे. मग त्यांना कसं खाणार?"

मी म्हणालो:

"मीष्का, तुझं डोकं फिरलंय असं दिसतंय! सुसर एवढी टणक असताना तू तिला खाणार कसा? सुसरीला चघळून चावणं शक्य नाही."

"उकडल्यानंतर?" मीष्का म्हणाला.

"कमाल आहे! सुसर स्वतःला उकडून घेईल होय?" मी मीष्कावर ओरडलो.

"सुसरीचे सुळे मोठ्ठे असतात," आल्योन्का म्हणाली. जणू समोर सुसर दिसावी अशी ती घाबरलेली होती.

कोस्तिकने भर घातली:

"सुसर रोज एका ट्रेनरला खाते!"

आल्योन्का म्हणाली:

"खरंच?" तिचे डोळे पांढऱ्या बटणांप्रमाणे दिसू लागले.

कोस्तिक एका बाजूला पचकन थुंकला.

आल्योन्का ओठ मुरडून म्हणाली:

"मघाशी छान गोष्टींबद्दल बोलत होतो—अळंब्या आणि पुरळासंबंधी, पण आता सुसरीच्या गोष्टी सुरू केल्यात. मला त्यांची भीती वाटते..."

मीष्का म्हणाला:

"आजारांबद्दल आतापर्यंत सर्व बोलून झालं. उदाहरण घ्यायचं तर खोकला—काय त्याचा उपयोग? फक्त शाळेत जावं लागत नाही, एवढाच एक फायदा!"

"तेसुद्धा काय कमी आहे?" कोस्तिक म्हणाला. "एकूण तुम्ही बरोबर बोललात: जेव्हा आजारी असतोस तेव्हा सगळेजण जास्त प्रेम करतात. त्याची तुलना करता येत नाही..."

"गोड शब्द बोलतात," मीष्का म्हणाला, "कुरवाळतात... माझ्या ध्यानात आलंय: आजारी असताना काहीही मागता येतं. हवं ते खेळणं, किंवा बंदूक, किंवा कबीजा."

मी म्हणालो:

"अर्थातच. महत्त्वाचं म्हणजे आजार जास्तीत जास्त भयानक असावा. जर पाय अथवा मान मोडून घेतलीस, तर काय पाहिजे ते विकत घेऊन देतात."

आल्योन्का म्हणाली:

"सायकलसुद्धा?"

कोस्तिक ख्याक् हसला:

"पाय मोडला असताना सायकल काय करायची?"

"पाय तिच्याबरोबर बरा होईल!" मी म्हणालो.

कोस्तिक म्हणाला:

"खरं?"

मी म्हणालो:

"मग, दुसरं काय करू शकणार? काय, मीष्का?"

मीष्काने डोके हलवले आणि आल्योन्काने गुडघ्यांपर्यंत फ्रॉक ताणत विचारले:

"मग असं का होतं, जेव्हा भाजतं, किंवा टेंगूळ येतं, किंवा काळा-निळा डाग अंगावर उमटतो, तेव्हा उलट आपल्याला आणखी चोप मिळतो? असं का होतं?"

"हे योग्य नाही!" मी म्हणालो आणि आमची उपकरणे भरून ठेवलेल्या बादलीला लाथ मारली.

कोस्तिकने विचारले:

"इथं तुम्ही काय खणत होता?"

मी म्हणालो:

"अंतराळयान सोडण्यासाठी तळ बनवत होतो."

कोस्तिक अक्षरशः ओरडला.

"अरे मग गप्प काय बसलात? पट्टेवाले सैतान! बडबड बंद करा. लौकर तळ बांधायला सुरुवात करा!"

आम्ही बडबड बंद केली व अंतराळयानासाठी तळ बांधू लागलो.

आणि आम्हीसुद्धा!..

ज्या क्षणी आम्हाला समजले की, आमचे अंतराळवीर एकमेकांना 'बहिरीससाणा' आणि 'सोनेरी गरुड' अशा नांवांनी हाक मारतात, त्या क्षणापासून आम्ही ठरवले की, आता यापुढे मी सोनेरी गरुड आणि मीष्का – बहिरीससाणा. कारण आम्ही मोठेपणी अंतराळवीर व्हायचे ठरवले होते व 'बहिरीससाणा' आणि 'सोनेरी गरुड' ही किती छान नांवे होती! मी आणि मीष्काने ठरवले की, जोवर आम्हाला अंतराळवीरांच्या शाळेत दाखल व्हायला वेळ आहे, तोवर आमचे आम्हीच थोडे थोडे पोलादासारखे कणखर बनायला लागू. असे ठरवल्यानंतर मी ताबडतोब घरी गेलो आणि कणखर बनायला सुरुवात केली.

मी शॉवरखाली उभा राहिलो आणि पहिल्यांदा गरम पाण्याचा नळ सोडला. नंतर उलट गार पाण्याचा नळ सोडला. हा प्रकार मी अगदी सहज सोसला. तेव्हा मला वाटले की, ज्याअर्थी मामला इतका छान जमतोय, तर यापेक्षा आणखी थोडे कणखर व्हायला हरकत नाही व फक्त थंड पाण्याचा नळ सोडला. ओहो-हो! माझ्या पोटात एकदम खड्डा पडला आणि अंगभर काटे फुलले.

तर असा अर्धा तास किंवा पाच मिनिटे मी उभा राहिलो आणि कणखर बनलो! मग अंगात कपडे घालत असताना मला आठवण झाली की, थंडीने निळया पडलेल्या आणि थरथर कापणाऱ्या एका लहान मुलाबद्दलची कविता आजीने मला कशी वाचून दाखवली होती.

जेवणानंतर माझे नाक गळू लागले आणि मी शिंका देऊ लागलो.

आई म्हणाली:

"ॲस्पिरीनची गोळी घे, उद्या खणखणीत बरा होशील. जाऊन झोप बघू! आज पुरे झालं उनाडणं!"

माझा अगदी विरस झाला. मी रडायच्या बेतात होतो, तेवढयात खिडकीखालून आरोळी ऐकू आली:

"सोनेरी गरुड!.. ए सोनेरी गरुड!.. अरे ए सोनेरी गरुडा!.."

मी खिडकीपाशी धावत जाऊन बाहेर वाकून पाहिले. मीष्का खाली उभा होता!

मी म्हणालो:

"तुला काय पाहिजे, बहिरीससाण्या?"

तर तो म्हणाला :

"चल, अंतराळकक्षेत ये!"

"आई सोडत नाही. मला थंडी बाधलीय!"

आईने माझे पाय खेचत म्हटले :

"एवढा खाली वाकू नको! पडशील! कुणाशी तू बोलतो आहेस?"

मी म्हणालो :

"माझ्याकडं मित्र आलाय. अंतराळातला भाऊ. तू मला त्रास देते आहेस!"

पण आई खंबीर आवाजात म्हणाली :

"खाली वाकू नको!"

मी मीष्काला म्हणालो :

"आई मला खाली वाकू देत नाही..."

मीष्काने थोडासा विचार केला आणि मग तो आनंदाने म्हणाला :

"वाकू देत नाही हे बरोबरच करते आहे. त्यामुळं खाली न वाकण्याची तुझी कसोटी लागेल!"

तेव्हा मी तरीही थोडा खाली वाकलो आणि त्याला हळूच म्हणालो :

"अरे माझ्या बहिरीससाण्या! इथं मला बहुधा दिवसभर कैद भोगावी लागणार!"

मीष्काने परत स्वतःच्या मनाने अर्थ लावला :

"फारच छान! उत्तम प्रशिक्षण! डोळे मिटून घे आणि एकाकी खोलीत असल्याप्रमाणं निजून रहा!"

मी म्हणालो :

"संध्याकाळी मी तुझ्याशी टेलिफोनवरून दळणवळण साधतो."

"ठीक आहे," मीष्का म्हणाला. "तू माझ्याशी साध आणि मी तुझ्याशी."

आणि तो निघून गेला.

मी बाबांच्या दिवाणावर आडवा झालो व डोळे मिटून गप्प राहण्याचा सराव करू लागलो. मग उठलो आणि व्यायाम केला. मग गवाक्षामधून अज्ञात जग न्याहाळून पाहिले. नंतर बाबा आले आणि मी नैसर्गिक पदार्थांचे जेवण घेतले. प्रकृती उत्तम होती. मी घडीची कॉट आणली व तिला उलगडू लागलो.

बाबा म्हणाले :

"आज एवढ्या लौकर?"

मी समजूतदारपणे म्हणालो :

"तुम्हाला हवं ते करा, पण मी झोपणार."

आई माझ्या कपाळावर हात ठेवत म्हणाली :

"पोराला बरं वाटत नाही!"

मी तिला काहीच म्हणालो नाही. माझा सगळा उद्योग म्हणजे अंतराळवीराचा सराव आहे हे जर त्यांना समजत नाही, तर कशाला उगीच खुलासे करत बसायचे? काही गरज नव्हती. नंतर जेव्हा माझ्यासारखा मुलगा वाढवल्याबद्दल त्यांचे आभार मानायला लागतील, तेव्हा वर्तमानपत्रामधून त्यांना सगळे समजेल!

मी विचार करत होतो त्या दरम्यान बराच वेळ उलटून गेला होता. मला आठवण झाली की, मीष्काशी टेलिफोनवरून दळणवळण साधण्याची वेळ झाली होती.

कॉरीडॉरमध्ये जाऊन मी नंबर फिरवला. मीष्का ताबडतोब फोनवर आला, पण त्याचा आवाज काहीसा जाडजूड भासला:

"हं-हं! बोला!"

मी म्हणालो:

"बहिरीससाण्या, तू?"

तो म्हणाला:

"काय-काय?"

मी परत:

"बहिरीससाण्या, तू बोलतोस अथवा दुसरा कुणी? मी सोनेरी गरुड! कसं काय?"

तो हसला, फोनमध्ये त्याने श्वास सोडला आणि तो म्हणाला:

"फारच मजेशीर! पण आता पुरे झाला खेळ. सोनेच्का, तू बोलते आहेस?"

मी म्हणालो:

"आणखी कुठली आलीय सोनेच्का, मी सोनेरी गरुड! तुझं डोकं फिरलंय का?"

तो म्हणाला:

"कोण बोलतंय? काय समजायचा अर्थ? डांबीसपणा! कोण बोलतंय?"

मी म्हणालो:

"कुणीही बोलत नाही!"

आणि रिसीव्हर खाली ठेवून दिला. बहुधा चुकीचा नंबर लागला होता. इकडे बाबांनी मला हाक मारली, मी खोलीत परतलो आणि कपडे उतरवून अंथरुणात पडलो. नुकती कुठे मला झोपेची गुंगी येत होती, तेवढ्यात एकदम: ट्रिंक, ट्रिंक! टेलिफोन! बाबा पटकन उठले आणि फोनपाशी धावले. मी पायात सपाता चढवीपर्यंत बाबांचा गंभीर आवाज माझ्या कानी पडला:

"सोनेरी गरुडाला? कुठल्या सोनेरी गरुडाला? इथं तसा कुणी नाही! नीट लक्ष देऊन फोन करा!"

मीष्काने फोन केला होता हे मला चटकन समजले. दळणवळण साधले होते! मी फोनकडे तसाच फक्त चड्डीत धावलो.

"माझा फोन आहे! माझा! मी सोनेरी गरुड!"

बाबांनी ताबडतोब माझ्या हातात फोन दिला आणि मी फोनमध्ये ओरडलो:

“बहिरीससाणा ? मी सोनेरी गरुड ! बोला !”

मीष्का :

“काय करतोस ते सांग !”

मी म्हणालो :

“मी झोपलोय !”

मीष्का :

“मीसुद्धा ! मला जवळ जवळ झोप लागली होती, तेवढ्यात आठवण झाली, एक महत्त्वाचं काम राहिलंय. सोनेरी गरुड, ऐक ! झोपण्यापूर्वी गाणं म्हटलं पाहिजे. दोघांनी मिळून ! म्हणजे आपलं अंतराळातलं द्वंद्वगीत होईल !”

मी अक्षरशः उडी मारली :

“शाबास, बहिरीससाणा ! अंतराळवीरांचं गाणं गाऊ या ! म्हण !”

मी सगळी ताकद लावून गाणे म्हणू लागलो. मी छान गातो, मोठ्यांदा ! माझ्यापेक्षा जास्त मोठ्यांदा गाणे कुणालाही जमत नाही. आमच्या पथकात मोठ्यांदा गाण्यात माझा पहिला नंबर लागतो. तर जेव्हा मी गायला लागलो, त्याच क्षणी शेजाऱ्यांच्या झोपा उडाल्या व ते ओरडू लागले : “काय हा गोंगाट... काय झालं... रात्रीची वेळ झालीय... मोकाट सुटलेत... इथं दुसरे भाडेकरूसुद्धा राहतात म्हटलं... मला वाटलं की डुक्कर कापताहेत...” पण बाबा त्यांना म्हणाले :

“हे अंतराळातले मित्र, बहिरीससाणा आणि सोनेरी गरुड, झोपण्यापूर्वी गाणं गात आहेत !”

तेव्हा सगळे गप्प झाले.

मी आणि मीष्काने शेवटपर्यंत गाणे गायले :

...दूर ग्रहांच्या धुळकट वाटांवर
आमच्या पाऊलखुणा राहतील.

रहस्याला वाचा फुटते !

आई कॉरीडॉरमधून कुणालातरी सांगत असलेली मी ऐकले :

“...रहस्याला नेहमीच वाचा फुटते !”

जेव्हा ती खोलीत आली, तेव्हा मी तिला विचारले :

“आई, याचा अर्थ काय : रहस्याला वाचा फुटते ?”

“याचा अर्थ, जर एखादा माणूस प्रामाणिक वागला नाही, तर त्याचा खोटेपणा कुणालातरी समजतोच आणि मग त्याला स्वतःच्या वागण्याची लाज वाटते आणि त्याला शिक्षा भोगावी लागते,” आई म्हणाली. “समजलं ? ... आता झोप !”

मी दात घासले आणि बिछान्यावर निजलो. पण मला झोप येत नव्हती. सारखा मनात विचार येत होता: रहस्याला वाचा कशी काय फुटते बुवा? खूप वेळपर्यंत मी झोपलो नाही. जेव्हा झोपून उठलो, तेव्हा परत दात घासले आणि न्याहरी करू लागलो. सकाळची वेळ होती, बाबा एव्हाना कामावर गेले होते आणि घरात फक्त मी व आई होतो.

सुरुवातीला मी अंडे खाल्ले. हा प्रकार अजून सहन करण्याइतपत होता, कारण मी फक्त पिवळा बलक खाल्ला होता आणि पांढरा बलक दिसणार नाही अशा रीतीने त्याला कवचामध्ये चुरडून टाकला होता. नंतर आईने आख्खी बशी भरून कांजी आणली.

"खा!" आई म्हणाली. "कुठलीही वटवट न करता!"

मी म्हणालो:

"ही कांजी मला बघवतसुद्धा नाही!"

पण आई खेकसली:

"जरा स्वतःचा अवतार बघ! नुसता हाडांचा सापळा! खा! तुझं वजन वाढलं पाहिजे."

मी म्हणालो:

"मला उलटी येते!.."

तेव्हा आई माझ्याशेजारी बसली, माझ्या खांद्यांभोवती हात धरून मिठी मारत प्रेमाने म्हणाली:

"आपण क्रेमलिन बघायला जाऊ या?"

कमाल आहे... क्रेमलिनपेक्षा अधिक सुंदर अशी दुसरी गोष्ट मला ठाऊक नाही. तेथे मी रत्नभांडार आणि शस्त्रागार पाहिले होते. झारच्या प्रचंड तोफेपाशी उभा राहिलो होतो आणि भयंकर इवान कुठे बसत होता हे मला माहीत आहे. शिवाय तेथे खूप खूप छान गोष्टी आहेत. म्हणून मी पटकन आईला उत्तर दिले:

"अर्थात, क्रेमलिन बघायला जाऊ या! माझी खूप इच्छा आहे."

तेव्हा आई थोडे हसून म्हणाली:

"तर मग बशीतली सगळी कांजी संपव, मग जाऊ. तोवर मी भांडी धुते. मात्र लक्षात ठेव – कांजी सगळी संपवली पाहिजे!"

आणि आई स्वयंपाकघरात गेली.

मी कांजीबरोबर एकटा राहिलो. मी चमच्याने ती ढवळली. मग मीठ घातले. चमचाभर नमुना चाखला – छेः, खाणे अशक्य. तेव्हा विचार केला की, बहुधा साखर कमी पडली असावी. साखर शिंपडली आणि भुरका मारला. आणखीच वाईट. मला कांजी मुळीच आवडत नाही.

शिवाय ती खूप घट्ट होती. जर पातळ असती, तर वेगळी गोष्ट. डोळे मिटून घटाघटा प्यायलो असतो. मग मी कांजीत किटलीतले गरम पाणी ओतले. ती आणखीच बुळबुळीत, चिकट आणि किळसवाणी बनली. मुख्य म्हणजे मी कांजी गिळतो तेव्हा ती घशात अडकते आणि परत तोंडाबाहेर येते. फार वाईट! क्रेमलिनला जायची तर इच्छा होती. एवढ्यात


11

मला आठवण झाली की, आमच्याकडे शेगटाची चटणी होती. कदाचित त्या चटणीबरोबर सगळी कांजी संपवणे शक्य होते! मी चटणीची सगळी बाटली कांजीत ओतली. जेव्हा थोडीशी कांजी चाखली, तेव्हा माझे डोळे चटकन कपाळावर चढल्यासारखे मला वाटले आणि श्वास घुसमटला. माझी बहुधा शुद्ध हरपली, कारण मी बशी उचलली, पटकन खिडकीपाशी धावत गेलो व कांजी रस्त्यावर ओतली. मग परत टेबलापाशी येऊन बसलो.

एवढ्या वेळात आई आली. बशीवर तिने नजर टाकली आणि आनंदाने ती म्हणाली:

"शाबास देनीस! शहाणा मुलगा आहेस! सगळी कांजी संपवली! चल, ऊठ, कपडे घाल, क्रेमलिनला जाऊ या!" तिने माझा पापा घेतला.

ह्याच क्षणाला दार उघडले गेले आणि खोलीत एक पोलीस आला. तो म्हणाला:

"नमस्ते," आणि खिडकीपाशी धावत जाऊन त्याने खाली पाहिले, मग आईकडे नजर टाकून तो म्हणाला: "आणि म्हणे शिकलेली माणसं!"

"तुम्हाला काय पाहिजे?" आईने कडकपणे विचारले.

"लाज कशी वाटत नाही?" पोलीस "दक्ष" पवित्र्यात उभा झाला. "सरकार तुम्हाला सर्व सुखसोयी असलेली घरं रहायला देतंय, कचरा टाकण्याचीसुद्धा सोय आहे, पण तुम्ही खुशाल खिडकीतून घाण खाली फेकता?"

"असं बोलायची तुमची हिंमत कशी झाली?" आई मोठ्यांदा गरजली. "खिडकीतून मी काहीही बाहेर फेकत नाही."

"अस्सं, फेकत नाही काय?" पोलीस दुष्टपणे हसला. त्याने कॉरीडॉरचे दार उघडून हाक मारली: "अहो, इकडं या!"

आणि आमच्या खोलीत कुणी एक माणूस आला. मी त्याच्यावर नजर टाकताच माझ्या ध्यानात आले की, माझी क्रेमलिनची सहल इथेच संपली होती.

त्या माणसाच्या डोक्यावर फेल्ट टोपी होती. आणि त्या टोपीवर आमची कांजी. टोपीच्या ऐन मध्यभागी खळग्यात कांजी पडली होती, थोडीशी टोपीच्या टोकाला फितीपाशी, थोडीशी त्याच्या कॉलरवर, थोडी खांद्यावर आणि थोडी त्यांच्या डाव्या पायाच्या विजारीवर. खोलीत येताच तो चाचरत बोलू लागला:

"मुख्य म्हणजे मी फोटो काढून घ्यायला चाललो होतो... एवढ्यात हा प्रकार... कांजी... रव्याची... गरम... टोपीमधून पाझरली आणि माझं डोकं भाजलं... आता मी फोटो कसा धाडणार... असा कांजीनं माखलो असताना?"

आईने माझ्याकडे पाहिले. तिचे डोळे गूझबेरीसारखे हिरवेगार दिसत होते. आई भयंकर संतापल्याचे ते लक्षण होते.

"माफ करा," हळू आवाजात ती म्हणाली. "मी तुमचे कपडे स्वच्छ करून देते, इकडं या!"

ते तिघेही कॉरीडॉरमध्ये गेले.

आई जेव्हा परत आली तेव्हा तिच्याकडे नुसते पाहण्याचासुद्धा मला धीर होत नव्हता.

पण मी धैर्य एकवटले आणि तिच्यापाशी जाऊन म्हणालो:

"आई, तू काल बरोबर सांगितलंस. रहस्याला नेहमी वाचा फुटते!"

आईने माझ्या डोळ्यांमध्ये पाहिले. खूप वेळपर्यंत टक लावून पाहिल्यानंतर ती म्हणाली:

"तू आता हे सबंध आयुष्यभर लक्षात ठेवशील?"

मी उत्तरलो:

"हो."

नजर ठेवणारी दुर्बीण

मी खिडकीच्या चौकटीत गुडघ्यांवर सदरा ओढून बसलो होतो, कारण माझी फाटलेली विजार आई शिवून देत होती.

"छे: बाई," आई म्हणाली व तिने सुई-दोरा बाजूला ठेवले. "हा मुलगा अगदी अशक्य बनलाय."

"होय," बाबा म्हणाले आणि त्यांनी वर्तमानपत्र बाजूला ठेवले. "अगदी सैतान बनलाय. तो कुंपणावर चढतो, झाडांवर आणि छपरांवर चढतो. त्याच्या अंगावर एक कपडा टिकणार नाही."

बाबा गप्प बसले, त्यांनी माझ्याकडे रागाने पाहिले आणि शेवटी ठाम आवाजात जाहीर केले:

"पण ह्या सगळ्याला पायबंद घालणारा एक उपाय मी खूप विचार करून शोधून काढलाय."

"मी काही मुद्दाम फाडत नाही कपडे," मी म्हणालो. "मी काय मुद्दाम तसं करतो? ते आपोआप फाटतात!"

"तर, तर, आपोआप फाटतात म्हणे!" आई खवटपणे म्हणाली. "तुझी विजार एवढी दुष्ट आहे की, सबंध दिवसभर ती मुद्दाम प्रयत्न करत असते – एखाद्या खिळ्यात कसं अडकवून घ्यायचं, नंतर स्वतःला फाडून घेऊन तुझ्या आईला त्रास कसा द्यायचा! काय भयंकर विजार आहे तुझी! आपोआप फाटते! आपोआप फाटते!"

अगदी सकाळपर्यंत "आपोआप फाटते" असे आई ओरडू शकली असती, कारण ती पुरती वैतागून गेली होती. तिचा संताप स्पष्ट दिसत होता. म्हणून मी बाबांना म्हणालो:

"मग, तुम्ही काय उपाय शोधून काढलाय?"

बाबांनी चेहरा कठोर केला आणि ते आईला म्हणाले:

"तुला तुझं सगळं कसब एकवटून एक असं उपकरण तयार केलं पाहिजे की, तुझा मुलगा घरात नसतानासुद्धा त्या उपकरणाच्या मदतीनं त्याच्यावर नजर ठेवता येईल. मला आज अजिबात वेळ नाही, कारण आज फूटबॉलचा सामना मला बघितलाच पाहिजे. पण तू मात्र अजिबात वेळ वाया घालवू नको. आत्ताच्या आत्ता नजर ठेवणारी दुर्बीण बनव. तुला हे काम फार छान जमतं हे मला माहीत आहे."

बाबा उठून स्वतःच्या टेबलापाशी गेले आणि थोडा वेळ खुडबूड करून त्यांनी आईपुढे कोपरे फुटलेला एक छोटा आरसा, एक मोठा लोहचुंबक, वेगवेगळे खिळे, एक गुंडी व आणखी काही वस्तू ठेवल्या.

"ह्या वस्तू तुला आवश्यक आहेत," बाबा आईला म्हणाले. "ह्यांच्यापासून काय बनवता येईल ते पहा."

आईने बाबांना दारापर्यंत निरोप दिला, मग ती परत आली व मला तिने अंगणात खेळायला पाठवले. संध्याकाळी जेवणाच्या वेळी जेव्हा आम्ही परत एकत्र जमलो, तेव्हा आईच्या बोटांना डिंक माखलेला होता व टेबलावर एक सुंदर निळे जाडसर नळकांडे पडले होते. आईने ते उचलले आणि दुरूनच मला दाखवत ती म्हणाली:

"देनीस, नीट लक्ष देऊन पहा!"

"हे काय?" मी विचारले.

"ही नजर ठेवायची दुर्बीण! माझा शोध!" आई उत्तरली.

मी म्हणालो:

"दूरच्या गोष्टी पहायला?"

तिने स्मित केले.

"नाही. तुझ्यावर नजर ठेवायला."

मी विचारले:

"माझ्यावर नजर कशी ठेवणार?"

"अगदी सोपं!" आई म्हणाली. "मी ही खास दुर्बीण पालकांसाठी बनवलीय. खलाशांच्या दुर्बीणीसारखीच आहे, पण जास्त चांगली."

बाबा म्हणाले:

"तू साध्या शब्दात समजावून सांग, रचनेची तत्त्वं, ती कसं काम करते, वगैरे वगैरे."

मास्तरीणबाई फळ्यापाशी उभ्या राहतात तशा थाटात आई टेबलापाशी उभी राहिली आणि भाषण देऊ लागली:

"आता जेव्हा जेव्हा मी घरातून बाहेर पडेन, तेव्हा तेव्हा, देनीस, मी तुला पाहू शकेन. घरापासून मी पाच ते आठ किलोमीटर अंतरावर असले आणि मला वाटलं की, खूप वेळात मी तुला पाहिलं नाही, आत्ता तू काय करत असशील – तर ताबडतोब ही दुर्बीण घेईन, आपल्या घराच्या दिशेनं तिला वळवून धरेन – बास्स! तुला संपूर्ण पाहीन."

बाबा म्हणाले:

"उत्तम! अगदी झटपट मामला!"

मी थोडासा बिचकलो. आई असली काही वस्तू शोधून काढेल असे मला कधीही वाटले नव्हते. दिसायला तर अशी सडपातळ, पण बघा! झटपट मामला!

मी म्हणालो:

"आई, आपलं घर कुठं आहे हे तुला समजणार कसं?"

अजिबात विचार न करता तिने ताबडतोब उत्तर दिले:

"माझ्या दुर्बीणीत दिशादर्शक चुंबक आहे. तो नेहमी आपल्या घराची दिशा दाखवतो!"

"आजी-दाईची प्रतिक्रिया!" बाबा म्हणाले.

"अगदी बरोबर," आई पुढे बोलू लागली. "देनीस, जर तू कुंपणावर अथवा आणखी कुठं कडमडत असलास, तर मला ताबडतोब दिसेल."

मी म्हणालो:

"आतमध्ये काय आहे नळकांड्याच्या? पडदा?"

ती उत्तरली:

"अर्थातच. आरसा आठवतो? तो तुझं प्रतिबिंब थेट माझ्या डोक्यात फेकतो. मला ताबडतोब दिसेल – तू गलोलीनं खडे मारतो आहेस अथवा नुसताच भटकतो आहेस."

"शिंकणाऱ्या श्वासनलिकेचा सामान्य नियम. विशेष काही नाही," बाबा पुटपुटले आणि एकदम उत्साहाने त्यांनी विचारले:

"माफ कर, पण मला एक प्रश्न विचारायचा आहे."

"विचार," आई म्हणाली.

"तुझी ही नजर ठेवणारी दुर्बीण विजेवर चालते अथवा दुसऱ्या कशावर?"

"विजेवर," आई म्हणाली.

"तर मी तुला इशारा देतो," बाबा म्हणाले, "शॉर्ट सर्किटपासून सावध रहा. नाहीतर कुठंतरी शॉर्ट सर्किट होईल आणि तुझ्या मेंदूत स्फोट व्हायचा."

"तसं नाही होणार," आई म्हणाली. "मग फ्यूज कशासाठी आहे?"

"मग गोष्ट वेगळी," बाबा म्हणाले. "पण तरीही नीट तपासून पहा. नाही तर मला उगीच काळजी वाटत राहील."

मी म्हणालो:

"असली एक दुर्बीण तू मला बनवून देशील? म्हणजे मी तुझ्यावर नजर ठेवू शकेन."

"हे कशासाठी," आई परत हसून म्हणाली, "मी तर कुंपणावर नक्कीच कडमडणार नाही?"

"ह्याची अजून खात्री नाही," मी म्हणालो. "कदाचित तू कुंपणावर चढणार नाहीस, पण मोटारीला चिकटून जाशील? नाहीतर बकरीसारखी आमच्यासमोर उडी मारशील?"

"किंवा झाडूवाल्यांशी भांडण करशील? किंवा पोलीसाशी वाद घालत बसशील?" बाबांनी मला दुजोरा दिला व उसासा टाकला. "अरेरे, किती वाईट... तुझ्यावर लक्ष ठेवता येईल असं यंत्र आमच्यापाशी नाही."

आईने आम्हाला जीभ काढून दाखवली.

"अशा प्रकारचं उपकरण फक्त एकमेव आहे, समजलं?"

ती माझ्याकडे वळून म्हणाली :

"तर आता लक्षात ठेव, माझं तुझ्यावर सतत नियंत्रण आहे!"

मी विचार केला की, अशा उपकरणामुळे माझे आयुष्य फार केविलवाणे बनणार आहे. पण मी काहीही बोललो नाही, फक्त मान हलवली आणि नंतर झोपायला गेलो. जेव्हा सकाळी जागा झालो आणि नेहमीचे आयुष्य सुरू झाले, तेव्हा ध्यानात आले की, माझ्या दुःखाच्या दिवसांना आरंभ झाला होता. आईच्या शोधापायी माझे आयुष्य म्हणजे निव्वळ छळवाद बनले होते. उदाहरण द्यायचे तर अलिकडच्या काळात कोस्तिक फार उर्मट बनला होता आणि त्या-बद्दल त्याची हाडे थोडी नरम करणे आवश्यक होते. पण ही कारवाई करण्याचा माझा निर्णय पक्का होत नव्हता, कारण आईची दुर्बीण माझ्या पाठीवर रोखलेली होती. अशा परिस्थितीत कोस्तिकची कणीक तिंबून काढणे अगदी अशक्य होते. एवढेच नव्हे तर तळ्यावर जाऊन बेड-कांची पिल्लं खिशात भरून आणण्याचा माझा उद्योगही थांबला. माझे सगळे सुखी, आनंदी, स्वच्छंदी जीवन आता बंद झाले होते. ते अळणी दिवस कंठणे मला इतके अवघड जाऊ लागले की. मेणबत्तीसारखा मी वितळून जात होतो. माझेपण मी हरवून बसलो होतो. माझ्या आयु-ष्याचा दुःखी शेवट होण्याच्या बेतात होता.

पण अचानक एक दिवस, जेव्हा आई बाहेर गेली होती, तेव्हा मी फूटबॉलमधली माझी जुनी ट्यूब शोधू लागलो आणि कप्प्यात जेथे माझ्या सगळया सटरफटर गोष्टी ठेवलेल्या असतात, तेथे अचानक मला दिसली... आईची नजर ठेवणारी दुर्बीण! सगळ्या कचऱ्याच्या मध्यभागी ती पडली होती आणि काहीशी जुनाट, फाटकी दिसत होती. एकूण स्पष्ट होते की, खूप दिवसांपासून आईने तिला हात लावलेला नव्हता, बहुधा ती दुर्बीणीबद्दल विसरून गेली होती. मी पटकन दुर्बीण उचलली आणि तिच्यात काय काय होते ते मी पाहू लागलो. पण शप्पत सांगतो, ती अगदी रिकामी होती. तिच्यात काहीही नव्हते. अगदी रिकामे नळकांडे!

आत्ता माझ्या लक्षात आले की, ह्या माणसांनी मला फसवले होते, आईने काहीही नवा शोध लावला नव्हता. ह्या खोटया दुर्बीणीच्या मदतीने तिने मला फक्त घाबरवले होते आणि मी मूर्ख घाबरलो होतो व अगदी शहाण्या मुलासारखा वागत होतो. मला सगळया जगाचा, आईचा, बाबांचा, ह्या सगळ्या गोष्टींचा एवढा राग आला की, मी ताबडतोब अंगणात धावलो आणि वेळ न गमावता कोस्तिकबरोबर, आन्द्रचूष्काबरोबर आणि आल्योन्काबरोबर मारामारीला सुरुवात केली. अर्थात त्या तिघांनी मिळून माझी मस्त कणीक तिंबली हे खरे. पण तरीही मी खूप आनंदात होतो. मारामारीनंतर आम्ही चौघेही पोटमाळ्यावर चढलो, छपरावर चढलो. नंतर झाडांवर चढलो, मग तळघरात गेलो, बॉयलरच्या खोलीत गेलो, काजळीपेक्षा जास्त तोंडे काळी होईपर्यंत कोळशात हुंदडलो. हा सारा वेळ माझ्या छातीवरचा दगड बाजूला सरक-ल्याप्रमाणे मला वाटत होते. खूप छान वाटत होते, मोकळे वाटत होते. एक मेच्या सणा-दिवशी वाटते तशी मजा वाटत होती.

मृत्युगोलातील फटफटीवरची कसरत

मी खूप लहान होतो तेव्हा मला एक तीन चाकी सायकल घेऊन दिली होती. मी तिला चालवायला शिकलो. अगदी पटकन. मुळीच घाबरलो नाही. जणू काही सबंध आयुष्यभर मी सायकल चालवत होतो.

आई म्हणाली:

"बघा, हा अगदी जन्मजात खेळाडू आहे!"

आणि बाबा म्हणाले: "अगदी माकडासारखा बसतो..."

मी सायकल छान चालवायला शिकलो आणि सर्कसमधल्या विदूषकांप्रमाणे सायकलवरच्या वेगवेगळ्या कसरती करू लागलो. उदाहरणार्थ, पाठीमागच्या दिशेला मी सायकल चालवत न्यायचा, किंवा सीटवर झोपून कोणत्याही एका हाताने पायडल फिरवायचा – कधी उजव्या, तर कधी डाव्या.

पाय हवेत ठेवून एका बाजूने सायकल चालवायचा.

हँडलवर बसून जायचा. डोळे मिटून, हात मोडून चालवायचा.

हातात पाण्याचा ग्लास धरून चालवायचा. थोडक्यात, सर्व तऱ्हांनी मी सायकल चालवायचा.

नंतर झेन्याकाकाने माझ्या सायकलचे एक चाक काढून टाकले आणि तिला दोन चाकांची सायकल केली. मी परत पटकन दुचाकी सायकल चालवायला शिकलो. आमच्या आवारातील मुले मला "जागतिक चॅम्पीयन" म्हणू लागली.

माझे गुडघे सायकलच्या हँडलला आपटू लागले त्या काळापर्यंत मी ती सायकल चालवत राहिलो. तेव्हा मी मनाशी विचार केला की, आता त्या सायकलपेक्षा मी मोठा झालो. माझे बाबा मला अस्सल सायकल केव्हा विकत घेऊन देतील ह्याची मी वाट पाहू लागलो.

एक दिवस आमच्या आवारात एक सायकल आली. जो माणूस त्या सायकलवर बसला होता, तो पाय फिरवून सायकल चालवत नव्हता आणि सायकल चतुराप्रमाणे फर्रर्र आवाज करत आपोआप जात होती. मला खूप आश्चर्य वाटले. सायकल आपोआप जात असलेली मी कधीही पाहिली नव्हती. फटफटीची गोष्ट वेगळी. मोटारीचेसुद्धा तसेच. पाण्यावरच्या वेगवान मोटारबोटी – समजू शकतो. पण सायकल? स्वतः?

माझा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता.

ह्या आपोआप चालणाऱ्या सायकलवरचा माणूस मीष्काच्या घरच्याकडे आला होता. त्याने सायकल थांबवली. तो मोठा नव्हता तर अगदीच तरुण मुलगा होता असे माझ्या ध्यानात आले. पन्हळीपाशी सायकल टेकवून तो घरात गेला. मी आ वासून तेथेच उभा राहिलो. एवढ्यात मीष्का तेथे आला.

मी म्हणालो:

"आपोआप चालते, समजलं?"

मीष्का म्हणाला :

"आमचा पुतण्या फेद्या ह्याची आहे ती. इंजिन लावलेली सायकल. फेद्या तिच्यावर बसून आमच्याकडं कामासाठी आलाय. चहा पितोय."

मी विचारले :

"ही इंजिनवाली सायकल चालवणं अवघड आहे?"

"अगदी सोप्पं आहे," मीष्का म्हणाला. "एकदा पायडल मारलं म्हणजे ती चालू होते. तिच्यातलं पेट्रोल शंभर किलोमीटरपर्यंत पुरतं. आणि वेग अर्ध्या तासाला वीस किलोमीटर."

"ओहो! कमाल आहे!" मी म्हणालो. "याला म्हणतात यंत्र! अशी सायकल फिर-वायला किती मजा येईल!"

मीष्का मान हलवत म्हणाला :

"शक्य नाही. फेद्या ठार मारील. मुंडकं उडवील!"

"हो. धोक्याचं आहे," मी म्हणालो.

पण मीष्काने भोवती नजर टाकली आणि एकदम तो म्हणाला :

"आवारात कुणीही नाही आणि तू तर "जागतिक चॅम्पीयन." बैस! इंजिन चालू करायला मी तुला मदत करतो. तू एकदा पायडल फिरव. पुढं सगळं आपोआप चालेल. आवा-रात दोन-तीन चकरा मार आणि मग आपण हळूच ही मोटारसायकल पहिल्या जागी ठेवून देऊ. फेद्या आमच्याकडं खूप वेळपर्यंत चहा पीत बसतो. निदान तीन ग्लास ढोसतो. चल!"

"चल," मी म्हणालो.

मीष्काने सायकल धरली आणि मी धडपडत तिच्यावर चढून बसलो. एका पायाचा अंगठा जेमतेम पायडलच्या टोकापर्यंत पोहचत होता, तर दुसरा पाय मकारोनीप्रमाणे हवेत लोंबत होता. ह्या मकारोनीचा पन्हळीला मी रेटा दिला आणि मीष्का शेजारून धावत ओरडला :

"पायडल दाब, दाब जोरात!"

मी सीटवरून अर्धे खाली घसरून पायडल दाबायचा प्रयत्न केला. मीष्काने हँडलवर काही-तरी पटकन फिरवले... एकदम इंजिन सुरू झाले आणि मी सुसाट निघालो!

मी फिरू लागलो. आपोआप. पायडल दाबत नव्हतो, कारण पायच तिथपर्यंत पोचत नव्हते. फक्त तोल सांभाळावा लागत होता.

फारच मजा वाटत होती! कानांमध्ये वारा शीळ वाजवत होता. भोवतालच्या सगळ्या गोष्टी भराभरा नजरेसमोरून सरकत होत्या : खांब, फाटक, बाकडे, पावसापासून आडोसा घ्यायच्या अळंब्या, वाळूचा चौकोन, झोपाळा, घरव्यवस्थापन कचेरी, आणि परत — खांब, फाटक, बाकडे, पावसापासून आडोसा घ्यायच्या अळंब्या, वाळूचा चौकोन, झोपाळा, घर-व्यवस्थापन कचेरी आणि परत खांब... हँडल गच्च पकडून मी फिरत होतो आणि मीष्का

माझ्यामागून धावत होता. पण तिसऱ्या फेरीला तो ओरडून म्हणाला:

"मी दमलो!" आणि खांबाला टेकून उभा राहिला.

मी एकटाच फिरवू लागलो आणि मला खूप मजा वाटत होती. मोठ्या ऐटीत मी सायकलवर बसलो होतो. मृत्युगोलात मी फटफटीवरच्या कसरती करतोय असे मला वाटत होते: गोर्की पार्कमध्ये एका धाडसी बाईने मृत्युगोलात तशी फटफटी चालवलेली मी पाहिली होती...

खांब, मीष्का, झोपाळा, कचेरी – ह्या सगळ्या गोष्टी माझ्यासमोरून खूप वेळपर्यंत भराभरा सरकत होत्या. एकूण मजा आली होती. फक्त मकारोनीसारख्या लोंबणाऱ्या पायाला हळूहळू मुंग्या येऊ लागल्या होत्या... अचानक मला कसेतरीच वाटायला लागले आणि हाताचे तळवे ओले झाले. थांबण्याची मला फार इच्छा झाली.

मीष्कापाशी पोहोचल्यावर मी ओरडलो:

"पुरे! थांबव!"

मीष्का माझ्यापाठी धावत ओरडला:

"काय? मोठ्यांदा बोल!"

मी ओरडलो:

"तू काय बहिरा बनलास?"

पण एव्हाना मीष्का दमला. तेव्हा मी आणखी एक फेरी मारली आणि ओरडलो:

"इंजिन थांबव, मीष्का!"

तेव्हा त्याने हँडल पकडले, सायकल पुढे झेपावली आणि तो पडला. मी पुढे गेलो.

बघतो तर खांबापाशी तो मला परत भेटला आणि ओरडत होता:

"ब्रेक लाव, ब्रेक लाव!"

मी त्याच्याजवळून भर्रर्र पुढे गेलो आणि ब्रेक शोधू लागलो. पण ब्रेक कुठे होता हेच मला सापडेना. हँडलवरच्या वेगवेगळ्या तारा मी खेचून पाहिल्या. पण काहीही उपयोग नाही! इंजिन फरफरतच राहिले आणि माझ्या मकारोनीवाल्या पायाला एव्हाना हजारो सुया खुपत होत्या.

मी ओरडलो:

"मीष्का, ब्रेक कुठं आहे?"

तो म्हणाला:

"मी विसरलो!"

"तू आठवून बघ!"

"ठीक आहे, आठवून बघतो. तोपर्यंत आणखी थोड्या चकरा मार!"

"तू लौकर आठव, मीष्का!" मी परत ओरडलो.

मी पुढे गेलो आणि आता मला घेरी येऊ लागली, ओकारी आल्यासारखे वाटू लागले. पुढच्या फेरीला मीष्का परत ओरडला:

"नाही आठवत! त्यापेक्षा तू खाली उडी मार!"

मी त्याला म्हणालो:

"मला ओकारी येतेय!"

असे काही घडणार ह्याची जर मला आधी कल्पना असती, तर मी सायकल मुळीच चालवली नसती. त्यापेक्षा पायी चालणे उत्तम! शप्पत!

परत समोर मीष्का ओरडत होता:

"झोपायची गादी आणली पाहिजे! म्हणजे तू गादीवर चालवत ने आणि थांबव! तू कशावर झोपतोस?"

मी ओरडलो:

"घडीच्या कॉटवर!"

आणि मीष्का:

"तर मग पेट्रोल संपेपर्यंत फिरत रहा!"

मी एवढा चिडलो की, जवळ जवळ त्याच्या अंगावरच सायकल घालणार होतो. "पेट्रोल संपेपर्यंत..." कदाचित आणखी दोन आठवडे आवारात चकरा माराव्या लागतील आणि आमच्यापाशी तर बाहुल्यांच्या थिएटरची मंगळवारची तिकीटे. आणि पाय बधीर झाला होता! त्या मूर्खाला मी किंचाळून सांगितले:

"तुमच्या फेद्याला लौकर घेऊन ये!"

"तो चहा पितोय!" मीष्का ओरडला.

"नंतर पिईल!" मी कोकललो.

"ठार मारील! नक्की ठार मारील!" मीष्का कबूल झाला.

परत माझ्याभोवती सगळे गरगर फिरले – खांब, फाटक, बाकडे, वाळूचा चौकोन, पावसापासून आडोसा घ्यायच्या अळंब्या, झोपाळा, कचेरी. मग त्याउलट – कचेरी, झोपाळा, वाळूचा चौकोन, अळंब्या, बाकडे, खांब. आणि मग सगळी एकत्र खिचडी: छोटुकले घर, खांबाची कचेरी, झोपाळा, पावसाचे फाटक, अळंब्या... परिस्थिती फारच वाईट बनल्याचे माझ्या ध्यानात आले.

दरम्यान कुणीतरी भक्कमपणे सायकल पकडली. यंत्र फरफरायचे थांबले आणि माझ्या टाळक्यावर एक सणसणीत टप्पल बसली. मला समजले की, मीष्काच्या फेद्याने अखेर चहा पिऊन संपवला होता. मी पटकन पळून जायच्या बेतात होतो, पण जमले नाही. कारण मकारोनीवाल्या पायात कट्यार खुपसल्याप्रमाणे वेदना झाली. तरीही मी भान राखून एका पायावर लंगडत फेद्यापासून जास्तीत जास्त लांब गेलो.

त्याने माझा पाठलाग केला नाही.

त्याने मला टप्पल हाणल्याबद्दल त्याचा मला राग आला नाही. कारण फेद्याने थांबवले नसते तर मी अजूनपर्यंत चकरा मारत राहिलो असतो.

सिंगापूरबद्दल मला सांगा !

रविवारी मी आणि बाबा आमच्या नातेवाईकांकडे गेलो होतो. ते मॉस्कोजवळच्या एका छोटया गावात रहात होते. विजेवर चालणाऱ्या आगगाडीतून आम्ही तेथे लौकर पोहोचलो.

अलेक्सेयकाका आणि मीलामावशी आम्हाला फलाटावर भेटले.

अलेक्सेयकाका म्हणाले :

"ओहो, देनीस आता मोठा पुरुष बनला !"

बाबा उत्तरले :

"होय, अलेक्सेय मिखायलोविच, काळ आपला नाश करतोय, पण ह्या छोटयांना तो फुलवतो."

मीलामावशी हसून म्हणाली :

"काहीतरी वेडयासारखं बरळू नका. चल देनीस, माझ्याबरोबर. ह्या करंडीत काय आहे?"

मी म्हणालो :

"इथं चिकणमाती, पेन्सिली आणि पिस्तूलं आहेत ..."

मीलामावशी हसली आणि रूळ ओलांडून, स्टेशनजवळून आम्ही एका मातीच्या रस्त्यावर पोहोचलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे उभी होती. मी पटकन बूट काढून टाकले आणि अनवाणी चालू लागलो. पायाच्या तळव्यांना थोडया गुदगुल्या होत होत्या आणि किंचित बोचत होते. मागच्या वर्षी हिवाळयानंतर अगदी पहिल्यांदा मी अनवाणी चाललो होतो त्यावेळी नेमके असेच वाटले होते. एव्हाना रस्ता नदीकिनाऱ्याकडे वळला होता. हवेत नदीचा आणि आणखी कसलातरी गोड्‌स वास भरला होता. मी गवतावरून उडया मारत धावू लागलो व ओरडू लागलो "ओ-हो-हो-हो!" मीलामावशी म्हणाली :

"वळू कसा उंडारतोय बघा !"

आम्ही तिच्या घरापाशी पोहोचलो तेव्हा एव्हाना अंधार पडला होता. सगळे काचेच्या खिडक्यांच्या खोलीत चहा प्यायला बसले. मलासुद्धा मोठ्या प्याल्यात चहा दिला होता. मी नाकाचे टोक चहाला लावून चहा पीत होतो.

अचानक अलेक्सेयकाका बाबांना म्हणाले :

"तुला माहीत आहे, आज रात्री बारा वाजून चाळीस मिनिटांनी आमच्याकडं हारीतोन येणार आहे. आख्खा दिवस तो इथं राहणार आहे. उद्या रात्री जाईल."

बाबांना खूप आनंद झाला.

"देनीस," ते म्हणाले, "तुझा चुलतकाका हारीतोन वासिल्येविच येतोय! तुझ्याशी ओळख करून घ्यायची त्याची खूप दिवसांपासून इच्छा आहे!"

मी म्हणालो :

"मला कसे ते ठाऊक नाहीत?"

मीलामावशी परत हसली.

"कारण ते उत्तरेत राहतात," ती म्हणाली. "आणि क्वचित मॉस्कोला येतात."

मी विचारले:

"ते कोण आहेत?"

अलेक्सेयकाकांनी बोट वर उचलून म्हटले:

"मोठ्या बोटीचे कप्तान."

माझ्या पाठीमधून शहारा गेला. काय? माझे चुलतकाका – मोठ्या बोटीचे कप्तान? आणि मला ही माहिती केवळ आत्ता समजतेय? बाबांचे नेहमीच असे – अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी त्यांना अगदी योगायोगाने आठवतात!

मी म्हणालो:

"हे काय हो बाबा, तुम्ही मला पूर्वी का नाही सांगितलंत – माझे काका मोठ्या बोटीचे कप्तान आहेत? यापुढं मी तुमचे बूट स्वच्छ करणार नाही!"

मीलामावशी परत हसली. माझ्या केव्हाच लक्षात आले होते की, मीलामावशी खूप हसते आणि काही कारण नसतानाही हसते. आत्ता काही कारण नसताना ती हसली होती. बाबा म्हणाले:

"गेल्या वर्षी तो सिंगापूरहून आला होता तेव्हा मी तुला त्याच्याबद्दल बोललो होतो, पण त्यावेळी तू आणखीच लहान होतास. बहुधा तू विसरलास. काही हरकत नाही, आता झोप. उद्या त्याच्याशी तुझी भेट होईल!"

मीलामावशीने माझा हात धरला आणि ती मला घरात घेऊन गेली. एका छोट्या खोलीला ओलांडून आम्ही दुसऱ्या छोट्या खोलीत आलो. तेथे एका कोपऱ्यात एक अरुंद दिवाण होता. खिडकीपाशी फुलाफुलांचा मोठा आडोसा उभा होता.

"इथं झोप!" मीलामावशी म्हणाली. "कपडे काढ! आणि पिस्तूलांची तुझी करंडी मी तुझ्या पायांपाशी ठेवते."

मी म्हणालो:

"बाबा कुठं झोपणार आहेत?"

ती म्हणाली:

"बाहेरच्या खोलीत. तुला माहीत आहे, तुझ्या बाबांना ताजी हवा खूप आवडते. का? तुला भीती वाटेल?"

मी म्हणालो:

"मुळीच नाही!"

मी कपडे काढले आणि निजलो.

मीलामावशी म्हणाली:

"झोप शांत! आम्ही इथं जवळच आहोत."

ती निघून गेली.

मी छोटचा दिवाणावर झोपलो आणि मोठ्ठी दुलई अंगावर ओढून घेतली. बाहेरच्या खोली-तून त्यांचे हळू आवाजांमधील बोलणे व हसणे ऐकू येत होते. मला झोप आली होती. पण मनात मात्र मोठ्ठ्या बोटीच्या कप्तानाबद्दलचे विचार येत होते.

त्याची दाढी कशी असेल? मी चित्रांमध्ये पाहिले होते त्याप्रमाणे खरेच अगदी थेट माने-पासून वाढलेली असेल? आणि पाईप कसा असेल? वाकडा अथवा सरळ दांडयाचा? आणि खंजीर – नांव कोरलेला किंवा साधा? मोठ्या बोटींच्या कप्तानांना धैर्याबद्दल नांव कोरलेले खंजीर बक्षीस देतात. अर्थात प्रवासात त्यांना दररोज हिमनगांना तोंड द्यावे लागते अथवा प्रचंड देवमाशांबरोबर किंवा पांढऱ्या अस्वलांबरोबर त्यांची भेट होते. अथवा फुटलेल्या बोटीं-वरच्या माणसांचे जीव वाचवावे लागतात. या ठिकाणी धैर्य असणे आवश्यक आहे, नाहीतर सर्व खलाशांसकट आणि बोटीसकट जलसमाधी मिळायची. जर 'लेनिन'सारखी अणुशक्तीवर चालणारी हिमभंजन बोट बुडाली तर किती भयंकर! शिवाय मोठ्या बोटींचे कप्तान फक्त उत्तरेतच प्रवास करत नाहीत, तर त्यांच्यापैकी काहीजण आफ्रिकेत जातात, त्यांच्या बोटींवर माकडे आणि मुंगूस राहतात. मुंगूस सापांना मारतात असे मी एका पुस्तकात वाचले होते. माझा मोठ्या बोटीचा कप्तान गेल्या वर्षी सिंगापूरहून आला होता. किती आश्चर्यकारक शब्द: 'सिंगा-पूर'... माझ्या काकांना मी सिंगापूरबद्दलची माहिती नक्की विचारीन – तेथे माणसे कशी आहेत, मुले कशी आहेत, होड्या आणि शिडांची जहाजे कशी आहेत... नक्की सगळी माहिती विचारीन अशा रीतीने खूप वेळपर्यंत मी विचार करत राहिलो आणि नकळत मला झोप लागली.

मध्यरात्री काहीतरी भयानक गुरगुरण्याच्या आवाजामुळे मला जाग आली बहुधा एखादा कुत्रा खोलीत शिरला होता आणि मी तेथे झोपलोय हे त्याच्या लक्षात आले होते व बहुधा त्याला ते आवडले नव्हते. त्या आडोशाआडून तो गुरगुरत होता. त्याचे सुरकुतलेले नाक आणि विचकलेले पांढरे सुळे पाहिल्याचा मला भास झाला. बाबांना हाक मारायचा माझा इरादा होता, पण ते माझ्यापासून लांब, बाहेरच्या खोलीत झोपले होते हे मला आठवले. शिवाय मी विचार केला की, यापूर्वी कधीही मी कुत्र्याला घाबरलो नव्हतो, तेव्हा आतासुद्धा भ्यायचे काही कारण नव्हते. नाही म्हटले तरी लौकरच मला आठ वर्षे पूर्ण व्हायची होती.

मी ओरडलो:

"तूबो! झोप!"

कुत्र्याने जणू घशात काही अडकावे तसा पटकन ओठ मिटल्याचा आवाज केला व तो गप्प झाला

मी अंधारात डोळे टक्क उघडे ठेवून पडलो होतो. खिडकीमधून बाहेरचे काहीही दिसत नव्हते. फक्त एक फांदी जराशी दिसत होती. ती उंटाप्रमाणे भासत होती. हा उंट मागच्या पायांवर जणू उभा होता. उंट दिसू नये म्हणून मी डोळयांवर पांघरूण ओढून घेतले व सातच्या

गुणाकाराची मी उजळणी सुरू केली. मी तसे केले म्हणजे मला पटकन झोप लागते. अगदी खरे ठरले: सातचा सातवेळा गुणाकार करीपर्यंत माझे डोके भिरभिरले आणि जवळ जवळ मला झोप लागली होती, तेवढ्यात त्या आडोशाआडचा झोपलेला कुत्रा परत गुरगुरू लागला. अरे बापरे! पहिल्यापेक्षा शंभरपट भयानक! माझ्या पोटात एकदम खड्डा पडला. पण तरीही मी त्याच्यावर ओरडलो:

"तूबो! चूप पडून रहा! ताबडतोब झोप!.."

कुत्रा परत थोडा गप्प झाला. मला आठवण झाली की, माझी करंडी माझ्या पायांशीच पडली होती आणि तिच्यात माझ्या वस्तूंशिवाय आईने मला वाटेत खाण्यासाठी खाद्यपदार्थांचे एक पुडके ठेवले होते. मी विचार केला की, जर ह्या कुत्र्याला थोडे खाऊ घातले, तर तो थोडा प्रेमळ बनेल आणि माझ्यावर गुरगुरायचा थांबेल. मी उठून बसलो, करंडीत धुंडाळू लागलो आणि अंधारात वस्तू शोधणे जरी कठीण होते, तरी करंडीमधून एक कटलेट आणि दोन अंडी बाहेर काढली. मला त्यांच्याबद्दल मुळीच वाईट वाटत नव्हते, कारण अर्धवट उकडलेली अंडी मला आवडतच नाहीत. कुत्रा परत गुरगुरू लागताच मी ताबडतोब आडोशापलिकडे एकामागून एक अशी दोन्ही अंडी फेकली.

"तूबो! खा! आणि ताबडतोब झोप!.."

प्रथम कुत्रा गप्प झाला, पण नंतर एवढ्या मोठ्यांदा गरजला की, मला समजले – त्यालासुद्धा अर्धी उकडलेली अंडी आवडत नव्हती. तेव्हा मी त्याच्याकडे कटलेट फेकले. कुत्र्यावर कटलेट पडल्याचा आवाज मला ऐकू आला. कुत्रा चूप झाला.

मी म्हणालो: "छान. आता – झोपायचं! ताबडतोब!"

कुत्रा आता गुरगुरत नव्हता, फक्त तोंडातून फुस्स फुस्स आवाज काढत होता. मी अंगभर पांघरूण लपेटून झोपलो...

सकाळी चकचकीत उन्हामुळे मला जाग आली आणि नुसत्या चड्डीतच मी बाहेर धावलो बाबा, अलेक्सेयकाका आणि मीलामावशी टेबलापाशी बसले होते. टेबलावर पांढरास्वच्छ रुमाल अंथरलेला होता व तांबडे मुळे भरलेली एक बशी ठेवलेली होती. हे फार सुंदर दिसत होते, सगळे तोंड धुवून ताजेतवाने दिसत होते. माझ्या अंगात त्यामुळे उत्साह संचारला आणि तोंड धुण्यासाठी मी अंगणात धावलो. तोंड धुण्याची जागा घराच्या दुसऱ्या बाजूला होती, तेथे ऊन पडले नव्हते, थंडी वाजत होती. झाडाची मुळे थंडगार होती व भांड्यातून पडणारे पाणी बर्फामारखे थंड होते, त्याचा निळसर रंग होता. मी खूप वेळपर्यंत पाण्याचे सपकारे मारत राहिलो आणि पुरता गोठून गेल्यानंतर न्याहरी करायला पळालो. टेबलापाशी बसून मी कुरुम कुरुम आवाज करत मुळे खाऊ लागलो. त्यांच्याबरोबर मीठ लावलेला काळा पाव खायला फारच मजा आली. आख्खा दिवस मी मुळे खात बसलो असतो! पण तेवढ्यात मला मुख्य गोष्टीची अचानक आठवण झाली!

मी म्हणालो:

"मोठ्या बोटीचा कप्तान कुठं आहे? तुम्ही मला फसवलं तर नाही?"

मीलामावशी खूप हसली. अलेक्सेयकाका म्हणाले:

"हात् तुझी! सबंध रात्र त्याच्याशेजारी झोपलास आणि तुझ्या लक्षातसुद्धा आलं नाही... ठीक आहे, आत्ता मी त्याला आणतो, नाहीतर आख्खा दिवसभर तो झोपून राहील. प्रवासानं दमलाय."

तेवढ्यात बाहेरच्या खोलीत तांबड्या चेहऱ्याचा आणि घाऱ्या डोळ्यांचा एक वजनदार माणूस आला. तो पायजम्यात होता. त्याला दाढी मुळीच नव्हती. टेबलापाशी येऊन भयानक खर्ज आवाजात तो म्हणाला:

"राम राम! हा कोण? हाच देनीस काय?"

त्याच्या आवाजात एवढा प्रचंड घुमारा होता की, त्याने आपला आवाज कुठे दडवला असावा याबद्दल मी नवल करत राहिलो.

बाबा म्हणाले:

"होय, हा शंभर ग्राम ठिपक्यांचा मुलगा म्हणजेच देनीस. ओळख करून घ्या. देनीस, तू ज्याची खूप वाट पहात होतास तोच हा कप्तान!"

मी पटकन उभा राहिलो. कप्तान म्हणाला: "सलाम!"

त्याने माझ्यापुढे हात धरला. मी त्याचा हात दाबला. त्याचा हात लाकडी फळ्यासारखा टणक होता. कप्तान खूप देखणा होता. पण त्याचा आवाज मात्र भयानक होता. आणि खंजीर कुठे? पायजम्यात फिरत होता. शिवाय पाईप कुठे? सरळ अथवा वाकड्या दांड्याचा... कसाही असो... पण पाईप तर हवा! पाईप नव्हताच... मी टेबलापाशी बसलो.

"झोप कशी लागली हारीतोशा?" मीलामावशीने विचारले.

"वाईट!" कप्तान म्हणाला. "काय झालं, समजत नाही. सबंध रात्रभर कुणीतरी माझ्यावर खेकसत होता. जरा कुठं डोळा लागतोय, तेवढ्यात कुणीतरी ओरडायचा: 'झोप! ताबडतोब झोप!' त्यामुळं मला नेमकी जाग यायची. पण पाच दिवसांच्या प्रवासाचा शीण होता, डोळे गपागप मिटत होते. परत डुलकी लागायची, कुणीतरी ओरडायचा: 'झोप! पडून रहा!' त्यावर कळस म्हणजे माझ्या अंगावर खाण्याचे वेगवेगळे पदार्थ कोसळू लागले – अंडी वाटतं... झोपेत मला कटलेटचा वास येत होता. सबंध झोपेत काहीतरी न कळणारे शब्द ऐकू येत होते: "कूष" किंवा "आपोर्त" असे काहीतरी!"

"तूबो!" मी म्हणालो. "आपोर्त नव्हे, तूबो! कारण मला वाटलं तिथं कुत्रा आहे... कुणीतरी गुरगुरत होतं!"

कप्तान स्वतःच्या दणदणीत आवाजात म्हणाला:

"मी गुरगुरत नव्हतो. मी बहुधा घोरत होतो?"

सर्व स्पष्ट झाले होते. माझ्याशी आता तो कधीही मैत्री करणार नाही हे मला समजले होते. मी उठलो आणि म्हणालो:

"कॉम्रेड कप्तान! अगदी गुरगुरल्यासारखा आवाज येत होता. मी बहुधा थोडासा घाबरलो होतो."

कप्तान म्हणाला :

"बरं, बरं, बैस खाली."

मी टेबलापाशी बसलो. मला जाणवले की, माझ्या डोळयांमध्ये जणू वाळू खुपत होती व कप्तानाकडे पाहणे मला अशक्य ठरले. आम्ही सगळे खूप वेळपर्यंत गप्प राहिलो.

मग तो म्हणाला :

"मला सांगायचंय, की मला मुळीच राग आलेला नाही."

पण तरीही मला त्याच्याकडे पाहणे अशक्य ठरले.

तेव्हा तो म्हणाला :

"माझ्या कोरलेल्या खंजीराची शपथ!"

अशा काही आनंदी स्वरात त्याने हे शब्द उच्चारले की, माझ्या छातीवरचे दडपण एकदम हलके झाले.

मी कप्तानापाशी जाऊन म्हटले :

"काका, मला सिंगापूरबद्दल माहिती सांगा!"

विनोदबुद्धी असावी

एकदा मी आणि मीष्का गृहपाठ करत होतो. समोर वह्या ठेवून लिहीत होतो. हे लिहिणे चालू असतानाच मी मीष्काला लेमूर प्राण्यांसंबंधी माहिती सांगत होतो. लेमूरचे डोळे काचेच्या बशांप्रमाणे मोठे असतात, फाऊंटनपेन धरलेल्या एका लेमूरचे चित्र मी पाहिले होते, तो स्वत: खूप खूप लहान होता, पण अत्यंत सुंदर होता, वगैरे माहिती मी सांगत होतो.

नंतर मीष्का म्हणाला : "सगळं लिहून झालं?"

मी म्हणालो :

"केव्हाच."

"तू माझी वही तपास," मीष्का म्हणाला, "आणि मी तुझी वही तपासतो."

आम्ही एकमेकांना वह्या दिल्या.

मीष्काची वही मी पाहिली आणि त्याने जे काही लिहिले होते ते पाहून खो खो हसू लागलो. त्याचवेळी मीष्कासुद्धा माझी वही पाहून तसाच हसत होता.

मी विचारले :

"मीष्का, तू का हसतो आहेस?"

"मी हसतोय, कारण तू चुकीचं लिहिलं आहेस. पण तू का हसतो आहेस?"

मी म्हणालो :

"मीसुद्धा त्याच कारणासाठी, तुझ्या चुकांबद्दल. हे बघ तू काय लिहिलंस: 'वाळा सुरू झाला.' हा कुठला 'वाळा'?"

मीष्का शरमून लाल झाला.

"मला वाटतं – हिवाळा असं लिहायला पाहिजे होतं. तू बघ काय लिहिलंस: 'हिवाळा सुपू झाला.' हे 'सुपू' काय?"

"खरंच," मी म्हणालो, "तिथं 'सुरू' असं लिहायला पाहिजे होतं. छे:, सगळं परत लिहून काढलं पाहिजे. त्या लेमूरांनी गोंधळ केला."

आम्ही परत लिहू लागलो. सर्व लिहून झाल्यानंतर मी म्हणालो:

"आपण आता एकमेकांना कोडी घालू!"

"चालेल," मीष्का म्हणाला.

तेवढ्यात माझे बाबा आले. ते म्हणाले:

"नमस्ते, विद्यार्थी कॉम्रेडांनो..."

बाबा टेबलापाशी बसले.

मी म्हणालो:

"बाबा, आता मी मीष्काला एक कोडं घालतो, ते ऐका: माझ्यापाशी दोन सफरचंदं आहेत, आपण तिघं आहोत, तर आपल्यामध्ये त्यांची समान वाटणी कशी करायची?"

मीष्काने गाल फुगवले आणि तो विचार करू लागला. बाबांनी गाल फुगवले नाहीत, पण तेसुद्धा विचारात पडले. त्या दोघांनी खूप वेळपर्यंत विचार केला.

तेव्हा मी म्हणालो:

"हरलास, मीष्का?"

मीष्का म्हणाला:

"हरलो!"

मी म्हणालो:

"आपल्याला सारखा वाटा मिळायला पाहिजे असेल तर त्या सफरचंदांना उकडून त्यांचं सरबत बनवलं पाहिजे." मी हसून म्हटले: "मीलामावशीनं मला हे शिकवलं!.."

मीष्काने आणखीच गाल फुगवले. तेव्हा बाबांनी डोळे किलकिले करत म्हटले:

"देनीस, तू जर एवढा चतुर आहेस, तर आता मी तुला एक कोडं घालतो."

"चालेल," मी म्हणालो.

बाबा खोलीत येरझाऱ्या घालू लागले.

"ऐक," ते म्हणाले. "एक मुलगा पहिली 'ब' मध्ये शिकतोय. त्याच्या कुटुंबात चार माणसं आहेत. आई सात वाजता उठते आणि कपडे करण्यात दहा मिनिटं घालवते. बाबा पाच मिनिटं दात घासतात. आजी दुकानात जाते आणि आईला कपडे करायला व बाबांना दात घासायला मिळून जेवढा वेळ लागतो, तेवढा वेळ घालवते. आजोबा वर्तमानपत्र वाचण्यात

जो वेळ घालवतात तो आजीला दुकानात जाऊन यायला, उणे आईला कपडे करायला लागणाऱ्या वेळाइतका आहे.

"ते सगळे एकत्र आले म्हणजे पहिली 'ब' मधल्या मुलाला झोपेतून उठवू लागतात. त्यासाठी आजोबांच्या वर्तमानपत्रवाचनाला लागणारा वेळ, अधिक आजीला दुकानात जाऊन यायला लागणारा वेळ, एवढा वेळ खर्च होतो.

"पहिली 'ब' मधला मुलगा जेव्हा जागा होतो, तेव्हा आईला कपडे करायला लागणारा वेळ, अधिक बाबांना दात घासायला लागणारा वेळ, एवढा वेळपर्यंत तो लोळत पडतो. आणि आजोबांना वर्तमानपत्र वाचायला लागणाऱ्या वेळातून आजीला दुकानात जाऊन यायला लागणारा वेळ भागल्यास उरणारा वेळ त्या मुलाला तोंड धुवायला लागतो. शाळेत जायला त्याला जितकी मिनिटं उशीर होतो, तो वेळ म्हणजे त्याने लोळत पडण्यात घालवलेला वेळ, अधिक तोंड धुण्यासाठी घालवलेला वेळ, उणे आईला कपडे करण्यासाठी लागणारा वेळ, गुणिले बाबांना दात घासण्यासाठी लागणारा वेळ."

"तर प्रश्न असा: हा पहिली 'ब' मधला मुलगा कोण आणि हे जर असंच पुढं चालू राहिलं तर त्याला कसला धोका आहे?"

बाबा खोलीच्या मध्यभागी थांबले व माझ्याकडे पाहू लागले. मीष्का पोट धरधरून हसला आणि तोही माझ्याकडे पाहू लागला. ते दोघेही माझ्याकडे पहात हसू लागले.

मी म्हणालो: "ह्या कोड्याचं उत्तर ताबडतोब देणं मला शक्य नाही, कारण आम्हाला अजून असली गणितं शिकवलेली नाहीत."

यापुढे आणखी एकही शब्द न बोलता मी खोलीतून बाहेर निघून गेलो, कारण मनातल्या मनात ताबडतोब मी ओळखले होते की, कोड्याचे उत्तर 'आळशी' असे होते आणि त्या मुलाला लौकरच शाळेतून हाकलून लावण्यात आले असते. मी खोलीमधून कॉरीडॉरमध्ये आलो आणि तेथे टांगलेल्या कोटांमागे उभा राहून विचार करू लागलो: जर कोडे माझ्याबद्दल असेल तर ते खरे नव्हते, कारण मी नेहमी लौकर उठतो आणि फार वेळ लोळत नाही. मी असाही आणखी विचार केला की, जर बाबांना माझ्याबद्दल अशा गोष्टी रचून सांगाव्याशा वाटत असतील, तर मी सरळ घर सोडून दूर ओसाड प्रदेशात काम करायला जाईन. तेथे काम सहज मिळेल, तेथे माणसांची – विशेषत: तरुणांची – खूप गरज आहे. मी तेथे नवनवे प्रदेश शोधून काढीन, मग बाबा एखाद्या प्रतिनिधीमंडळाबरोबर आल्ताय प्रदेशात येतील, मला बघतील, मी एक मिनिटभर थांबून म्हणेन:

"नमस्ते, बाबा," आणि पुढे काम करायला जाईन.

ते म्हणतील:

"तुला आईनं नमस्कार धाडलाय..."

आणि मी म्हणेन:

"धन्यवाद... कशी आहे ती?"

ते म्हणतील :

"ठीक आहे."

मी म्हणेन :

"कदाचित ती आपल्या एकुलत्या एक मुलाला विसरली तर नाही?"

ते म्हणतील :

"अरे तू काय बोलतोस, उलट तिचं सदतीस किलो वजन कमी झालंय! तुझ्यापायी एवढी झुरतेय!"

त्यावर मी त्यांना काय सांगेन ह्याचा विचार करायला मला सवड मिळाली नाही, कारण माझ्या अंगावर कोट पडला आणि तेवढ्यात बाबा तेथे आले. मला बघताच ते म्हणाले :

"अरेच्चा, तू इथं आहेस होय! तुझे डोळे असे का? ते कोडं तुझ्यावर रचलंय असं वाटून घेतलंस की काय?"

त्यांनी खाली पडलेला कोट उचलून परत टांगला आणि ते पुढे म्हणाले :

"मी ते सगळं मनाशी रचून सांगितलं. तसा मुलगा या जगात नाही आणि तुमच्या वर्गात तर मुळीच नाही!"

बाबांनी माझा हात पकडून कोटांमागून मला बाहेर काढले.

मग परत एकदा माझ्याकडे रोखून पहात ते हसून म्हणाले :

"विनोदबुद्धी असली पाहिजे," त्यांचे डोळे आनंदाने चमकत होते. "पण कोडं मजेदार होतं की नाही! काय? हस बघू!"

आणि मी हसू लागलो.

तेसुद्धा हसू लागले.

आणि आम्ही खोलीत गेलो.

छूः मंतर!

काही दिवसांपूर्वी मरायचा थोडक्यात वाचलो. म्हणजे हसण्यापायी. हे सगळे मीष्कामुळे घडले.

एकदा बाबा म्हणाले :

"देनीस, उद्या आपण कुरणात चरायला जाऊ. उद्या आई मोकळी आहे आणि मीसुद्धा. आणखी कुणाला घ्यायचं बरोबर?"

मी म्हणालो :

"कुणाला घ्यायचं हे उघड आहे – मीष्काला."

आईने विचारले :

“त्याला सोडतील?”

“आपल्याबरोबर नक्की सोडतील, का नाही?” मी म्हणालो. “मी त्याला बोलवायला जातो.”

मी धावत मीष्काकडे गेलो. त्याच्या घरात गेल्यावर म्हणालो: “नमस्ते!” त्याच्या आईने मला उत्तर दिले नाही, पण त्याच्या वडिलांना ती म्हणाली:

“पहा, किती चांगले रीतीरिवाज आहेत, नाही तर आपला...”

मी त्यांना सर्व समजावून सांगितले की, उद्या उपनगरात भटकायला आम्ही मीष्काला निमंत्रण देत होतो. त्यांनी ताबडतोब परवानगी दिली आणि दुसऱ्या दिवशी आम्ही निघालो.

विजेच्या आगगाडीमधून प्रवास करायला फारच मजा येते!

पहिली गोष्ट म्हणजे बाकांचे हात चकचकतात. दुसरी, ब्रेकच्या तांबड्या साखळ्या अगदी डोळ्यांसमोर लोंबत असतात. आणि प्रवास कितीही अंतराचा असो, ती साखळी खेचण्याची मला नेहमी इच्छा होते, निदान तिला हात लावून पहावासा वाटतो. सर्वांत मुख्य म्हणजे— खिडकीबाहेर पाहता येते, तेथे खास फळी असते. जर उंची अपुरी पडत असेल, तर त्या फळीवर उभे राहून बाहेर वाकून पाहता येते. मी आणि मीष्काने ताबडतोब एका खिडकीजवळची जागा पटकावली. बाहेर पहायला मजा येत होती. सगळीकडे नवे गवत उगवले होते आणि जहाजांवरील झेंड्यांप्रमाणे घरांच्या कुंपणांवर वेगवेगळ्या रंगांचे वाळत घातलेले कपडे फडकत होते.

पण बाबा आणि आई आम्हाला सतत सतावत होते. आमच्या विजारींचे पट्टे मागून खेचत ते ओरडत होते: “बाहेर वाकून बघायचं नाही म्हणून सांगितलं ना! खाली पडाल!”

पण आम्ही सारखे बाहेर वाकून पहात होतो. तेव्हा बाबांनी एक युक्ती केली. खिडकीतून बाहेर पाहण्याचे आम्ही बंद करावे असा त्यांचा त्या युक्तीमागील हेतू होता. म्हणून त्यांनी विचित्र चेहरा केला आणि मुद्दाम सर्कशीतील विदूषकाप्रमाणे ते बोलू लागले:

“ए पोरांनो! आपापल्या जागांवर बसा! कार्यक्रम सुरू होत आहे!”

मी आणि मीष्का ताबडतोब खिडकीपासून दूर झालो आणि बाकावर शेजारी-शेजारी बसलो, कारण माझे बाबा विनोद करण्यात फार पटाईत आहेत आणि आता काहीतरी गंमत बघायला मिळणार अशी आमची खात्री होती. आमच्या डब्यामधील इतर प्रवासीसुद्धा माना वळवून बाबांकडे पाहू लागले. बाबा मात्र कुणाकडेही लक्ष न देता पुढे बोलत होते:

“माननीय प्रेक्षकहो! आता तुमच्यासमोर अजिंक्य जादूगार कार्यक्रम सादर करत आहे! जगप्रसिद्ध मोहिनीमंत्रज्ञ, ऑस्ट्रेलियात आणि मॉस्कोच्या उपनगरांमध्ये लोकप्रिय असलेले, तलवारी खाऊन दाखवणारे, बरण्या आणि जळलेले कांचेचे दिवे खाऊन दाखवणारे, प्रोफेसर एदुआर्द कोन्द्रातीयेविच कीओ-सीओ! बँडवाले—वाजवा! त्रा-बी-बो-बूम-ल्या-ल्या! त्रा-बी-बो-बूम-ल्याल्या!”

सगळेजण बाबांकडे पहात होते. माझ्यासमोर आणि मीष्कासमोर उभे रहात बाबा म्हणाले:

"अत्यंत धोक्याचा प्रयोग! प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर तर्जनी तोडून दाखवणार! भित्र्या लोकांनी घेरी येऊन पडू नये म्हणून कृपया त्यांनी हॉलबाहेर जावे! सावधान!"

आणि बाबांनी हातांना असे काही धरले की, उजव्या हाताने डाव्या हाताच्या तर्जनीला त्यांनी पकडल्याचे मला व मीष्काला भासले. मग बाबांनी खूप जोर लावला, त्यांचा चेहरा लालेलाल झाला, त्यांनी चेहरा भयंकर केला, जणू वेदनेपायी ते मरत होते आणि अचानक ते चिडले... आणि त्यांनी स्वतःचे बोट तोडले! कमाल होती!.. आम्ही चक्क पहात होतो... रक्त मुळीच दिसत नव्हते. पण बोट नव्हते! तेथे मोकळी गुळगुळीत जागा होती. शप्पत!

बाबा म्हणाले:

"वूआल्या!"

त्या शब्दाचा अर्थसुद्धा मला माहीत नाही. पण तरीही मी टाळ्या वाजवल्या आणि मीष्का ओरडला "वाह्व्वा!" मग बाबांनी दोन्ही हात झटकले, एक हात स्वतःच्या कॉलरखाली घालत ते म्हणाले:

"आले-ऊप! छूः मंतर!!"

आणि त्यांनी बोट परत जागच्या जागी बसवले! खरेच! जुन्या बोटाच्या जागी नवे बोट कुठूनतरी उगवले! अगदी तस्सेच! पूर्वीसारखे! शाईचा डागसुद्धा पूर्वीच्या बोटावर होता, तसाच नव्या बोटावर होता. अर्थात मला समजले की, ही हातचलाखी होती आणि ती कशी करतात हे मी बाबांना विचारण्याच्या बेतात होतो, पण तेवढ्यात संपूर्ण गोंधळून गेलेल्या मीष्काने विचारले:

"हे कसं काय?"

बाबा नुसते हसून म्हणाले:

"जर खूप माहीत झालं, तर लौकर म्हातारा होशील!"

तेव्हा मीष्का विनवणीच्या सुरात म्हणाला:

"आणखी एकदा करून दाखवा ना! छूः मंतर!"

बाबांनी परत सर्व करून दाखवले. बोट तोडले आणि परत चिकटवले, परत सर्वजण चकित झाले. बाबांनी वाकून मुजरा केला आणि आम्हाला वाटले की, कार्यक्रम संपला. पण प्रत्यक्षात तसे मुळीच नव्हते. बाबा पुढे बोलू लागले:

"अनेक लोकांच्या आग्रहाखातर, कार्यक्रम पुढे चालू रहात आहे. आता फकीराच्या हाताच्या कोपरात नाणं घालून दाखवण्यात येईल. बँडवाले – त्रीबो-बूम-ल्या-ल्या!"

बाबांनी एक नाणे काढले, स्वतःच्या कोपरावर ठेवले व कोटावर ते नाणे घासायला सुरुवात केली. पण नाणे कुठेही हातामध्ये जाईना आणि सारखे खाली पडू लागले. तेव्हा मी बाबांना हसू लागलो व म्हणालो:

"अरेरे! तुम्ही कसले फकीर! काही जमत नाही तुम्हाला!"

भोवतालची सगळी माणसेसुद्धा हसू लागली. बाबा लालेलाल होत ओरडले:

"अरे नाण्या! आत्ताच्या आत्ता जा माझ्या कोपरात! नाहीतर तुला त्या आईस्क्रीमवाल्याला देऊन टाकीन. समजलं!"

नाणे जणू काही बाबांना घाबरले आणि क्षणात कोपरात नाहीसे झाले.

"काय देनीस, जिरली का?" बाबा म्हणाले. "कोण इथं ओरडलं होतं – मी कसला फकीर? आता बघ: मीष्का नांवाच्या छान मुलाच्या नाकातून नाणी काढून दाखवतो! छू: मंतर!"

आणि बाबांनी मीष्काच्या नाकातून एक नाणे खेचून काढले. मंडळी, माझे बाबा एवढे चतुर आहेत हे मला माहीत नव्हते! आणि आपल्या नाकातून नाणे काढून दाखवले म्हणून मीष्का गर्वाने फुगला होता. गंमत वाटून तो मोठ्यांदा बाबांना म्हणाला:

"आणखी एकदा छू: मंतर करा ना!"

बाबांनी परत त्याच्या नाकातून नाणे काढले आणि नंतर ते आईला म्हणाले:

"विश्रांती! आता थोडं खाऊ या!"

आईने आम्हाला कबाबाचे सँडविच दिले. मी आणि मीष्का पाय हलवत सँडविच खाऊ लागलो. अचानक मीष्का माझ्या आईला म्हणाला:

"तुमची टोपी कशासारखी दिसते मला माहीत आहे."

आईने विचारले:

"सांग बघू, कशासारखी?"

"अंतराळवीराच्या हेल्मेटसारखी."

बाबा म्हणाले:

"अगदी बरोबर! शाबास मीष्का, अचूक हेरलंस! खरंच ही टोपी अंतराळवीराच्या हेल्मेटसारखी दिसते. फॅशन नेहमी काळाच्या बरोबर चालते. मीष्का, जरा इकडं ये बघू!"

बाबांनी आईची नवी टोपी घेतली व मीष्काच्या डोक्यावर बसवली.

"अस्सल अंतराळवीर दिसतो!" आई म्हणाली.

मीष्का खरोखरीच छोट्या अंतराळवीरासारखा दिसत होता. तो अशा काही मजेशीर ऐटीत बसला होता की, त्याच्या जवळून जाणारी सर्व माणसे त्याला पाहून गालातल्या गालात हसत होती.

मीष्का तसा गोड दिसत होता म्हणून बाबा हसत होते, आई हसत होती आणि मीसुद्धा हसत होतो. मग आम्हाला आईस्क्रीम विकत घेऊन देण्यात आले आणि आम्ही ते चाटून खाऊ लागलो. मीष्काने माझ्याआधी आईस्क्रीम संपवले आणि तो परत खिडकीपाशी गेला. त्याने खिडकीची चौकट पकडली, फळीवर पाय ठेवले व मुंडके बाहेर काढून तो पाहू लागला.

आमची विजेवर चालणारी आगगाडी वेगात धावत होती. खिडकीमधून बाहेरचा निसर्ग भराभर सरकत होता. डोक्यावर अंतराळवीराचे हेल्मेट घालून बाहेरचे देखावे बघायला मीष्काला मजा वाटत होती. तो अगदी गुंगला होता. दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचे त्याला भान उरले नव्हते. मला त्याच्याशेजारी उभे रहायची इच्छा होती, पण तेवढ्यात आईने माझ्या कोपराला हळूच धक्का मारला व डोळयांनी खूण करून बाबांकडे माझे लक्ष वेधले.

बाबा हळूच उठले आणि दुसऱ्या भागात गेले. तेथेही खिडकी उघडी होती, पण त्या खिडकीमधून कुणीही बाहेर डोके काढून पहात नव्हते. बाबांचा चेहरा खूप गूढ बनला होता आणि भोवतीची सर्व माणसे गप्प राहून त्यांची प्रत्येक हालचाल लक्षपूर्वक पहात होती. बाबा चोरपावलांनी त्या रिकाम्या खिडकीपाशी पोहोचले आणि आगगाडी ज्या दिशेने जात होती त्या दिशेला, मीष्काप्रमाणेच डोके बाहेर काढून ते पाहू लागले. मग बाबांनी अगदी हळू हळू उजवा हात खिडकीबाहेर घातला, सावधपणे मीष्कापर्यंत लांब केला आणि एकदम वेगाने त्याच्या डोक्यावरची आईची टोपी त्यांनी खेचून काढली! बाबा ताबडतोब उडी मारून खिडकीपासून दूर झाले, त्यांनी टोपी पाठीशी लपवली आणि कमरेच्या पट्ट्यात खोचली. मी हे सर्व स्पष्ट पाहिले, कारण मी बाबांच्या पाठीशी होतो. पण मीष्काने काहीच पाहिले नव्हते! त्याने पटकन डोक्यावर हात धरला, पण आईची टोपी त्याला सापडली नाही. घाबरून तो खिडकीपासून मागे सरला आईकडे तो घाबरून बघू लागला. आई किंचाळली:

"काय झालं मीषा? माझी नवी टोपी कुठं आहे? वाऱ्यानं उडून तर गेली नाही? तरी मी तुला बजावत होते: बाहेर वाकून बघू नको. माझी टोपी हरवणार असं मला आधीपासूनच मनात वाटत होतं! आता मी काय करू?"

आईने दोन्ही हातांनी स्वतःचा चेहरा झाकून घेतला व जणू हुंदके देऊन रडत असल्याप्रमाणे ती खांदे हलवू लागली. बिचाऱ्या मीष्काचा केविलवाणा चेहरा बघवत नव्हता. कापऱ्या आवाजात अडखळत तो म्हणाला:

"रडू नका... मी तुम्हाला नवी टोपी विकत घेऊन देईन... माझ्यापाशी पैसे आहेत... सत्तेचाळीस कोपेक. तिकीटांसाठी मी जमवले होते..."

त्याचे ओठ थरथरत होते आणि बाबांना अर्थातच त्याची ही अवस्था पाहवली नाही. त्यांनी ताबडतोब मजेशीर चेहरा केला आणि सर्कसमधील विदूषकाच्या आवाजात ते ओरडले:

"लोकहो, लक्ष द्या! रडू नका, शांत व्हा! तुमचं भाग्य की, सुप्रसिद्ध जादूगार एदुआर्द कोन्द्रातीयेविच कीओ-सीओ यांच्याशी तुमची ओळख आहे! आता एक जबरदस्त जादू बघाल: निळ्या एक्स्प्रेसमधून खाली पडलेली टोपी परत आणून दाखवण्यात येईल! तयार! सावधान!! छू: मंतर!!!"

आणि बाबांच्या हातात आईची टोपी दिसली. बाबांनी स्वतःच्या पाठीकडून किती चलाखीने ती टोपी बाहेर काढली ते माझ्यासुद्धा ध्यानात आले नाही. सर्वांच्या तोंडून आश्चर्याचा चीत्कार उमटला! मीष्काचा चेहरा आनंदाने उजळला. त्याचे डोळे आश्चर्याने मोठ्ठे मोठ्ठे बनले होते. आनंदाने जणू त्याला वेड लागले होते तो पटकन बाबांपाशी गेला, त्यांच्या हातून त्याने टोपी घेतली आणि खिडकीपाशी परत धावून जात अंगातील सर्व शक्तीनिशी त्याने ती टोपी खिडकी-बाहेर भिरकावली. मग मागे वळून तो माझ्या बाबांना म्हणाला:

"आता परत एकदा छू: मंतर करून दाखवा ना!"

तेव्हा मात्र अगदी मरेपर्यंत हसून हसून मी बेजार झालो.

दीडशहाणा प्रोफेसर

माझे बाबा जेव्हा वर्तमानपत्र वाचत असतात तेव्हा मी त्रास दिलेला त्यांना आवडत नाही. पण ही गोष्ट मी नेहमी विसरतो, कारण मला त्यांच्याबरोबर गप्पा मारायचा खूप इच्छा असते. सरतेशेवटी ते माझे एकुलते एक बाबा आहेत! मला नेहमी त्यांच्याशी गप्पा माराव्याशा वाटतात.

एकदा ते असेच वर्तमानपत्र वाचत बसले होते आणि आई माझ्या जाकीटाची कॉलर शिवत होती. मी म्हणालो:

"बाबा, तुम्हाला माहीत आहे, बैकल सरोवरात किती आझोवचे समुद्र मावतील?"

ते म्हणाले:

"मला त्रास देऊ नको..."

मी म्हणालो:

"ब्याण्णव! कमाल आहे ना?"

ते म्हणाले:

"कमाल आहे. आता बडबडू नको. ठीक?"

आणि ते परत वाचू लागले.

मी म्हणालो:

"तुम्हाला चित्रकार एल् ग्रेको माहीत आहे?"

त्यांनी मान हलवली.

मी म्हणालो:

"त्याचं खरं नांव दोमेनिको तेओतोकोपूली! तो क्रीट बेटावरचा ग्रीक आहे. एके काळी क्रीट ग्रीकांच्या ताब्यात होतं. म्हणून ह्या चित्रकाराला स्पेनचे लोक एल् ग्रेको म्हणतात!.. मजा आहे. बाबा, देवमाशाला पाच किलोमीटर अंतरावरचं ऐकू येतं!"

बाबा म्हणाले:

"जरा गप्प बैस... निदान पाच मिनिटं..."

पण माझ्यापाशी बाबांना सांगायला खूप खूप नवी माहिती होती, म्हणून मला गप्प बसणे अशक्य ठरले. नवनव्या माहितीने मी अगदी तुडुंब भरलो होतो. जर माझ्यापाशी कमी नवी माहिती असती, तर कदाचित मी थोडा वेळ गप्प बसू शकलो असतो, पण तसे नव्हते. न राहवून मी म्हणालो:

"बाबा! सर्वांत महत्त्वाची बातमी तुम्हाला माहीत आहे: मोठ्या सुन्दा बेटांवर छोटुकले बैल राहतात. त्यांना केन्तुम म्हणतात. अशा केन्तुमला सूटकेसमध्ये घालून आणता येतं!"

"असं?" बाबा म्हणाले. "आश्चर्य आहे! आता मला जरा शांतपणं वर्तमानपत्र वाचू दे. ठीक?"

"वाचा, वाचा," मी म्हणालो. "खुशाल वाचा! पण बाबा, तशा बैलांचा आख्खा कळप आपण आपल्या कॉरीडॉरमध्ये बाळगू शकू!.. हुर्रा!"

"हुर्रा!" बाबा म्हणाले. "गप्प बसशील की नाही?"

"आणि सूर्य आकाशाच्या मध्यभागी नाही, एका बाजूला आहे," मी म्हणालो.

"शक्य नाही," बाबा म्हणाले.

"पैजेवर सांगतो," मी म्हणालो, "सूर्य आकाशाच्या एका बाजूला आहे!"

बाबांनी माझ्याकडे धुंद डोळ्यांनी पाहिले. मग त्यांचे डोळे स्पष्ट झाले आणि ते आईला म्हणाले:

"कुठून गोळा करतो एवढी माहिती? केव्हा?"

आई हसून म्हणाली:

"तो आधुनिक मुलगा आहे. तो वाचतो, रेडिओ ऐकतो, टेलीव्हिजन पाहतो, भाषणं ऐकतो. तुम्हाला काय वाटलं?"

"आश्चर्य आहे," बाबा म्हणाले "एवढ्या लहान वयात कसं काय जमतं?"

आणि त्यांनी परत वर्तमानपत्रात डोके खुपसले. आईने त्यांना विचारले:

"एवढं काय वाचताय?"

"आफ्रिका," बाबा म्हणाले. "खदखदतेय! वसाहतवादाचा शेवट आलाय!"

"अजून शेवट नाही!" मी म्हणालो.

"काय?" बाबांनी विचारले.

वर्तमानपत्राखालून सरपटत मी बाबांसमोर उभा राहिलो.

"अजून पराधीन देश आहेत," मी म्हणालो. "अजून खूप पराधीन देश आहेत. वीसपेक्षा जास्त अजून छळ सहन करताहेत."

ते म्हणाले:

"तू लहान मुलगा नाहीस. साक्षात प्रोफेसर आहेस! अस्सल प्रोफेसर... दीडशहाणा!"

बाबा हसले आणि त्यांच्याबरोबर आईसुद्धा हसली. ती म्हणाली:

"बरं, देनीस, आता खेळायला जा." तिने माझ्यासमोर जाकीट धरले आणि मला किंचित धक्का देत ती म्हणाली – "जा, पळ!"

मी कॉरीडॉरमध्ये गेलो आणि आईला विचारले:

"आई, दीडशहाणा प्रोफेसर म्हणजे काय? पहिल्यांदाच हा शब्द मी ऐकतोय! बाबांनी मला चेष्टेनं म्हटलं – दीडशहाणा प्रोफेसर? हा अपमान आहे ना?"

पण आई म्हणाली:

"छे: ह्यात मुळीच अपमान नाही. बाबा तुझा अपमान करतील का? उलट त्यांनी तुझं कौतुक केलं!"

बाबांनी माझे कौतुक केले असे ऐकताच मी ताबडतोब शांत झालो आणि खेळायला गेलो.

जिन्यावर असताना मला आठवण झाली की, आल्योन्काकडे भेटायला जायला हवे होते. ती आजारी होती आणि काही खात नव्हती असे सगळेजण म्हणत होते. मी आल्योन्काकडे गेलो. त्यांच्याकडे निळया सुटातला आणि पांढऱ्याशुभ्र हातांचा एक माणूस बसला होता. टेबलापाशी बसून तो आल्योन्काच्या आईबरोबर बोलत होता. खुद्द आल्योन्का दिवाणावर निजली होती आणि घोड्याचा पाय चिकटवत होती. मला बघताच आल्योन्का ओरडली :

"देनीस आला! हुर्रा!"

मी नम्रपणे म्हणालो :

"नमस्ते! अशी वेड्यासारखी ओरडतेस काय?"

मी तिच्यापाशी दिवाणावर बसलो. पांढऱ्याशुभ्र हातांचा माणूस उठत म्हणाला :

"तर सगळं स्पष्ट आहे! शुद्ध हवा पाहिजे. शुद्ध हवा! तशी ती ठणठणीत मुलगी आहे! चिंतेचं काहीही कारण नाही!"

ते डॉक्टर आहेत असे माझ्या चटकन ध्यानात आले.

आल्योन्काची आई म्हणाली :

"धन्यवाद, प्रोफेसर! मनःपूर्वक धन्यवाद!"

आणि तिने त्यांच्याशी हस्तांदोलन केले. असे दिसले की, सर्व काही माहीत असलेले असे ते एक छान डॉक्टर होते आणि म्हणून त्यांना प्रोफेसर म्हणत होते.

आल्योन्कापाशी येऊन ते म्हणाले :

"अच्छा, परत भेटू आल्योन्का, लौकर बरी हो."

ती लाजून लाल झाली, तिने मला जीभ काढून दाखवली आणि भिंतीकडे तोंड वळवून ती पुटपुटली : "अच्छा..."

त्यांनी तिच्या डोक्यावर थोपटले आणि माझ्याकडे वळून विचारले :

"तुमचं नांव काय, तरुण गृहस्था?"

किती छान माणूस होता. मला "तुम्ही" म्हणत होता.

मी पटकन उठून म्हणालो :

"मी देनीस कराब्ल्योव! तुमचं काय नांव?"

त्यांनी स्वतःच्या पांढऱ्याशुभ्र, मोठ्या आणि मऊ पंजात माझा हात घेतला. त्यांचा हात एवढा मऊ पाहून मला आश्चर्यसुद्धा वाटले. अगदी रेशमासारखा मऊ. माझा हात हलवत ते म्हणाले :

"माझं नांव वासिली वासिल्येविच सेर्गेयेव. प्रोफेसर."

मी म्हणालो :

"दीडशहाणे? दीडशहाणे प्रोफेसर?"

आल्योन्काच्या आईने कपाळाला हात लावला. आणि प्रोफेसरांचा चेहरा लाल झाला व ते खोकू लागले. ते दोघेही खोलीतून बाहेर गेले.

मला जाणवले की, खोलीतून त्यांचे जाणे काहीसे विचित्र होते. जणू ते दोघे पळाले होते. शिवाय मला जाणवले की, मी काहीतरी चुकीचे बोललो होतो.

कदाचित "दीडशहाणा" हा शब्द चांगला नसावा, काय?

पोहण्यात तिसरा नंबर

जेव्हा मी पोहण्याच्या तलावावरून निघालो तेव्हा अत्यंत मजेत होतो. सगळ्या ट्रॉलीबस मला आवडत होत्या, कारण त्यांच्या मोठमोठ्या काचांच्या खिडक्यांमुळे आतील प्रवासी दिसत होते. आईस्क्रीम विकणाऱ्या बायका आनंदी होत्या म्हणून मला आवडत होत्या. रस्त्यावर फारसे गरम होत नव्हते आणि माझे ओले डोके वारा थंड करत होता म्हणून मी खूष होतो. पण मला विशेष आनंद झाला होता कारण बटरफ्लाय पद्धतीने पोहण्याच्या स्पर्धेत माझा तिसरा नंबर लागला होता. आता घरी गेल्यावर ही बातमी सांगून मी बाबांना खूष करणार होतो. मी पोहायला शिकावे अशी त्यांची केव्हापासूनची इच्छा होती. बाबांचे मत होते की, सर्व लोकांना पोहायला येणे आवश्यक होते आणि लहान मुलाग्यांना तर विशेष आवश्यक होते, कारण ते पुरुष होते. जहाज फुटण्याच्या वेळी अथवा एरवी तळ्यात होडी उलटून जो माणूस बुडून मरतो तो कसला पुरुष?

तर आज माझा पोहण्यात तिसरा नंबर आला होता आणि घरी गेल्यावर बाबांना मी ही बातमी सांगणार होतो. घाईघाईने मी घरापर्यंत चालत आलो आणि खोलीत जाताच आईने पटकन विचारले:

"आज तू एवढा खुषीत का?"

मी म्हणालो:

"आज आमची स्पर्धा झाली."

बाबा म्हणाले:

"कसली?"

"बटरफ्लाय पद्धतीनं पंचवीस मीटर पोहण्याची..."

बाबा म्हणाले:

"मग?"

"तिसरा नंबर!" मी म्हणालो.

बाबा खूप खूष झाले.

"असं?" ते म्हणाले. "झकास!" त्यांनी हातातील वर्तमानपत्र बाजूला ठेवले. "शाब्बास!"

ते खूष होणार हे मला आधीच ठाऊक होते. मी आणखीच आनंदित झालो.

SPORT

"पहिला कोण आला?" बाबांनी विचारले.

मी उत्तरलो:

"पहिला आला वोवका. त्याला छान पोहायला येतं. तेव्हा त्याला काही अवघड गेलं नाही..."

"शाबास वोवका!" बाबा म्हणाले. "बरं, दुसरा कोण आला?"

"दुसरा," मी म्हणालो, "पिंगट केसांचा एक मुलगा. त्याचं नांव मला माहीत नाही. पाण्यात तो बेडकीसारखा दिसतो..."

"आणि तू तिसरा आलास का?" बाबा हसले आणि त्यांचे हे हसणे मला फार आवडले. "काही म्हणा, पण तिसऱ्या नंबरलासुद्धा पदक मिळतं – ब्रॉंझचं! आणि चौथा कोण आला? आठवत नाही? चौथा कोण आला?"

मी म्हणालो:

"चौथा नंबर कुणालाच मिळाला नाही!"

बाबांना फार आश्चर्य वाटले.

"असं कसं बुवा?"

मी म्हणालो:

"आमचा सगळयांचा तिसरा नंबर आला: माझा, मीष्काचा, तोल्याचा, कीमकाचा, सगळ्या-सगळयांचा. वोवका पहिला, पिंगट केसांचा बेडूक – दुसरा, आणि उरलेले आम्ही अठराजण – तिसरे. आमचे शिक्षक तसं म्हणाले!"

बाबा म्हणाले:

"अच्छा, असं आहे होय... समजलं सगळं!"

आणि त्यांनी परत वर्तमानपत्रात डोके खुपसले.

का कुणास ठाऊक, पण माझा आनंद एकदम मावळला.

सर्कसवाल्यांनो, आम्ही तुमच्यापेक्षा कमी नाही!

आता मी वारंवार सर्कसला जातो. तेथे माझ्या ओळखीची माणसे बनली आहेत आणि काही तर मित्र बनली आहेत. माझी इच्छा असेल तेव्हा मला फुकट सर्कस बघायला सोडतात. कारण मी स्वत: जणू सर्कस कलाकार बनलोय. एका मुलामुळे तसे घडले. अगदी अलिकडेच तो प्रसंग घडला. मी दुकानामधून घरी चाललो होतो. आम्ही आता नव्या घरात राहतो आणि हे नवे घर सर्कसपासून जवळ आहे. तसेच मोठे दुकान कोपऱ्यावर आहे. तर मी हातात कागदी पिशवी धरून दुकानातून येत होतो. माझ्या पिशवीत दीड किलो टोमॅटो आणि कार्डबोर्डच्या पेल्यात तीनशे ग्राम आंबट साय एवढ्या वस्तू होत्या. अचानक समोरून दूस्यामावशी आली.

ती आमच्या जुन्या घरातील ओळखीची. खूप प्रेमळ. गेल्या वर्षी तिने मला आणि मीष्काला क्लबाचे तिकीट भेट म्हणून दिले होते. तिला पाहून मला खूप आनंद झाला व तिलासुद्धा. ती म्हणाली : "कुठून आलास तू ?"

मी म्हणालो :

"दुकानातून. टोमॅटो विकत घेतले ! नमस्ते दूस्यामावशी !"

ती तोंडावर हात धरत म्हणाली :

"अग्गो बाई, स्वत: दुकानात जाऊन खरेदी करतोस ? एवढ्यात ? काळ किती भराभर उलटतो !"

चकित काय व्हायचे ? मला आता नववे वर्ष आणि ती चकित होतेय !

मी म्हणालो :

"बरं, परत भेटू, दूस्यामावशी."

आणि निघालो. ती माझ्यापाठी धावत ओरडली :

"थांब ! कुठं निघालास ? मी तुला आत्ता सर्कसच्या खेळाला सोडते, दिवसाच्या कार्यक्रमाला. येणार ?"

कमाल आहे ! विचारते काय ? मी म्हणालो :

"अर्थात ! विचारायचं कारणच नाही..."

तर तिने माझा हात पकडला, आम्ही मोठमोठ्या पायऱ्या चढून वर गेलो. दूस्यामावशी दारावरच्या तिकीट तपासणाऱ्या बाईपाशी जाऊन म्हणाली :

"मारीया निकोलायेवना, माझ्या छोट्या मित्राला घेऊन आलेय. त्याला आत सोडता का ? सर्कस बघायला ?"

ती बाई हसली आणि तिने मला आत सोडले. माझ्यापाठोपाठ दूस्यामावशी आणि मारीया निकोलायेवना आत आल्या. अर्धवट अंधारात चालताना मला माझ्या आवडीचा सर्कसचा वास आला. हा विशिष्ट वास जाणवताच मला एकदम खूप उत्साह वाटू लागतो. कुठेतरी बँड वाजत होता, मी त्या आवाजाच्या दिशेने घाईघाईने जात होतो. मोठ्या चेंडूवरून चालणाऱ्या मुलीची मला अचानक आठवण झाली. रुपेरी झग्यातल्या त्या मुलीला मी नुकतेच सर्कसच्या रिंगणात पाहिले होते. ती मुलगी परत दिसेल अथवा नाही हे मला ठाऊक नाही, पण माझ्या काळजात काहीतरी वेगळेच वाटू लागले... तेवढ्यात आम्ही कोपऱ्याच्या दारापाशी पोहोचलो. मला पुढे ढकलत मारीया निकोलायेवना हळूच म्हणाल्या :

"त्या पहिल्या रांगेतल्या रिकाम्या खुर्चीवर बैस..."

मी पटकन खुर्चीवर जाऊन बसलो. माझ्याशेजारी माझ्याच वयाचा [illegible] बसला होता. माझ्याप्रमाणेच त्याच्या अंगात शाळेचा गणवेष होता, त्याच्या नाका[illegible]र उचलेला होता आणि डोळे चमकत होते. मी उशीरा आलो आणि पाहण्यात अडथळा आणला म्हणून त्याने माझ्याकडे रागाने पाहिले. पण मी त्याच्याकडे लक्षच दिले नाही. रिंगणात कार्यक्रम

करणाऱ्या कलावताकडे मी एकटक पाहू लागलो. त्या कलावताने डोक्यावर भलीमोठी पगडी घातली होती आणि त्याच्या हातात अर्धा मीटर लांबीची सुई होती. त्या सुईमध्ये दोऱ्याऐवजी एक निमुळती आणि लांब रेशमी फीत अडकवलेली होती. ह्या कलाकाराशेजारी दोन मुली उभ्या होत्या, अगदी गप्प. अचानक तो माणूस एका मुलीकडे वळला आणि त्याने भस्सदिशी सुई तिच्या पोटात खुपसून पाठीतून बाहेर काढली. मला वाटले, आता ती मुलगी ठणाठणा किंचाळणार, पण नाही! ती जागच्या जागी हसत उभी होती. माझा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. तो कलावंत भलताच चेकाळला होता. भस्स! दुसरीच्या पोटात त्याने सुई खुपसली. तीसुद्धा ओरडली नाही. नुसती डोळ्यांची उघडझाप करत राहिली. तर त्या दोघी फितीने एकत्र शिवल्या गेल्या होत्या आणि जणू काहीच झाले नाही अशा तऱ्हेने हसत होत्या. अगदी कमाल!

मी म्हणालो:

"त्या किंचाळत कशा नाहीत? कसं सहन करतात?"

माझ्या शेजारी बसलेला मुलगा उत्तरला:

"किंचाळायचं कशाला? त्यांना मुळीच दुखत नाही!"

मी म्हणालो:

"तुला केलं असतं तसं म्हणजे कळलं असतं! कसा ठणाणा कोकलला असतास याची मी कल्पना करू शकतो..."

तो हसू लागला. जणू माझ्यापेक्षा वयाने खूप मोठ्या असलेल्या माणसासारखा. मग म्हणाला:

"मला पहिल्यांदा वाटलं की, तू सर्कशीतला मुलगा आहेस. मारीयामावशीनं तुला बसवलं... पण तू सर्कसमधला नाहीस... आमच्यातला नाहीस."

मी म्हणालो:

"काय फरक पडतो, मी सर्कसमधला आहे अथवा नाही, यामुळं? मी सरकारी आहे, समजलं? आणि सर्कसमधला म्हणजे काय? त्यात काय विशेष?"

तो हसून म्हणाला:

"सर्कसमधले... वेगळे असतात..."

मी चिडलो.

"त्यांना काय तीन पाय असतात?"

"तीन पायांचा प्रश्न नाही, पण ते इतरांपेक्षा जास्त चपळ असतात, जास्त ताकदवान असतात, जास्त रुबाबदार असतात."

मी [illegible] म्हणालो:

"उगाच [illegible] बाऊ नको! इतर काही तुझ्यापेक्षा कमी नाहीत! तू सर्कसमधला आहेस काय?"

त्याने नजर खाली वळवत म्हटले:

"नाही, मी आईचा लाडका..."

आणि ओठांच्या कोपऱ्यातून तो धूर्त हसला. अगदी कपटी. पण त्यावेळी मला समजले नाही की, तो माझ्याशी कपट खेळत होता. मी त्याला कुचेष्टेने मोठ्यांदा हसलो. माझ्याकडे धावती नजर टाकत तो म्हणाला:

"कार्यक्रम बघ!.. खोगीराविना घोड्यावर बसणारी मुलगी!.."

खरोखरीच बँडवर जलद आणि मोठ्यांदा संगीत वाजू लागले. रिंगणात भक्कम आणि दिवाणासारख्या रुंद पाठीचा पांढरा घोडा धावू लागला. घोड्याच्या पाठीवर एक बाई उभी होती. घोडा रिंगणात धावत असताना तिने वेगवेगळ्या कसरती सुरू केल्या: एका पायावर, दोन्ही हात पसरून, मग दोरीवरच्या उड्या मारल्याप्रमाणे दोन्ही पायांवर उड्या. मी मनात विचार केला—एवढ्या रुंद पाठीच्या घोड्यावर उड्या मारणे म्हणजे काही विशेष नाही—लिहिण्याच्या टेबलावर उड्या मारण्याएवढेच सोपे होते; मीसुद्धा तशा उड्या मारू शकलो असतो. तर ही बाई सारखी उड्या मारत होती आणि काळ्या पोषाखातील एक पुरुष सारखा चाबूक फडकावत होता व घोड्याला पळता ठेवत होता. एखाद्या झोपाळू माशीप्रमाणे घोडा एकाच गतीने धावत होता. पण तो माणूस घोड्यावर सारखा ओरडत होता आणि हवेत चाबकाचे फाड फाड आवाज काढत होता. घोडा त्याच्याकडे मुळीच लक्ष देत नव्हता. अगदी कंटाळा आला... अखेरीस पोटभर उड्या मारून ती बाई पडद्यामागे धावली आणि घोडा एकटाच रिंगणात फिरत राहिला.

तेवढ्यात तेथे करंदाश* हा विदूषक आला. माझ्याशेजारी बसलेल्या मुलाने परत एकदा पटकन माझ्यावर नजर टाकली, मग डोळे दुसरीकडे वळवत निर्विकारपणे तो म्हणाला:

"हा कार्यक्रम तू कधी पाहिला आहेस?"

"नाही, पहिल्यांदाच," मी म्हणालो.

तो म्हणाला:

"तर मग माझ्या जागी बैस. इथून तुला जास्त चांगलं दिसेल. बैस. मी खूप वेळा हा कार्यक्रम बघितलाय."

तो हसला. मी म्हणालो:

"तुला काय झालं?"

तो म्हणाला:

"असंच, विशेष काही नाही. करंदाश आता एकेक गमती करून दाखवील! चल, जागा बदलू!"

आता एवढा जर तो उदार बनला होता, तर मी कशाला नाही म्हणू! मी त्याच्या खुर्चीवर बसलो आणि तो माझ्या. एक खरे, माझ्या खुर्चीवरून बघताना मधे एक खांब आडवा येत होता. करंदाशच्या गमती सुरू झाल्या. चाबूकवाल्या माणसाला तो म्हणाला:

---

* करंदाश—एक प्रसिद्ध सोविएत विदूषक. रशियन भाषेत 'करंदाश' म्हणजे पेन्सिल—अनु.

"अलेक्सान्द्र बरीसोविच! ह्या घोड्यावर मी बसू का?"

चाबूकवाला म्हणाला:

"जरूर, ताबडतोब बसा!"

करंदाश त्या घोड्यावर चढून बसण्याचा प्रयत्न करू लागला. त्याने तऱ्हातऱ्हांनी प्रयत्न केले, पण त्याचे पाय खूप अपुरे पडत होते व तो सारखा पडत होता. घोडा फारच धिप्पाड होता. तेव्हा करंदाश म्हणाला:

"मला ह्या घोड्यावर बसवा!"

एक मदतनीस ताबडतोब पुढे आला आणि ओणवा उभा राहिला. मग करंदाश त्याच्या पाठीवर उभा राहिला व घोड्यावर चढून बसला. पण त्याचे तोंड घोड्याच्या शेपटीकडे झाले आणि त्याची पाठ घोड्याच्या तोंडाकडे झाली. सगळे खो खो हसू लागले! चाबूकवाला करंदाश-ला म्हणाला:

"करंदाश! तुम्ही चुकीचे बसलात!"

"चुकीचा म्हणजे? मला कोणत्या दिशेला जायचंय हे तुम्हाला कुठं माहीत आहे?"

तेव्हा चाबूकवाल्याने घोड्याचे डोके थोपटत म्हटले:

"अहो, डोकं तर इकडं आहे!"

करंदाशने घोड्याची शेपटी पकडून म्हटले:

"पण दाढी तर इथं आहे!"

मग मदतनीसाने करंदाशच्या कमरपट्ट्याला दोरी अडकवली. सर्कसच्या घुमटाजवळच्या एका कडीमधून ती दोरी खाली सोडलेली होती आणि तिचे दुसरे टोक चाबूकवाल्याने आपल्या हातात पकडले. तो ओरडला:

"बँडवाले, चलो!"

बँड सुरू झाला आणि घोडा धावू लागला. कुंपणावरच्या कोंबडीप्रमाणे करंदाश घोड्या-च्या पाठीवर एकदा एकीकडे, तर एकदा दुसरीकडे लोंबकळू लागला. एकदम त्याच्या मांडी-खालून घोडा पुढे जाऊ लागला आणि करंदाश मोठ्यांदा किंचाळला:

"अरे देवा, घोडा संपतोय!"

खरोखरीच घोडा त्याच्या पायांखालून पुढे गेला व पडद्यामागे दौडत नाहीसा झाला. करंदाश बहुधा खाली आपटून मेला असता, पण चाबूकवाल्याने दोरी खेचली व करंदाश हवेत लोंबकळू लागला. सर्वांची हसून हसून मुरकुंडी वळली. आता मी हसून हसून कोसळणार असे सांगण्या-साठी शेजारच्या मुलाकडे वळलो, तर काय! मुलगा शेजारी नव्हता! कुठेतरी निघून गेला होता. एव्हाना करंदाश हवेत पोहल्याप्रमाणे हातवारे करत होता. मग त्याला खाली सोडण्यात आले, पण जमिनीला त्याचे पाय टेकले व काही पावले तो धावला न धावला तोच परत वर उडाला. झोपाळ्याप्रमाणे ते झाले होते आणि सगळी माणसे पोट धरधरून हसू लागली. असे उडत असताना एकदा त्याची विजार पूर्ण सुटायच्या बेतात होती. मला वाटले की, आता

हसता हसता गुदमरून मी मरणार. तेवढ्यात करंदाश परत जमिनीवर उतरला. अचानक त्याने माझ्याकडे हसत पाहिले व डोळा मारला. हो, चक्क मला डोळा मारला! तेव्हा मीसुद्धा उलट त्याला डोळा मारला! त्यात काय विशेष? एवढा छान विदूषक मला डोळा मारत होता! त्याने आणखी एकदा मला डोळा मारला, स्वतःचे हात चोळले, धावायला सुरवात केली, थेट माझ्यापाशी तो आला व त्याने पटकन मला बकोटीत धरले. तेवढ्यात चाबूक-वाल्याने दोरीला जोरात हिसका मारला. करंदाश आणि मी असे दोघेही वर हवेत उडालो. त्याने माझे डोके स्वतःच्या खाकेत गच्च पकडले होते आणि दुसऱ्या हाताचा माझ्या पोटाभोवती घट्ट विळखा घातला होता. कारण आम्ही जमिनीपासून खूप उंच होतो. खाली माणसे दिसत नव्हती, तर नुसते पांढरे-काळे पट्टे दिसत होते, कारण आम्ही वेगात गिरक्या घेत होतो व तोंडापाशी मला थोड्या गुदगुल्याही होत होत्या. जेव्हा आम्ही बँडवरून उडत गेलो, तेव्हा मोठ्या डबल-बासला आपटेन अशा भीतीने मी किंचाळलो:

"आई!"

माझ्याखाली प्रचंड आवाज ऐकू आला. सगळी माणसे हसली होती. करंदाशने ताबडतोब माझी नक्कल केली व रडव्या आवाजात तो ओरडला:

"या – ई ऽऽ!"

खाली प्रचंड हशा उसळला. दरम्यान आम्ही हवेत गिरक्या घेत होतो आणि मला थोडी सवय होऊ लागली होती. तेवढ्यात माझी कागदी पिशवी थोडी फाटली व तिच्यातून माझे टोमॅटो खाली पडू लागले. बॉंब कोसळल्याप्रमाणे चारही दिशांना टोमॅटो पडत होते – दीड किलो टोमॅटो! काही टोमॅटो लोकांच्या अंगावर आपटले असावेत, कारण खाली उडालेल्या गोंधळाचे वर्णन करणे अशक्य आहे. मी सगळा वेळ विचार करत होतो की, आता तीनशे ग्राम आंबट साय खाली पडली नाही म्हणजे मिळवली! आईने माझी चांगलीच कणीक तिंबली असती! तेवढ्यात करंदाश भोवऱ्यासारखा गरगर फिरू लागला आणि त्याच्याबरोबर मीही गरगर फिरू लागलो. असे त्याने करायला नको होते, कारण मी परत घाबरलो आणि लाथा झाडू लागलो, त्याला ओरबाडू लागलो. करंदाश हळूच, पण कठोर आवाजात म्हणाल्याचे मी ऐकले:

"तोल्या, तुला काय झालं?"

मी ओरडलो:

"मी तोल्या नव्हे! मी देनीस! मला सोडा!"

त्याच्या पकडीतून सुटण्याची मी धडपड करू लागलो, पण त्याने आणखीच घट्ट मला आवळले. मी घुसमटायच्या बेतात होतो. आम्ही सावकाशपणे फिरू लागलो आणि मी सबंध सर्कस बघितली, चाबूकवाला पाहिला. आमच्याकडे पाहून तो गालातल्या गालात हसला त्याच क्षणी आंबट साय खाली पडली. मला वाटलेच होते आधी की, तसे घडणार. चाबूकवाल्याच्या थेट टकलावर साय पडली. तो किंचाळला आणि आम्ही दाणदिशी जमिनीवर उतरलो..

आम्ही जमिनीवर उतरलो आणि करंदाशने मला सोडले त्या क्षणी का कुणास ठाऊक

अंगातल्या सगळ्या बळानिशी त्याच्यापासून दूर पळालो, पण कुठे जावे ते मला समजेना आणि डोके गरगरल्याप्रमाणे मला थोडी चक्कर आली. शेवटी कोपऱ्यातील दारापाशी दूस्यामावशी आणि मारीया निकोलायेवना उभ्या असलेल्या मला दिसल्या. त्यांचे चेहरे पांढरेफटक पडले होते. मी त्यांच्यापाशी धावत गेलो. भोवती सर्व माणसे वेड्यासारखी टाळ्या पिटत होती.

दूस्यामावशी म्हणाली :

"देवाची कृपा, धडधाकट परतला. चल घरी!"

मी म्हणालो :

"पण टोमॅटोंचं काय करायचं?"

"मी तुला विकत घेऊन देते. चल."

तिने माझा हात पकडला आणि आम्ही तिघेही अर्धवट अंधाऱ्या कॉरीडॉरमधून बाहेर आलो. तेथे आम्ही पाहिले की, भिंतीवरच्या दिव्यापाशी मुलगा उभा होता. माझ्याशेजारी बसलेलाच तो मुलगा होता. मारीया निकोलायेवना म्हणाल्या :

"तोल्या, तू कुठं होतास?"

मुलाने उत्तर दिले नाही.

मी म्हणालो :

"तू कुठं गायब झालास? मी तुझ्या खुर्चीवर बसलो आणि काय गोंधळ उडाला! करंदाश मला आकाशापर्यंत उचलून घेऊन गेला!"

मारीया निकोलायेवना म्हणाल्या :

"तू त्याच्या खुर्चीवर का बसलास?"

"त्यानं स्वतःच मला सांगितलं," मी म्हणालो. "तो म्हणाला की, तिथून जास्त दिसेल. म्हणून मी बसलो. आणि तो कुठंतरी निघून गेला!.."

"समजलं सगळं," मारीया निकोलायेवना म्हणाल्या. "मी सर्कसच्या डायरेक्टरना सांगते. तोल्या, तुझं हे काम काढून घेतील."

मुलगा म्हणाला :

"नको, नको. मारीयामावशी, असं करू नका."

पण त्या दबत्या आवाजात दटावून म्हणाल्या :

"तुला शरम कशी वाटत नाही! तू सर्कसमधला मुलगा आहेस, तू सराव केला होतास आणि स्वतःच्या जागी परक्याला बसवण्याचं धाडस केलंस? जर तो पडून मेला असता तर? त्यानं सराव तर केलेला नव्हता!"

मी म्हणालो :

"काही हरकत नाही. मी सराव केलेला आहे... तुम्हा सर्कसवाल्यांपेक्षा मुळीच कमी नाही! काय वाईट उड्डाण केलं मी?"

मुलगा म्हणाला :

"मस्त! अगदी शंकाच नाही. आणि ती टोमॅटोंची युक्ती फार छान होती. माझ्या कधी डोक्यात आली नव्हती. खूप मजेदार!"

"तुमचा तो विदूषक," दूस्यामावशी म्हणाली, "तोसुद्धा थोरच! हाती सापडेल त्याला बकोटीला मारतो!"

"मिखाइल निकोलायेविच," मारीयामावशी म्हणाल्या, "खेळाच्या ऐन मध्यात होते, हवेत त्यांनी आधी चकरा मारल्या होत्या, तेसुद्धा माणूसच आहेत आणि त्यांना पक्कं माहीत होतं की, नेहमीप्रमाणं त्या ठरलेल्या खुर्चीवर सर्कसमधला खास मुलगा बसलेला असणार. हे सर्व आधी ठरलेलं असतं. पण हा मुलगा अगदी त्या मुलासारखाच दिसतो, दोघांचे कपडेही सारखेच, त्यांच्या ध्यानात आला नाही त्यांच्यातला फरक..."

"नीट पहायला हवं होतं!" दूस्यामावशी म्हणाली. "उंदीर उचलून न्यावा तसा पोराला उचलून घेऊन गेला!"

मी म्हणालो:

"बरं आता पुरे. चलायचं?"

तोल्या म्हणाला:

"ऐक, रविवारी दोन वाजण्याच्या सुमाराला ये. माझा पाहुणा म्हणून. तिकीटखिडकी-पाशी मी तुझी वाट पाहीन."

"ठीक आहे," मी म्हणालो. "ठीक आहे... त्यात काय!.. येईन!"

हेराचा मृत्यू

असे आढळले की, मी आजारी पडलो होतो त्या काळात बाहेर रस्त्यावर एव्हाना चांगलीच उबदार हवा बनली होती आणि आमची सुटी सुरू व्हायला शेवटचे अवघे दोन-तीन दिवस उरले होते. मी शाळेत गेलो तेव्हा सगळे ओरडले:

"देनीस आला, हुर्रा!"

सगळ्या मुलांबरोबर मी परत वर्गात आलो ह्याचा मला खूप आनंद झाला. कात्या तोचीलीना, मीष्का, वालेर्का असे सारेजण आपापल्या बाकांवर बसलेले होते, पूर्वीप्रमाणेच कुंड्यांमध्ये फुले होती, फळा पूर्वीसारखाच चकचकीत होता, आमच्या शिक्षिका राईसा इवानोवना आनंदात होत्या व एकूण सर्व काही नेहमीसारखे होते. मधल्या सुटीत इतर मुलांबरोबर आम्ही भटकलो, खूप हसलो. मग मीष्काने एकदम मोठेपणाचा आव आणत म्हटले:

"आपल्याकडं वासंतिक कार्यक्रम होणार आहे!"

मी म्हणालो:

"खरंच?"

मीष्का म्हणाला :

"अगदी खरं! आपण स्टेजवर कार्यक्रम करणार आहोत. आणि चौथीची मुलं नाटक करणार आहेत. त्यांनी स्वतःच रचलेलं. मजा आहे!.."

मी म्हणालो :

"मीष्का, तू कार्यक्रमात भाग घेणार आहेस?"

तो म्हणाला :

"जरा थांब, म्हणजे समजेल."

आणि मी कार्यक्रमाची अधीरतेने वाट पाहू लागलो. घरी आईला मी याबाबत सगळी माहिती दिली व नंतर म्हणालो :

"मलासुद्धा कार्यक्रमात भाग घ्यायचाय..."

आई गालातल्या गालात हसून म्हणाली :

"तू काय करू शकतोस?"

मी म्हणालो :

"कमाल आहे आई तुझी! तुला माहीत नाही? मी मोठ्यांदा गाणं म्हणू शकतो. मी चांगला गातो ना? गाण्यात मला फक्त "बरा" शेरा मिळालाय, त्यावर जाऊ नकोस! मी खरंच छान गातो!"

आईने कपाट उघडले आणि कुठेतरी कपड्यांमधून ती म्हणाली :

"तू दुसऱ्या एखाद्या वेळी गाणं म्हण. नुकताच आजारातून उठला आहेस... ह्या कार्यक्रमाच्या वेळी तू प्रेक्षकाची भूमिका कर." कपाटामधून तिने डोके बाहेर काढले. "प्रेक्षक होण्यात खूप मजा असते. कलावंत कसा कार्यक्रम करतात ते मस्तपैकी बसून पहायचं! किती छान! पुढच्या वेळी तू कलावंत म्हणून काम करशील आणि ह्यावेळी जे कलाकार आहेत, ते पुढच्या वेळी प्रेक्षक बनतील. ठीक?"

मी म्हणालो :

"ठीक. तर ह्यावेळी मी प्रेक्षक बनतो."

दुसऱ्या दिवशी मी कार्यक्रम पहायला गेलो. आई माझ्याबरोबर येऊ शकली नाही – तिला इन्स्टिटयूटमध्ये कामावर जावे लागले आणि बाबा उरालमधल्या कुठल्यातरी कारखान्यात गेले होते. तेव्हा कार्यक्रमाला मी एकटाच गेलो.

आमच्या मोठ्या हॉलमध्ये खुर्च्या मांडल्या होत्या, स्टेज उभारले होते आणि त्यावर पडदा टांगला होता. आणि स्टेजखाली आमचे संगीतशिक्षक बरीस सेर्गेयेविच पियानोपाशी बसले होते. आम्ही सारे पुढच्या रांगांमध्ये बसलो आणि आमच्या वर्गामधल्या मुला-मुलींच्या आजीबाया भिंतीपाशी उभ्या राहिल्या. मी अजून सफरचंद चघळत होतो.

अचानक पडदा उघडला आणि आमची बालवीर पथकाची पुढारीण ल्यूस्या स्टेजवर आली. रेडिओवरच्या निवेदिकेप्रमाणे मोठ्या आवाजात ती म्हणाली :

"आमचा वासंतिक कार्यक्रम सुरू होत आहे! आता पहिली 'ब' मधला मीषा स्लोनोव त्यानं स्वत: रचलेली कविता म्हणून दाखवील. टाळया वाजवा!"

सर्वांनी जोरात टाळया वाजवल्या आणि स्टेजवर मीष्का आला. तो खूप धीटपणे चालत स्टेजच्या मध्यभागापर्यंत आला आणि थांबला. थोडा वेळ तो तसाच उभा राहिला व मग त्याने आपले हात मागे घेतले. परत गप्प उभा राहिला. मग त्याने डावा पाय पुढे टाकला. सर्व मुले अगदी गप्प बसून मीष्काकडे पहात होती. त्याने अचानक आपला डावा पाय मागे घेतला आणि उजवा पाय पुढे टाकला. मग परत त्याने पायांच्या जागेची अदलाबदल केली. नंतर त्याने अचानक खोकायला सुरुवात केली:

"ख्यॅक! ख्यॅक! ख्यॅक!"

मी म्हणालो:

"ए मीष्का, तुझ्या घशात काहीतरी अडकलंय काय?"

त्याने माझ्याकडे अनोळखी माणसाकडे पहावे तसे पाहिले. मग डोळे छताकडे लावत तो म्हणाला:

"कविता —

उलटतील वर्षं; म्हातारपण येईल!
चेहऱ्यावर सुरकुत्या उमटतील!
कलेमध्ये यश येवो!
सर्वांनी पुढे छान अभ्यास करावा!"

मीष्काने वाकून अभिवादन केले आणि स्टेजवरून तो खाली उतरला. सर्वांनी त्याला खूप कडकडून टाळया दिल्या, कारण कविता फार छान होती आणि मीष्काने ती स्वत: रचली होती. शाबास मीष्का!

तेवढ्यात परत ल्यूस्या स्टेजवर आली आणि तिने जाहीर केले:

"कार्यक्रम सादर करत आहे, पहिली 'ब' मधला वालेरी तागीलोव!"

सर्वांनी परत जोरदार टाळया पिटल्या आणि ल्यूस्याने स्टेजच्या ऐन मध्यभागी एक खुर्ची ठेवली. मग आमचा वालेर्का स्वत:च्या छोटुकल्या ॲकॉर्डियनला घेऊन स्टेजवर आला व खुर्चीवर बसला. त्याने पाय हवेत लोंबू नयेत म्हणून ॲकॉर्डियनची पेटी आपल्या पायांखाली ठेवली. त्याने 'अमूरच्या लाटा' ह्या वॉल्त्झचे सूर वाजवायला सुरुवात केली. सर्वजण ऐकत होते आणि मीसुद्धा ऐकता ऐकता विचार करत होतो: "ह्या वालेर्काची बोटं एवढी जलद हालचाल कशी करू शकतात?" मी माझ्या बोटांची हवेत हालचाल करू लागलो, पण वालेर्काप्रमाणे जलद हालचाली करणे मला जमले नाही. स्टेजच्या एका विंगेत वालेर्काची आजी उभी होती आणि वालेर्का वाजवत असताना त्याला हळूच मार्गदर्शन करत होती. तो छान मोठ्यांदा वाजवत होता आणि त्याचे वादन मला खूप आवडले. पण अचानक तो एका जागी अडखळला. त्याची

बोटे थांबली. वालेर्का शरमून थोडासा लाल झाला, पण परत त्याची बोटे हलू लागली, जणू त्यांना तो पळू देत होता. पण बोटे एका विशिष्ट जागेपर्यंत धावली आणि परत थांबली. कशावर तरी अडखळून पडल्याप्रमाणे. वालेर्काचा चेहरा आता पुरता लालबुंद बनला आणि तो नव्याने वाजवू लागला. पण यावेळी त्याची बोटे भित्र्या हालचाली करत होती, जणू परत अडखळणार हे त्यांना आधीच ठाऊक होते आणि मी ह्या प्रकाराला अगदी कंटाळून गेलो होतो. तेवढ्या वेळात, वालेर्का ज्या जागी दोनदा अडला होता, त्या जागी त्याच्या आजीने अचानक मान लांब ताणली व पुढे झुकून ती गायली:

"... चंदेरी लाटा,
चंदेरी लाटा..."

वालेर्काने ताबडतोब सूर पकडला. कुठल्यातरी अवघड पायरीवर अडखळणारी त्याची बोटे आता सहजपणे पुढे धावू लागली, अगदी वेगाने शेवटपर्यंत धावली. वालेर्काला प्रचंड टाळ्या मिळाल्या! त्याची आजीसुद्धा ओरडली – "शाब्बास!"

त्यानंतर पहिली 'अ' मधल्या सहा मुली आणि पहिली 'ब' मधले सहा मुलगे स्टेजवर आले. मुलींनी केसांवर रंगीबेरंगी फिती बांधल्या होत्या, पण मुलांच्या डोक्यांवर मात्र काहीही नव्हते. त्यांनी युक्रेनी 'गपाक' नाच सुरू केला आणि एवढ्या जोराने पाय आपटले की, स्टेजवर धुळीचे लोट उठले व मी दोनदा सणकून शिंका दिल्या. बरीस सेर्गेयेविच ठीक वाजवत होते, पण त्यापेक्षा मोठ्यांदा वाजवणे शक्य होते. नंतर त्यांनी पियानोच्या पट्ट्यांवर जोरात बोटे आपटली व वाजवणे थांबवले.

पण मुले आणि मुली संगीताविना स्टेजवर पाय आपटत राहिली. ते बघायला फार सुंदर आणि छान वाटत होते. स्टेजवर धावत जाऊन त्यांच्याबरोबर नाचायच्या बेतात मी होतो, पण तेवढ्यात ती मुले-मुली विंगेत पळाली व ल्यूस्या स्टेजवर येऊन म्हणाली:

"पंधरा मिनिटं विश्रांती. त्यानंतर चौथीची मुलं स्वतः रचलेलं नाटक सादर करणार आहेत. नाटकाचं नांव – 'कुत्र्याला कुत्र्याचंच मरण!'"

सगळे प्रेक्षक खुर्च्या सरकवत कुठेतरी पसार झाले आणि मी खिशातून मघाचे अर्धवट खाल्लेले सफरचंद बाहेर काढून परत खाऊ लागलो.

आमची बालवीर पथकाची पुढारीण ल्यूस्या जवळच उभी होती. तेवढ्यात पिंगट केसांची एक खूप उंच मुलगी तिच्यापाशी धावत आली आणि म्हणाली:

"ल्यूस्या, तू कल्पना करू शकतेस – येगोरोव आलाच नाही!"

ल्यूस्याने हातांनी स्वतःचे डोके गच्च आवळत म्हटले:

"काय म्हणतेस! आता काय करायचं? टेलीफोनची घंटा वाजवायचं आणि पिस्तूल झाडायचं काम कोण करणार?"

ती उंच मुलगी म्हणाली:

“ताबडतोब कुणातरी हुषार मुलाला शोधून काढलं पाहिजे. आम्ही त्याला शिकवू. दुसरं काय करणार?”

तेव्हा ल्यूस्या आजूबाजूला पाहू लागली आणि मी सफरचंद चघळत असल्याचे तिला दिसले. ती एकदम आनंदली.

“तो बघ,” ती म्हणाली. “देनीस! याहून जास्त छान ते काय! तो आपल्याला मदत करील! देनीस, इकडं ये!”

मी त्यांच्यापाशी गेलो. पिंगट केसांच्या मुलीने माझ्याकडे निरखून पहात म्हटले:

“हा खरंच हुषार आहे?”

ल्यूस्या म्हणाली:

“मला वाटतं – आहे!”

पिंगट केसवाली म्हणाली:

“पहिल्या नजरेत तसं वाटत नाही!”

मी म्हणालो:

“चिंता करू नको! मी खरंच हुषार आहे!”

त्या दोघीही खुदूखुदू हसल्या. पिंगट केसवाल्या मुलीने मला स्टेजमागे नेले.

तेथे चौथीमधला एक मुलगा काळ्या सुटात उभा होता. त्याला म्हातारा दाखवण्यासाठी त्याचे केस खडूची भुकटी टाकून पांढरे केले होते. त्याने हातात पिस्तूल धरले होते आणि त्याच्या शेजारीसुद्धा चौथीतलाच एक मुलगा उभा होता. ह्या मुलाला दाढी चिकटवलेली होती, त्याच्या नाकांवर निळा चष्मा होता. त्याने कॉलर वळवलेला रेनकोट अंगात घातला होता. तेथे आणखीही काही मुले-मुली होती, कुणाच्या हाती ब्रीफकेस, तर कुणाच्या हाती आणखी काहीतरी. डोक्याला रुमाल बांधलेल्यां एका मुलीच्या अंगात घरचा अंगरखा होता व हातात केरसुणी होती.

पिस्तूल धरलेल्या काळ्या सुटातल्या मुलाला पाहताच मी त्याला विचारले:

“पिस्तूल खरं आहे? वाल्तेर अथवा ब्राऊनिंग?”

पण पिंगट केसवालीने मला अडवले.

“ऐक, देनीस!” ती म्हणाली. “तू आम्हाला मदत करशील. इथं कोपऱ्यात उभा रहा आणि स्टेजवर पहा. जेव्हा हा मुलगा म्हणेल – ‘श्रीमान गादचूकिन, ही गोष्ट तुम्हाला माझ्याकडून मिळणार नाही!’ तू ताबडतोब ही घंटी वाजव. समजलं?”

मी म्हणालो:

“समजलं, समजलं... ह्यात काय न समजण्यासारखं? पण त्याचं पिस्तूल खरं आहे का? कोणत्या बनावटीचं?”

“थांबव तुझं पिस्तूल पुराण... अर्थातच ते खरं नाही! ऐक – पिस्तूलाच्या बाराचा आवाज तू इथं करायचास, स्टेजमागं. जेव्हा हा दाढीवाला स्टेजवर एकटा राहील, तेव्हा तो टेबलावरून एक फाईल उचलेल आणि खिडकीकडं धावत जाईल. मग हा काळा सूटवाला त्याच्यावर पिस्तू-

लाचा नेम धरील. त्यावेळी तू ही छोटी लाकडी फळी घ्यायची आणि अंगातला सगळा जोर लावून खुर्चीवर आपट. ही अशी, मात्र ह्यापेक्षा खूप जोरानं!"

आणि पिंगट केसवालीने फळी खुर्चीवर आपटली. अगदी खऱ्या पिस्तूलाच्या बारासारखा आवाज झाला. मला खूप आवडला.

"मस्त!" मी म्हणालो. "आणि मग?"

"एवढंच!" मुलगी म्हणाली. "जर समजलं असेल, तर पुन्हा म्हणून दाखव."

मी शब्द न शब्द परत म्हणून दाखवला.

ती म्हणाली:

"बघ हं, आम्हाला खोटं पाडू नको!"

मी म्हणालो:

"चिंता करू नको. मी खोटं पाडणार नाही."

तेवढ्यात आमच्या शाळेची घंटा वाजली. तास सुरू होताना वाजते तशी.

मी सायकलची घंटा रेडिएटरवर ठेवली, फळी खुर्चीला टेकवून ठेवली आणि पडद्याच्या फटीतून प्रेक्षकांना पाहू लागलो. राईसा इवानोवना आणि ल्यूस्या आपापल्या जागांवर बसत होत्या, मुले खुर्च्यांवर बसत होती, सगळ्या आजीबाया परत भिंतीपाशी उभ्या रहात होत्या. कुणाचेतरी रिकामे असलेले वडील सर्वांत मागच्या स्टूलावर उभे राहून स्टेजकडे फोटो-कॅमेरा रोखत होते. इथून पडद्यामागून प्रेक्षागृह पहायला फार मजा येत होती. प्रेक्षागृहातून स्टेज पाहण्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त मजा! हळूहळू शांतता झाली आणि पिंगट केसवाली स्टेजच्या दुसऱ्या बाजूला धावली व तिने दोरी खेचली. पडदा उघडला आणि त्या मुलीने हॉलमध्ये उडी मारली. स्टेजवर टेबल होते, त्या टेबलाशी काळ्या सुटातील मुलगा बसला होता व त्याच्या खिशात पिस्तूल होते हे मला माहीत होते. त्याच्या समोर दाढीवाला मुलगा येरझाऱ्या घालत होता. सुरवातीला त्याने हकीकत सांगितली की, खूप काळपर्यंत तो परदेशात राहिला होता आणि आता परत मायदेशी आला होता. मग काळ्या सुटातील मुलाची तो सारखी विनवणी करू लागला की, विमानतळाचा नकाशा त्याने त्याला दाखवावा.

तेव्हा काळ्या सुटातला मुलगा म्हणाला:

"श्रीमान गादचूकिन, ही गोष्ट तुम्हाला माझ्याकडून मिळणार नाही!"

ताबडतोब मला घंटीची आठवण झाली आणि मी रेडिएटरवर हात लांबवला. पण तेथे घंटी नव्हती. मला वाटले की, घंटा खाली पडली असावी, म्हणून वाकून शोधू लागलो. घंटी फरशीवर नव्हती. माझे काळीज गोठले. मग स्टेजवर नजर टाकली. तेथे अगदी शांत-शांत होते. नंतर काळ्या सूटवाल्या मुलाने विचार करून परत म्हटले:

"हो-हो! तुम्हाला ही गोष्ट माझ्याकडून मुळीच मिळणार नाही, श्रीमान गादचूकिन!"

काय करावे ते मला सुचेना. घंटी कुठे गेली? आत्ता तर इथे होती! बेडकीप्रमाणे उड्या मारत ती स्वतःच पसार होणे तर शक्य नव्हते! कदाचित रेडिएटरच्या मागे पडली? मी

खाली वाकून बसलो आणि रेडिएटरमागील धुळीत हाताने चाचपू लागलो. घंटी तेथेही नव्हती! बापरे! आता काय करायचे?

दरम्यान स्टेजवर दाढीवाला मुलगा हातवारे करत ओरडला.

"मी तुम्हाला पाचव्यांदा विनंती करतोय! मला विमानतळाचा नकाशा दाखवा!"

तेव्हा काळा सूटवाला माझ्याकडे तोंड वळवून भयानक आवाजात किंचाळला:

"माझ्यापासून ही गोष्ट तुम्हाला मिळणार नाही, श्रीमान गादचूकिन!"

आणि त्याने मला हाताच्या मुठीने धमकावले. दाढीवाल्यानेही मला मुठीने धमकावले. ते दोघेही मला धमकावत होते!

मला वाटले की, आता ते मला ठार मारणार! पण घंटी नव्हती तर मी काय करणार? घंटी हरवली होती.

तेव्हा काळ्या सूटवाल्या मुलाने स्वतःचे केस पकडत माझ्याकडे काकुळत्या चेहऱ्याने पहात म्हटले:

"आत्ता कदाचित टेलीफोनची घंटी वाजेल! बघा, आत्ता टेलीफोनची घंटी वाजेल! आत्ता वाजेल..."

माझ्या डोक्यात एकदम कल्पना चमकली. मी स्टेजवर मुंडके पुढे केले आणि पटकन म्हणालो:

"ट्रिंक-ट्रिंक, ट्रिंक-ट्रिंक!"

हॉलमध्ये प्रचंड हशा पिकला. पण काळा सूटवाला एकदम खूष झाला आणि त्याने पटकन रिसीव्हर उचलला. आनंदी आवाजात तो म्हणाला:

"हॅलो!" आणि त्याने स्वतःच्या कपाळावरचा घाम पुसला.

पुढे सर्व सुरळीत पार पडले. काळा सूटवाला उठला व दाढीवाल्याला म्हणाला:

"मला बोलावताहेत. मी काही मिनिटांनंतर परत येईन."

तो स्टेजवरून निघून गेला आणि दुसऱ्या विंगेत उभा राहिला. दाढीवाला मुलगा चोर-पावलांनी टेबलापाशी गेला आणि इकडेतिकडे नजरा टाकत फायली धुंडाळू लागला. मग त्याने एक विकट हास्य केले, एक फाईल बकोटीला मारली आणि कार्डबोर्डाची खिडकी चिकटवलेल्या स्टेजच्या मागच्या भिंतीकडे धावला. तेवढ्यात काळा सूटवाला पळत स्टेजवर आला व दाढी-वाल्यावर पिस्तूलाचा नेम धरू लागला. मी पटकन फळी उचलली आणि अंगातली सगळी शक्ती एकवटून खुर्चीवर आपटली. पण खुर्चीवर कुठलीतरी एक मांजरी येऊन बसली होती. ती भयानक आवाजात ओरडली, कारण माझा फळीचा फटका तिच्या शेपटीवर बसला होता. पिस्तूलाचा बार उमटला नाही, पण मांजरीने स्टेजवर उडी मारली. काळ्या सूटवाल्याने दाढीवाल्याच्या अंगावर उडी मारून त्याचा गळा दाबायला सुरुवात केली. मांजरी त्यांच्या दोघांच्या दरम्यान सापडली. मुलांच्या मारामारीत दाढीवाल्याची दाढी सुटली. ती दाढी उंदीर समजून मांजरीने तिच्यावर झडप घातली व देवाच्या कृपेने ती स्टेजवरून पळून गेली. दाढीवाल्या मुलाला स्वतःची दाढी नाहीशी झाल्याचे जाणवताच तो स्टेजवर पटकन आडवा

झाला — त्याने मेल्याचा अभिनय केला. प्रेक्षक खो खो हसत होते. तेवढ्यात चौथीच्या वर्गातील मुले-मुली हातात ब्रीफकेस, केरसुणी आणि इतर गोष्टी घेऊन स्टेजवर धावली व विचारू लागली :

"कुणी पिस्तूल झाडलं? कशाबद्दल गोळीबार झाला?"

प्रत्यक्षात पिस्तूलाचा बार झालाच नव्हता. मांजरीने सगळा घोटाळा केला होता.

पण काळ्या सुटामधील मुलगा म्हणाला :

"त्या हेर गादचूकिनला मी ठार मारलं!"

त्यासरशी पिंगट केसवालीने पडदा पाडला. हॉलमधील सर्वांनी एवढ्या जोरात टाळ्या पिटल्या की, त्या आवाजाने माझे डोके दुखू लागले. मी पटकन खाली जाऊन माझा ओव्हरकोट अंगात घातला आणि घरी धूम ठोकली.

धावत जात असताना सारा वेळ मला कशाचा तरी अडथळा होत होता. मी थांबलो आणि खिशात हात घातला तो काय!... सायकलची घंटी!

बूट घातलेला बोका

"मुलांनो आणि मुलींनो!" राईसा इवानोवना म्हणाल्या. "ही तिमाही तुम्ही छान पार पाडलीत. मी तुमचं अभिनंदन करते. आता विश्रांती घ्यायला हरकत नाही. सुटीमध्ये आपण विविध वेषभूषा स्पर्धा भरवू. तुमच्यापैकी प्रत्येकजण स्वतःच्या इच्छेप्रमाणं वेषभूषा करून येऊ शकतो आणि सर्वोत्तम वेषभूषेला बक्षिस देण्यात येईल. तेव्हा तयारीला लागा." राईसा इवानोवनानी वह्या गोळा केल्या, आमचा निरोप घेतला व त्या निघून गेल्या.

आम्ही घरी जात असताना मीष्का म्हणाला :

"मी बुटक्याचं सोंग घेणार आहे. काल मला कुंचीवाला रेनकोट विकत आणलाय. मी फक्त तोंडावर काहीतरी फासून घेईन, म्हणजे बुटका तयार! तू कसला वेष करणार?"

मी म्हणालो :

"प्रत्यक्ष स्पर्धेच्या वेळी दिसेल!"

आणि मी ह्याबद्दल विसरून गेलो. कारण घरी आई मला म्हणाली की, दहा दिवस आरोग्यधामात रहायला ती जाणार होती, तेव्हा मी घरात नीट वागायचे होते आणि बाबांची काळजी घ्यायची होती. दुसऱ्या दिवशी आई निघून गेली आणि बाबांबरोबर मी कमालीचा वैतागलो. काही ना काही काम सतत निघायचे. बाहेर हिमवर्षाव सुरू झाला होता आणि आई केव्हा परत येईल याबद्दल मी सारखा विचार करत होतो. माझ्या कॅलेंडरवर मी फुल्या मारत होतो.

अचानक एक दिवस मीष्का धावत आला आणि उंबरठ्यावरूनच ओरडला :

"तू येणार किंवा नाही?"

मी विचारले :

"कुठं?"

मीष्का ओरडला:

"कुठं म्हणून काय विचारतोस? शाळेत! आज वेषभूषा स्पर्धा आहे! मी बुटक्याचं सोंग घेतलेलं तुला दिसत नाही?"

खरेच त्याने कुंचीवाला रेनकोट घालून बुटक्याचे सोंग आणले होते.

मी म्हणालो:

"माझ्यापाशी वेगळा वेष नाही! माझी आई बाहेरगावी गेलीय."

मीष्का म्हणाला:

"आपण काहीतरी युक्ती लढवू! तुमच्या घरात काय गंमतीदार आहे? ती गंमत तू अंगावर चढव, तोच तुझा स्पर्धेचा वेष ठरेल!"

मी म्हणालो:

"आमच्यापाशी तसं काहीच नाही. ते बघ बाबांचे पाणबूट – मासे धरायला जाताना वापरायचे!"

हे पाणबूट रबराचे आणि गुडघ्यापर्यंत उंच होते. पावसात आणि चिखलात वापरायला उत्तम. पाय मस्त कोरडे राहतात.

मीष्का म्हणाला:

"तू चढव बघू हे पाणबूट तुझ्या पायात. पाहू, कसं दिसतं!"

मी माझ्या बुटांसकट बाबांच्या पाणबूटांमध्ये पाय घातले. चक्क माझ्या खाकांपर्यंत बूट पोचले. मी चालायचा प्रयत्न केला. फारच कठीण. पण त्यांची चमक सुरेख होती. मीष्काला ते पाणबूट फार आवडले. तो म्हणाला:

"टोपी कसली आहे?"

मी म्हणालो:

"आईची उन्हात वापरायची गवती टोपी चालेल?"

मीष्का म्हणाला:

"लौकर आण!"

मी टोपी शोधून काढली आणि स्वतःच्या डोक्यावर घातली. टोपी थोडी मोठी होती व नाकापर्यंत खाली घसरत होती. पण तिच्यावर सुंदर फुले होती.

मीष्का माझ्याकडे पहात म्हणाला:

"छान वेष जमलाय. पण त्याला नांव काय?"

मी म्हणालो:

"'मूखोमोर'* म्हटलेलं चालेल?"

---

* मूखोमोर – एक विषारी जातीची अळंबी. – अनु.

मीष्का खो खो हसत म्हणाला :

"अरे मूखोमोरची टोपी संपूर्ण तांबडी असते! तुझ्या पोषाखाला सर्वांत योग्य नांव ठरेल 'म्हातारा मच्छीमार!'"

मी मीष्काची सूचना धुडकावून लावली.

"वाहव्वा! काय पण सुचवलं! म्हणे 'म्हातारा मच्छीमार!' ... पण दाढी कुठं आहे?"

मीष्का विचारात पडला. मी कॉरीडॉरमध्ये गेलो. तेथे आमच्या शेजारी राहणाऱ्या वेरा सेर्गेयेवना उभ्या होत्या. मला पाहताच हात उडवून त्या म्हणाल्या :

"अगबाई! अगदी अस्सल बूट घातलेला बोका!"

मला ताबडतोब माझ्या पोषाखाचे नांव सापडले. मी – 'बूट घातलेला बोका!' पण शेपूट कुठे? मी विचारले :

"वेरा सेर्गेयेवना, तुमच्यापाशी शेपूट आहे?"

वेरा सेर्गेयेवना म्हणाल्या :

"मी काय शेपूटवाल्या सैतानासारखी दिसते?"

"नाही, मुळीच नाही," मी म्हणालो. "मला तसं नव्हतं म्हणायचं. तुम्ही म्हणालात की, हा पोषाख म्हणजे 'बूट घातलेला बोका', पण ह्या बोक्याला शेपूट कुठं आहे? कुठूनतरी शेपटी लावली पाहिजे! तुमच्यापाशी आहे का शेपटीसाठी काहीतरी?"

तेव्हा वेरा सेर्गेयेवना म्हणाल्या :

"एक मिनिट थांब ..." आणि लौकरच एक जुनीपुराणी काळया ठिपक्यांची पिंगट शेपूट घेऊन त्या आल्या.

"ही बघ," त्या म्हणाल्या, "ही शेपूट जुन्या केसाळ कातडीच्या पोषाखाची आहे. आजकाल मी तिचा स्टोव्ह पुसायला वापर करते. मला वाटतं, तुला ही छान उपयोगी पडेल."

मी त्यांचे खूप आभार मानले आणि शेपूट घेऊन मीष्कापाशी आलो.

शेपूट पाहताच मीष्का म्हणाला :

"लौकर सुई-दोरा दे, मी तुला शिवतो ही शेपूट. भलतीच मजेशीर आहे ही शेपटी!"

मीष्का माझ्या पाठीशी शेपूट शिवू लागला. तो छान शिवत होता, पण अचानक त्याने अशी सुई खुपसली! .. मी किंचाळलो :

"अयाई! अरे ए धीट शिंप्या! तुला दिसत नाही – चक्क जिवंत माणसाला शिवतोस? किती जोरात सुई खुपसलीस!"

मीष्का म्हणाला :

"माझा जरा अंदाज चुकला!" आणि पुन्हा त्याची सुई मला जोरात टोचली!

"मीष्का, नीट बघून शीव, नाहीतर आता तुझं टाळकं फोडीन!"

"अरे, मी आयुष्यात पहिल्यांदाच शिवतोय!"

आणि परत – खस्स! ..

मी मोठ्यांदा किंचाळलो :

"अरे तुला समजत नाही, तुझ्या ह्या उद्योगानंतर मी चक्क अपंग होईन आणि मला बसता येणार नाही ?"

तेवढ्यात मीष्का म्हणाला :

"हुर्रा ! तयार ! झकास शेपूट ! अस्सल मांजरांनासुद्धा अशी शेपूट नसते !"

मग मी शाईच्या मिशा रंगवल्या – प्रत्येक बाजूला तीन मिशा . लांबच लांब – थेट कानांपर्यंत !

आम्ही शाळेकडे निघालो .

तेथे लोकांची खच्चून गर्दी जमली होती . सगळे वेगवेगळे पोषाख करून आले होते . बुटक्याचे सोंग घेतलेले जवळ जवळ पन्नासजण होते .

शिवाय खूप पांढरे 'हिमकण' होते . हा पोषाख म्हणजे पांढऱ्याशुभ्र जाळीदार कपड्यात गुंडाळलेली मुलगी .

आम्ही खूप मजा केली, नाच केले .

मीमुद्धा नाचलो, पण सारखा अडखळत होतो . माझ्या प्रचंड पाणबूटांमधून खाली पडायचा थोडक्यात वाचत होतो आणि माझी टोपीसुद्धा जणू माझा सूड घ्यायला चक्क हनुवटीपर्यंत सारखी घसरत होती .

मग आमच्या बालवीर पथकाची पुढारीण ल्यूस्या स्टेजवर आली आणि खणखणीत आवाजात म्हणाली :

"सर्वोत्तम पोषाखाचं पहिलं बक्षिस घ्यायला 'बूट घातलेल्या बोक्यानं' स्टेजवर यावं !"

मी स्टेजकडे जाऊ लागलो . पण शेवटच्या पायरीशी जोरात अडखळलो . खाली पडलो नाही हे नशीब . सगळे मोठ्यांदा हसले . ल्यूस्याने माझ्याशी हस्तांदोलन केले आणि मला दोन पुस्तके दिली : 'स्तेपानकाका' आणि 'मजेदार कोडी .' बरीस सेर्गेयेविचनी पियानोवर संगीत वाजवले आणि मी स्टेजवरून परत निघालो . ह्यावेळीही पायरीवर मी अडखळलो आणि परत सर्वजण मोठ्यांदा हसले .

घरी परत येताना मीष्का म्हणाला :

"बुटके खूप होते, पण 'बूट घातलेला बोका' तू एकटाच होतास !"

"होय," मी म्हणालो, "पण सगळ्या बुटक्यांमध्ये तू सर्वांत जास्त मजेदार होतास . तेव्हा तुलासुद्धा एक पुस्तक बक्षिस मिळालं पाहिजे . माझ्याकडच्या दोन पुस्तकांमधलं एक तू घे ."

मीष्का म्हणाला :

"नको, तू काहीतरीच बोलतोस !"

मी विचारले :

"तुला कोणतं पुस्तक पाहिजे ?"

तो म्हणाला :

"'स्तेपानकाका !'"

मी त्याला 'स्तेपानकाका' पुस्तक दिले.

घरी जाताच मी पायातील प्रचंड पाणबूट फेकून दिले आणि कॅलेंडरपाशी धावत जाऊन आजच्या दिवसाची फुली मारली. मग उद्याच्या दिवसाचीही फुली मारून टाकली.

बघतो तर आई परत यायला अवघे तीन दिवस उरले होते.

बरोब्बर २५ किलो

हुर्रा! मला आणि मीष्काला 'मेतालीस्त' क्लबामधील मुलांच्या सणाची निमंत्रणे मिळाली होती. दूस्यामावशीने त्या निमंत्रणपत्रिका मिळवून दिल्या होत्या. क्लबाची स्वच्छता करणाऱ्या कामगारपथकाची ती मुख्य होती. तिने निमंत्रणपत्रिका तर आम्हाला एकच दिली होती, पण त्यावर लिहिले होते: "दोन माणसांसाठी." म्हणजे मी आणि मीष्का. आम्हा दोघांना खूप आनंद झाला होता व विशेष म्हणजे क्लब आमच्या घरापासून जवळच, रस्त्याच्या कोपऱ्यावर होता. आई म्हणाली:

"तिथं जास्त वाह्यातपणा मात्र करू नका."

आणि तिने आम्हाला पैसे दिले – प्रत्येकाला पंधरा कोपेक.

मी आणि मीष्का क्लबाकडे निघालो.

तेथे ओव्हरकोट ठेवण्याच्या जागी लोकांची झुंबड उडाली होती. आम्ही दोघे अगदी शेवटी उभे राहिलो. रांग अगदी मुंगीच्या पावलांनी पुढे सरकत होती. अचानक वरती संगीत वाजू लागले. मी आणि मीष्का ओव्हरकोट देण्यासाठी घाई करू लागलो. आणखी काही मुलेही संगीत सुरू होताच घाई करू लागली. काहीजण तर उशीर होतोय म्हणून रडायला लागली.

तेथे कुठूनतरी दूस्यामावशी अचानक उगवली. ती ओरडून म्हणाली:

"देनीस आणि मीष्का! तिथं काय घोटाळत उभे आहात? इकडं या!"

आम्ही तिच्यापाशी धावत गेलो. तिची जिन्याखाली स्वतंत्र खोली होती. त्या खोलीत लांब दांडीचे झाडू व बादल्या होत्या. दूस्यामावशीने आमचे कोट घेतले आणि ती म्हणाली:

"इथंच परत या कोट घ्यायला, पोरट्यांनो!"

मी आणि मीष्का एक पायरी सोडून जिन्यावरून धावत वरती गेलो. तेथे खरोखरच फार सुंदर होते! अगदी सुरेख! सगळ्या छतभर रंगीबेरंगी कागदांच्या माळा आणि दिवे टांगलेले होते. सुंदर चकचकीत कागदांचे दिवे, तेवत होते. बँड वाजत होता. वेगवेगळे पोषाख केलेले कलाकार गर्दीत फिरत होते. एकजण शिंग वाजवत होता, तर दुसरा ड्रम बडवत होता. एका बाईने घोड्याचे सोंग घेतले होते, काहींनी ससांची सोंगे घेतली होती. वेडीवाकडी प्रतिबिंबे दाखवणारे आरसे तेथे होते आणि एक विदूषक होता.

हॉलच्या टोकाला आणखी एक दार होते आणि त्यावर लिहिले होते: "मनोरंजन दालन."

मी विचारले :

"तिथं काय आहे ?"

मीष्का म्हणाला :

"तिथं वेगवेगळ्या गंमती आहेत."

खरोखरच तेथे वेगवेगळ्या गंमती होत्या. म्हणजे, दोऱ्यावर एक सफरचंद टांगले होते आणि दोन्ही हात पाठीशी धरून, हातांची मदत न घेता, सफरचंद खायचे होते. पण ते सफरचंद दोऱ्यावर गरगर फिरत होते आणि ते खाणे अवघड होते. मी चक्क दोनदा हातांनी सफरचंद पकडले आणि त्याचा चावा घेतला. पण मला त्यांनी ते सफरचंद खाऊ दिले नाही. सगळेजण हसले आणि मला त्या खेळातून वगळण्यात आले. शिवाय तेथे धनुष्याची नेमबाजी होती, पण बाणांना रबरी टोके होती. निशाणाच्या ठिकाणी कार्डबोर्डावर मध्यभागी एका माकडाचे चित्र काढलेले होते. त्या माकडावर बाणाचे रबरी टोक चिकटले तर बक्षिस !

मीष्काने प्रथम बाण मारला. त्याने नेम धरायला आधी खूप वेळ घेतला. पण जेव्हा बाण मारला तेव्हा माकडाऐवजी कुठेतरी दूरचा एक दिवाच त्याने फोडला...

मी म्हणालो :

"हात् तुझी, म्हणे नेमबाज !"

"मला अजून सराव झाला नाही ! जर पाच बाण दिले असते तर बरोब्बर नेम मारला असता ! पण एकच बाण दिला – तेवढ्यानं कसं जमणार ?"

मी फुशारकी मारली :

"बरं, बरं ! आता बघ – मी त्या माकडावर नेमका बाण मारतो !"

धनुष्य-बाण देणाऱ्या माणसाने मला एक बाण देत म्हटले :

"नेमबाजा, मार बाण !"

आणि तो माकड नीट करायला गेला, कारण ते काहीसे तिरके झाले होते. मी एव्हाना नेम धरला होता आणि तो चित्र नीट केव्हा करतो ह्याची वाट पहात होतो. धनुष्य खूप ताणले होते आणि मी सतत स्वतःशी म्हणत होतो : "त्या माकडाला मी आत्ता ठार मारतो !" अचानक बाण सुटला आणि सूं..! त्या माणसाच्या खांद्यामागे सप्पदिशी तो बाण चिकटला.

भोवतालच्या लोकांनी जोरात हसून टाळ्या वाजवल्या. तो माणूस घाबरून पटकन मागे वळला आणि संतापून ओरडला :

"ह्यात हसण्यासारखं काय झालं ? मला समजत नाही ? डांबीस पोरट्या, चालता हो ! तुला आणखी बाण मारायला मिळणार नाही !"

मी म्हणालो :

"मी मुद्दाम बाण मारला नाही !" आणि त्या ठिकाणाहून निघून गेलो.

आमचे त्या दिवशी नशीब वाईट होते. मला खूप राग आला होता आणि मीष्कालामुद्धा एकदम आम्हाला वजनाचा काटा दिसला. त्या काट्यापाशी आनंदी मुलांची एक छोटी

रांग होती व ती रांग भराभर पुढे सरकत होती. सगळे विनोद करत होते आणि हसत होते. वजनापाशी एक विदूषक उभा होता

मी विचारले :

"हा वजनाचा काटा कशासाठी?"

"उभा रहा काट्यावर आणि वजन कर. जर तुझं वजन बरोब्बर पंचवीस किलो भरलं तर तू भाग्यवान. बक्षीस मिळेल – 'मूर्झिल्का' नांवाचं मुलांचं मासिक एक वर्षभर फुकट!"

मी म्हणालो :

"मीष्का, आपण प्रयत्न करून बघायचा?"

मी मागे वळून पाहिले, तर मीष्का बेपत्ता. कुठे नाहीसा झाला होता कोण जाणे! मी एकट्यानेच प्रयत्न करायचा ठरवला. खरेच माझे वजन बरोब्बर २५ किलो भरले तर? एकदम भाग्यवान ठरेन!

रांग पुढे सरकत होती आणि टोपीवाला विदूषक वजनाचे काटे सरकवताना सारखा गंमतीदार बडबडत होता.

"तुमचा अर्धा किलो जास्त भरलाय – गोड कमी खा!" खटक्! वजनाचा काटा सरकला. "आणि तुम्ही आदरणीय कॉम्रेड, फार कमी पेज खाल्लीत. फक्त एकोणीस किलो! एक वर्षानंतर परत या!" खटक्!

तर असे हसत-खेळत चालले होते, रांग पुढे सरकत होती, अजून कुणाचेही नेमके २५ किलो वजन भरले नव्हते. शेवटी माझी पाळी आली.

मी वजनावर चढलो – खटक्! विदूषक म्हणाला :

"ओहो! तुला 'गरम-गार' खेळ माहीत आहे?"

मी म्हणालो :

"अर्थात!"

तो म्हणाला :

"तुला चांगलाच गरम शेक मिळालाय! तुझं वजन चोवीस किलो पाचशे ग्राम. बरोब्बर अर्धा किलो कमी पडतोय. अरेरे! अच्छा!"

कमाल आहे! फक्त अर्धा किलो कमी पडत होता!

मी पुरता खट्टू झालो. अगदी अपयशी दिवस उजाडला होता!

तेवढ्यात मीष्का तेथे उगवला.

मी म्हणालो :

"तुमची स्वारी कुठं गायब झाली होती?"

मीष्का म्हणाला :

"लेमन प्यायलो."

मी म्हणालो :

"वा! चांगलं केलंत! मी इथं 'मूर्झिल्का' जिंकण्यासाठी धडपडतोय आणि हा पठ्ठ्या लेमन ढोसायला गेला!"

मी त्याला सर्व हकीकत सांगितली. मीष्का म्हणाला:

"तर आता मी प्रयत्न करतो!"

विदूषकाने काटे सरकवले आणि खो खो हसत तो म्हणाला:

"थोडंसं जास्त भरलं! पंचवीस किलो आणि पाचशे ग्राम. थोडं बारीक झालं पाहिजे. पुढचा!"

मीष्का वजनावरून खाली उतरत म्हणाला:

"छ्याः, मी निष्कारण लेमन प्यायलो!"

मी विचारले:

"इथं लेमनचा काय संबंध?"

"मी आख्खी बाटली प्यायलो! समजलं?"

"मग?"

मीष्का संतापून म्हणाला:

"तुला एवढंसुद्धा माहीत नाही, की लेमनच्या बाटलीत बरोब्बर अर्धा लिटर लेमन असतं?"

"माहीत आहे. मग?"

आता मीष्काचा अगदी तिळपापड उडाला.

"अर्धा लिटर लेमन म्हणजे अर्धा किलो. पाचशे ग्राम! जर मी लेमन प्यायलो नसतो, तर माझं वजन बरोब्बर २५ किलो भरलं असतं!"

"खरंच?"

"मग काय खोटं?"

माझ्या डोक्यात लख्ख कल्पना चमकली.

"मीष्का," मी म्हणालो, "अरे मीष्का! आपण 'मूर्झिल्का' जिंकलं!"

"ते कसं काय?"

"हे असं–आता मी बाटलीभर लेमन पितो. मला नेमके पाचशे ग्राम कमी पडताहेत!"

मीष्काने आनंदाने उडी मारली.

"समजलं! चल लौकर कँटीनमध्ये!"

आम्ही पटकन लेमनची एक बाटली विकत घेतली. मीष्काने विक्रेत्या बाईला विचारले:

"मावशी, बाटलीत नेहमी बरोब्बर अर्धा लिटर लेमन असतं?"

विक्रेती बाई लाल झाली.

"तू एवढासा चिमुरडा आणि असले प्रश्न मला विचारतोस?"

मी बाटली घेतली व टेबलापाशी बसून पिऊ लागलो. मीष्का शेजारी उभा राहून बघत होता. लेमन फार थंड होते. पहिला ग्लास मी एका दमात रिकामा केला. मीष्काने ताबडतोब

परत ग्लास भरला. पण बाटलीत अजून बरेच लेमन शिल्लक होते. मला आणखी पिण्याची इच्छा नव्हती.

मीष्का म्हणाला :

"आटप लौकर उशीर लावू नको!"

"फार थंड आहे. घसा दुखायला लागला नाही म्हणजे मिळवली!"

"असा घाबरटपणा दाखवू नको. बोल, भित्रा म्हणून कबूल करतोस?"

"तूच आहेस भित्रा!"

आणि मी दुसरा ग्लास पिऊ लागलो.

हा ग्लास रिकामा करायला मला बरेच सायास पडले. हा ग्लास तीन-चतुर्थांश प्यायल्यानंतर मला जाणवले की, माझे पोट गच्च भरले होते. अगदी गळ्यापर्यंत!

मी म्हणालो :

"थांब, मीष्का! मला आणखी जात नाही!"

तो म्हणाला :

"जाईल, जाईल! तुला तसा भास होतोय! पी!"

मी प्रयत्न केला. घोट घशाखाली उतरेना.

मीष्का म्हणाला : "तू असा सरदाराच्या थाटात आडवा काय पसरलास? उभा रहा, म्हणजे आणखी पिता येईल!"

मी उभा राहिलो. आणि खरेच, उरलेला ग्लास पटकन संपवला. मीष्काने ताबडतोब बाटलीतील उरलेले सर्व लेमन ग्लासात ओतले. अर्ध्या ग्लासापेक्षा जास्त भरले.

मी म्हणालो :

"आता माझं पोट फुटेल!"

मीष्का म्हणाला :

"माझं कसं फुटलं नाही? मलाही वाटलं होतं की, माझं पोट फुटणार! चल, पिऊन टाक!"

"मीष्का, जर माझं पोट फुटलं, तर त्याला तू जबाबदार राहशील!"

"ठीक आहे. पी आता!"

मी परत पिऊ लागलो. सगळे लेमन पिऊन टाकले. अगदी आश्चर्य! मात्र मला बोलता येईना. कारण लेमन चक्क गळ्यापर्यंत पोहोचले होते आणि काही माझ्या तोंडात घोळत होते, तर काही नाकामधून गळत होते.

मी वजनाच्या काट्याकडे पळालो. विदूषकाने मला ओळखले नाही. त्याने काट्यांची खटाखट केली आणि सबंध हॉलला ऐकू जाईल एवढ्या मोठ्यांदा तो ओरडला :

"हुर्रा ऽऽ! बरोब्बर पंचवीस किलो! 'मूर्झिल्का' चं बक्षिस ह्या मुलानं जिंकलं! बरोब्बर २५ किलो वजनवाल्या! ही पावती! आत्ताच मी भरून टाकतो! टाळ्या वाजवा!"

त्याने माझा डावा हात पकडला व उंच केला. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. विदूषकाने

विजयी संगीत तोंडाने म्हटले. मग लेखणी धरून तो म्हणाला:

"काय तुझं नांव? नांव आणि आडनांव? बोल!"

पण मी गप्प! माझे पोट तुडुंब भरले होते व त्यामुळे मला बोलणे अशक्य झाले होते. पण मीष्का मदतीला धावला. तो ओरडला:

"त्याचं नांव देनीस. आडनांव – कोराब्ल्योव! लिहा, लिहा – मी त्याला ओळखतो!"

विदूषकाने ती पावती माझ्यापुढे धरत म्हटले:

"निदान आभार तरी मान!"

मी डोके हलवले. मीष्का परत ओरडला:

"त्याला आभार मानायचे असतात तेव्हा तो असं डोकं हलवतो. माझ्या ओळखीचा आहे तो!"

विदूषक म्हणाला:

"कमाल आहे ह्या मुलाची! एवढं बक्षिस जिंकलं, पण गप्प बसतोय! जणू तोंडात गुळणी धरून ठेवलीय!"

मीष्का म्हणाला:

"त्याच्याकडं लक्ष देऊ नका. तो लाजरा आहे. मी त्याला ओळखतो!"

मीष्काने माझा हात पकडला आणि तो मला खाली घेऊन गेला.

रस्त्यावर जाताच मला थोडा श्वास घेता येऊ लागला. मी म्हणालो:

"मीष्का, मला ही पावती घरी घेऊन जायची इच्छा नाही. कारण माझं खरं वजन फक्त चोवीस किलो आणि पाचशे ग्राम आहे."

मीष्का म्हणाला:

"तर मग मला दे. माझं वजन बरोब्बर २५ किलो आहे. जर मी लेमन प्यायलो नसतो, तर मला ताबडतोब बक्षिस मिळालं असतं. आण इकडं ती पावती!"

मी म्हणालो:

"कमाल करतोस! मी एवढी धडपड काय उगीच केली? आपणा दोघांचं हे बक्षिस आहे – निम्मं-निम्मं!"

तेव्हा मीष्काने कबुली दिली: "बरोब्बर!"

घराला लागलेली आग अथवा बर्फावरचा पराक्रम

मीष्का आणि मी हॉकी खेळण्यात अगदी गुंग झालो होतो. आम्हाला कशाचेही भान राहिले नव्हते. जेव्हा एका जवळून जाणाऱ्या माणसाला आम्ही किती वाजले असा प्रश्न केला तेव्हा तो आम्हाला म्हणाला:

“ठीक दोन वाजलेत.”

आम्ही दोघांनी एकदम कपाळावर हात मारले. दोन वाजले! नुकते कुठे पाच मिनिटे खेळलो, तेवढ्यात दोन वाजले! भलतीच आफत! आम्हाला शाळेला उशीर झाला होता! पटकन दप्तर उचलत मी ओरडलो:

“मीष्का, जोरात पळ!”

आम्ही विजेच्या वेगाने धावू लागलो. पण लौकरच दमलो आणि चालू लागलो.

मीष्का म्हणाला:

“उगीच घाई करू नको. एवीतेवी आपल्याला उशीर झालाच आहे.”

मी म्हणालो:

“आता आपली चांगलीच चंपी होणार... पालकांना शाळेत बोलावून घेतील! आपल्यापाशी सांगायला चांगली सबबसुद्धा नाही.”

मीष्का म्हणाला:

“सबब शोधून काढली पाहिजे. उत्तम अशी! नाहीतर सल्लागार समितीपुढं उभं करतील. लौकर एखादी सबब शोधून काढ!”

मी म्हणालो:

“समज, आपण जर सांगितलं की, आमचे दात दुखायला लागले होते आणि दात उपटून घ्यायला आम्ही गेलो होतो.”

मीष्काने नुसता नाकाने फुर्र्र आवाज काढला.

“दोघांचे दात एकदम दुखायला लागले, असंच ना? अगदी कोरसमध्ये!.. नाही, असं घडत नाही. शिवाय, जर आपण दात उपटले, तर उपटलेल्या दातांच्या जागी भोकं कुठली दाखवायची?”

“मग आता काय करायचं? काही सुचत नाही... बापरे, पालकांना बोलावून घेतील आणि!.. ऐक, काय करायचं ठाऊक आहे? काहीतरी अशी गोष्ट शोधून काढली पाहिजे की, अगदी खास वेगळी आहे, तिच्यात शौर्य आहे. म्हणजे तशी गोष्ट सांगितल्यावर उलट आपलं कौतुक करतील... समजलं?”

“म्हणजे कसं?”

मी म्हणालो:

“उदाहरणार्थ, अशी कल्पना करू की, कुठंतरी आग लागली होती आणि त्या आगीमधून आपण एका लहान बाळाला वाचवलं... समजलं?”

मीष्का खूष झाला.

“हो, हो, समजलं! आगीची गोष्ट छानच आहे, पण त्यापेक्षा जास्त चांगली ठरेल, जर आपण सांगितलं की, तळ्यावरचा बर्फ एकदम फुटला आणि ते लहान बाळ त्यात... डुबूक!.. पाण्यात पडलं! आणि आपण त्याला पाण्याबाहेर खेचून काढलं... छान आहे ना?”

"होय," मी म्हणालो, "बरोबर! पण आगीची गोष्ट जास्त चांगली वाटते!"

"नाही," मीष्का म्हणाला, "उलट तळ्यावरचा बर्फ फुटण्यात जास्त गंमत आहे!"

आम्ही दोघांनी आणखी थोडा वेळ वाद घातला. अखेर कोणती गोष्ट जास्त चांगली आणि शौर्याची, ह्याचा निर्णय न करताच आम्ही शाळेपाशी येऊन पोहोचलो. ओव्हरकोट काढून ठेवण्याच्या स्टँडपाशी आमची पाशामावशी एकदम म्हणाली:

"अरे मीष्का, कुठं झोंबाझोंबी केलीस? तुझ्या कॉलरची सगळी बटणं तुटलीत. अशा अवतारात वर्गात जाणं चांगलं नव्हे. नाहीतरी तुला उशीर झालाच आहे, तर मी तुझी बटणं शिवून देते! माझ्यापाशी आख्खा खोका भरून बटणं आहेत! देनीस, तू जा वर्गात. उगीच इथं घुटमळू नको."

मी मीष्काला म्हणालो:

"तू इथून लौकर ये. नाहीतर मगळं माझ्या एकट्यावर शेकेल!"

पण पाशामावशीने मला पिटाळून लावले.

"जा, जा, तो आत्ता तुझ्या पाठोपाठ येतोय! पळ!"

तर मी आमच्या वर्गाचे दार हळूच उघडले, त्यातून आत डोके खुपसले. राईसा इवानोवना वर्गाला शुद्धलेखन घालत होत्या:

"पिले चिवचिवत होती..."

फळ्यापाशी वालेर्का उभा होता आणि वाकड्या अक्षरांमध्ये लिहीत होता:

"पिले चिपचिपत होती..."

मला राहवले नाही आणि मी मोठ्यांदा हसलो. राईसा इवानोवनांनी डोळे वर केले तेव्हा त्यांना मी दिसलो. मी पटकन म्हणालो:

"मी आत येऊ, राईसा इवानोवना?"

"अस्सं, देनीस, तू आहेस होय," त्या म्हणाल्या. "ये, आत ये! कुठं हरवला होतास?"

मी वर्गात गेलो आणि कपाटापाशी थांबलो. राईसा इवानोवनांनी मला न्याहाळून पाहिले आणि त्या चकित झाल्या.

"असा काय तुझा अवतार झालाय? कुठं लोळलास? आं? ताबडतोब उत्तर दे!"

मी अजून मनाशी काहीच निश्चित ठरवले नव्हते, त्यामुळे ताबडतोब उत्तर देणे मला जमले नाही. पण वेळ काढण्यासाठी मी भरभर बोलायला सुरुवात केली:

"मी, राईसा इवानोवना, एकटा नव्हतो... आम्ही दोघे होतो, मी आणि मीष्का... तर असं झालं. छे:! ...तर असं झालं... आणि पुढं... असं झालं..."

राईसा इवानोवनांनी विचारले:

"काय झालं? तू जरा शांत हो, सावकाश बोल, मला काहीच समजत नाही! झालं तरी काय? कुठं होतात तुम्ही? अरे बोल ना!"

पण काय बोलावे ते मला सुचत नव्हते. तरीही बोलणे आवश्यक होते. आता बोलण्यासारखे

माझ्यापाशी काहीच नव्हते तेव्हा बोलणार काय कपाळ? तर मी म्हणालो:

"मी आणि मीष्का. हो. तर... चालत होतो. कुणाच्याही अध्यात-मध्यात नव्हतो. शाळेला उशीर व्हायला नको म्हणून भरभर चालत होतो. पण तेवढ्यात असं काही घडलं, राईसा इवानोवना, अगदी भयंकर! अबब! फारच भयानक!"

सबंध वर्ग आता हसू लागला आणि आरोळ्या ठोकू लागला. वालेर्का सर्वांत मोठ्यांदा ओरडत होता, कारण स्वतःच्या "पिलांबद्दल" वाईट शेरा मिळणार ह्याची त्याला केव्हाच जाणीव झाली होती. आता धडा थांबला होता आणि माझ्याकडे पाहून खो खो हसणे त्याला शक्य झाले होते. अगदी पोट धरधरून तो हसत होता. पण राईसा इवानोवनांनी ह्या बाजारी गोंधळाला ताबडतोब आळा घातला.

"शांत रहा," त्या म्हणाल्या, "सगळा प्रकार नीट समजून घेऊ या! देनीस! सरळ उत्तर दे – तुम्ही कुठं होतात? मीषा कुठं आहे?"

ह्या सगळ्या साहसांपायी माझे डोके एव्हाना चांगलेच भणाणू लागले होते आणि मी एकाएकी जाहीर केले:

"मीषा सध्या पाशामावशीला बटणं शिवतोय! म्हणजे पाशामावशी त्याची कॉलर शिवून देतेय!"

परत गोंगाट माजला आणि हशा उमटला. राईसा इवानोवना आता अगदी लाल लाल झाल्या होत्या आणि मला जाणवले की, इच्छा असो वा नसो, पण तरीही काहीतरी सांगणे भाग होते.

मी सावरलो आणि बरळलो:

"तिथं आग लागली होती!"

सगळे एकदम गप्प झाले. राईसा इवानोवनांचा चेहरा पांढराफटक पडला आणि त्यांनी विचारले:

"कुठं आग लागली?"

मी म्हणालो:

"आमच्या घरापाशी. आवारात. छोट्या घराला. धुराचे लोट उसळत होते. मी आणि मीष्का जवळूनच जात होतो... म्हणजे... चोरवाटेनं! कुणीतरी ह्या चोरवाटेच्या तोंडाशी फळी लावून ठेवली होती. तर आम्ही जात होतो! आणि तिथून धूर! कुणीतरी घुसमटत असल्याचा आवाज ऐकला. आम्ही फळी बाजूला केली. तिथं एक तान्ही मुलगी. रडत होती. घुसमटली होती. आम्ही तिच्या हाता-पायांना पकडलं आणि आगीमधून बाहेर काढलं. तेवढ्यात तिची आई धावत आली. तिनं आम्हाला विचारलं: 'मुलांनो, तुमची आडनांवं काय? तुमच्याबद्दल मी वर्तमानपत्रात चार चांगले शब्द लिहीन!' आम्ही म्हणालो: 'एवढ्या छोट्या मुलीबद्दल तुम्ही आमचे आभार कसले मानता? तशी मुळीच गरज नाही. आम्ही नम्र मुलं आहोत.' तर आम्ही तिथून निघालो. मी खाली बसलो तर चालेल, राईसा इवानोवना?"

त्या टेबलापासून उठल्या आणि माझ्यापाशी आल्या. त्यांचे डोळे गंभीर होते व आनंदी होते. त्या म्हणाल्या:

"किती छान! तू आणि मीषा इतके छान वागलात ह्याचा मला खूप खूप आनंद झालाय! बैस आपल्या जागेवर. बैस. थोडी विश्रांती घे."

मी पाहिले की, मला जवळ घेऊन कुरवाळावे अथवा माझी पापी घ्यावी, असे त्यांना वाटत होते. पण ह्या सगळ्या प्रकाराचा मला मात्र मुळीच आनंद झाला नव्हता. मी सावकाश-पणे स्वतःच्या जागेपाशी गेलो. जणू मी खरेच काहीतरी विशेष केले होते अशा नजरेने सबंध वर्ग माझ्याकडे पहात होता. मला मनातून अगदी चोरट्यासारखे वाटले. तेवढ्यात दार उघडले गेले आणि उंबरठ्यावर मीष्का दिसला. सगळ्यांच्या नजरा त्याच्याकडे वळल्या. राईसा इवा-नोवना आनंदून म्हणाल्या:

"आत ये, मीष्का, आत ये... बैस... बैस. विश्रांती घे. शांत हो. तुझीसुद्धा जिवाची घालमेल झाली असणार!"

"तर काय!" मीष्का म्हणाला. "तुम्ही रागावणार म्हणून भीती वाटत होती."

"अरे पण तुझ्यापाशी सबळ कारण आहे," राईसा इवानोवना म्हणाल्या. "तू घाबरायची गरज नाही. तू आणि देनीसनं एका तान्ह्या मुलाला वाचवलंत. असे प्रसंग काही रोजच्या रोज घडत नाहीत."

मीष्काने चक्क आ वासला. आम्हा दोघांचे संभाषण तो पूर्ण विसरला होता असे भासत होते.

"म-म-मुलाला?" मीष्का तोतरे बोलू लागला. "व... व... वाचवलं? क... क... कुणी वाचवलं?"

मीष्का आता सगळा विचका करणार हे मला जाणवले. त्याला मदत करण्याच्या इराद्याने मी गोड स्मित करत म्हणालो:

"मीष्का, उगीच आव आणू नको... मी एव्हाना सगळं सांगून टाकलंय!" आणि माझ्या थापेबाजीला त्याने खोटे पाडू नये म्हणून मी त्याला डोळ्यांनी खुणा करू लागलो. पण तो मूर्ख एखाद्या मठ्ठ मेंढ्याप्रमाणे उभा होता. आता मी त्याला दोन्ही डोळे मिचकावून खुणावू लागलो. आणि एकदम त्याच्या टाळक्यात प्रकाश पडलेला दिसला! पुढे काय करायचे ह्याचा त्याने ताबडतोब तर्क केला! तर आमच्या मीष्काने अगदी लाजऱ्या बाळाप्रमाणे नजर जमिनीवर वळवली आणि अगदी शिसारी आणणाऱ्या नम्र आवाजात तो म्हणाला:

"कशाला बोललास तू! अगदी साधी बाब..."

आणि अस्सल नटाप्रमाणे लाजेने त्याचा चेहरा लालसुद्धा बनला. वा रे मीष्का! त्याच्या-पासून अशी अपेक्षा मी कधी बाळगली नव्हती. तो बाकावर बसला आणि दप्तरातून वह्या बाहेर काढू लागला. सगळेजण त्याच्याकडे आदराने पहात होते. मीसुद्धा. खरे तर एवढ्यावरच तो विषय संपला असता. पण मीष्काची जीभ अचानक सैल सुटली. सभोवती नजर फिरवत एकदम तो म्हणाला:

"तो फार जड नव्हता. दहा-पंधरा किलो असेल..."

राईसा इवानोवनांनी विचारले:

"कोण? कोण जड नव्हता? कोण दहा-पंधरा किलो?"

मीष्का:

"तो छोटा मुलगा."

"कुठला मुलगा?"

मीष्का:

"ज्याला आम्ही बर्फ फुटलेल्या तळ्यातून बाहेर ओढून काढलं..."

"तू काहीतरी चूक करतो आहेस," राईसा इवानोवना म्हणाल्या, "अरे, ती मुलगी होती! आणि तिथं बर्फ कुठून आला?"

पण मीष्का आपलेच म्हणणे रेटत होता:

"काय – बर्फ कुठून? हिवाळा आहे, म्हणून बर्फ! सगळी तळी गोठलीत! मी आणि देनीस येत होतो चालत... तेवढ्यात बर्फाच्या भोकातून कुणाच्यातरी ओरडण्याचा आवाज ऐकला. जोरजोरात पाणी उडवत होता. बर्फाला खरवडत होता. हातांनी कड धरून वर चढायचा प्रयत्न करत होता. पण बर्फ ठिसूळ! त्याचे भराभर तुकडे पडत होते. तेव्हा मी आणि देनीसनं रांगत रांगत जाऊन त्या लहान मुलाचे हात-पाय पकडले आणि त्याला किनाऱ्या-पर्यंत ओढत नेलं. तेवढ्यात त्या मुलाचे आजोबा तिथं धावत आले, धाय धाय रडू लागले..."

आता मी काहीही करू शकत नव्हतो. मीष्काने थापा मारण्यात गाड्यावर कडी केली होती. सर्व वर्गाला एव्हाना समजून चुकले होते की, मीष्का थापा मारत होता आणि मीसुद्धा थापा ठोकल्या होत्या. त्यामुळे मीष्काच्या प्रत्येक शब्दानंतर प्रचंड हशा उठत होता. त्याने गप्प बसावे आणि थापा मारणे बंद करावे म्हणून मी खुणा करत होतो. कारण तो नको त्या थापा मारत होता! पण मीष्का माझ्या कुठल्याही खुणांना दाद न देता आपलेच गाणे गात होता:

"तर आजोबा ह्याला म्हणाले: 'ह्या लहान मुलाला तुम्ही वाचवलंत म्हणून मी माझं सोन्याचं घड्याळ तुम्हाला बक्षिस देतो.' पण आम्ही म्हणालो: 'नको, नको. आम्ही नम्र सोविएत मुलं आहोत!'"

माझा संयम सुटला आणि मी ओरडलो:

"तिथं आग लागली होती! मीष्कानं गोंधळ केला!"

त्यावर तो म्हणतो:

"तुझं काय टाळकं फिरलं? बर्फाच्या भोकात आग कुठून लागणार? तूच सगळा गोंधळ केलास!"

सबंध वर्गाची हसून हसून मुरकुंडी वळली होती. राईसा इवानोवनांनी टेबलावर थाड-दिशी हात आपटला! सगळेजण एकदम गप्प झाले. मीष्का तसाच आ वासून उभा राहिला.

राईसा इवानोवना म्हणाल्या:

"किती शरमेची गोष्ट! खोटं बोलण्याचा अगदी कळस! आणि मला वाटलं होतं – किती आदर्श बालवीर आहेत!"

सर्व मुलांनी ताबडतोब आमच्यापासून दुसरीकडे नजरा वळवल्या. वर्गात विचित्र शांतता पसरली. मी मीष्काला चिठी लिहिली:

"बघितलंस, खरं बोलायला पाहिजे होतं!"

त्याने उत्तर लिहिले:

"अर्थातच! एक तर खरे बोलावे, किंवा काय बोलायचे ते आधी नीट ठरवावे!"

जर ...

एक दिवस मी असाच नुसता बसून होतो आणि अचानक काही कारण नसताना असा एक विचार मनात आला की, त्या विचाराचे माझे मलाच खूप आश्चर्य वाटले. माझ्या मनात विचार आला होता की, जर जगात सगळ्या गोष्टी उलट घडल्या तर किती छान झाले असते! उदाहरणार्थ, जर सर्व कामांचे प्रमुखपण मुलांकडे आले आणि मोठ्या माणसांना मुलांचे ऐकावे लागले, तर..! थोडक्यात मोठी माणसे लहान मुलांसारखी आणि लहान मुले मोठ्या माणसांसारखी. हे असे फार मस्त झाले असते, खूप मजा आली असती.

पहिली गोष्ट म्हणजे मी कल्पना करू शकतो की, आईला मी माझ्या इच्छेप्रमाणे जर आज्ञा देऊ लागलो तर तिला ते कितपत "आवडले" असते! आणि बाबांनासुद्धा! आजी तर सबंध दिवस रडली असती! मी त्यांना सगळ्या ताकीदी दिल्या असत्या! उदाहरणार्थ, जर आई जेवायला बसली, तर मी तिला सांगीन:

"पावाशिवाय जेवायची फॅशन कुठून काढलीस? हे काहीतरी नवीनच! जरा आरशात बघ स्वतःचा अवतार? नुसता हाडांचा सापळा! ताबडतोब खायला लाग!" – आणि ती मान खाली घालून जेवू लागेल व मी तिला नुसते हुकूम ठोकीन.

"लौकर! उगीच टंगळमंगळ करू नको! परत विचारात गुंतलीस? सगळ्या जगाचे प्रश्न सोडवते आहेस? नीट चावून खा! आणि खुर्चीवर पाय हलवत बसू नको!"

तेवढ्यात जर बाबा कामावरून घरी आले, तर त्यांनी अंगातून कपडे उतरवायच्या आधीच मी ओरडेन:

"वा, आलात! सदा तुमची वाट बघत बसावं लागतं! ताबडतोब हात धुवा! नीट खसखसून हात धुवा. अजिबात घाण ठेवायची नाही. तुम्ही हात पुसल्यावर टॉवेलकडं बघवत नाही! ब्रशानं हात घासा आणि साबणाची मुळीच काटकसर करू नका! नखं दाखवा पाहू? छीः छीः, ही काय नखं म्हणायची? पंजे आहेत पंजे! कात्री कुठाय? चळवळ करू नका! मी हात कापत नाही, अगदी जपून नखं कापतोय! नाक सुरसुरू नका, तुम्ही लहान मुलगी नव्हेत... आस्सं! आता बसा टेबलापाशी!"

बाबा बसतील आणि हळूच आईला म्हणतील :

" कशी आहेस तू ?"

तीसुद्धा हळू आवाजात म्हणेल :

" ठीक आहे ."

आणि मी ताबडतोब गर्जेन :

" टेबलापाशी बडबड बंद ! जेवताना वटवट करायची नाही ! कायम लक्षात ठेवा . कडक नियम ! बाबा ! ते हातातलं वर्तमानपत्र ताबडतोब खाली ठेवा ! तुम्ही म्हणजे मला एक शिक्षा आहात ! "

मग ते दोघे माझ्यासमोर उंदरांसारखे चुपचाप बसतील आणि जेव्हा आजी येईल , तेव्हा मी कपाळाला आठ्या घालून हातवारे करीत मोठ्या आवाजात ओरडेन :

" बाबा ! आई ! जरा आपल्या आजीवर नजर टाका ! काय तिचा अवतार ! कोटाची बटणं सुटलेली , टोपी वाकडी ! गाल लाल झालेत , मानेवर घामाचं थारोळं ! वा , वा , कौतुक करावं तेवढं थोडंच ! कबूल कर , परत हॉकी खेळत होतीस ना ? काय ही घाणेरडी काठी ? कशाला घरात मिरवत आणलीस ? काय ? ही हॉकी खेळायची स्टिक आहे ? ताबडतोब माझ्या डोळ्यांसमोरून तिला बाजूला कर – बोळात फेकून दे ! "

मग खोलीत येरझाऱ्या घालत मी त्या तिघांना सांगीन :

" जेवणानंतर सर्वांनी अभ्यासाला बसायचं आणि मी सिनेमाला जाईन ! "

अर्थातच त्यांची रडारड आणि आरडाओरड सुरू होईल : " आम्ही पण तुझ्याबरोबर येणार ! आम्हालासुद्धा सिनेमा बघायचाय ! "

मी त्यांना म्हणेन :

" मुळीच नाही ! काल वाढदिवसाच्या पार्टीला गेला होतात , रविवारी मी तुम्हाला सर्कसला नेलं होतं ! वा ! रोजच्या रोज मनोरंजनाची चटक लागलीय ! बसा घरात ! हे घ्या तीस कोपेक आईस्क्रीमसाठी ! बास्स ! "

तेव्हा आजी कळवळून विनवणी करील :

" निदान मला तरी घेऊन जा ! प्रत्येक लहान मुलाला स्वतःबरोबर एक मोठं माणूस फुकट नेता येतं ! "

पण मी म्हणेन :

" हा चित्रपट सत्तर वर्षांवरील लोकांना बघायला बंदी आहे . बैस घरात , भटकी कुठली ! "

मग मी मुद्दाम टाचा आपटत त्यांच्यासमोरून जाईन , त्यांचे डोळे पाणावले आहेत इकडे जणू लक्ष नसल्याचा बहाणा करीन , आरशासमोर खूप वेळ नखरे करत , गाणे गुणगुणत कपडे घालीन . ह्या सर्व गोष्टींमुळे त्यांचा आणखी छळ होईल आणि मग जिन्याचे दार उघडत मी म्हणेन :

पण मी काय म्हणेन त्याचा विचार करण्याची मला संधी मिळाली नाही, कारण तेवढ्यात आई आली – माझी खरीखुरी जिवंत आई – आणि म्हणाली :

"अजून बसून आहेस? ताबडतोब खायला लाग. जरा अवतार बघितलास स्वतःचा? नुसता हाडांचा सापळा!"

चतुर उपाय

"बघा इकडं," आई म्हणाली. "माझी सगळी सुटी कशात जाते? भांडी विसळण्यात! दिवसाला तीन वेळा भांडी विसळायची! सकाळी कप धुवा, संध्याकाळी कप धुवा आणि दिवसा बशांचा मोठ्ठाच्या मोठा ढीग! पिडून गेलेय मी!"

"होय," बाबा म्हणाले, "खरंच, ही फार भयानक बाब आहे. ह्यावर काही उपाय शोधलेला नाही हे किती वाईट! इंजिनिअर काय करताहेत? खरंच... बिच्चाऱ्या बायका!"

बाबांनी एक खोल उसासा टाकला व ते दिवाणावर बसले.

बाबा किती आरामात बसले होते ते आईने पाहिले आणि ती म्हणाली :

"नुसती फतकल मारून उसासे टाकत बसण्यानं काही होत नाही! इंजिनिअरांच्या माथी सगळा दोष मारून भागणार नाही! मी तुम्हा दोघांना मुदत देते. जेवणाच्या वेळेपर्यंत तुम्ही ह्यावर काहीतरी उपाय शोधून काढला पाहिजे आणि भांडी धुण्याच्या ह्या कटकटीमधून माझी सुटका केली पाहिजे. जो उपाय शोधणार नाही, त्याला मी खायला घालणार नाही. बसा खुशाल उपाशी! देनीस, तुलासुद्धा मी बजावतेय!"

मी ताबडतोब खिडकीच्या चौकटीत बसलो आणि कोणता उपाय शोधावा ह्यावर विचार करू लागलो. पहिली गोष्ट म्हणजे मी पुरता घाबरून गेलो होतो की, आई मला खरोखरीच खाऊ घालणार नाही आणि उपासमारीमुळे मी मरून जाईन. दुसरी गोष्ट म्हणजे कुणाही इंजिनिअरला सुचला नाही असा उपाय शोधून काढण्यासाठी विचार करण्यात मला रस वाटत होता. तर मी बसून विचार करत होतो, मधून मधून बाबांकडे तिरप्या नजरेने पहात होतो. पण बाबा विचार करत होते असे मुळीच दिसत नव्हते. त्यांनी दाढी केली, मग जवळ जवळ दहा वर्तमानपत्रे वाचली, त्यानंतर शांतपणे रेडिओ लावला आणि कुठलातरी फालतू कार्यक्रम ते ऐकत बसले.

तेव्हा मी आणखी वेगाने विचार करू लागलो. स्वतःच भांडी विसळून त्यांना पुसून काढणाऱ्या एखाद्या विजेवर चालणाऱ्या यंत्राचा प्रथम मी विचार करत होतो. म्हणून मी आमचे फरशी स्वच्छ करणारे विजेचे यंत्र आणि बाबांचे दाढीचे विजेवर चालणारे यंत्र खोलले. पण भांडी पुसायचा फडका कुठे अडकवायचा ते मला सुचेना.

असे आढळले की, दाढीचे यंत्र सुरू करताच फडक्याचे हजार बारीक तुकडे झाले असते. तेव्हा मी परत दोन्ही यंत्रे जुळवली व दुसरा उपाय शोधू लागलो. सुमारे दोन तासांनंतर मला

आठवण झाली की, एका कन्व्हेयर बेल्टसंबंधी एका वर्तमानपत्रात मी माहिती वाचली होती व त्यावरून मला एक उत्तम उपाय सुचला. जेव्हा जेवणाची वेळ झाली, आईने टेबलावर रुमाल पसरला आणि आम्ही सगळे बसलो, तेव्हा मी म्हणालो:

"मग काय, बाबा? तुम्ही विचार केलात?"

"कशाबद्दल?" बाबांनी विचारले.

"भांडी विसळण्याबद्दल," मी म्हणालो. "नाही तर आई आपल्या दोघांना खाऊ घालणार नाही."

"अरे, ती गंमतीनं तसं म्हणाली," बाबा बोलले. "आपल्या पोटच्या मुलाला आणि अत्यंत आवडत्या नवऱ्याला ती उपाशी कसं ठेवील?"

आणि ते मजेने खूप हसले.

पण आई म्हणाली:

"मी मुळीच गंमतीनं म्हटलं नव्हत. आता माझा हिसका समजेल तुम्हाला! शरम कशी वाटत नाही! मी आत्तापर्यंत शंभर वेळा सांगितलं – ह्या भांडी विसळण्यापायी माझी दमछाक होतेय! पण तुम्हाला त्याची पर्वा वाटत नाही. कुणी खिडकीच्या चौकटीत बसतो, कुणी दाढी करतो, रेडिओ ऐकतो आणि हा सारा वेळ मी तुमच्या उष्ट्या-खरकट्या कप-बशांना विसळण्यात माझं आयुष्य नासवतेय!"

"ठीक आहे," बाबा म्हणाले, "काहीतरी उपाय शोधू! पण तोवर जेवण वाढ बघू! उगीच राईचा पर्वत कशाला करतेस?"

"अस्सं? मी राईचा पर्वत करते काय?" आई एकदम चिडून म्हणाली. "असं काही ऐकायला मिळेल अशी कधी अपेक्षा केली नव्हती! ठीक आहे – मी तुम्हाला मुळीच जेवण देणार नाही. बसा उपाशी!"

तिने बोटांनी स्वतःची कानशीले दाबली व ती टेबलापासून उठली. टेबलापाशी उभे राहून तिने खूप वेळ बाबांकडे पाहिले. बाबांनी हातांची घडी घातली आणि खुर्चीवर मागे-पुढे डोलत सुद्धा आईकडे टक लावून पाहू लागले. दोघेही गप्प झाले. जेवणाचा पत्ता नव्हता. मला तर सपाटून भूक लागली होती. मी म्हणालो:

"आई! एकट्या बाबांनी काहीच विचार केला नाही. पण मी एक उपाय शोधलाय! सगळं ठीक आहे, तू चिंता करू नकोस. चला, जेवू या."

आई म्हणाली:

"तू काय उपाय शोधलास?"

"आई, मी एक चतुर उपाय शोधलाय!"

"असं? सांग बघू!"

मी विचारले:

"प्रत्येक जेवणानंतर तू किती भांड्यांचे संच विसळतेस?"

"तीन."

"तर मग ओरड 'हुर्रा'," मी म्हणालो, "आता यापुढं तुला फक्त एकच संच विसळावा लागेल! मी चतुर उपाय शोधलाय!"

"अरे, सांग ना तुझा उपाय," बाबा म्हणाले.

"प्रथम जेवू या," मी म्हणालो. "जेवता जेवता मी सांगतो. मला कडकडून भूक लागलीय!"

"ठीक आहे," उसासा टाकत आई म्हणाली. "बसा जेवायला."

तर आम्ही जेवू लागलो.

"तर?" बाबा म्हणाले.

"अगदी साधं आहे," मी म्हणालो, "आई, तू ऐकलंस म्हणजे समजेल, किती सोप्पं आहे! बघ: जेवण तयार झालंय. तू ताबडतोब टेबलावर भांड्यांचा एक संच मांडायचा. म्हणजे एक बशी, एक काटा, एक सुरी, एक चमचा, सारासाठी एक खोलगट बशी, एक कप. मग टेबलाशी बसून प्रथम तू साराची बशी संपवायची आणि बाबांना हाक मारून सांगायचं: 'जेवण तयार आहे!'

"अर्थात बाबा जोवर हात धुतील, तोवर तू त्याच बशीत नवा सार ओतशील.

"बाबा हात धुवून खोलीत येतील आणि मला हाक मारतील: 'देनीस, जेवायला चल! हात धू!'

"मी हात धुवायला जातो. एवढ्या दरम्यान तू छोट्या सपाट बशीतून कटलेटं खाशील. बाबा सार संपवतील. मी हात धुतोय. मी हात धुवून तुमच्यापाशी येईन, तोवर बाबांचा सार संपलेला असेल आणि तुझी कटलेटं खाऊन झाली असतील. मी आल्यावर बाबा त्याच बशीत माझ्यासाठी सार ओततील, तू स्वतःच्या रिकाम्या बशीत बाबांसाठी कटलेटं वाढशील. मी सार संपवतोय, बाबा कटलेटं खात आहेत, तोवर तू कपामधून शांतपणं उकडलेल्या फळांचं सरबत पिऊन टाकशील.

"जेव्हा बाबांची कटलेटं संपतील, त्याचवेळी माझं सार संपेल. तेव्हा ते स्वतःच्या रिकाम्या बशीत माझ्यासाठी कटलेटं घालतील आणि ह्यावेळी तू स्वतःच्या रिकाम्या कपात बाबांसाठी फळांचं सरबत ओतशील. मी साराची रिकामी बशी बाजूला सरकवून ठेवीन, कटलेटांची बशी घेईन, तोवर बाबा सरबत पीत आहेत. एव्हाना तुझं जेवण संपलंय, म्हणून तू साराची खोल बशी उचलशील आणि ती धुण्यासाठी स्वयंपाकघरात जाशील!

"जोवर तू ती बशी धूत आहेस, तोवर माझी कटलेटं खाऊन झालीत आणि बाबांचं सरबत पिऊन झालंय! ते ताबडतोब कपात माझ्यासाठी सरबत ओततील आणि कटलेटांची रिकामी बशी तुझ्याकडं आणून देतील. मी घुट्टदिशी सरबताचा कप गट्ट करीन आणि स्वयंपाकघरात कप आणून देईन. बघ, किती सोप्पं आहे सगळं! आणि भांड्यांचे तीन संच धुण्याऐवजी फक्त एकच संच धुवावा लागेल. हुर्रा?"

"हुर्रा," आई म्हणाली. "हुर्रा तर हुर्रा, पण स्वच्छतेच्या दृष्टीनं चूक!"

“फालतू,” मी म्हणालो. “आपण काय एकमेकांना परके आहोत? बाबांच्या बशीत खायला मला मुळीच संकोच वाटणार नाही. माझं प्रेम आहे त्यांच्यावर... त्यात काय विशेष... माझं तुझ्यावरसुद्धा प्रेम आहे.”

“वा रे वा, फारच चतुर उपाय,” बाबा म्हणाले. “पण काही म्हण – तीन टप्प्यांनी खाण्यापेक्षा सर्वांनी एकत्र जेवण्यातच जास्त मजा आहे.”

“पण त्यामुळं आईचं काम हलकं होईल,” मी म्हणालो. “भांडी तिपटीनं कमी होतील!”

“मला वाटतं, मलाही एक उपाय सुचलाय,” एकदम विचारात गढत बाबा म्हणाले. “अर्थात, तो काही तसा चतुर नाही, पण तरीही...”

“सांगा,” मी म्हणालो.

“सांग, सांग,..” आई म्हणाली.

बाबा उठले, त्यांनी सदऱ्याच्या बाह्या वर सरकवल्या आणि टेबलावरील सर्व भांडी गोळा केली.

“माझ्या पाठीमागून ये,” ते म्हणाले. “माझा बिनचतुर उपाय मी तुला आत्ता दाखवतो. तो असा की, यापुढं सर्व भांडी आपण दोघांनी मिळून धुवायची!”

बाबा स्वयंपाकघरात गेले.

मी त्यांच्या पाठोपाठ धावलो. आम्ही सर्व भांडी विसळली. म्हणजे फक्त दोन संच. कारण तिसरा संच माझ्या हातून फुटला! अगदी योगायोगाने माझ्या हातून तसे घडले. बाबांनी किती साधा उपाय शोधून काढला ह्याचाच मी सारा वेळ विचार करत होतो.

मला का बरे हा उपाय सुचला नाही?

कोंबडीचे सार

आईने दुकानामधून एक भली मोठी लांब पायांची कोंबडी आणली होती. कोंबडीच्या डोक्यावर मोठ्ठा लाल तुरा होता. आईने त्या कोंबडीला खिडकीत टांगले आणि ती म्हणाली:

“जर माझ्याआधी बाबा घरी आले, तर त्यांना कोंबडी उकडून ठेवायला सांग. सांगशील?”

मी म्हणालो:

“नक्की सांगीन!”

आई इन्स्टिटयूटमध्ये कामाला निघून गेली. मी रंगांची पेटी घेऊन चित्रे रंगवायला बसलो. रानात झाडांवरून उड्या मारत जाणारी खार रंगवण्याचा माझा इरादा होता. मी सुरुवात तर छान केली, पण नंतर असे आढळले की, खारीऐवजी एक विचित्र माणूस मी रेखाटला होता. खारीच्या शेपटीजागी त्याचे नाक बनले होते आणि झाडांच्या फांद्याऐवजी त्याचे केस,

कान व टोपी दिसत होते... असे कसे घडले ह्याचे मला फार आश्चर्य वाटले. जेव्हा बाबा घरी आले, तेव्हा मी विचारले:

"बाबा, ओळखा पाहू, मी काय चित्र काढलंय?"

बाबांनी चित्र पाहिले व ते विचारात पडले.

"आग?"

"हे काय हो बाबा? नीट बघा ना!"

तेव्हा बाबांनी परत निरखून पाहिले व ते म्हणाले:

"अरेच्चा, माफ कर. मला वाटतं हा फूटबॉल..."

मी म्हणालो:

"तुम्ही मुळीच लक्ष देऊन पहात नाही! तुम्ही खूप दमला आहात का?"

"नाही रे, पण खूप भूक लागलीय. आज जेवणाला काय ते माहीत आहे तुला?"

"ती बघा, खिडकीत कोंबडी टांगून ठेवलीय. तिला उकडा आणि खा!"

बाबांनी खिडकीमधून कोंबडी उचलली आणि तिला टेबलावर ठेवले.

ते म्हणाले:

"उकड म्हणून सांगणं सोपं आहे! अर्थात उकडणं शक्य आहे. अगदी क्षुल्लक काम. पण प्रश्न आहे – कशा प्रकारं आपण कोंबडीला खायचं? कोंबडीपासून शेकडो चवदार प्रकार बनवता येतात. उदाहरणार्थ, साधी कोंबडी-कटलेटं बनवता येतील, किंवा द्राक्षांमधली कोंबडी! मी वाचलंय त्याबद्दल! किंवा कोंबडीच्या तंगडीपासून 'कीयेव कटलेट' बनवता येईल. अगदी चाटूनपुसून खाशील. किंवा कोंबडी आणि शेवयांचं सार उकळता येईल. अथवा जॉर्जियात 'चिकन तबाका' म्हणतात तशी लसूण लावून कोंबडी भाजता येईल. शिवाय..."

पण मी त्यांना मध्येच अडवले. मी म्हणालो:

"बाबा, तुम्ही आपली साधीच कोंबडी बनवा. अगदी लौकर तयार होईल अशी!"

बाबा पटकन कबूल झाले.

"खरं आहे, पुत्रा! आपल्याला महत्त्वाचं काय? लौकर खाणं! तुला हे समजलंय! सगळ्यात लौकर काय बनवता येईल बरं? उत्तर साधं आणि स्पष्ट आहे: सार! कोंबडीचं सार!"

बाबांनी स्वतःचे हात खसखसा चोळले. मी विचारले:

"तुम्हाला सार बनवता येतं?"

बाबा फक्त हसले.

"त्यात काय बनवायचं?" त्यांचे डोळे चमकत होते. "सार बनवणं सर्वांत सोप्पं! पाण्यात कोंबडी ठेवायची आणि केव्हा उकडते त्याची वाट पहायची. बास्स! ठरलं! आपण सार बनवू आणि लौकरच जेवणासाठी आपल्यापाशी दोन पदार्थ बनतील: प्रथम सार आणि

पाव, मग – गरम गरम वाफा निघणारी उकडलेली कोंबडी. आता तुझी चित्रकला ठेव बाजूला आणि मला मदत कर!"

"मी काय केलं पाहिजे?"

"हे बघ! कोंबडीच्या अंगावर बारीक बारीक केस आहेत. त्यांना तू कापून टाक, कारण केसाळ सारं मला आवडत नाही! जोवर तू केस कापण्याचं काम उरकशील, तोवर मी स्वयंपाकघरात जाऊन पाणी तापवत ठेवतो."

बाबा स्वयंपाकघरात गेले. मी आईची कात्री घेतली आणि कोंबडीच्या अंगावरचा एकेक बारीक केस कापू लागलो. प्रथम मला वाटले की, केस फार नसतील, पण नंतर नीट न्याहाळून पाहिले तेव्हा त्यांची संख्या भरघोस असल्याचे आढळले. अगदी केशकर्तनालयातल्याप्रमाणे मी कोंबडीचे केस भराभरा कापायला सुरुवात केली. एका केसापासून दुसऱ्या केसापर्यंत जाताना हवेत कात्री फिरवू लागलो.

बाबा खोलीत आले आणि माझ्याकडे पाहून म्हणाले:

"कल्ल्यांच्या जागी जास्त काप!"

मी म्हणालो:

"लौकर कापणं जमत नाही..."

तेवढ्यात बाबांनी अचानक स्वतःच्या कपाळावर हात मारला.

"अरे देवा! आपण दोघं अगदीच बिनडोक आहोत रे देनीस! मी हे कसं काय विसरलो? थांबव तुझं केस कापणं! त्या कोंबडीला आगीवर धरलं पाहिजे! समजलं? सगळे तसं करतात. आपण तिला आगीवर धरू, म्हणजे सगळे केस जळून जातील. मग केस कापायची गरज नाही आणि दाढी घोटायचं कारण नाही! चल माझ्यामागून!"

त्यांनी माझ्या हातून कोंबडी हिसकावून घेतली आणि ते स्वयंपाकघरात धावले. मी त्यांच्या पाठोपाठ धावलो. आम्ही गॅसची दुसरी शेगडी पेटवली, कारण एकीवर पाण्याची तपेली आधीपासूनच तापत होती. कोंबडीला आम्ही आगीवर धरले. तिला चांगलेच चटके बसत होते आणि तिच्या केसांचा वास सबंध घरभर दरवळला. बाबा तिला आगीवर उलटसुलट फिरवत होते आणि त्याचवेळी बोलत होते:

"जरा थांब, आत्ता आटपेल! वा, काय छान कोंबडी आहे! आत्ता तिचे सगळे केस जळून जातील आणि मग ती अगदी स्वच्छ पांढरीशुभ्र दिसू लागेल..."

पण प्रत्यक्षात कोंबडी काळी काळी दिसायला लागली होती, कोळशाप्रमाणे भासू लागली होती. शेवटी बाबांनी गॅस विझवला. ते म्हणाले:

"मला वाटतं, अनपेक्षितपणं ती धुरावली. तुला धुरावलेली कोंबडी आवडते?"

मी म्हणालो:

"नाही. ती धुरावली नाही, फक्त तिच्यावर काजळी चढलीय. बाबा, द्या तिला माझ्यापाशी. मी तिला धुतो."

बाबा विलक्षण खूष झाले.

"शाबास तुझी!" ते म्हणाले. "तू प्रसंगावधानी आहेस. चांगला वारसा उचललास तू माझ्यापासून. थेट माझ्यासारखा बनला आहेस, चल मित्रा, ह्या धुराडी स्वच्छ करणाऱ्या कोंबडीला घे आणि नळाखाली छान खसाखसा धुवून काढ. मी खूप दमलोय."

त्यांनी स्टूलावर बैठक मारली. मी म्हणालो:

"मी तिला आत्ता स्वच्छ करून आणतो!"

मी कोंबडी नळाखाली ठेवली आणि सगळा जोर लावून उजव्या हाताने तिला खसाखसा चोळून धुवू लागलो. कोंबडी खूप गरम आणि अत्यंत घाण झाली होती. माझे हात थेट कोपरां-पर्यंत ताबडतोब मळकट झाले. बाबा स्टूलावर डुलत होते.

"बाबा, तुम्ही तिचं काय केलंत बघा!" मी म्हणालो. "मुळीच स्वच्छ होत नाही. काजळी खूप दाट चढलीय."

"अरे छट्," बाबा म्हणाले, "काजळी फक्त वर वर चढलीय. सबंध आतपर्यंत काजळी कशी जाईल? जरा थांब!"

बाबा न्हाणीघरात गेले आणि गुलाबी रंगाच्या साबणाची मोठ्ठी वडी घेऊन आले.

"घे," ते म्हणाले, "नीट धू! साबण लाव तिला!"

त्या दुर्दैवी कोंबडीला मी साबण फासू लागलो. आता ती भलतीच वाईट दिसू लागली. मी तिला भरपूर साबण फासला, पण तिच्या अंगावरची काजळी पुरती धुवून निघाली नाही. जवळ जवळ अर्धा तास तिच्या अंगामधून काळे पाणी निथळत होते. पण तरीही ती पांढरीशुभ्र बनली नाही.

"ही नतद्रष्ट कोंबडी फक्त साबणानं धुतली जातेय," मी म्हणालो:

तेव्हा बाबा म्हणाले:

"तो ब्रश घे! घास तिला ब्रशानं! प्रथम पाठ आणि नंतर बाकीचं..."

मी कोंबडीला ब्रशानं घासू लागलो. अंगातील सगळी ताकद पणाला लावून मी तिला घासत होतो आणि काही जागी तिची सालटी निघाली होती. पण ते काम अवघड होते, कारण ती कोंबडी जणू एकदम जिवंत झाल्याप्रमाणे माझ्या हातांमधून निसटू लागली. आणि सारा वेळ बाबा स्टूलावर बसून मला फक्त हुकूम ठोकत होते:

"जोरात घास! घट्ट पकड! पंखांना धर! हात् तुझी! तुला कोंबडी धुणं अजिबात जमत नाही असं मला दिसतंय!"

तेव्हा मी म्हणालो:

"बाबा, तुम्ही स्वतःच प्रयत्न करून बघा ना!"

मी त्यांच्या पुढ्यात कोंबडी धरली. पण तिला पकडणे त्यांना जमले नाही, कारण ती एकदम माझ्या हातांमधून निसटली आणि अगदी शेवटच्या कपाटाखाली घसरत गेली. पण बाबा गोंधळले नाहीत. ते म्हणाले:

" फरशी पुसायचा लांब दांड्याचा झाडू दे ! "

मी बाबांना झाडू दिला आणि बाबा त्या कोंबडीला कपाटाखालून बाहेर काढू लागले. प्रथम त्यांनी जुना उंदराचा पिंजरा बाहेर काढला. मग गेल्या वर्षी मी हरवलेला पत्र्याचा सैनिक बाहेर काढला. तो सैनिक परत मिळाला म्हणून मी खूप आनंदलो.

सरतेशेवटी बाबांनी कपाटाखालून कोंबडीला ओढून काढले. ती सबंध धुळीने माखली होती. आणि बाबा पुरते लालेलाल झाले होते. पण त्यांनी तिची तंगडी पकडली आणि तिला परत नळाखाली नेले. ते म्हणाले :

" अरे निळ्या पक्ष्या, आता कुठं जाशील आमच्या तावडीतून ! "

त्यांनी तिला भरपूर धुतले आणि शेवटी भांड्यात टाकले. तेवढ्यात आई आली. ती म्हणाली :

" इथं काय चाललीय एवढी धांदल ? "

बाबा उसासा टाकत म्हणाले :

" कोंबडी उकडतोय ! "

आईने विचारले :

" खूप वेळापासून ? "

" आत्ताच तिला भांड्यात टाकलं, " बाबा म्हणाले.

आईने भांड्याचे झाकण उघडले.

" तिला मीठ लावलंत ? "

" नंतर ! " बाबा म्हणाले. " उकडून झाल्यानंतर ! "

आईने भांड्याचा वास घेतला.

" तिचं पोट साफ केलंत ? "

" नंतर ! " बाबा म्हणाले. " उकडून झाल्यानंतर ! "

आईने सुस्कारा टाकला आणि भांड्यातून कोंबडी बाहेर काढली. ती म्हणाली :

" देनीस, माझा एप्रन आणून दे लौकर ! पुन्हा सगळं पहिल्यापासून करायची पाळी आली ! कसले तुम्ही आचारी ! "

मी खोलीत पळत जाऊन आईचा एप्रन घेतला व टेबलावरून मी काढलेले चित्रही सोबत घेतले. आईला एप्रन देऊन मी माझ्या चित्राबद्दल तिला विचारले :

" मी काय चित्र काढलंय ते ओळख पाहू ? "

आईने चित्र पाहिले व ती म्हणाली :

" शिवणयंत्र ? होय ना ? "

शिलेदार

मुलांच्या वृंदगानाची तालीम संपल्यानंतर आमचे संगीत-शिक्षक बरीस सेर्गेयेविच म्हणाले:

"मुलांनो, सांगा बघू, आठ मार्चच्या महिला दिनाला तुमच्यापैकी कुणी कुणी आपल्या आईला काय काय भेटी दिल्या? देनीस, तू सांग!"

मी म्हणालो: "आठ मार्चला मी आईला सुया ठेवायची उशी भेट दिली. सुंदर अशी. बेडकीसारख्या आकाराची. तीन दिवस शिवत होतो. सगळ्या बोटांना टोचत होतं. मी तशा दोन उशा शिवल्या."

मीष्काने पुस्ती जोडली:

"आम्ही सर्वांनी दोन-दोन उशा शिवल्या. एक आईसाठी आणि दुसरी राईसा इवानोवना यांच्यासाठी."

"सगळ्यांनी का म्हणून?" बरीस सेर्गेयेविचनी विचारले. "सर्वांनी एकसारख्या उशा शिवायचं तुम्ही ठरवलं होतं?"

"नाही," वालेर्का म्हणाला, "आमच्या हस्तव्यवसायाच्या मंडळात सध्या आम्ही सुया ठेवायच्या उशा बनवायला शिकतोय. पहिल्यांदा आम्ही सैतान बनवायला शिकलो, आता सुयांच्या उशा."

"कुठल्या प्रकारचे सैतान?" बरीस सेर्गेयेविचनी आश्चर्याने विचारले.

मी म्हणालो:

"चिकणमातीचे! आठवीच्या वर्गात शिकणारे आमचे प्रमुख वालोद्या आणि तोल्या सहा महिने सैतान बनवायला आम्हाला शिकवत होते. दरवेळी वर्गात आले की म्हणायचे: 'बनवा सैतान!' तर आम्ही सैतान बनवत असू आणि ते दोघे बुद्धिबळ खेळत बसत."

"कमाल आहे!" बरीस सेर्गेयेविच म्हणाले. "उशा! ह्या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे! थांबा!" आणि ते एकदम मजेने मोठ्यांदा हसले. "पहिली 'ब' मध्ये किती मुलगे आहेत?"

"पंधरा," मीष्का म्हणाला. "आणि मुली पंचवीस."

त्यावर बरीस सेर्गेयेविच अगदी पोट धरधरून हसले.

मी म्हणालो:

"आपल्या देशात एकूण लोकसंख्येत पुरुषांपेक्षा बायकांचं प्रमाण जास्त आहे."

पण बरीस सेर्गेयेविचनी मला गप्प बसवले.

"मला त्याबद्दल नाही म्हणायचं फक्त बघायला मजा आली असती जेव्हा राईसा इवानोवनांना पंधरा सुयांच्या उशा भेट म्हणून मिळाल्या! ठीक आहे. ऐका: एक मे रोजी स्वतःच्या आईचं अभिनंदन करण्याचं तुमच्यापैकी कुणी कुणी ठरवलंय?"

आता हसण्याची पाळी आमच्यावर आली. मी म्हणालो:

"बरीस सेर्गेयेविच, तुम्ही बहुधा आमची थट्टा करताय. आता आणखी मे दिनाला आम्ही कुठून भेटी देणार?"

"तुमची चूक आहे. मे दिनाला तुम्ही आपल्या आईला भेट दिलीच पाहिजे. वर्षातून फक्त एकदाच आईला भेट देणं काही चांगलं नव्हे. पण जर प्रत्येक सणाला भेट दिलीत, तर ते शिलेदारी वागणं ठरेल. शिलेदार म्हणजे कोण ह्याची कुणाला माहिती आहे?"

मी म्हणालो:

"घोड्यावर बसणारा आणि पोलादी चिलखताचा पोषाख घालणारा तो शिलेदार."

बरीस सेर्गेयेविचनी मान डोलावली.

"होय, फार पूर्वी तसं होतं. जेव्हा तुम्ही मोठे व्हाल, तेव्हा शिलेदारांविषयी खूप पुस्तकं वाचाल. पण आत्ता जर कुणाला शिलेदार असं म्हटलं, तर त्याचा अर्थ तो माणूस उदात्त, शूर आणि दयाळू मनाचा आहे. मला वाटतं की, प्रत्येक बालवीरानं शिलेदार असलंच पाहिजे. इथं कोण कोण शिलेदार आहेत, त्यांनी हात वर करावेत!"

आम्ही सर्वांनी हात वर केले.

"माझी तशी खात्रीच होती," बरीस सेर्गेयेविच म्हणाले. "आता जा, शिलेदारांनो!"

आम्ही आपापल्या घरी गेलो. वाटेत मीष्का म्हणाला:

"ठीक आहे, मी आईसाठी टॉफी विकत घेईन. माझ्यापाशी पैसे आहेत."

मी घरी आलो तेव्हा घरात कुणीच नव्हते. मला निराशेने घेरले. कधी नव्हे ते मी शिलेदार बनायचे ठरवले आणि पैसे तर नाहीत! तेवढ्यात माझ्या जखमेवर मीठ चोळायला जणू हातात सुंदर टॉफीचा पुडका घेऊन मीष्का धावत आला. त्या पुडक्यावर लिहिले होते: "एक मे." मीष्का म्हणाला:

"पहा! बावीस कोपेकमध्ये आता मी शिलेदार बनलो! तू का असा बसून आहेस?"

"मीष्का, तू शिलेदार?" मी म्हटले.

"होय, शिलेदार!" मीष्का म्हणाला.

"तर मग मला उसने पैसे दे!"

मीष्का कष्टी झाला.

"मी सगळे पैसे खर्च केले."

"आता काय करायचं?"

"शोध." मीष्का म्हणाला, "वीस कोपेक म्हणजे छोटं नाणं आहे. कदाचित कुठंतरी पडलेलं असेल. चल, आपण शोधू."

आम्ही सगळी खोली धुंडाळली. दिवाणमागे, कपाटाखाली पाहिले; आईच्या सर्व सँडल झटकून पाहिल्या. तिच्या पावडरच्या डबीतसुद्धा बोटं खुपसून पाहिली. पण छे:!

अचानक मीष्काने बाटल्या ठेवण्याचे कपाट उघडले.

"थांब, हे काय आहे?"

"कुठं?" मी विचारले. "अरे, ही बाटली आहे. तुला दिसत नाही? इथं दारूच्या दोन बाटल्या आहेत. एका बाटलीत काळी आणि दुसरीत पिवळी दारू आहे. उद्या आमच्याकडं पाहुणे यायचेत, त्यांच्यासाठी ह्या बाटल्या आणल्यात."

मीष्का म्हणाला:

"अरेरे, तुमचे पाहुणे काल आले असते तर तुला आज पैसे मिळाले असते."

"ते कसं?"

"बाटल्यांचे," मीष्का म्हणाला. "रिकाम्या बाटल्यांचे नेहमी पैसे मिळतात. कोपऱ्यावर. रिकाम्या बाटल्या विकत घेणारं दुकान आहे तिथं!"

मी म्हणालो:

"मग आत्तापर्यंत गप्प का बसलास? आत्ता आपण ही कामगिरी पार पाडू. ती खिडकीतली मोठ्ठी रिकामी बरणी दे."

मीष्काने मला बरणी दिली आणि मी काळपटतांबड्या रंगाची दारूची बाटली उघडून बरणीत ती दारू ओतली.

"बरोबर," मीष्का म्हणाला, "बरणीत दारू ठेवली तर बिघडलं कुठं?"

"अर्थातच काही बिघडणार नाही," मी म्हणालो. "दुसरी बाटली कशात ओतू?"

"ह्याच बरणीत ओत," मीष्का म्हणाला. "सगळ्या दारू सारख्याच ना?"

"खरं आहे," मी म्हणालो. "जर एका बाटलीत दारू आणि दुसरीत रॉकेल असेल, तर गोष्ट वेगळी. पण दोन्ही दारूच–तेव्हा जास्त छान! धर ती बरणी!"

आणि दुसरी बाटलीही आम्ही बरणीत रिकामी केली.

मी म्हणालो:

"बरणी खिडकीत ठेव! तिथं. तिच्या तोंडावर बशी झाक. आता चल लौकर!"

आम्ही धावत निघालो. त्या दोन बाटल्यांचे आम्हाला २४ कोपेक मिळाले. मी आईसाठी टॉफीचा पुडा विकत घेतला. मला उलट दोन कोपेक परत मिळाले. मी मोठ्या आनंदात घरी आलो, कारण आता मी शिलेदार बनलो होतो. आई आणि बाबांचे घरात पाऊल पडताच मी म्हणालो:

"आई, आता मी शिलेदार. आम्हाला बरीस सेर्गेयेविचनी शिकवलं–शिलेदार कसं बनायचं ते!"

आई म्हणाली:

"असं? सांग बघू!"

मी सांगितले की, उद्या आईला मी भेट देऊन चकित करणार होतो.

"पण तुला पैसे कुठून मिळाले?" आईने विचारले.

"आई, मी रिकाम्या बाटल्या विकल्या. हे बघ, दोन कोपेक उरलेत."

त्यावर बाबा म्हणाले :

"शाबास! मला टेलीफोनसाठी ते दोन कोपेक दे!"

आम्ही जेवायला बसलो. मग बाबा खुर्चीवर मागे रेलून बसत हसत म्हणाले :

"फळांचं सरबत मिळालं तर किती छान!"

"आज मला सरबत बनवायला सवड मिळाली नाही," आई म्हणाली.

बाबा माझ्याकडे डोळे मिचकावत म्हणाले :

"मग ते काय? माझ्या केव्हाच लक्षात आलंय!"

ते खिडकीपाशी गेले, बरणीवरची बशी त्यांनी बाजूला काढली व सरळ बरणी तोंडाला लावली. बापरे! बाबांना जोराचा ठसका लागला. भयानक वेडावाकडा चेहरा करत ते विचित्र आवाजात ओरडले :

"हे काय आहे? कसलं विष भरलंय ह्या बरणीत?"

मी म्हणालो :

"बाबा, भिऊ नका! ते विष नाही. तुमच्या दोन्ही दारू आहेत!"

बाबांचा चेहरा एकदम पांढराफटक पडला.

"कुठल्या दोन दारू?" मघापेक्षा जास्त मोठ्या आवाजात ते ओरडले.

"काळी आणि पिवळी," मी म्हणालो. "कपाटात होत्या दोन बाटल्या. मुख्य म्हणजे तुम्ही घाबरू नका."

बाबांनी धावत जाऊन खाडदिशी बाटल्यांच्या कपाटाचे दार उघडले. मग डोळ्यांची उघड-झाप करत ते स्वतःची छाती चोळू लागले. जणू मी काहीतरी विचित्र मुलगा होतो किंवा माझ्या अंगावर ठिपके अथवा पट्टे होते, अशा आश्चर्यचकित नजरेने माझ्याकडे ते पहात होते. मी म्हणालो :

"बाबा, तुम्हाला एवढं आश्चर्य काय वाटतंय? तुमच्या दोन्ही दारूच्या बाटल्या मी जर बरणीत ओतल्या नसत्या, तर रिकाम्या बाटल्या मला कुठून मिळणार होत्या? जरा विचार करा!"

आई एकदम उद्गारली : "अग बाई!"

आणि ती दिवाणावर आडवी झाली. ती एवढ्या जोरजोराने हसू लागली की, तिची प्रकृती बिघडेल अशी मला भीती वाटू लागली. मला काही समजेना. बाबा ओरडले :

"हसताय? ठीक आहे, हसा! तुमचा हा शिलेदार मला वेडा करणार! त्यापेक्षा तो कायमची शिलेदारी विसरेल अशी त्याला अद्दल घडवतो!"

बाबा पट्टा शोधत होते असा त्यांचा एकूण अवतार मी पाहिला.

"कुठं आहे तो?" बाबा गरजले. "आणा त्या आयव्हॅनोला माझ्यासमोर! कुठं नाहीसा झालाय तो?"

मी एव्हाना पुस्तकांच्या कपाटामागे दडलो होतो. कुठलाही प्रसंग ओढवेल ह्या भीतीने मी

केव्हाच कपाटामागे दडी मारली होती. कारण बाबा भलतेच चिडले होते. ते ओरडले:

"खास 'मूस्कात' मदिरा आणि बीयर यांना एका बरणीत ओतून त्यांचं मिश्रण बनवलेलं कधी ऐकलंय?"

आईची हसून मुरकुंडी वळली होती. तिच्या तोंडून नीट शब्द उमटत नव्हते.

"पण... त्याचा... हेतू चांगला... तो... शिलेदार... आई ग... हसून हसून... मी मरणार!.."

आणि ती परत हसू लागली.

बाबांनी आणखी थोडा वेळ खोलीत येरझाऱ्या मारल्या व मग आईपाशी जाऊन ते म्हणाले:

"किती छान हसतेस तू!"

ते खाली वाकले आणि त्यांनी आईची पापी घेतली.

तेव्हा मी शांतपणे कपाटामागून बाहेर आलो.

कुत्रा-चोर

अशी एक हकीकत घडली. वालोद्याकाकाच्या दाचावर जेव्हा मी रहायला गेलो आहे, तेव्हा आमच्यापासून जवळच बरीस क्लीमेन्त्येविच रहात होते उंच, हडकुळे, हातात छडी घेऊन फिरणारे आणि नेहमी हसतमुख.

त्यांचा चापका नांवाचा एक कुत्रा होता. काळया रंगाचा, छोटया शेपटीचा तो लहानसा कुत्रा फार छान होता. माझी त्याच्याशी छान गट्टी जमली होती.

एके दिवशी बरीस क्लीमेन्त्येविचना पोहायला जायची इच्छा झाली व चापकाला त्यांना बरोबर न्यायचे नव्हते. कारण एकदा ते चापकाला घेऊन पोहायला गेले होते तेव्हा खूप गोंधळ झाला होता. चापका पाण्यात उतरला त्यावेळी एक घाबरट बाई रबरी टयूब धरून पोहत होती. चापका नेमका तिच्यापाशी गेला, तेव्हा ती त्याच्यावर खेकसली:

"चालता हो! कशाला मेल्या कुत्र्यांना पाण्यात सोडतात!" ती चापकावर पाण्याचे सपकारे मारू लागली.

"जा! चालता हो!"

चापकाला हे आवडले नाही त्याने त्या बाईला चावायचा प्रयत्न केला. पण बाईऐवजी त्याने रबरी टयूब चावली. त्याने फक्त एकच चावा मारला, पण टयूब फुटायला तो पुरेसा ठरला. फुस्स आवाज करत टयूबमधील हवा बाहेर पडली आणि आता आपण बुडणार अशा कल्पनेने बाई किंचाळली:

"धावा! वाचवा!"

किनाऱ्यावर एकच घबराट माजली. बरीस क्लीमेन्त्येविच त्या बाईला वाचवायला धावले.

पण बाई जेथे ओरडत होती, तेथे नदीचे पाणी त्यांच्या अवघ्या गुडघ्यांएवढे खोल होते व त्या बाईच्या खांद्यांपर्यंत. त्यांनी त्या बाईला किनाऱ्यावर आणले आणि चापकाला छडीने खोटेच धमकावले. तेव्हापासून त्यांनी चापकाला नदीवर पोहायला नेणे बंद केले होते

तर म्हणून त्यांनी मला विनंती केली की, चापकाने त्यांच्यासाठी धावू नये ह्यासाठी मी चापकाला अंगणात फिरवावे. मी आणि चापका अंगणात उडचा मारू लागलो, खेळू लागलो. बरीम क्लीमेन्त्येविच शांतपणे निघून गेले. मी आणि चापका कंटाळा येईपर्यंत हुंदडलो. ह्या दरम्यान कुंपणाजवळून वान्का दीखोव गळाची छडी घेऊन जाताना मला दिसला. त्याने मला विचारले :

"देनीस! मासे धरायला येतोस?"

मी म्हणालो :

"शक्य नाही! चापकाबरोबर मला राहिलं पाहिजे!"

तो म्हणाला :

"त्याला घरात बंद कर. तुझं जाळं घे आणि मला गाठ."

तो पुढे निघून गेला. मी चापकाचा गळपट्टा धरला आणि हळूच त्याला गवतावरून फरफटत नेले. तो पाय वर करून उताणा पडला होता. मी घराचे दार उघडून त्याला खोलीत नेले, नंतर दार घट्ट बंद केले व स्वतःचे जाळे घ्यायला धावलो. मी रस्त्यावर येईपर्यंत वान्का दिसेनासा झाला होता. तो वळणाला पार करून गेला होता. त्याला गाठायला मी धूम ठोकली, पण छोट्या दुकानापर्यंत धावलो आणि पाहतो तर रस्त्याच्या ऐन मध्यभागी माझा चापका बसलेला! जणू काही घडलेच नाही अशा थाटात जीभ बाहेर काढून तो माझ्याकडे पहात होता... कमाल झाली! म्हणजे मी दार नीट बंद केले नव्हते, किंवा चापकाने चोरवाटेने पळ काढला होता व आता माझी वाट पहात रस्त्यात बसला होता. भलताच चतुर! मला तर मासे धरायला जायची घाई झाली होती. एव्हाना वान्काने बरेच मासे धरले असणार आणि मी इथे चापकाबरोबर अडकून पडलो होतो. खरे तर मी चापकाला माझ्याबरोबर घेऊन गेलो असतो, पण तेवढ्यात जर बरीस क्लीमेन्त्येविच परतले आणि चापका त्यांना घरात आढळला नाही, तर ते काळजीत पडले असते, चापकाला शोधत बसले असते आणि नंतर मला खूप रागे भरले असते... तेव्हा चापकाला नेणे शक्य नव्हते! त्याला परत घरी नेऊन कोंडणे आवश्यक होते. त्याचा गळपट्टा पकडून मी त्याला घरापर्यंत नेऊ लागलो. पण ह्यावेळी चापका चारी पायांच्या नख्या जमिनीत रोवून बसला. त्यामुळे त्याला एखाद्या बेडकाप्रमाणे पोटावर खेचत न्यावे लागले. मोठ्या कष्टाने मी त्याला दारापर्यंत ओढत आणले. दाराची नुसती फट उघडून मी त्याला आत लोटले व थाडदिशी दार परत घट्ट बंद केले. तो तेथे केकाटला आणि भुंकला. पण त्याला शांत करण्याच्या फंदात मी पडलो नाही. मी घराभोवती फेरी मारून सर्व खिडक्या बंद केल्या, फाटकसुद्धा बंद केले. चापकाला घरापर्यंत खेचून आणण्यापायी मी चांगलाच दमलो होतो, तरीसुद्धा परत धावत नदीकडे निघालो. मी खूप वेगात पळत होतो.

पण विजेच्या पेटीपर्यंत पोहोचलो, तेवढ्यात पेटीमागून... परत चापका! मी आश्चर्याने थक्क झालो. माझ्या स्वतःच्या डोळयांवर माझा विश्वास बसेना. मला स्वप्न पडतेय असा भास झाला. पण चापका मला चावायच्या पवित्र्यात होता. मी त्याला घरी डांबून ठेवले होते म्हणून कदाचित! माझ्यावर भुंकत होता! गुरगुरत होता! काय कुत्रा तरी! आता मी त्याला चांगलाच हिसका दाखवायचे ठरवले. मी त्याचा गळपट्टा पकडू लागलो, पण तो मला धरू देईना. तो जोरजोरात भुंकत होता, मागे सरत होता, माझ्या पकडीतून सुटू पहात होता. तेव्हा मी त्याला गोडीगुलाबी दाखवू लागलो:

"चापका, चापका, यू-यू-यू, तू कित्ती छान! ये!"

पण तरीही तो नखरे दाखवत राहिला आणि स्वतःला पकडू देईना. माझे जाळे मला अडथळा आणत होते. पेटीभोवती आम्ही बऱ्याच फेऱ्या मारल्या. अचानक मला आठवण झाली की, "जंगलवाटा" नांवाचा एक चित्रपट मी नुकताच टेलीव्हिजनवर पाहिला होता. चीनमध्ये जाळयांच्या साह्याने माकडे कशी पकडतात हे त्या चित्रपटात दाखवले होते. मी तात्काळ माझे जाळे ताणले आणि एका झटक्यात चापकाला माकडाप्रमाणे जाळयात पकडले. चापका चिडून जोरजोरात भुंकत होता, पण मी पटकन त्याचे मुटकुळे पाठीवर मारले आणि अस्सल शिकाऱ्याच्या थाटात सबंध वस्ती ओलांडून घरापाशी परतलो. एखाद्या पोत्यात घातल्याप्रमाणे चापकाचे गाठोडे माझ्या खांद्यावर लटकत होते आणि तो सारखा भुंकत होता. पण मी त्याच्याकडे लक्ष न देता खिडकीतून त्याला घरात टाकले. मग खिडकी बंद करून तिला एका काठीचा टेकू दिला. चापकाने वेगवेगळया आवाजांमध्ये घरात भुंकायला सुरुवात केली. मी तिसऱ्यांदा नदीच्या दिशेने धावलो. ही हकीकत मी आता जरी पटकन सांगून संपवली असली, तरी प्रत्यक्षात ह्या भानगडीत खूप वेळ गेला होता. ऐन नदीपाशी माझी वान्काशी गाठ पडली. तो अत्यंत आनंदात चालत येत होता. त्याच्या हातात एक लांब काडी होती व त्या काडीवर चमच्याच्या आकाराएवढे दोन मासे टोचलेले होते. मी म्हणालो:

"ओहो! तुला मस्त शिकार गावलेली दिसतेय!"

वान्का म्हणाला:

"हो! अगदी गळ ओढायला फुरसत मिळत नव्हती! चल, माझ्या आईपाशी हे मासे देऊ आणि जेवणानंतर परत जाऊ मासे धरायला! कदाचित तुलासुद्धा सापडतील!"

असे बोलत बोलत आम्ही नकळतपणे बरीस क्लीमेन्त्येविचच्या घरापर्यंत पोहोचलो. त्यांच्या घरापाशी लोकांचा एक छोटा जमाव उभा होता त्या जमावामध्ये पट्ट्यापट्ट्यांची विजार घातलेला एक ढेरपोटचा माणूस होता आणि विजार घातलेली, उघडया पाठीची एक बाई होती. शिवाय एक चष्मेवाला मुलगा होता व आणखी काही लोक होते त्या सर्वांचे हातवारे चालले होते व जोरजोराने ते काहीतरी ओरडत होते. मग त्या चष्मेवाल्या मुलाने मला पाहिले आणि तो एकदम ओरडला:

"तो बघा, तो बघा, हाच तो दस्तुरखुद्द!"

त्यावर सर्वांचा मोहरा आमच्याकडे वळला आणि ढेरपोटचा गरजला:

"त्यांच्यापैकी कोणता? मासेवाला किंवा छोटा?"

चष्मेवाला पोरगा ओरडला:

"छोटा! पकडा त्याला! हाच तो!"

आणि सगळे माझ्या दिशेने धावले. मी थोडा घाबरलो आणि वेगाने त्यांच्यापासून दूर पळालो. मी हातातले जाळे फेकून दिले आणि कुंपणावर चढलो. हे कुंपण उंच होते. खालून मला धरणे कुणालाही जमले नसते. उघड्या पाठीची बाई कुंपणापाशी धावत आली आणि विचित्र आवाजात ओरडू लागली:

"आत्ताच्या आत्ता बॉबीला दे! कारट्या, कुठं लपवलंस तू त्याला?"

ढेरपोट्या माणूस कुंपणावर मुठी आपटत ओरडला:

"माझी ल्यूसी कुठं आहे? कुठं घेऊन गेलास तू तिला? बोल!"

मी म्हणालो:

"कुंपणापासून दूर व्हा! मला तुमचा बॉबी माहीत नाही आणि ल्यूसी माहीत नाही! माझी त्यांच्याशी ओळखसुद्धा नाही. वान्का, तू समजावून सांग त्यांना!"

वान्का ओरडला:

"उगीच काय त्या लहान मुलावर तुटून पडलात? आत्ता मी माझ्या आईला बोलावून आणतो! मग समजेल तुम्हाला तिचा इंगा!"

मी ओरडलो:

"तू लौकर पळ वान्का, नाहीतर ही माणसं मला झोडपून काढतील!"

वान्का ओरडला:

"धीर धर! कुंपणावरून खाली उतरू नको!"

तो धावत गेला.

ढेरपोट्या म्हणाला:

"तो दुसरा पोरगा ह्याचा साथीदार दिसतोय! आख्खी टोळी दिसतेय त्यांची! अरे ए कुंपणावरच्या, बोल ताबडतोब, ल्यूसी कुठं आहे?"

मी म्हणालो:

"तुमच्या मुलीचा तुम्हीच शोध लावा!"

"अरे कारट्या, वर आणखी चेष्टा करतोस? उतर खाली आणि चल पोलीस ठाण्यावर!"

"मी मुळीच खाली उतरणार नाही!"

तेव्हा चष्मेवाला मुलगा म्हणाला:

"मी आत्ता त्याला धरतो!"

आणि तो कुंपणावर चढायची धडपड करू लागला. पण त्याला वर चढणे जमेना. कारण कुठे आधार पकडायचा हे त्याला ठाऊक नव्हते. याउलट मी ह्या कुंपणावर यापूर्वी शंभर वेळा

चढलो होतो. शिवाय ह्या मुलावर मी लाथा झाडत होतो. देवाची कृपा – तो सारखा खाली घसरत होता.

"थांब, पावेल," ढेरपोट्या त्या मुलाला म्हणाला. "मी तुला चढवतो!"

पावेल त्या ढेरपोट्याच्या पाठीवर उभा राहिला. मी परत घाबरलो, कारण हा पावेल दणकट मोठा मुलगा होता, बहुधा तिसरीत किंवा चौथीत शिकत असावा. माझी अखेर आली असे मला वाटले. तेवढ्यात मला दिसले की, बरीस क्लीमेन्त्येविच धावत येत होते व गल्ली-मधून वान्काची आई व वान्कासुद्धा धावत येत होते. ते ओरडत होते:

"थांबा! काय भानगड आहे?"

ढेरपोट्या किंचाळला:

"काही भानगड नाही! फक्त हा मुलगा कुत्रे चोरतोय! त्यानं माझी ल्यूसी कुत्री चोर-लीय!"

त्यावर ती विजारवाली बाई म्हणाली:

"आणि माझा बॉबी चोरला!"

वान्काची आई म्हणाली:

"माझा ह्यावर मुळीच विश्वास नाही! अगदी अजिबात नाही!"

चष्मेवाला मुलगा मधेच म्हणाला:

"मी स्वतः पाहिलंय! त्यानं आमच्या कुत्र्याला जाळ्यात गुंडाळून खांद्यावर टाकून नेलं! मी पोटमाळ्यावर बसलो होतो तेव्हा पाहिलं!!"

मी म्हणालो:

"खोटं बोलायला लाज नाही वाटत? मी चापकाला नेलं! चापका घरामधून पळाला होता!"

बरीस क्लीमेन्त्येविच म्हणाले:

"हा फार प्रामाणिक मुलगा आहे. अचानक कुत्री चोरण्याचं त्याला काय कारण? घरात चला आणि आपण ह्या प्रकरणाचा छडा लावू! देनीस, चल आमच्याबरोबर!"

ते कुंपणापाशी आले आणि मी थेट त्यांच्या खांद्यांवर उतरलो, कारण याआधी मी सांगितले त्याप्रमाणे ते खूप उंच होते.

मग सगळे अंगणाकडे निघाले. ढेरपोट्या नाक फुरफुरत होता, विजारवाली बाई बोटे मोडत होती, चष्मेवाला पोरगा त्यांच्या पाठोपाठ चालत होता आणि मी बरीस क्लीमेन्त्ये-विचच्या खांद्यांवर बसून जात होतो. आम्ही देवडी चढून गेलो, बरीस क्लीमेन्त्येविचनी दार उघडले आणि अचानक घरातून तीन कुत्री धावत बाहेर आली! तीन चापका! अगदी एकजात एकसारखे! मला वाटले की, माझे डोळे बिघडले होते!

ढेरपोट्या ओरडला:

"ल्यूसीच्का!"

एक चापका पुढे आला आणि त्याने थेट त्या माणसाच्या ढेरीवर उडी मारली!

विजारवाली बाई आणि पावेल ओरडले :

"बॉबिक! बॉबका!"

दुसऱ्या चापकाचे ते दोघे दोन तुकडे करणार असे वाटू लागले कारण, ती बाई कुत्र्याचे पुढचे पाय ओढत होती, तर मुलगा मागचे पाय खेचत होता. हा सारा वेळ तिसरा चापका आमच्या शेजारी उभा राहून शेपूट हलवत होता.

बरीस क्लीमेन्त्येविच म्हणाले :

"तू असला आहेस होय? मला तसं कधी वाटलं नव्हतं! तू दुसऱ्यांची कुत्री घरात कशाला कोंडून ठेवलीस?"

मी म्हणालो :

"मला वाटलं, ती चापका आहेत! बघा, किती सारखी दिसतात! अगदी तिळी वाटतात!"

मग मी सर्व हकीकत सांगितली. त्यावर सगळे खो खो हसू लागले. हसणे विरल्यानंतर बरीस क्लीमेन्त्येविच म्हणाले :

"तू त्यांना ओळखलं नाहीस ह्यात मुळीच आश्चर्य नाही. स्कॉच टेरीयर कुत्रे खूप एकसारखे दिसतात. त्यांच्यातला फरक ओळखणं फार अवघड असतं. आजसुद्धा खरं सांगायचं तर आपण माणसांनी स्वतःच्या कुत्र्यांना ओळखलं नाही, तर कुत्र्यांनी आपल्याला ओळखलं. तेव्हा तुझा मुळीच दोष नाही. तरीसुद्धा यापुढं मी तुला कुत्रा-चोर म्हणून हाक मारणार!"

...आणि खरेच, मला ते ह्याच नांवाने हाक मारतात...

वरून खालपर्यंत, मागे-पुढे!

मी शाळेला अजून जात नव्हतो तेव्हाची गोष्ट. उन्हाळ्याचे दिवस होते. आमच्या घराच्या आवारात दुरुस्तीचे काम चालू होते. सगळीकडे विटा आणि फळ्यांचे ढीग पडले होते. आवाराच्या मध्यभागी वाळूचा प्रचंड डोंगर उभा होता. त्यावर आम्ही "फॅसिस्टांचा मॉस्कोजवळ धुव्वा" हा खेळ खेळत असू अथवा बोगदे बनवत असू, अगर दुसरे काही खेळ खेळत असू.

आम्ही खूप मजेत होतो. दुरुस्ती करणाऱ्या कामगारांबरोबर आमची मैत्री जमली होती आणि घराच्या दुरुस्तीमध्ये आम्ही मदतसुद्धा करत होतो. प्लंबर ग्रीशाकाकाला एकदा मी उकळलेल्या पाण्याची किटली नेऊन दिली होती आणि दुसऱ्या वेळी आल्योन्काने वीजदुरुस्ती करणाऱ्यांना आमची चोरवाट दाखवली होती. आम्ही आणखी खूप खूप मदत केली, पण आत्ता मला सगळे आठवत नाही.

नंतर नकळत दुरुस्तीचे काम संपत आले, कामगार एकामागून एक निघून जाऊ लागले. ग्रीशाकाकाने हस्तांदोलन करून आमचा निरोप घेतला, मला एक मोठ्ठा बोल्ट बक्षिस दिला व तोसुद्धा निघून गेला.

आणि त्याच्याऐवजी आवारात तीन मुली आल्या. त्यांचा पोषाख फार सुंदर होता. पुरुषां-प्रमाणे त्यांनी लांब विजारी घातल्या होत्या. त्या विजारींवर वेगवेगळया रंगांचे डाग पडलेले होते आणि त्या अगदी कडक होत्या. जेव्हा त्या मुली चालायच्या तेव्हा छपरावर पत्रे वाजावेत तसा त्यांच्या विजारींचा कडकड आवाज व्हायचा. त्या मुली डोक्यावर वर्तमानपत्राच्या काग-दाच्या टोप्या घालायच्या. त्या मुली रंगारी होत्या आणि त्यांना 'पथक' म्हणायचे. त्या खूप आनंदी आणि चपळ होत्या. सारख्या हसायच्या आणि 'लान्दीशी, लान्दीशी' नांवाचे फुलां-बद्दलचे गाणे गायच्या. पण मला हे गाणे आवडत नाही. आल्योन्का आणि मीष्कालासुद्धा हे गाणे आवडत नाही. मात्र त्या मुली काम कशा करतात ते बघायला आम्हाला आवडायचे. अगदी सफाईने आणि अचूकपणे त्या काम करायच्या. त्या पथकातल्या सगळयाजणींची नांवे आम्हाला ठाऊक झाली होती.

सान्या, राया आणि नेल्ली.

एकदा आम्ही त्यांच्यापाशी गेलो तेव्हा सान्यामावशी म्हणाली:

"पोरांनो, तुमच्यापैकी कुणीतरी पळत जा आणि किती वाजले ते येऊन सांगा."

मी धावलो, वेळ बघितली आणि येऊन सांगितले:

"बारा वाजायला पाच मिनिटं कमी, सान्यामावशी..."

ती म्हणाली:

"पुरे करा, पोरींनो! मी कँटीनकडे चालले!" आणि ती आवारातून बाहेर गेली. तिच्या पाठोपाठ रायामावशी आणि नेल्लीमावशी जेवायला गेल्या.

रंगाचे पिंप त्यांनी तेथेच ठेवले.

आणि रबरी नळीसुद्धा. आम्ही ताबडतोब जवळ गेलो आणि त्यांनी नुकताच रंगवलेला घराचा भाग पाहू लागलो. छान एकसारखा रंगाचा थर बसला होता — तपकिरी आणि त्यात थोडी लाल छटा. मीष्का खूप वेळ बघत राहिला आणि मग म्हणाला:

"जर मी हा पंप चालवला, तर रंग उडेल?"

आल्योन्का म्हणाली:

"पैज लावते, रंग उडणार नाही!"

तेव्हा मी म्हणालो:

"तर मी पैज लावतो — रंग उडेल!"

मीष्का म्हणाला:

"पैजा लावू नका. मी आत्ता प्रयत्न करून बघतो. देनीस, तू नळी धर आणि मी पंप चालवतो."

तो पंप हापसू लागला. दोन-तीनदा हापसल्यावर एकदम रबरी नळीमधून रंगाचा फवारा उडाला! नळीमधून सापासारखा फुस्स आवाज निघाला, कारण तिच्या दुसऱ्या टोकापाशी झारीच्या तोटीप्रमाणे बारीक भोकांचे बूच बसवलेले होते. पण भोके अगदी लहान होती आणि केस कापायच्या दुकानात सुगंधी पाण्याचा फवारा मारतात तसा रंगाचा फवारा उडत होता. अगदी अस्पष्ट दिसायचा.

मीष्का आनंदाने ओरडला:

"लौकर रंगव! लौकर काहीतरी रंगव!"

मी पटकन रबरी नळी उचलली आणि कोऱ्या भिंतीच्या दिशेने धरली. रंगाचा फवारा उडू लागला आणि भिंतीवर कोळयाच्या आकाराचा फिकट तपकिरी डाग उमटला.

"हुर्रा!" आल्योन्का ओरडली. "उडाला! फवारा उडाला!" आणि तिने रंगाच्या फवाऱ्यासमोर स्वतःचा पाय धरला.

मी ताबडतोब तिचा पाय गुडघ्यापासून बोटांपर्यंत रंगवून काढला. अगदी आमच्या नजरे-समोर तिच्या पायावरचे निळे डाग, ओरखडे नाहीसे झाले. उलट आल्योन्काचा पाय गुळगुळीत आणि नव्या लाकडी मुद्गलाप्रमाणे चकचकीत तपकिरी दिसू लागला.

मीष्का ओरडला:

"मस्त जमतंय! दुसरा पाय धर, लौकर!"

आल्योन्काने घाईघाईने दुसरा पाय पुढे केला आणि मी क्षणात तिला वरून खालपर्यंत दोन वेळा रंगवून काढले.

तेव्हा मीष्का म्हणाला:

"मंडळी, किती सुंदर! अस्सल रेड इंडियनप्रमाणं पाय बनलेत! तिला लौकर रंगवून काढ!"

मी विचारले:

"सबंध? सबंध रंगवू? डोक्यापासून पावलांपर्यंत?"

आल्योन्का ह्या कल्पनेवर एकदम बेहद्द खूष झाली

"रंगवा, मंडळी! डोक्यापासून पावलांपर्यंत रंगवून काढा! मी अस्सल रेड इंडियन मुलगी होईन!"

तेव्हा मीष्का अंगातील सगळा जोर लावून पंप हापसू लागला आणि मी आल्योन्कावर रंगाचा फवारा मारू लागलो. मी अत्यंत सुरेखपणे तिला रंगवून काढले: पाठ, पाय, हात, खांदे, पोट, चड्डी; ती सबंध तपकिरी दिसू लागली. फक्त तिचे केस सोनेरी राहिले.

मी विचारले:

"मीष्का, तुला काय वाटतं, केस रंगवायचे?"

मीष्का उत्तरला:

"अर्थातच! रंगव लौकर! पटापट आटप!"

आल्योन्का घाई करत म्हणाली :

"लौकर, लौकर, केस रंगव ! आणि कानसुद्धा !"

मी भराभर तिला रंगवून काढले आणि म्हणालो :

"आल्योन्का, आता उन्हात उभी रहा आणि रंग वाळव ! आता आणखी काय रंगवावं बरं ?"

मीष्का म्हणाला :

"ते बघ, आमचे कपडे वाळताहेत ? लौकर रंगवून टाक !"

हे काम मी भर्रदिशी उरकले ! दोन टॉवेल आणि मीष्काचा सदरा अवघ्या एका मिनिटा-च्या आत मी रंगवून सुंदर बनवले !

मीष्का झपाटल्याप्रमाणे पंप हापसत होता. आणि सारखा ओरडत होता :

"रंगव ! लौकर ! खालच्या मजल्यावरचं ते नवीन दार रंगव ! लौकर !"

आणि मी दाराकडे मोर्चा वळवला. वरून खालपर्यंत ! खालून वरपर्यंत ! वरून खालपर्यंत, मागे-पुढे !

तेवढ्यात दार अचानक उघडले गेले आणि त्यामधून आमच्या घराचे मॅनेजर अलेक्सेय आकीमीच पांढऱ्या सुटात बाहेर आले.

ते अक्षरश: स्तंभित झाले. आणि मीसुद्धा. आम्ही दोघेही मंतरल्याप्रमाणे बनलो होतो. मुख्य म्हणजे मी त्यांच्या अंगावर फवारा उडवत होतो आणि भीतीपायी रबरी नळी दुसरीकडे फिरवणे अशक्य ठरले होते. नुसता वरून खाली, खालून वरती फवारा मारत होतो. त्यांचे डोळे विस्फारले होते व पाऊलभर उजवीकडे अथवा डावीकडे सरकण्याचे भान त्यांना उरले नव्हते.

मीष्का मात्र स्वत:च्याच नादात पंप हापसत ओरडत होता :

"रंगव ! लौकर रंगव !"

आणि कोपऱ्यावर आल्योन्का नाचत होती :

"मी रेड इंडियन ! मी रेड इंडियन !"

बापरे !

...आमच्यावर तेव्हा चांगलेच शेकले. मीष्का दोन आठवडे टॉवेल आणि सदरा धूत होता. आणि आल्योन्काला टर्पेन्टाईन फासून सात वेळा आंघोळ घालण्यात आली...

अलेक्सेय आकीमीचना नवा सूट विकत घेऊन देण्यात आला. आई मला अंगणात सोडाय-लाच तयार नव्हती. पण तरीही मी अंगणात गेलोच. तेव्हा मान्या, राया आणि नेल्ली अशा तिन्ही मावशा म्हणाल्या :

"देनीस, लौकर मोठा हो. आम्ही तुला आमच्या पथकात घेऊ. रंगारी छान होशील !"

तेव्हापासून मी लौकर मोठे व्हायचा प्रयत्न करतोय

मुख्य नद्या

जरी मला लौकरच नववे वर्ष लागणार असले, तरी केवळ कालच मला उमजले की, कोणात्याही परिस्थितीत गृहपाठ केलाच पाहिजे. आवडो वा नावडो, इच्छा असो वा नसो, पण गृहपाठ केलाच पाहिजे. हा कायदा आहे. तो मोडला तर भलती भलती संकटे कोसळतात. उदाहरणार्थ, काल मला गृहपाठ करणे जमले नाही. नेक्रासोवची एक कविता पाठ करायची आणि अमेरिकेतील मुख्य नद्यांची नांवे पाठ करायची, असा काल आम्हाला गृहपाठ दिला होता. पण मी गृहपाठ करण्याऐवजी अंगणात पतंग उडवायला गेलो. अंतराळात पतंग पाठवण्याची माझी इच्छा होती, पण त्याची शेपूट फारच हलकी असल्यामुळे तो भोवऱ्यासारखा गरगर गिरक्या घेत राहिला. हे झाले एक कारण. दुसरे कारण, माझ्यापाशी दोरा अपुरा होता. मी सबंध घर धुंडाळून होता नव्हता तेवढा सगळा दोरा एकत्र केला. आईच्या शिवणयंत्रावरचा दोरासुद्धा घेतला. पण तरीही दोरा कमी पडला. पतंग जेमतेम पोटमाळ्याच्या खिडकीपर्यंत उडाला. अंतराळ खूप दूर राहिले.

तर त्या पतंगाला अंतराळात धाडण्याच्या नादात जगातल्या इतर सर्व गोष्टींचा मला विसर पडला. त्या खेळात मी एवढा गुंगलो की, गृहपाठाचा नुसता विचार करणेसुद्धा मी सोडून दिले. गृहपाठ डोक्यातून अजिबात निघून गेला. पण पुढे असे आढळून आले की, स्वतःची कामे मुळीच विसरून चालत नाहीत, कारण अशा विसरण्यापायी प्रचंड अनर्थ ओढवतात.

सकाळी मी थोडा जास्त वेळ झोपलो आणि जेव्हा उठलो, तेव्हा वेळ फारच थोडा उरला होता... बंबवाले किती पटकन पोषाख करतात ह्याबद्दल मी वाचले होते – त्यांची एकही हालचाल जादा नसते. मला ती कल्पना खूप आवडली होती व पटकन पोषाख करण्याचा मी निम्म्या उन्हाळाभर सराव केला होता. आज सकाळी उठल्यानंतर जेव्हा मी घड्याळात पाहिले, तेव्हा ताबडतोब मला समजले की, बंबवाल्याप्रमाणे आज भराभर कपडे घातले पाहिजेत. एक मिनिट आणि अठ्ठेचाळीस सेकंदात मी अंगात कपडे चढवले. माझ्या बुटांच्या लेस मी धावता धावता बांधल्या. एकूण शाळेत मी वेळेवर पोहोचलो आणि वर्गातसुद्धा राईसा इवानोवनांच्याआधी एक सेकंद दाखल झालो. म्हणजे त्या कॉरीडॉरमधून सावकाशपणे चालत जात होत्या, तेव्हा ओव्हरकोटच्या स्टँडपासून वर्गापर्यंत मी धूम ठोकली (स्टँडपाशी कुणीही मुले एव्हाना नव्हती). जेव्हा मी लांबून राईसा इवानोवनांना पाहिले, तेव्हा अंगातील सगळी शक्ती एकवटून मी धूम ठोकली आणि वर्गापासून अवघ्या पाच पावलांवर राईसा इवानोवना यांना गाठून मी त्यांच्याआधी वर्गात घुसलो. एकूण त्यांच्याआधी दीड सेकंद मी शर्यत जिंकली होती आणि त्या जेव्हा वर्गात आल्या, तेव्हा माझी पुस्तके एव्हाना डेस्कवर होती व, जणू काही विशेष घडलेच नाही अशा थाटात मी मीष्काशेजारी बसलो होतो. राईसा इवानोवना वर्गात येताच आम्ही सर्वांनी उभे राहून त्यांना "नमस्ते" म्हटले. मी सर्वांत मोठ्यांदा "नमस्ते" म्हणालो –

मी किती नम्र आहे हे त्यांच्या ध्यानात यावे अशा हेतूने . पण त्यांनी ह्या गोष्टीकडे मुळीच लक्ष दिले नाही . उलट चालता चालता त्या म्हणाल्या :

"देनीम , फळ्यापाशी ये !"

माझा नूर एकदम उतरला, कारण गृहपाठ करण्यास मी विसरलो होतो ह्याची मला आठवण झाली . माझ्या लाडक्या डेस्कपासून दूर होण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती . माझ्या डेस्कला जणू मी चिकटलो होतो . पण राईसा इवानोवना मला घाई करू लागल्या :

"देनीम ! काय झालंय तुला ? मी तुला हाक मारलेली ऐकलीस ना ?"

मी फळ्यापाशी गेलो . राईसा इवानोवना म्हणाल्या : "कविता !"

म्हणजे गृहपाठाला सांगितलेली कविता मी म्हणून दाखवायची होती . पण मला ती कविता ठाऊक नव्हती . नेमका गृहपाठ काय होता , हेसुद्धा मला नीटसे माहीत नव्हते . तेव्हा मी क्षणात विचार केला की , कदाचित राईसा इवानोवनासुद्धा नेमका गृहपाठ कोणता ते विसरल्या असतील आणि मी कोणती कविता म्हणतोय हे त्यांच्या ध्यानात येणार नाही . मी झोकात कविता म्हणू लागलो :

हिवाळा ! .. शेतकरी आनंदात ,
बर्फातून वाट कापत चाललाय ;
त्याचा घोडा , बर्फाला हुंगत ,
मजेने फुरफुरत गाडी ओढतोय ...

"ही पूष्कीनची कविता आहे ," राईसा इवानोवना म्हणाल्या .

"होय ," मी म्हणालो , "ही पूष्कीनची कविता . पूष्कीन अलेक्सान्द्र सेर्गेयेविच ."

"मी गृहपाठाला कोणती कविता दिली होती ?"

"हो !"

"काय "हो" ? मी गृहपाठ काय दिला होता – तुला विचारतेय ? देनीस !"

"काय ?"

"काय "काय"? तुला विचारतेय मी – काय गृहपाठ दिला होता ?"

तेवढ्यात मीष्का चेहरा भाबडा करून म्हणाला :

"तुम्ही नेक्रासोवची कविता पाठ करायला सांगितली होती हे काय त्याला माहीत नाही ? त्याला प्रश्न समजला नाही , राईसा इवानोवना !"

ह्याला म्हणतात खरा मित्र . मीष्काने अशा चतुराईने मला उत्तर सांगितले होते . पण राईसा इवानोवना एव्हाना रागावल्या होत्या .

"मीष्का ! खबरदार त्याला सांगशील तर !"

"हो !" मी म्हणालो . "मीष्का , तू कशाला मधे तोंड खुपसतोय ? तुझ्याशिवाय मला माहीत नाही काय की , राईसा इवानोवनांनी नेक्रासोवची कविता पाठ करायला सांगितली

होती ! माझ्या डोक्यात दुसरेच काही विचार आले म्हणून थोडा घुटमळलो. तू निष्कारण लुडबूड करू नको."

मीष्काचा चेहरा लाल बनला आणि त्याने माझ्यापासून दुसरीकडे तोंड फिरवले. मी परत राईसा इवानोवनांसमोर एकाकी राहिलो.

"तर ?" त्या म्हणाल्या.

"काय ?" मी म्हणालो.

"दर मिनिटाला काय काय करायचं थांबव !" त्या भलत्याच चिडलेल्या होत्या हे मला समजले. "म्हणून दाखव !"

"काय ?"

"अर्थात, कविता !"

"हं, हं ! समजलं ! तर कविता म्हणून दाखवायची ? ठीक आहे !" आणि मी मोठ्या आवाजात सुरुवात केली:

"कवी, नेक्रासोव. महाथोर कवी. महान सोविएत कवी नेक्रासोव. कविता ..."

"म्हण !" राईसा इवानोवना म्हणाल्या.

"काय ?"

"ताबडतोब म्हण पाहू !" बिचाऱ्या राईसा इवानोवना ओरडल्या. "ताबडतोब म्हण असं सांगितलं ना ? कवितेचं शीर्षक !"

त्या ओरडत होत्या तोवर पहिला शब्द मला सांगण्यात मीष्का यशस्वी ठरला होता. तोंड न हलवता तो दबत्या आवाजात बोलत होता, पण मला त्याचे बोलणे उत्तम समजले. म्हणून मी धीटपणे एक पाय पवित्र्यात पुढे टाकला आणि त्याने सांगितलेल्या शब्दाचा पुनरुच्चार केला:

"बालपुरुष !"

सर्व गप्प झाले. राईसा इवानोवनासुद्धा. त्या माझ्याकडे लक्षपूर्वक पहात होत्या आणि मी मीष्काकडे त्याहून जास्त लक्षपूर्वकतेने पहात होतो. मीष्काने स्वतःचा अंगठा दाखवला आणि त्याचे नख तो खरवडून दाखवत होता.

मला ताबडतोब शीर्षक आठवले आणि मी म्हणालो:

"नखवाला !"

आणि परत एकत्र म्हटले: "नखवाला बालपुरुष !"

सगळे हसले. राईसा इवानोवना म्हणाल्या:

"पुरे झालं, देनीस !.. उगीच प्रयत्न करू नको, नाही जमणार ! जर माहीत नसेल तर फुका धडपडू नको !"

मग त्या पुढे म्हणाल्या: "आत्मसुधारणा कार्यक्रमाचं काय ? तुला आठवतं, काल आपण वर्गात ठरवलं होतं की, क्रमिक पुस्तकांशिवाय आपण आणखी चांगली चांगली पुस्तकं वाचाय-

ची? अमेरिकेतील मर्व नद्यांची नांवं पाठ करण्याचं काल तुम्ही ठरवलं होतं. तू पाठ केलीस?"

अर्थातच मी नद्यांची नांवे पाठ केली नव्हती. त्या नतद्रष्ट पतंगाने माझे सर्व आयुष्य नामवले होते. मी हे राईसा इवानोवनांसमोर कबूल करायच्या बेतात होतो, पण प्रत्यक्षात माझ्या तोंडून अनपेक्षितपणे भलतेच शब्द बाहेर पडले:

"अर्थात, पाठ केलीत. प्रश्नच नाही!"

"तर मग नेक्रासोवच्या कवितेबाबत तू घातलेला भयानक गोंधळ आता निस्तरून दाखव. अमेरिकेतल्या सर्वांत मोठचा नदीचं नांव तू मला सांग आणि मी तुला मोकळं करते."

तेव्हा मला भलतेच मळमळू लागले. चक्क पोटात दुखू लागले. वर्गामध्ये आश्चर्यकारक शांतता पसरली होती. सर्वांचे डोळे माझ्यावर रोखलेले होते. आणि मी छताकडे नजर रोखली होती. आता बहुतेक मी मरणार असे मला वाटले. मंडळी, परत भेटू! त्या क्षणाला मला दिसले की, डाव्या शेवटच्या रांगेत पेत्या गोर्बूश्कीन मला वर्तमानपत्राची लांबच लांब पट्टी दाखवत होता व त्या पट्टीवर शाईने मोठमोठ्या अक्षरात काहीतरी लिहिलेले होते—बहुधा त्याने शाईत बोटे बुडवून ती अक्षरे लिहिली होती. मी ती अक्षरे चोरून पाहू लागलो आणि अखेरीस पहिला अर्धा शब्द मी वाचला. तेवढ्यात राईसा इवानोवना परत म्हणाल्या:

"मग, देनीस? अमेरिकेतली सर्वांत मुख्य नदी कोणती?"

मला एकदम आत्मविश्वास वाटू लागला आणि मी म्हणालो:

"मिमी-पिमी."

यापुढे मी काही सांगत नाही. पुरे. आणि अगदी डोळ्यांमधून पाणी येईपर्यंत जरी राईसा इवानोवना हसल्या, तरी त्यांनी मला चक्क "वाईट" शेरा दिला. आता मी प्रतिज्ञा केली आहे की, यापुढे नेहमी गृहपाठ करीन. अगदी खूप म्हातारपणापर्यंत!

बुद्धिबळपटूची टोपी

त्यादिवशी सकाळी मी गृहपाठ लौकर उरकला, कारण त्यात अवघड असे काहीच नव्हते. प्रथम मी स्वतःच्या घराच्या खिडकीत बसून वर्तमानपत्र वाचणाऱ्या चेटकिणीचे चित्र काढले. मग एक वाक्य रचले: 'आम्ही घर बांधले.' आणखी काहीही अभ्यास नव्हता. मी अंगात ओव्हरकोट घातला, बरोबर ताज्या पावाचा तुकडा घेतला आणि बुलेवार्दवर फिरायला निघालो. आमच्या बुलेवार्दच्या मध्यभागी एक तळे आहे आणि त्या तळयात वेगवेगळे हंस, कलहंस आणि बदके पोहतात. त्यादिवशी खूप जोराचा वारा वाहात होता. झाडांची पाने जोरजोराने सळसळत होती आणि तळयाचे पाणी थरथरत होते.

मी बुलेवार्दवर गेलो तेव्हा तेथे माणसांचा जवळजवळ मागमूस नव्हता असे मला आढळले. फक्त दोन अनोळखी मुले शिवाशिवीचा खेळ खेळत होती आणि एक माणूस बाकावर बसून

एकटाच बुद्धिबळाचा डाव खेळत होता. तो बाकावर तिरपा बसला होता आणि त्याच्या पाठीशी त्याची टोपी पडली होती.

एवढ्यात वाऱ्याचा एक अत्यंत जोरदार झोत आला आणि त्या माणसाची टोपी हवेत उडाली. पण त्या बुद्धिबळपटूच्या ध्यानात ही गोष्ट आली नाही. तो स्वतःच्या डावात रमला होता. बहुधा त्याला भोवतालच्या जगाचे भान उरले नव्हते. मीसुद्धा जेव्हा बाबांबरोबर बुद्धिबळाचा डाव खेळतो, तेव्हा भोवतालच्या गोष्टींना मी अजिबात पहात नाही, कारण डाव जिंकायची फार इच्छा असते. तर ती टोपी उडाली आणि हवेतून तरंगत नेमकी त्या दोन मुलांसमोर पडली. ते दोन्ही मुलगे टोपी धरायला धावले, पण तेवढ्यात वाऱ्याचा आणखी एक जोरदार झोत आला व ती टोपी जणू जिवंत असल्याप्रमाणे परत हवेत उडाली. ती थेट तळ्यावर तरंगत गेली, पण पाण्यात पडली नाही – एका हंसाच्या डोक्यावर बसली. बदके खूप घाबरली आणि कलहंससुद्धा. टोपीवाल्या हंसापासून सगळे दूर विखुरले. पण हंसांना मात्र त्या टोपीचे कुतूहल वाटले व सगळे हंस त्या टोपीवाल्या हंसाभोवती जमले. त्या हंसाने सर्व ताकद एकवटून डोक्यावरची टोपी उडवायचा प्रयत्न केला, पण त्याला यश आले नाही. बाकीचे हंस त्या अद्भुताकडे पहात होते. बहुधा त्यांना आश्चर्य वाटत असावे.

तेव्हा ती अनोळखी मुले तळ्याच्या काठी उभे राहून हंसाला स्वतःकडे बोलावू लागली. ती शिटचा वाजवत होती. जणू काही तो हंस म्हणजे कुत्राच!

मी म्हणालो:

"मी त्या हंसाला पावाचं आमीष दाखवून किनाऱ्यापाशी आणतो, तोवर तुम्ही एखादी लांब काठी मिळवा. काही झाले तरी ती टोपी आपण त्या बुद्धिबळपटूला परत मिळवून दिली पाहिजे. कदाचित तो फार मोठा बुद्धिबळपटू असेल..."

मी खिशातून पाव काढला व त्याचे बारीक बारीक तुकडे करून पाण्यात फेकू लागलो. तळ्यातील सर्व हंस, बदके, कलहंस माझ्याकडे पोहत येऊ लागले. ऐन किनाऱ्यावर त्यांचा एकच कलकलाट माजला. ते एकमेकांना ढकलाढकली करू लागले. अक्षरशः पक्ष्यांचा बाजार भरला होता! टोपीवाला हंससुद्धा धक्काबुक्की करत होता व पावासाठी मान खाली झुकवत होता. अखेर त्याच्या डोक्यावरची टोपी खाली घसरून पाण्यात पडली.

किनाऱ्यापासून जवळच टोपी पाण्यावर तरंगत होती. तेवढ्यात ती अनोळखी दोन मुले धावत आली. एका टोकाला खिळा असलेली एक लांब काठी त्यांनी पैदा केली होती. त्या काठीच्या मदतीने टोपी खेचायला त्यांनी सुरुवात केली. पण काठीची लांबी थोडी कमी पडत होती. तेव्हा त्यांनी एकमेकांचे हात धरून साखळी बनवली आणि काठीवाला मुलगा परत टोपी ओढण्याचा प्रयत्न करू लागला.

मी त्याला म्हणालो:

"तो खिळा टोपीच्या ऐन मध्यभागी अडकवायचा प्रयत्न कर. आणि मासा खेचताना जशी छडी ओढतात, तसं कर. समजलं?"

तो म्हणाला:

"मी बहुधा आत्ता पाण्यात पडणार, कारण हा मुलगा मला घट्ट धरत नाही."

"चल, मी प्रयत्न करतो!" मी म्हणालो.

तो म्हणाला: "ये! नाहीतर नक्की पाण्यात पडणार मी!"

मी म्हणालो: "दोघंही माझ्या पट्ट्याला धरा!"

मला त्यांनी पट्ट्याला धरले. मी दोन्ही हातांनी काठी धरली, संपूर्ण पुढे झुकलो आणि धप्पदिशी पालथा पडलो! माझे सुदैव म्हणजे तेथे मऊ चिखल होता. त्यामुळे फारसे दुखले नाही.

मी म्हणालो: "असं काय तुम्ही ढिलं धरता? धरायला जमत नसेल तर तसं सांगितलं का नाही?"

"आम्ही छान धरू शकतो! तुझा पट्टा तुटला म्हणून असं झालं! कापडाचा तुकडासुद्धा त्याच्याबरोबर फाटून निघालाय!"

"माझ्या खिशात कोंबा त्याला आणि तुम्ही माझ्या कोटाचं मागचं टोक गच्च पकडा! कोट नाही फाटायचा! धरा!"

आणि परत काठीसकट टोपीच्या दिशेने ओणवा झालो वारा त्या टोपीला किनाऱ्याच्या जास्त जवळ लोटेल ह्या आशेने मी थोडा थांबून राहिलो. सारा वेळ हळू हळू काठीने पाणी वल्हवत होतो. त्या बुद्धिबळवाल्याला ती टोपी परत देण्याची माझी फार इच्छा होती. खरेच तो फार प्रसिद्ध खेळाडू असेल तर? कदाचित तोच बोत्विन्निक असेल! सहज फिरायला म्हणून बाहेर पडला असेल. आयुष्यात असे प्रसंग घडतात! मी त्याला टोपी देईन आणि तो मला म्हणेल: "धन्यवाद, देनीस!"

मग मी त्याच्याबरोबर स्वतःचा फोटो काढून घेईन आणि नंतर तो सगळ्यांना दाखवीन...

कदाचित तो माझ्याबरोबर एक डाव खेळायचा मान्य करील? अचानक मी जिंकलो तर? असेसुद्धा प्रसंग घडतात!

एवढ्यात टोपी आणखी जवळ तरंगत आली आणि तिच्या ऐन मध्यभागी मी खिळा अडकवला. अनोळखी मुले ओरडली: "तू पकडलीस!"

मी खिळ्यापासून टोपी वेगळी केली. ती खूप ओली झाली होती आणि जड बनली होती.

"तिला पिळून काढलं पाहिजे!" मी म्हणालो.

एका मुलाने त्या टोपीचे रिकामे टोक धरले व तो तिला उजवीकडे पिळू लागला. मी डावीकडे पिळू लागलो. टोपीमधून पाणी गळले. आम्ही तिला चांगलीच पिळली, कारण ती मध्यभागी उसवली. ज्या मुलाने टोपी पिळली नव्हती तो म्हणाला:

"आता सर्व ठीक आहे. द्या ती टोपी इकडं. मी त्या माणसाला नेऊन देतो."

मी म्हणालो: "अरे वा! मी स्वतः देणार!"

तेव्हा तो टोपी स्वतःकडे खेचू लागला. दुसरा मुलगा स्वतःकडे खेचू लागला. आणि मी स्वतःकडे खेचू लागलो. आमच्यात रस्सीखेच सुरू झाली. त्यांनी टोपीच्या आतील अस्तर फाडले.

आता संपूर्ण टोपी त्यांनी माझ्यापासून खेचून घेतली होती.

मी म्हणालो: "मी पावाचं आमीष दाखवून हंमांना किनाऱ्यावर आणलं, म्हणून टोपी देण्याचा हक्क माझा आहे!"

ती मुले म्हणाली: "पण खिळ्यासकट काठी कुणी दिली?"

"पण पट्टा कुणाचा तुटला?"

तेव्हा त्यांच्यापैकी एकजण म्हणाला:

"ठीक आहे, देऊन टाक त्याला, मार्क! पट्ट्याबद्दल त्याला घरी मार खावा लागणारच आहे!"

मार्क म्हणाला:

"घे तुझी कमनशिबी टोपी!" आणि चेंडूप्रमाणे त्याने लाथेने ती टोपी हवेत उडवली.

मी ती झेलली आणि वेगाने धावत त्या बुद्धिबळपटूपाशी गेलो. मी त्याला म्हणालो:

"काका, ही घ्या तुमची टोपी!"

"कुठाय?" त्याने विचारले.

"ही बघा," आणि मी टोपी त्याच्यापुढे धरली.

तो म्हणाला: "मुला, तुझी चूक होतेय! माझी टोपी इथं आहे." आणि त्याने पाठीमागे नजर टाकली. तेथे अर्थातच काहीही नव्हते.

"काय भानगड आहे? माझी टोपी कुठं आहे?"

मी त्याच्यापासून थोडासा मागे सरलो व परत म्हणालो:

"ही बघा. तुम्हाला दिसत नाही?"

तो अक्षरशः घुसमटला.

"हे भिजलेलं लक्तर काय माझ्या तोंडापुढं धरतो आहेस? माझी टोपी नवीकोरी होती! कुठाय ती? ताबडतोब उत्तर दे!"

मी त्याला म्हणालो:

"तुमची टोपी वाऱ्यानं उडाली आणि तळ्यात पडली. पण मी तिला खिळेवाल्या काठीनं बाहेर काढली. मग आम्ही तिच्यातलं पाणी पिळून काढलं. ही बघा. घ्या... हे तिचं अस्तर!"

तो म्हणाला:

"आत्ताच्या आत्ता मी तुला तुझ्या पालकांकडं घेऊन जातो!!"

मी म्हणालो: "आई इन्स्टिट्यूटमध्ये गेलीय. बाबा कारखान्यात. तुम्ही बोत्विन्निक तर नव्हे?"

तो भलताच चिडला. "चालता हो कारट्या! माझ्या डोळ्यांसमोरून नाहीसा हो! नाहीतर तुला चोपून काढीन!"

मी आणखी थोडासा मागे सरलो आणि म्हणालो:

"आपण बुद्धिबळ खेळू या?"

त्याने प्रथमच मला नीट न्याहाळून पाहिले. मग तो म्हणाला :

"तुला खेळता येतं?"

"हो!"

तेव्हा त्याने एक उसासा टाकला व तो म्हणाला :

"तर मग बैस!"

स्वतंत्र गोर्बूश्का

दोन आठवड्यांपूर्वी आमच्या शाळेत एक खूप मोठा समारंभ झाला – एका नामवंत लेखकाची प्रत्यक्ष भेट. आम्ही त्या लेखकाच्या मजेदार गोष्टींचे आणि कवितांचे सबंध वर्गात जाहीर वाचन केलेले होते व तो आमचा अत्यंत आवडता लेखक बनला होता. तो लेखक शनिवारी आमच्या वर्गाला भेट देणार होता असे जेव्हा राईसा इवानोवना म्हणाल्या, तेव्हा आम्ही जोरदार टाळ्या पिटल्या व "ब्राव्हो" म्हणून आरोळ्या ठोकल्या. पण राईसा इवानोवना म्हणाल्या :

"आरडाओरडा बंद करा! इथं काही सर्कस नाही. ही शाळा आहे. त्यापेक्षा पाहुण्यांचं स्वागत आपण कसं करायचं त्याबद्दल निश्चित काहीतरी ठरवू या. थोडी डोकी चालवा! स्पर्धा सुरू झालीय..."

आम्ही ताबडतोब हात वर करून वेगवेगळ्या सूचना मांडू लागलो. सगळेजण एकाच वेळी आपापल्या कल्पना ओरडून सांगू लागले :

"त्यांना फुलं दिली पाहिजेत!"

"त्यांना सन्माननीय बालवीर बनवलं पाहिजे!"

"त्यापेक्षा त्यांना सुयांच्या उशा भेट द्याव्यात!"

"त्यांच्याबरोबर आपला फोटो काढू!"

"फालतू! त्यांचा छान पाहुणचार केला पाहिजे!"

"चहा, पाव, लोणी आणि कबाब!"

"एक कल्पना! वर्गात आले म्हणजे एकदम प्रचंड आवाजात "हुर्रे" ओरडू!"

"खरंच! आणि खेळातल्या पिस्तूलांची सलामी! एकशे एक बार!"

"हो! दार उघडलं रे उघडलं की आपण ठो-ठो-ठो!"

"भलती मजा येईल!"

"पण मी म्हणते सुयांची उशी भेट देणंच जास्त छान!"

"तुझ्या उशीवर थुंकतील ते! काय वेडपट आहेत?"

"हे एका मूर्खाकडून ऐकतोय!"

"माझा बोका वास्या त्यांना भेट देऊ. चक्क सहा किलो वजन आहे त्याचं!"

"नको. तुझा बोका दुसऱ्या कुणालातरी भेट दे!"

"त्याला कुणीही पत्करत नाही!"

"सुयांची उशी!"

"पूझीरकोवा! तुझी उशी विसर!"

"त्यांना हातांवर झेललं पाहिजे!"

"पण वजन जड असेल तर?"

"आठवीच्या वर्गाला मदतीला बोलवू!"

आम्ही अशा प्रकारे बराच वेळ चर्चा करत होतो. शेवटी राईसा इवानोवना म्हणाल्या:

"एकूण समजलं! एक – फुलांचा गुच्छ. दोन – टाळ्या. मग आपण त्यांना त्यांची एक गोष्ट वाचायला सांगू. त्यांचं वाचन संपल्यावर आपण त्यांना आपल्या बालवीर पथकाचे सन्मान-नीय सभासद बनवू. मारीया कोझिना त्यांना बालवीर-रुमाल बांधील. मग आपण त्यांच्या-बरोबर जमल्यास फोटो काढून घेऊ. बास्स! थोडक्यात पण छान, होय की नाही? ठरलं?"

"अगदी बरोबर," आम्ही म्हणालो, "ठरलं! सगळं व्यवस्थित!"

तेवढ्यात छोटा पेत्या गोर्बूश्कीन उभा राहिला. त्याने हात वर केला, पण राईसा इवानोव-नांचे त्याच्याकडे लक्ष गेले नाही. कारण तो बुटका आणि साळिंदरासारखा गुबगुबीत होता. वर्गात एवढा प्रचंड गोंधळ माजला होता की, तो मुळीच दिसत नव्हता. तेव्हा मी म्हणालो:

"राईसा इवानोवना, गोर्बूश्कीन काहीतरी सांगू पाहतोय."

"गोर्बूश्कीन, बोल!" त्या म्हणाल्या.

गोर्बूश्कीनने सुरुवातीला असा सूर लावला: "आ-आ-आ..."

मग तो बोलू लागला: "आप... आप... आपण..."

त्याला स्वतःला सावरणे जमेना, बहुधा तो खूप उत्तेजित झाला असावा.

त्याचे तोतरे बोलणे केव्हा थांबते ह्याची आम्ही वाट पाहू लागलो.

गोष्ट अशी आहे की, आमचा गोर्बूश्कीन महत्त्वाच्या प्रसंगी बोलताना थोडा चाचरतो. 'गदी पहिलीपासून. त्याचे तोतरणे साधेसुधे नव्हते. अगदी पट्टीचे होते. आणि त्याचे तोतरे बोलणे एकदा सुरू झाले म्हणजे तिसऱ्या टप्प्यात. अशा वेळी बोलण्याआधी त्याचा प्रथम बारीक सूर लागायचा:

"आ-आ-आ-आ..."

मग एकदम त्याचा दुसरा टप्पा सुरू व्हायचा आणि पहिल्या शब्दातील आरंभीची अक्षरे त्याच्या तोंडातून बाहेर पडू लागत. उदाहरणार्थ, जर त्याला "नमस्ते" म्हणायचे असले, तर पहिल्या "आआआ" गाण्यानंतर तो पोपटाप्रमाणे जवळ जवळ दहादा दळत रहायचा:

"नम... नम... नम... नम..."

ह्याचा त्याला कंटाळा आला म्हणजे मग तिसरा टप्पा सुरू व्हायचा. जणू काही तोतरेपण

विसरायची इच्छा आहे अशा रीतीने तो डोक्याला झटका द्यायचा आणि मग गोर्बूश्काच्या तोंडून शब्द न तोडता वाक्याचे भेंडोळे बाहेर पडायचे :

"नमस्ते राईसा इवानोवना! विसरलो रशियन भाषेची वही घरी! पुन्हा असं करणार नाही!"

पण असे तोतरेपण त्याला काही विशिष्ट प्रसंगी यायचे. एरवी तो छान मोठ्याने आणि स्पष्ट बोलायचा. एकूण तो फार चांगला मुलगा होता. सबंध वर्गात तो सर्वांत छान घोडा चितारायचा, नेहमी न्याहरी दुसऱ्यांना वाटून खायचा आणि आम्हाला त्याची सवय झाली होती. त्याच्या तोतरेपणाला आमच्यापैकी कुणीही कधीही हसत नसे. आणि आम्ही त्याला हसत नव्हतो त्यामुळे त्याचे तोतरेपण जवळ जवळ निघून गेले होते. पण आत्ता त्याने परत "आआआ ..." चा सूर लावला, तेव्हा आम्ही संयम राखून वाट पाहू लागलो. आमचा गोर्बूश्का काय सांगू इच्छितो हे आम्हाला जाणून घ्यायचे होते. तो लौकरच म्हणाला :

"आआआ ... आप ... आप-आप ... आपण त्यांना त्यांची स्वाक्षरी मागितली पाहिजे!"

म्हणजे गोर्बूश्काची इच्छा होती की, लेखकांनी स्वतःच्या पुस्तकावर स्वाक्षरी करून ते त्याला आठवणीदाखल भेट द्यावे. मी म्हणालो :

"शाबास गोर्बूश्का, छान कल्पना आहे!"

ह्यानंतर आम्ही लेखकाची वाट पाहू लागलो. काहींनी त्यांच्या कविता तोंडपाठ केल्या. पुझीरकोवाने अखेरीस सुयांची उशी बनवलीच. बहुतेकजण अधीरपणे वाट पहात होते. भराभर दिवस उलटले आणि शेवटी आमचा तो महान शनिवार उजाडला. त्या दिवशी अगदी सकाळपासूनच आम्ही लख्ख तोंडे धुवून, केस व्यवस्थित विंचरून आणि कडक इस्त्री केलेले शुभ्र सदरे घालून, लाल टाय बांधून सज्ज बसलो होतो. मला आश्चर्य वाटले की, केवळ ह्या स्वच्छतेपायी आम्ही सगळेजण जणू फारच सुंदर दिसत होतो. सर्वांत कमाल म्हणजे मुलीसुद्धा. एकूण आम्ही काही-तरी वेगळेच दिसत होतो. वर्ग जास्त सुंदर आणि स्वच्छ दिसत होता. टेबलावर फुलांचा गुच्छ होता. एकदम दार सताड उघडले आणि लेखक वर्गात आले. ते खूप उंच होते. अगदी छतापर्यंत. बाकी त्यांच्यात विशेष असे काही नव्हते. का-ही-ही नव्हते. चारचौघांसारखे. मुख्य म्हणजे त्यांच्यात रुबाब जाणवत नव्हता. जेव्हा ते वर्गात आले, तेव्हा आम्ही ताबडतोब उभे राहिलो. ते टेबलापाशी आले आणि राईसा इवानोवना म्हणाल्या :

"मुलांनो, आज आपल्याकडं पाहुणे आलेत, आपले आवडते लेखक इवान व्लादीस्लावो-विच ..."

आणि त्यांनी लेखकांचे आडनांव उच्चारायच्या आतच आम्ही खूप जोराने टाळ्या पिटल्या. लेखक किंचित हसले आणि एकदम खूप छान व आनंदी दिसू लागले. तेव्हा आम्ही आणखी जोराने टाळ्या पिटल्या आणि न राहवून आरोळ्या ठोकू लागलो. काहीजण तर जागच्या जागी उड्या मारू लागले, दुसरे त्यांना धक्के मारून शांत करू लागले, दोन्ही हातांनी गप्प बसवू लागले. ज्यांना शांत रहायची इच्छा नव्हती ते झोंबाझोंबी करू लागले. उदाहरणार्थ, मी

ल्योवकाच्या टाळक्यावर टप्पल मारली, तर त्याने माझ्या बरगड्यांवर ठोसा हाणला. एकूण आमच्या वर्गात छोटासा गोंधळ माजला.

शेवटी राईसा इवानोवनांनी टेबलावर हात आपटला व आम्ही थोडेसे शांत होऊ लागलो. जेव्हा पूर्ण शांतता पसरली, तेव्हा आमच्या लेखकमहाशयांनी स्वतःचे लांब हात टेबलावर टेकले आणि किंचित पुढे झुकून ते म्हणाले:

"नम ... नम ... नम ..."

आम्ही अक्षरशः थक्क झालो. हे काय? ते तोतरे होते काय? आम्हाला ही गोष्ट माहीत नव्हती. आम्हाला हे अनपेक्षित होते. आम्हाला कुणीही आधी ह्याबद्दल कल्पना दिली नव्हती आणि त्यामुळे आमच्या वर्गातील मूर्ख सोन्या पूझीरकोवा मागच्या बाकावर बावळटासारखी खी खी हसली. लेखकांचा चेहरा किंचित लाल झाला व सोन्याच्या दिशेने पहात ते शांतपणे म्हणाले:

"मुलांनो, मी तुम्हाला आधीच सांगू इच्छितो की, जेव्हा मी उत्तेजित होतो किंवा माझं मन हेलावतं, तेव्हा मी थोडासा तोतरा बोलू लागतो. ज्या कुणाला हे विचित्र वाटत असेल, त्यांनी वर्गाबाहेर जावं. मला त्याबद्दल वाईट वाटणार नाही."

त्यांनी अशा रीतीने सोन्याची हजेरी घेतली. तिने गाल फुगवले, तिचा चेहरा लालेलाल झाला व तिने डोके खाली झुकवले. मी उभा राहिलो आणि म्हणालो:

"इवान व्लादीस्लावोविच, पूझीरकोवाकडं मुळीच लक्ष देऊ नका. कारण ती मूर्ख आहे. तुम्ही कृपा करून मुळीच लाजू नका. पाहिजे तेवढं तोतरं बोला. घरच्यासारखं वागा!"

सबंध वर्गाने परत टाळ्या पिटल्या, लेखक परत किंचित हसले व आणखी शंभरपटींनी छान दिसू लागले. त्यांनी आमच्या सर्व आवडत्या कविता आम्हाला म्हणून दाखवल्या आणि गोष्टी सांगितल्या. एखाद्या उत्तम नटापेक्षा जास्त चांगल्या रीतीने त्यांनी गोष्टी सांगितल्या. आमची पोटे हसून हसून दुखू लागली. त्यांनी स्वतःच त्या कविता रचल्या होत्या, गोष्टी रचल्या होत्या आणि ते स्वतःच साक्षात आम्हाला सांगत होते, ह्यामुळे भलतीच मजा आली होती!

ते आमच्यासमोर हसऱ्या चेहऱ्याने बसले होते आणि जर आम्ही त्यांना स्पर्श करून पाहिला असता, तर ते आमच्यावर रागावले नसते, कारण प्रेमळ माणसे मुलांवर रागावत नाहीत. अजून ते गोष्टी सांगत होते, मुले पुरती रमली होती आणि अतिआनंदापायी काय करावे ते मला सुचत नव्हते. हा प्रकार एक तासाहून जास्त काळ चालू होता आणि अगदी संध्याकाळी उशीरापर्यंत मी तसा गोष्टी ऐकत बसू शकलो असतो, पण काही मुले हात वर करून "बाहेर जाऊ का" असे विचारू लागली. तेव्हा लेखक गोष्टी सांगायचे थांबले व म्हणाले:

"तर मी आता आटपतं घेतो, तुम्हा सर्वांना आरोग्य आणि आनंद लाभो. मी आशा करतो की, आपली आता मैत्री जमलीय. होय ना?"

अर्थातच आम्ही वेगवेगळ्या आवाजांमध्ये मान्यतादर्शक आरोळ्या ठोकल्या. मारीया कोझिना लेखकांपाशी गेली व तिने त्यांना बालवीर-रुमाल बांधला. आम्ही ओरडलो:

" ध-न्य-वा-द ! ध-न्य-वा-द !"

तेवढ्यात कुणा एका मुलीने लेखकांना फुले दिली व धिटाईने त्यांच्या कानाची पापी घेतली लेखकांचे डोळे लाल झाले आणि आमचे लक्ष वेधावे म्हणून त्यांनी हात हलावला. ते म्हणाले:

" ममम ... ममम ... ममम ..."

आम्हाला समजले की, लेखक परत हेलावले होते आणि उत्तेजित बनले होते. आम्हाला ते काय सांगतात हे ऐकण्यासाठी आम्ही ताबडतोब शांत झालो. पण नेमक्या याच क्षणाला गोर्बूश्काने स्वतःच्या डेस्कमधून कुठलेतरी एक पुस्तक बाहेर काढले, तो उभा राहिला व हात वर करून म्हणाला:

" ममम ... ममम ... ममम..."

बहुधा गोर्बूश्कासुद्धा उत्तेजित बनला होता. लेखकांनी त्याच्याकडे तिरप्या डोळ्यांनी पाहिले, पण लक्ष दिले नाही. शांत होऊन आम्हाला काहीतरी सांगण्याची त्यांची इच्छा होती. पण त्यांनी कितीही प्रयत्न केला तरी त्यांना शांत होणे जमले नाही आणि परत तोतरू लागले: " ममम ... ममम ... ममम ..."

आणि गोर्बूश्का काय कमी त्यांच्यापेक्षा? तोसुद्धा स्वतःचा सूर वाजवू लागला: " ममम ... ममम ... ममम ..."

तेव्हा लेखक चिडून म्हणाले: " ए मुला, तू माझी नक्कल कशाला करतोस? असं करणं चांगलं नव्हे!"

आणि परत आमच्याकडे वळून: " ममम ... ममम ... ममम ..."

गोर्बूश्काने पटकन उत्तर दिले: " तुमची नक्कल करायचा माझा मुळीच हेतू नाही ..."

त्याने लेखकांपुढे पुस्तक धरले व विनवणीच्या स्वरात तो म्हणाला: " ममम ... ममम ... ममम ..."

लेखकांचे डोळे भलतेच विस्फारले. मला वाटले की, आमच्या गोर्बूश्काला आता ते ठार मारतील. ते म्हणाले:

" तू कशाला तोतरं बोलतोस? मी तोतरा आहे, तू नव्हे. उगाच गोंधळ माजवू नको!"

आणि तिसऱ्यांदा ते आमच्याकडे वळले: " ममम ... ममम ... ममम ..."

तेवढ्यात गोर्बूश्काने स्वतःची गाडी सोडली: " मीसुद्धा तोतरा आहे. तुमच्यापेक्षा जास्त! ममम ... ममम ... ममम ..."

आता जर मी मधे पडलो नाही तर त्या दोघांची मारामारी जुंपेल असे मला वाटले. पटकन उठून उभा रहात मी म्हणालो:

" इवान व्लादीस्लावोविच, हा आमचा गोर्बूश्का! तो तुमची नक्कल नाही करत! फक्त तोसुद्धा तोतरा आहे. पण तो आपल्या परीनं तोतरतो. योगायोगानं तुम्ही दोघं एकाच वेळी अडखळू लागलात. प्रत्यक्षात तुमचं प्रत्येकाचं स्वतंत्र तोतरण आहे. गोर्बूश्का! तुला काय सांगायचं होतं? उगाच घाबरू नको! स्वतःला आवर! प्रयत्न कर!"

गोर्बूश्काने ताबडतोब प्रयत्न करून स्वतःला आवरले.

"मला आठवण म्हणून पुस्तकावर तुमची स्वाक्षरी द्या!"

"पाहिलंत! " मी म्हणालो. "शाबास गोर्बूश्का! इवान व्लादीस्लावोविच, समजलं त्याला काय म्हणायचं होतं? तो चांगला मुलगा आहे. अगदी स्वतंत्रपणं तो तोतरा बोलतो."

लेखक मनापासून हसले आणि म्हणाले: "आण तुझं पुस्तक!"

त्यांनी पुस्तक घेतले व पहिल्या पानावर लिहिले:

"स्वतंत्र गोर्बूश्काला प्रेमळ आठवण!"

मग ते उठले व अगदी हळू आवाजात म्हणाले:

"ममम... ममम... मला तुम्हाला सांगायचंय की, तुम्ही मला फार फार आवडलात!"

आणि ते निघून गेले.

प्राणी-संग्रह

धड्याच्या शेवटी आमच्या शिक्षिका राईसा इवानोवना म्हणाल्या:

"मुलांनो, मी तुमचं अभिनंदन करते! शाळेच्या सोविएतनं निर्णय घेतलाय की, आपल्या शाळेत एक प्राणी-संग्रह स्थापन करायचा. छोटंसं प्राणी-संग्रहालय. तिथल्या प्राण्यांची सर्व व्यवस्था तुम्हीच पहायची आणि त्यांचं निरीक्षण करायचं..."

मी आनंदाने ताडकन उडी मारली! कित्ती मज्जा! मी म्हणालो:

"हा प्राणी-संग्रह कुठं असणार?"

"तिसऱ्या मजल्यावर," राईसा इवानोवना उत्तरल्या. "शिक्षकांच्या खोलीजवळ."

"कसं काय बुवा?" मी म्हणालो. "रानगवा तिसऱ्या मजल्यावर कसा चढणार?"

"कुठला रानगवा?" राईसा इवानोवनांनी विचारले.

"केसाळ," मी म्हणालो. "शिंगं आणि शेपूट असलेला!"

"नाही," राईसा इवानोवना म्हणाल्या, "आपल्याकडं रानगवा असणार नाही. पण छोटी साळिंदरं, पक्षी, मासे आणि उंदीर असतील. तुमच्यापैकी प्रत्येकानं यांपैकी एक छोटा प्राणी आपल्या शाळेच्या प्राणी-संग्रहात आणून ठेवायचा. अच्छा, भेटू परत!"

मी घराकडे चालत निघालो. वाटेत आणि नंतर आमच्या घराच्या आवारातही मी सतत विचार करत होतो की, आमच्या प्राणी-संग्रहात सांबर, याक अथवा निदान पाणघोड्याला कसे आणता येईल. किती सुंदर प्राणी आहेत ते...

तेवढ्यात मीष्का स्लोनोव धावत आला आणि ओरडून म्हणाला:

"अर्बात रस्त्यावरच्या प्राण्यांच्या दुकानात पांढरे उंदीर देताहेत!!"

मला भयंकर आनंद झाला व आईपाशी मी धावलो.

ЖИВАЯ РЫБА

"आई," मी ओरडलो, "आई, म्हण "हुर्रा!" अर्बात रस्त्यावर पांढरे उंदीर देताहेत!"

"कोण देतंय, कुणाला, कशासाठी आणि मी का म्हणून हुर्रा म्हणायचं?" आईने विचारले.

मी म्हणालो: "प्राणी-संग्रहासाठी प्राण्यांच्या दुकानात देताहेत. मला पैसे दे ना!"

आई पैशाच्या बटव्याकडे जात म्हणाली: "पण तुमच्या प्राणी-संग्रहासाठी पांढरे उंदीरच का? भुरे उंदीर तुम्हाला का चालणार नाहीत?"

"काय ग तू आई," मी म्हणालो, "ही काय तुलना झाली? भुरे उंदीर म्हणजे साधे, पण पांढरे म्हणजे खास बनवलेले असतात. समजलं?"

आईने मला एक हलकी चापटी मारली, पैसे दिले व मी दुकानाकडे धावलो.

तेथे लोकांची झुंबड उडालेली. अर्थात ती समजण्यासारखी होती, कारण पांढरे उंदीर कुणाला आवडत नाहीत? म्हणून दुकानात एवढी गीघ लागलेली होती. मीष्का काऊंटरपाशी नजर ठेवून उभा होता: एका माणसाला दोनपेक्षा जास्त उंदीर देऊ नयेत म्हणून. पण तरीही मी अभागी ठरलो! अगदी माझ्या पाळीलाच उंदीर संपले. मला फार वाईट वाटले. बाजारात उंदीर विकत घेणे शक्य नव्हते. तिथे खूप महाग — माझ्या पाठीची साल निघाली असती!

मी विक्रेतीला विचारले: "पुन्हा उंदीर केव्हा येतील?"

"जेव्हा पाठवतील. बहुधा वर्षअखेरीला!"

"उंदरांसारख्या अत्यंत आवश्यक वस्तूचा पुरवठा तुम्ही फार वाईट रीतीनं करता!" असे बोलून मी तेथून बाहेर पडलो.

दुःखापायी मी बारीक होऊ लागलो. आईने माझा चेहरा पाहताच घाबरून म्हटले: "अग बाई! उंदरांपायी एवढं वाईट वाटून घेऊ नकोस देनीस! नाहीत तर नाहीत! चल, आपण तुला मासे विकत घेऊ! पहिलीतल्या मुलाला सर्वांत उत्तम — मासा! तुला कोणत्या प्रकारचा मासा हवा?"

मी म्हणालो: "नाईलमधली सुसर!"

"पण तिच्याहून लहान दुसरं काही?" आई म्हणाली.

"तर मग मोल्लीनेझी!" मी म्हणालो. मोल्लीनेझी हा आगपेटीच्या निम्म्या आकाराचा छोटा मासा आहे.

आम्ही परत दुकानात आलो. आईने विक्रेतीला विचारले: "हे मोल्लीनेझी केवढ्याला? मला तसे दहा छोटे मासे विकत घ्यायचेत, प्राणी-संग्रहासाठी!"

विक्रेती म्हणाली: "प्रत्येक मासा दीड रूबलला!"

आईने चक्क स्वतःचे डोके धरले.

"बाई ग! एवढे महाग असतील अशी मला कल्पनासुद्धा नव्हती! चल बाळा, घरी चल!"

"आई, पण मोल्लीनेझी?"

"नकोत आपल्याला," आई म्हणाली. "ते चावतात! चल, त्या एका चिमुरड्या

माशाच्या किंमतीत आपण भला मोठा कार्प मासा विकत घेऊ, त्याला क्रीम माखून चवदार शिजवू, मीष्काला बोलावू आणि मस्त खाऊ. ते मोल्लीनेझी चावतात..."

आता सांगा, प्राणी-संग्रहासाठी मी काय घेऊन जाऊ? उंदीर संपले, मासे चावतात... एकूण नशीबी दुःखच!

लठ्ठ थापाडी

आईच्या ओळखीची मारीया पेत्रोवना नांवाची एक बाई होती. पिंपासारखी लठ्ठ. खूप पूर्वी तिने मला वचन दिले होते की, अस्सल बाकदार तलवार ती मला बक्षिस देईल — पण नंतर फसवले. तिने मला तलवार दिलीच नाही. सबंध सकाळ मी तिची वाट पहात होतो, मनाशी कल्पना करत होतो — त्या तलवारीच्या मदतीने माझ्या आवडत्या क्युबाच्या शत्रूंची मुंडकी मी कशी उडवीन! पण मारीया पेत्रोवनाने मला फसवले आणि ती आलीच नाही. मला त्याबद्दल तिचा खूप राग आला आणि मी सर्वांना ही हकीकत सांगितली. सर्वांना तिची खरी ओळख पटावी आणि तिला स्वतःची शरम वाटावी म्हणून. पण तरीही तिने स्वतःचे वाईट उद्योग तसेच चालू ठेवले व लोकांना ती सर्रास फसवत राहिली. माझ्या आईलासुद्धा तिने फसवले. आईसुद्धा तिच्यावर चिडली होती. खूप दिवसपर्यंत माझा तिच्यावरचा राग टिकला, पण नंतर नकळतपणे मी तो प्रसंग विसरून गेलो व नेहमीप्रमाणे जगू लागलो. त्याच दरम्यान हँगरच्या स्टँडवर मला एक छत्री सापडली आणि त्या छत्रीची मी तलवार बनवली. अर्थात तिच्या मदतीने शत्रूंची मुंडकी मारणे शक्य नव्हते. ती मोडली असती. विशेषतः तिच्या काड्या. पण ह्या तलवारीने हवी तेवढी भोसकाभोसकी करता येत होती. अर्थात ही बाकदार तलवार नव्हती, सरळ समशेर होती. प्रसिद्ध लाल सेनानी चापायेव होण्याचे माझे केव्हाचे स्वप्न होते, पण वाकड्याऐवजी सरळ तलवारीपायी काही काळ 'तीन शिलेदार' मधील दार्तान्यान बनावे लागले. काय करणार! दार्तान्यान चापायेवपेक्षा अर्थात खूपच कमी होता. त्यांची तुलनाच अशक्य होती. चापायेव लाल सैनिक होता; सगळ्या गरीबांना चांगले जगता यावे, सबंध पृथ्वीवर स्वातंत्र्याचा लाल झेंडा इथून फडकत जावा, म्हणून तो लढला होता. तो थोर वीर होता, त्याचे ध्येय महान आणि उदात्त होते. पण दार्तान्यान कोण? अर्थात तो साहसी, दयाळू आणि विश्वासू मित्र होता, त्याने फक्त एका राणीची सेवा बजावली होती आणि तुम्ही मान्य करा अगर न करा, पण तेवढे पुरेसे नाही! आता माझी इच्छा असो वा नसो, पण सरळ समशेरीमुळे शिलेदाराची भूमिका वठवणे भाग होते! मी दार्तान्यान बनलो, मीष्का आतोस बनला, कोस्त्या आरामीस बनला व आल्योन्का कार्डिनल रीशेल्ये बनली. आम्हा मुलग्यांपैकी कुणीही कार्डिनल रीशेल्ये बनू इच्छित नव्हता, कारण तो दुष्ट साप होता. आल्योन्काला हे ठाऊक नव्हते, आम्ही तिला त्याबद्दल सांगितले नव्हते, त्यामुळे ती कबूल

झाली होती. ती चांगलीच फसली. आम्ही तिची चांगलीच भंबेरी उडवली. एकदा आम्ही तिला आठव्या मजल्यावर चापात पकडले आणि ताबडतोब बास्तिल तुरुंगात टाकले. लिफ्टचा आम्ही तुरुंग बनवला. आम्ही तिला लिफ्टमध्ये बंद केले व सहाव्या आणि पाचव्या मजल्यांच्या दरम्यान लिफ्ट थांबवली. तर आमचा कार्डिनल आल्योन्का-रीशेल्ये तेथे तब्बल दीड तास तुरुंगवास भोगत होता. तो सारा वेळ आल्योन्का ठणाणा किंचाळत होती! कसली खंबीर प्रकृती! मग प्लंबर ग्रीशाकाकाने तिला सोडवले. लोक हसून हसून बेजार झाले!

अशा रीतीने ह्या उद्योगांमध्ये मी गुंतल्याकारणाने लठ्ठ मार्या पेत्रोवनाविषयी आणि तिच्या वाईट कृत्यांविषयी विचार करणे सोडून दिले होते. आमच्या घरातील सगळे तिला विसरून गेले होते. पण एका संध्याकाळी, काही कारण नसता, बाबांनी अचानक आईला विचारले:

"खरंच! कुठं आहे लठ्ठ थापाडी?"

"कुणाबद्दल विचारतोस?" आईने विचारले.

"मी विचारतोय, कुठं आहे आपली लठ्ठ थापाडी? एवढं समजत नाही?"

"नाही बाई मला समजत," आई म्हणाली.

"पण देनीसला समजलं," बाबा म्हणाले. "खरं ना, देनीस? लठ्ठ थापाडी! कुणाला तू हे नांव ठेवलं होतंस? सांग बघू!"

माझ्या डोक्यात ताबडतोब प्रकाश पडला. बाबांनी अगदी योग्य वर्णन केले होते.

मी म्हणालो: "समजलं! लठ्ठ थापाडी? पिंपासारखी ढोली? अंगभर खोटे दागिने मिरवणारी? स्वस्त, गोड अत्तरांच्या वासानं घमघमणारी? अरेच्चा, ही तर मार्या पेत्रोवना!"

बाबा ओरडले: "बरोब्बर!" आणि खूप हसले. मीही हसलो. आई हसली. डोळ्यांमधून पाणी येईतो आम्ही हसलो.

तेवढ्यात कॉरीडॉरमध्ये टेलिफोन खणखणला. मी खोलीतून धावत गेलो आणि रिसीव्हर उचलला.

मी विचारले: "हॅलो! कोण पाहिजे?"

टेलिफोनमध्ये कुणीतरी किंचाळले. माझ्या कानात कुणीतरी जोरात खरवडल्यासारखे वाटले. किंचाळीनंतर टेलिफोनमधून आवाज आला:

"अनास्तासिया वासिल्येवनाला बोलवा!"

मी एकदम मुका बनलो! ती मार्या पेत्रोवना होती – लठ्ठ थापाडी! तिचा आवाज मी ताबडतोब ओळखला. नुकतेच आम्ही तिच्याबद्दल बोललो होतो. किती योगायोग! कमाल आहे! मी म्हणालो: "एक मिनिट थांबा!"

आणि परत खोलीत पळत आलो.

"आई" दबत्या आवाजात मी म्हणालो, "टेलीफोनवर मारीया पेत्रोवना! तुला बोलावतेय!"

आईच्या डोळ्यांमध्ये एकदम भीती उमटली. पटकन उठून ती खिडकीपाशी धावली. बाबा अक्षरश: हसून कोलमडले:

"वा लठ्ठ थापाडी! नुसती आठवण काढताच झाली हजर! लठ्ठंभारती की जय!"

आईने हात झटकले!

"मी घरात नाही!" दबत्या आवाजात ती संतापून ओरडली. "देनीस, जा आणि सांग तिला, मी घरात नाही म्हणून! लौकर!"

मी परत टेलिफोनकडे धावलो. मारीया पेत्रोवना तेथे अधीरपणे किंचाळत होती आणि टेबलावर ठेवलेला रिसीव्हर घाबरून थडथड उडत होता.

मी रिसीव्हर उचलला. अगदी खरे सांगतो — एखादी बेडकी हातात धरल्यासारखा मला भास झाला.

"हॅलो! हॅलो!! हॅलो!!!"

मी म्हणालो: "तुम्ही ऐकताय?"

"होय," रिसीव्हर कडकडला. "ऐकतेय मी! आख्खा तासभर ताटकळत उभी आहे! काय भानगड? अनास्तासिया वासिल्येवनाला बोलवा!"

"ती घरात नाही," मी म्हणालो.

"शक्य नाही!" मार्या पेत्रोवना ओरडली. "ह्या वेळेला ती नेहमी घरात असते! तू काहीतरी चूक केलीस का मुली?"

"मी मुलगी नव्हे," मी म्हणालो. "आणि मी काहीही चूक केलेली नाही. अनास्तासिया वासिल्येवना घरात नाही. तिनं आत्ताच स्वतः तसं सांगितलं!"

"काय, तिनं स्वतः तसं सांगितलं?" संतापून तिने विचारले. "स्वतः?"

"होय, होय, स्वतः!" मी म्हणालो. "अगदी नक्की! आईनं स्वतः सांगितलं!"

"अग बाई, देनीस, तू बोलतो आहेस का," मारीया पेत्रोवना आनंदून म्हणाली. "देनीस, तू बोलतो आहेस?"

"नाही," मी म्हणालो. "मी नाही!"

आता ती पुरती गोंधळली.

"काही समजत नाही! कोण बोलतंय? देनीस, तू आहेस का?"

"नाही म्हटलं ना," चिडून मी म्हणालो. "मी नाही बोलत... तुम्हाला सांगितलं ना!"

ती दुष्टपणे हसली.

"अस्सं, तू नाहीस? तर मग कोण आहे, सांगा बघू!"

"माझा मित्र बोलतोय," मी म्हणालो.

"वात्रट मुलगा आहेस तू!" मार्या पेत्रोवना एवढ्या संतापाने किंचाळली, की रिसीव्हर-मधून ठिणग्या पडल्याचा व धूर बाहेर आल्याचा मला भास झाला.

"मी सगळी हकीकत सांगीन! काय हा वाह्यातपणा? छी:? अशी हिंमत कशी करतोस? मी तुला असा इंगा दाखवीन... समजलास?"

हातात कडकडणाऱ्या रिसीव्हरचे काय करावे ते मला सुचेना. मी पुरता भांबावलो होतो. मी म्हणालो:

"अहो बाई! मी सार्वजनिक टेलीफोनमधून बोलतोय! माझ्या पाठीमागं खूप लांब रांग लागलीय आणि माझ्यापायी सर्वांचा खोळंबा झालाय! इथं पाटी लावलीय: 'तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ संभाषण करण्यास मनाई आहे.' ओरडू नका! तुमचा वेळ संपला!"

पण ती तशीच किंचाळत, ओरडत, गुरगुरत होती व रिसीव्हरच्या माझ्या हातात अक्षरशः ठिकऱ्या उडत होत्या, तो धगधगून पेटत होता. तेव्हा मी शांतपणे त्याला परत जागेवर ठेवले.

एका थेंबात घोडा ठार!

बाबा जेव्हा आजारी पडले, तेव्हा डॉक्टर घरी आले आणि बाबांना तपासून झाल्यावर म्हणाले:

"काही विशेष नाही. किंचित थंडी बाधलीय. पण मी तुम्हाला सल्ला देतो की, धूम्रपान बंद करा. तुमच्या हृदयात किंचित घरघर आवाज येतोय."

डॉक्टर निघून गेल्यानंतर आई म्हणाली:

"त्या नतद्रष्ट सिगारेटींपायी आजार ओढवून घेणं किती असंस्कृतपणाचं आहे. तू अजून तरुण आहेस, पण एवढ्यात तुझ्या हृदयात घरघर आणि खरखर सुरू झालीय!"

"तू निष्कारण बाऊ करतेस," बाबा म्हणाले. "माझ्या छातीत कसलाही आवाज होत नाही, खरखर तर मुळीच नाही. उगीच जरासा घरघर आवाज येतोय, पण तो ध्यानात घ्यायचा नाही."

"घेतला पाहिजे ध्यानात," आई आवाज चढवून म्हणाली, "मला तू चांगला ठाऊक आहेस! तुला बारीक घरघर नको, तर मोठ्ठा खडखडाट झाला म्हणजे खूष होशील!"

"कोणत्याही परिस्थितीत मला दणदण आवाज नकोय," बाबांनी तिला मधेच अडवले.

"मी दणदणत नाही," आईचा चेहरा शरमून किंचित लालसुद्धा बनला, "पण तू समजून घे, सिगारेट ओढणं खरंच हानीकारक आहे. तुला ठाऊक आहे की, सिगारेटमधलं एक थेंब निकोटिन धडधाकट घोडा ठार मारायला पुरेसं ठरतं!"

असे होते तर! मी बाबांकडे पाहिले. ते धिप्पाड होते याबाबत काहीच वाद नव्हता, पण तरीही घोड्यापेक्षा लहान होते. माझ्यापेक्षा आणि आईपेक्षा ते मोठे होते, पण काही झाले तरी घोड्यापेक्षा लहान होते. एवढेच नव्हे तर सर्वांत रोड गायीपेक्षासुद्धा लहान होते. आमच्या दिवाणावर गाय कधीही मावली नसती, पण बाबांना दिवाण ऐसपैस पुरत होता. मी खूप घाबरलो. त्या विषाच्या एका थेंबाने बाबा ठार व्हावेत अशी माझी मुळीच इच्छा नव्हती. तसे मला कोणत्याही परिस्थितीत नको होते. ह्या विचारांपायी मला खूप वेळ झोप लागली नाही आणि केव्हातरी नकळत माझा डोळा लागला.

शनिवारी बाबा आजारातून बरे झाले व आमच्याकडे पाहुणे आले. यूराकाका कात्यांमावशी-बरोबर आले, बरीस मिखायलोविच आणि तमारामावशी आले. सगळेजण अगदी सभ्यपणे वागत होते. पण तमारामावशी येताच एकदम गजबज सुरू झाली. अखंड बडबड करत ती बाबांशेजारी चहा प्यायला बसली. टेबलापाशी बसल्यावर ती बाबांना सतत प्रश्न विचारू लागली, त्यांच्या प्रकृतीबद्दल चिंता दाखवू लागली आणि शेवटी शेवटी तर धांदलीपायी तिने बाबांच्या कपात चुकून तीन चमचे साखर टाकली. बाबांनी साखर ढवळली, चहाचा भुरका मारला व एकदम तोंड वाकडे केले.

"ह्या कपात मी एकदा साखर घातली होती," आई म्हणाली. तिचे डोळे गूझबेरींसारखे हिरवेगार बनले होते.

पण तमारामावशी गदगदून हसली. जणू टेबलाखालून कुणीतरी तिच्या पावलांना गुदगुल्या करत होते, अशा तऱ्हेने ती हसत होती. बाबांनी तो अतिगोड चहा बाजूला सारला. तेव्हा तमारामावशीने पर्समधून एक अगदी पातळ अशी छोटी सिगारेट-केस बाहेर काढली व बाबांना भेट दिली.

"चहा बिघडल्यामुळं तुम्ही चिडू नये म्हणून तुम्हाला ही सिगारेट-केस बक्षिस!" ती म्हणाली. "जेव्हा जेव्हा सिगारेट ओढाल, तेव्हा तेव्हा तुम्हाला हा मजेदार प्रसंग आणि गुन्हेगार अशा दोन्हींची आठवण होईल."

ह्या गोष्टीबद्दल मी तिच्यावर फार संतापलो. बाबांनी आजारपणात सिगारेट ओढणं जवळ जवळ सोडून दिले होते आणि आता ही बाई कशाला त्यांना सिगारेटीची आठवण करून देत होती? सिगारेटच्या निकोटिनचा एक थेंब घोडा ठार करतो, पण ही त्यांना सिगारेट ओढायची आठवण करून देतेय! मी म्हणालो:

"तुम्ही मूर्ख आहात, तमारामावशी! तुम्ही मेलात तर छान होईल! चालत्या व्हा माझ्या घरातून! तुमचे लठ्ठ पाय ह्या घरात पुन्हा कधीही दिसू नयेत!"

अर्थात हे सर्व मी स्वतःशी मनातल्या मनात म्हणालो, त्यामुळे माझे विचार कुणालाच समजले नाहीत.

बाबा त्या सिगारेट-केसला हातात खेळवत म्हणाले: "धन्यवाद, तमारा सेर्गेयेवना. मी फार हेलावून गेलोय. पण ही केस खूप लहान आहे, तिच्यात माझी एकही सिगारेट मावणार नाही. मी 'काझबेक' ओढतो. तरीही..."

बाबांनी माझ्याकडे नजर टाकली.

"देनीस," ते म्हणाले, "रात्रीच्या वेळी चहाचा तिसरा ग्लास पोटात रिचवण्याऐवजी माझ्या टेबलापाशी जा, तिथलं 'काझबेक' चं पाकीट घे आणि ह्या सिगारेट-केसमध्ये सिगारेटी मावतील अशा रीतीनं सिगारेटी काप. मधल्या कप्प्यात कात्री आहे!"

मी टेबलापाशी गेलो, सिगारेटचे पाकीट व कात्री ह्या वस्तू शोधून काढल्या आणि बाबांच्या आज्ञेप्रमाणे सिगारेट-केसमध्ये मावतील अशा बेताने सिगारेटी आखूड केल्या. मग भरलेली

सिगारेट-केस बाबांकडे घेऊन गेलो. बाबांनी केस उघडली, माझी कामगिरी पाहिली, नंतर माझ्याकडे पाहिले व एकदम खो खो हसायला सुरुवात केली.

"बघा, माझ्या शहाण्या मुलानं काय केलंय!"

सर्व पाहुणे लगबगीने केस बघायला धावले व कानठळ्या बसेपर्यंत हसू लागले. अर्थात सर्वांत मोठ्यांदा तमारामावशी हसत होती. खरे तर ती हसत नव्हती—तिच्या घशामधून आणि नाकामधून चमत्कारिक आवाज निघत होते. तिच्या तोंडामधून प्रथम चहा सांडला, मग अर्धा केक, दोन टॉफी आणि पुढचा दात...! पण तमारामावशीने पटकन तो दात उचलला आणि मूळ जागी परत बसवला. जणू काही घडलेच नव्हते अशा थाटात. त्यानंतर ती हसायची थांबली व बोटे वाकडी करून माझ्या डोक्यावर बोटांना आपटत म्हणाली:

"कार्डबोर्डाचे रिकामे होल्डर तसेच ठेवून जवळ जवळ सगळी तंबाखू छाटून टाकायची कल्पना तुझ्या डोक्यात कशी काय आली? खरे तर तंबाखू ओढतात आणि तू तंबाखूच कापून टाकलीस? तुझ्या डोक्यात काय आहे—वाळू किंवा लाकडाचा भुस्सा?"

मी म्हणालो: "तुझ्याच डोक्यात लाकडाचा भुस्सा आहे, ढोलमावशी!"

अर्थात मी हे स्वतःशी मनात म्हणालो. नाही तर आईने माझी खरडपट्टी काढली असती. पण आई माझ्याकडे वेगळ्याच नजरेने पहात होती.

"इकडं ये बघू," आईने माझी हनुवटी धरली. "माझ्या डोळ्यांमध्ये बघ!"

मी आईच्या डोळ्यांमध्ये पाहू लागलो आणि माझे गाल लालेलाल होत असल्याचे मला जाणवले.

"तू हे मुद्दाम केलंस?" आईने विचारले.

मी तिला फसवू शकत नव्हतो.

"हो," मी उत्तरलो, "मी हे मुद्दाम केलं."

"तर मग खोलीतून बाहेर जा," बाबा म्हणाले, "नाही तर माझे हात खाजायला लागलेत."

बाबांना काहीच कळले नव्हते. पण मी त्यांना समजावून सांगत बसलो नाही, खोलीमधून बाहेर गेलो.

काय चेष्टा आहे—एक थेंब घोड्याला ठार मारतो!

वीस वर्षे पलंगाखाली

ती हिवाळी संध्याकाळ मी कधीही विसरणार नाही. घराबाहेर खूप थंडी होती, वारा घूं घूं वाहात होता. गालांमध्ये खंजीर खुपसावे तसा झोंबत होता. बर्फाच्या वावटळी उठत होत्या. कमालीचे उदास आणि भकास वाटत होते. खूप मोठ्याने आरोळ्या ठोकण्याची इच्छा

हान होती. त्यातच आई-बाबा सिनेमाला गेले होते. त्यामुळे जेव्हा मीष्काने मला फोन करून स्वतःच्या घरी बोलावले, तेव्हा मी ताबडतोब कपडे चढवून त्याच्याकडे गेलो. तेथे खूप झगझगीत प्रकाश होता, खोली उबदार होती आणि खूप मंडळी जमली होती. आल्योन्का आली – तिच्या पाठोपाठ कोस्त्या आणि आन्द्रयूष्का आले. आम्ही खूप खेळ खेळलो. चिक्कार मजा आली व भरपूर गोंगाट केला. शेवटी आल्योन्का अचानक म्हणाली:

"आता आपण लपंडाव खेळू!"

आम्ही लपंडाव खेळू लागलो. मी आणि मीष्का विशेष खूष होतो, कारण लहान्यांवर मारखा डाव पडत होता: कोस्त्यावर अथवा आल्योन्कावर आणि आम्ही सतत लपत होतो, त्यांना दमवत होतो. पणं आमचे सगळे खेळ मीष्काच्या खोलीत चालले होते व आम्हाला त्यांचा लौकरच कंटाळा आला. कारण खोली फार छोटी आणि अडगळीची होती. आम्ही सारा वेळ कपडयांमागे अथवा कपाटामागे अथवा पेटीमागे लपत होतो. शेवटी शेवटी आम्ही हळूच आमच्या खेळाचा विस्तार कॉरीडॉरपर्यंत वाढवला.

कॉरीडॉरमध्ये खेळण्यात जास्त मजा येत होती, कारण प्रत्येक दारापाशी हँगर होते व त्यांच्यावर ओव्हरकोट आणि केसाळ कोट टांगलेले होते. आमच्या दृष्टीने हे जास्त छान होते, कारण ज्याच्यावर डाव असायचा, त्याला आम्ही नेमक्या कोणत्या कोटामागे लपलोय हे ओळखणे कठीण जात होते.

एकदा कोस्त्यावर डाव आला तेव्हा त्याने भिंतीकडे तोंड केले आणि तो मोठ्यांदा ओरडला:

"एक! दोन! तीन! चार! पाच! आलो मी शोधायला!"

सगळे इकडे-तिकडे पळाले लपायला. कोस्त्या थोडा वेळ थांबला आणि परत ओरडला:

"एक! दोन! तीन! चार! पाच! आलो मी परत शोधायला!"

हा दुसरा इशारा होता. मीष्का खिडकीखालच्या चौकटीत घुसला, आल्योन्का कपाटामागे दडली आणि मी व आन्द्रयूष्का कॉरीडॉरमध्ये पळालो. तेथे आन्द्रयूष्का क्षणाचा विचार न करता एका केसाळ कोटामागे लपला. आत्तापर्यंत ती माझी लपायची जागा होती. असे आढळले की, मला लपायला जागाच उरली नव्हती! आन्द्रयूष्काला एक ठोसा हाणून त्याला तेथून हुसकावण्याचा माझा इरादा होता, पण तेवढ्यात कोस्त्याने तिसरा शेवटचा इशारा दिला:

"आलो रे आलो, सांभाळा!"

आता तो मला बघणार ह्या विचाराने मी घाबरलो, कारण अजून मी लपलोच नव्हतो. शिकारी पाठीशी लागलेल्या भेदरलेल्या सशासारखा मी कॉरीडॉरमध्ये सैरावैरा धावत होतो. ऐन मोक्याच्या क्षणाला मी एक उघडे दार पाहिले व पटकन आत घुसलो.

ती एक खोली होती व तिच्या भिंतीपाशी एक उंच आणि रुंद पलंग होता. तात्काळ मी त्या पलंगाखाली शिरलो. तेथे अनेक वस्तू विखुरलेल्या होत्या. मी त्यांना निरखून पाहू लागलो. वेगवेगळया फॅशनच्या अनेक सँडल तेथे पडल्या होत्या. पण त्या सगळ्या खूप जुन्या होत्या. शिवाय एक सपाट लाकडी पेटी होती. त्या पेटीवर एक पत्र्याची पन्हळ उलटी ठेवली

होती. मी तिच्यावर आरामशीर आडवा झालो. वेगवेगळ्या सपाता पहात असताना सतत माझ्या मनात विचार येत होता की, किती छान जागी मी लपलो होतो व कोस्त्या जेव्हा मला इथे पाहील, तेव्हा सगळेजण किती हसतील!

पलंगावरील आच्छादनाचा एक कोपरा मी आणखी खाली ओढला आणि माझ्या व खोली-च्या दरम्यान पडदा पाडला. कारण दारातून कोस्त्या केव्हा येतो आणि तो मला कसा शोधतो ते पहायची माझी इच्छा होती. पण तेवढ्यात कोस्त्याऐवजी म्हाताऱ्या एफ्रोसीन्या पेत्रोवना खोलीत आल्या. ही म्हातारी बाई तशी छान होती, पण थोडीशी चेटकिणीसारखी दिसायची.

टॉवेलला हात पुसत त्या खोलीत आल्या.

मी सतत त्यांच्यावर लक्ष ठेवून होतो आणि माझ्या मनात येत होते की, जेव्हा कोस्त्या मला पलंगाखाली पकडेल, तेव्हा त्यांना किती मजा वाटेल! आणखी गंमत यावी म्हणून मी त्यावेळी दातांमध्ये त्यांची एखादी सँडल धरीन. तेव्हा तर त्या बहुधा हसून हसून खाली कोसळ-तील. माझी खात्री होती की, आणखी एक-दोन सेकंदांच्या आत कोस्त्या खोलीत आला असता आणि त्याने मला शोधून काढले असते. म्हणून मी सतत आवाज न करता स्वतःशी खुदूखुदू हसत होतो.

मी खूप मजेत होतो. सतत एफ्रोसीन्या पेत्रोवनाकडे पहात होतो. तेवढ्या दरम्यान त्या शांतपणे दारापाशी गेल्या व एकदम त्यांनी थाडदिशी दार बंद केले. मग पाहतो तर त्यांनी किल्ली फिरवली! आता अडकलो! पुरता अडकलो!

खोलीत एकाएकी विलक्षण शांतता पसरली. माझ्या मनात आशा पालवली की, त्यांनी कदाचित मिनिटभरासाठी दार बंद केले असेल आणि परत त्या दार उघडतील, सर्व काही सुरळीत होईल, परत हशा होईल, मजा येईल आणि अशा अवघड जागी मला पकडल्याचा कोस्त्याला खूप आनंद होईल. म्हणून मी जरी घाबरलो होतो तरी पुरता घाबरलो नव्हतो आणि एफ्रोसीन्या पेत्रोवनांच्या पुढील हालचाली बारकाईने पहात होतो.

त्या पलंगावर बसल्या आणि माझ्या डोक्यावर स्प्रिंगा करकरल्या. मला त्यांचे पाय दिसत होते. त्यांनी पायांमधील सँडल काढून टाकले आणि तशाच अनवाणी दारापाशी गेल्या. आनंदाने माझी छाती धडधडू लागली.

माझी खात्री होती की, आता त्या कुलूप काढतील. पण तसे झाले नाही. झाले भलतेच! खट्ट! खोलीतील दिवा विझला. परत माझ्या डोक्यावर स्प्रिंगा करकरल्या आणि काळाकुट्ट अंधार भोवती पसरला. एफ्रोसीन्या पेत्रोवना पलंगावर निजल्या होत्या आणि मी तेथे पलंगाखाली लपलो होतो हे त्यांना माहीत नव्हते. मी आत बंद झालो होतो. सापळ्यात अडकलो होतो.

आणखी किती वेळ मी इथे पडून राहणार होतो? एक अथवा दोन तास असतील तर माझे भाग्य! पण सकाळपर्यंत? आणि सकाळी बाहेर कसे पडायचे? जर मी घरी गेलो नाही, तर आई-बाबा नक्की पोलीसात वर्दी देतील. मग पोलीस कुत्रा मदतीला घेऊन माझा शोध करतील. पण आमच्या पोलीसांपाशी एकही कुत्रा नसेल तर? जर पोलीसांना माझा शोध

लागला नाही तर? जर ही म्हातारी, ह्या एफ्रोसीन्या पेत्रोवना, सकाळपर्यंत झोपल्या आणि नंतर परत मला बंद करून स्वतःच्या आवडत्या चौकात सबंध दिवस फिरायला गेल्या, तर? तर काय? अर्थात मी त्यांच्या कपाटामधून काहीतरी घेऊन खाईन आणि त्या परत येतील तेव्हा मला परत पलंगाखाली लपावे लागेल, कारण मी त्यांचे पदार्थ चोरून खाल्ले म्हणून त्या माझ्यावर खटला भरतील! बदनामी टाळण्यासाठी मी अखंड काळ पलंगाखाली राहीन ही भलतीच आफत आली! अर्थात ह्यात एक जमेची बाजू म्हणजे मी शाळेचा सर्व काळ ह्या पलंगाखाली लपून काढीन. पण मग दाखल्याचे काय? शिवाय शरीराची वाढ? पलंगाखाली वीस वर्षांत मी भलताच वाढलेला असेन!

ह्या विचारासरशी माझा राग अनावर झाला आणि पन्हळीवर मी जोरात मूठ आपटली. एक भयानक आवाज उमटला! त्या विलक्षण शांततेत, मिट्ट अंधारात आणि माझ्या विचित्र परिस्थितीत मला तो आवाज आणखी वीसपटींनी मोठा भासला. माझे कान बधीर झाले.

भीतीने माझे काळीज गोठले. माझ्यावरची म्हातारी बहुधा ह्या आवाजाने जागी झाली होती. कदाचित केव्हाच तिला शांत झोप लागली असावी आणि आता पलंगाखालून एकदम — ठाक-ठाक! म्हातारी थोडा वेळ तशीच धापा टाकत पडून राहिली व नंतर मंद कापऱ्या आवाजात ओरडली:

"धा-वा!"

मला म्हणायची इच्छा होती: "अहो एफ्रोसीन्या पेत्रोवना, कशाला उगीच मदतीसाठी हाका मारताय? झोपा शांत, मी देनीस आहे!" मी त्यांना असे सांगणार होतो, पण तेवढ्यात मला एक जोरदार लांब शिंक आली व पाठोपाठ छोट्या शिंका आल्या:

"आ... छीक्! छीक्! छीक्! छीक्!..."

ह्या सगळ्या गडबडीत तेथे बहुधा पलंगाखाली धूळ उडाली व माझ्या नाकात गेली होती. पण माझ्या शिंकांनंतर एफ्रोसीन्या पेत्रोवनांची खात्री पटली होती की, पलंगाखाली काहीतरी भानगड होती. त्यांनी आता सगळ्या ताकदीनिशी किंचाळी फोडली:

"धा... वा...!"

का कुणास ठाऊक, पण मी यानंतर आणखी जोराने शिंकलो आणि आरोळीसारखा आवाज उमटला:

"आक्छी... ऊ ऊ ऊ!.."

एफ्रोसीन्या पेत्रोवनांनी माझी नवी शिंक ऐकताच परत दुबळ्या आवाजात म्हटले:

"चोर!.."

बहुधा त्यांनी विचार केला असावा की, जर चोर असतील तर खुशाल चोरी करोत, फारसे भयानक नाही. पण जर... आणि त्यांनी जोरदार किंकाळी फोडली:

"खून! खून!"

खोटे बोलण्याची कमाल झाली! कोण तिचा खून करतोय? कशाबद्दल? आणि कशाने?

रात्रीच्या वेळी अशा खोटया किंचाळया मारणे चांगले का? म्हणून मी सर्व सोक्षमोक्ष करायचा ठरवला. नाहीतरी त्या झोपत नव्हत्या, तर मी पलंगाखालून बाहेर पडायचे ठरवले.

अंधारात मला काही दिसत नसल्यामुळे मी धडपडत उठताना पत्र्याच्या पन्हळीचा जोरदार खडखडाट झाला. त्या भयानक आवाजापायी एफ्रोसीन्या पेत्रोवना आणखीच घाबरल्या व विचित्र शब्द ओरडू लागल्या: "चा... वा! धू... न!"

मी भिंतीजवळच्या विजेच्या दिव्याच्या बटणापाशी धावलो. पण बटणाऐवजी माझ्या हाताला किल्ली लागली. दार सापडले अशा कल्पनेने मी खूष झालो. मी चटकन किल्ली फिरवली, पण ते कपाटाचे दार होते. कपाटात मी शिरताच माझ्या डोक्यावर वेगवेगळया वस्तू कोसळू लागल्या.

एफ्रोसीन्या पेत्रोवना किंचाळत होत्या, मी घाबरून पुरता थिजलो होतो आणि बाहेर खऱ्या दरवाजावर कुणीतरी जोरजोराने ठोकत होते.

"ए देनीस! बाहेर ये! एफ्रोसीन्या पेत्रोवना! देनीसला द्या! त्याचे वडील आलेत शोधायला!"

माझ्या बाबांचा आवाज आला:

"माझा मुलगा तुमच्या घरात आहे का?"

तेवढ्यात खोलीत दिवा पेटला. दार उघडले गेले. खोलीत आमच्या पोरांची सगळी झुंड घुसली. मला शोधण्यासाठी ती खोलीभर धावाधाव करू लागली. मी जेव्हा कपाटामधून बाहेर पडलो, तेव्हा माझ्या डोक्यावर दोन टोप्या आणि तीन फ्रॉक होते.

बाबा म्हणाले:

"तुला काय झालं? कुठं नाहीसा झाला होतास?"

कोस्त्या आणि मीष्का यांनीसुद्धा विचारले:

"तू कुठं होतास? काय गंमत झाली? सांग आम्हाला!"

पण मी गप्प राहिलो. मला भासत होते की, मी खरोखरच पलंगाखाली वीस वर्षे राहिलो होतो.

चेंडूवरील मुलगी

निळ्या आकाशात लाल फुगा

अचानक आमचे दार सताड उघडले आणि कॉरीडॉरमधून आल्योन्का ओरडली :

"मोठ्या दुकानात वासंतिक बाजार भरलाय !"

ती भयानक मोठ्यांदा ओरडली होती आणि तिचे डोळे बटणांएवढे, मोठे विस्फारले होते. प्रथम मला वाटले, कुणाचा तरी भोसकून खून पडला. ती परत ठणाणा ओरडली :

"लौकर चल देनीस ! तिथं बुडबुड्यांचं क्वास * विकताहेत ! बँड वाजतोय आणि वेगवेगळ्या बाहुल्या आहेत ! धाव !"

आग लागल्याप्रमाणे किंचाळत होती. त्यामुळे मीसुद्धा थोडासा कावराबावरा झालो आणि मला काखेत गुदगुल्या होऊ लागल्या. मी घाईघाईने घरातून बाहेर पडलो.

आल्योन्का आणि मी एकमेकांचे हात धरून वेड्यांप्रमाणे मोठ्या दुकानाकडे धावलो. तेथे माणसांची खूप गर्दी उसळली होती. जमावाच्या मध्यभागी एका पुरुषाची आणि एका बाईची अशा दोन प्रचंड चकचकीत आकृत्या उभ्या होत्या. ती खरी माणसे नव्हती, पण त्यांच्या डोळ्यांची उघडझाप होत होती व बोलल्याप्रमाणे त्यांचे ओठ हलत होते. पुरुषाची आकृती गरजली :

"वासंतिक बाजाररररर ! वासंतिक बाजाररररर !"

बाई ओरडत होती :

"सुस्वागतम् ! सुसुसुस्वागतम् !"

आम्ही खूप वेळपर्यंत त्या आकृत्या पहात राहिलो. मग आल्योन्का म्हणाली :

"ती खरी माणसं नाहीत, तरी ओरडतात कशी ?"

"काही समजत नाही !"

तेव्हा आल्योन्का म्हणाली :

"पण मला माहीत आहे. त्या आकृत्या स्वत: नाही ओरडत. त्यांच्या आतमध्ये जिवंत

---

* क्वास – काळ्या पावाला आंबवून बनवलेले एक रशियन थंड पेय – अनु.

नट बसतात आणि दिवसभर ओरडतात. तेच आतून दोरी ओढतात आणि त्यामुळं बाहुल्यांचे ओठ हलतात."

मी पोट धरधरून हसलो.

"तू खरंच अजून लहान बाळ आहेस. त्या बाहुल्यांच्या पोटात सबंध दिवसभर नट कशाला बसतील? आख्खा दिवस आत बसून ओरडायचं? दम निघेल! मग खायचं-प्यायचं केव्हा? शिवाय इतर गोष्टी काय कमी... अगदी अडाणी मुलगी! त्यांच्यात बसवलेला रेडिओ ओरडतोय!"

आल्योन्का म्हणाली: "उगीच शहाणपणाचा टेंभा मिरवू नको!"

आम्ही पुढे गेलो. तेथे खूप माणसे होती. त्यांचे पोषाख रंगीबेरंगी होते, आनंद ओसंडत होता, बँड वाजत होता आणि एक माणूस लॉटरीची पेटी गरगर फिरवत ओरडत होता:

लौकर इकडे या!
इथे लॉटरीची तिकीटे घ्या!
मस्त डौलदार 'वोल्गा' मोटारीला,
जिंकायला उशीर करू नका!
'वोल्गा' मोटार नको ज्यांना,
छोटी 'मस्क्विच' तयार त्यांना!

त्याचे मजेदार ओरडणे ऐकूनसुद्धा आम्ही हसलो. आल्योन्का म्हणाली:

"काही झालं तरी रेडिओपेक्षा जिवंत माणूस ओरडतो, तेव्हा जास्त मजा येते!"

मोठ्या माणसांच्या गर्दीत आम्ही खूप वेळ धावपळ करत होतो. मोठी मजा आली. कुणा एका लष्करी पोषाखातील माणसाने आल्योन्काला बकोटींना धरून वर उचलले आणि त्याच्या बरोबरच्या माणसाने भिंतीवरचे एक बटण दाबले, तेव्हा भिंतीतून अचानक सुगंधी पाण्याचा फवारा उडाला. आल्योन्काला त्यांनी परत खाली ठेवले तेव्हा तिच्या सबंध अंगाला गोड वास येत होता. लष्करी माणूस म्हणाला:

"किती सुंदर आहे ही छोटुकली!"

पण आल्योन्का त्यांच्यापासून लांब पळाली आणि मी तिच्या पाठोपाठ. शेवटी आम्ही क्वासच्या ठेल्यापाशी पोहोचलो. माझ्यापाशी न्याहरीसाठी दिलेले पैसे होते, म्हणून मी आणि आल्योन्काने क्वासचे दोन-दोन मोठे ग्लास रिचवले. आल्योन्काचे पोट ताबडतोब फूटबॉलप्रमाणे दिसू लागले. माझ्या नाकात सतत झिणझिण्या येत होत्या. भलतीच मस्त मजा! नंतर परत आम्ही पळू लागलो तेव्हा माझ्या पोटात क्वास ढवळत असल्याचा आवाज मला ऐकू येत होता.

घरी जाण्याच्या हेतूने आम्ही रस्त्यावर धावलो. तेथे आणखीच छान वाटत होते. दुकानाच्या दारापाशीच एक बाई गॅसचे फुगे विकत होती.

त्या बाईला पाहताच आल्योन्का एकदम थबकली. ती म्हणाली: "अय्या! मला फुगा हवा!"

मी म्हणालो: "पण माझ्यासाठी आता पैसे नाहीत!"

"माझ्यापाशी एक नाणं आहे!" आल्योन्का.

"दाखव!" मी.

तिने खिशातून एक नाणे काढून दाखवले. मी म्हणालो: "ओहो! दहा कोपेक! अहो बाई, ह्या मुलीला एक फुगा द्या!"

फुगेवाली बाई हसून म्हणाली: "कुठला पाहिजे? लाल, पिवळा, निळा?"

आल्योन्काने लाल फुगा घेतला. आम्ही पुढे चालू लागलो. अचानक आल्योन्का म्हणाली: "तुला धरायचाय हातात फुगा?"

तिने फुग्याचा दोरा माझ्यापुढे धरला. मी फुगा घेतला. ताबडतोब मला जाणवले की, फुगा दोऱ्याला हलकेच हिसका देत होता. बहुधा त्याला उडून जायची इच्छा होती. तेव्हा मी दोरा थोडा ढिला सोडला, तर फुग्याने परत हिसका दिला. जणू तो उडून जायची परवानगी मागत होता. मला त्या फुग्याबद्दल एकाएकी दया वाटू लागली. जबरदस्तीने मी त्याला धरून ठेवतोय असे वाटू लागले. आणि मी त्या फुग्याला सोडून दिले. प्रथम तो फुगा माझ्यापासून दूर उडाला नाही. जणू त्याला मी सोडून दिले ह्यावर त्याचा विश्वास बसला नव्हता. पण मग त्याला स्वतःचे स्वातंत्र्य जाणवले आणि एकदम रस्त्यावरील दिव्यापेक्षा उंच त्याने झेप घेतली.

आल्योन्काने स्वतःचे डोके गच्च धरले. "आई ग! कशाला सोडलंस? पकड..."

आणि ती उंच उड्या मारू लागली. जणू काही फुग्यापर्यंत तिचे हात पोहोचणार होते! पण फुगा धरणे जमत नाही असे पाहिल्यावर रडत ती म्हणाली:

"कशाला तू सोडून दिलंस त्याला?"

मी काहीच उत्तर दिले नाही. मी वरती फुग्याकडे पाहिले. तो संथपणे तरंगत वर जात होता. जणू असे जाण्याची त्याची सबंध आयुष्यभराची इच्छा होती!

मी वरती पहात होतो, आल्योन्कासुद्धा वरती पहात होती. आमच्याभोवती अनेक मोठी माणसे गोळा झाली होती व तीसुद्धा वरती फुग्याकडे पहात होती. फुगा उडत वरती जात होता व हळू हळू त्याचा आकार बारीक होऊ लागला होता.

सर्वांत उंच इमारतीच्या शेवटच्या मजल्याजवळून तो उडत गेला, तेव्हा खिडकीतून कुणी-तरी डोके बाहेर काढून फुग्याला हात हलवला. पण फुगा आणखी वर चढला, टेलीव्हिजनच्या अँन्टेन्नापेक्षा वर गेला, कबूतरांच्या कळपापेक्षा वर गेला व अगदीच लहान दिसू लागला...

जेव्हा तो उडाला तेव्हा माझ्या कानात कसल्यातरी घंटा वाजल्या होत्या. आता तो जवळ जवळ दिसेनासा झाला. ससासारख्या गुबगुबीत लहान ढगामागे तो तरंगत गेला, परत त्यामागून बाहेर आला आणि अखेर पूर्ण अदृश्य झाला. बहुधा एव्हाना तो चंद्रापाशी अंतराळात पोहोचला होता. आम्ही अजूनही वरती पहात होतो आणि माझ्या डोळ्यांसमोर कसलेतरी ठिपके व वर्तुळे फिरू लागली होती. फुगा आता कुठेच नव्हता. आल्योन्काने एक हलका सुस्कारा टाकला. सगळे आपापल्या कामांना निघून गेले.

आम्हीसुद्धा निघालो. अगदी मुकाट. चालताना माझ्या मनात विचार येत होता की, वसंताच्या मोसमाचे आगमन किती सुंदर होते, सगळे लोक छान-छान कपडे करून आनंदात वावरत होते, मोटारी धावत होत्या, पोलीसाच्या हातांमध्ये पांढरेशुभ्र हातमोजे होते, आणि स्वच्छ निळ्या-निळ्या आकाशात आमचा लाल फुगा उडत होता... आल्योन्काला हे सर्व मी सांगू शकत नव्हतो याचे मला मनातल्या मनात वाईट वाटत होते. शब्दांनी समजावून सांगणे मला जमत नाही आणि जरी जमले असते, तरी आल्योन्काला त्यातले काही कळले नसते, कारण ती अजून खूप लहान होती. ती माझ्याशेजारून गुपचूप चालत होती आणि तिच्या गालां-वरची आसवे अजून सुकली नव्हती. स्वतःचा फुगा गमावल्याचे तिला अतीव दुःख झाले होते.

तर थेट घरापर्यंत आम्ही काहीही न बोलता पोहोचलो. आमच्या फाटकापाशी निरोपा-साठी जेव्हा थांबलो, तेव्हा आल्योन्का म्हणाली:

"जर माझ्याजवळ आणखी पैसे असते, तर मी आणखी एक फुगा विकत घेतला असता... तुला उडवायला देण्यासाठी!"

"तो जिवंत आहे आणि चमकतोय..."

एका संध्याकाळी घरासमोरच्या आवारात वाळूच्या ढिगापाशी बसून मी आईची वाट पहात होतो. कदाचित इन्स्टिटयूटमध्ये किंवा दुकानात तिला उशीर झाला होता, अथवा [illegible] खूप वेळ वाट पहावी लागली होती. नक्की कारण मला माहीत नव्हते. मात्र सगळ्यांचे आई-वडील एव्हाना कामावरून परतले होते, सगळी मुले त्यांच्याबरोबर एव्हाना आपापल्या घरांमध्ये गेली होती, चहा-पाव आणि चीज खात होती, पण माझ्या आईचा अजून पत्ता नव्हता...

घरांच्या खिडक्या प्रकाशाने उजळल्या होत्या, रेडिओवरून संगीत वाजत होते आणि आकाशात काळे मेघ दाटत होते. म्हाताऱ्या माणसांच्या दाढ्यांप्रमाणे ते भासत होते.

मला खूप भूक लागली होती, पण आईचा अजूनही पत्ता नव्हता. माझ्या मनात विचार आला की, माझ्या आईला भूक लागलीय आणि जगाच्या दुसऱ्या टोकाला ती माझी वाट पहात असे जर मला माहीत असते, तर मी क्षणात तिच्यापाशी धावत गेलो असतो, उशीर

केला नमता आणि वाळूच्या ढिगापाशी उदासवाणे बसवून तिला ताटकळत ठेवले नसते.

तेवढ्यात आवारात मीष्का आला. तो म्हणाला: "सलाम!"

मी म्हणालो: "सलाम!"

मीष्का माझ्यापाशी बसला व माझी मालमोटार त्याने हातात घेतली.

"ओहो!" मीष्का म्हणाला. "कुठून मिळवलीस ही मालमोटार? ती स्वतःच वाळू भरून घेते? स्वतःच ओतते? होय? कळ कुठाय? कशासाठी? तिला फिरवता येतं? होय? ओहो! घरी घेऊन जायला मला देशील?"

मी म्हणालो: "नाही, घरी देणार नाही. मला ही भेट मिळालीय. बाबांनी गावाला जायच्या आधी मला बक्षिस दिलीय."

मीष्काने गाल फुगवले आणि माझ्यापासून तोंड फिरवले. आवारात आणखी अंधार वाढला. आई केव्हा येते ते दिसावे म्हणून मी सतत फाटकाकडे लक्ष ठेवून होतो. पण अजून ती आली नव्हती. बहुधा रोझामावशी तिला वाटेत भेटली होती, दोघीजणी गप्पांमध्ये रंगल्या होत्या आणि माझा त्यांना विसर पडला होता. मी वाळूवर निजलो.

मीष्का म्हणाला: "मालमोटार देणार नाहीस?"

मी म्हणालो: "मीष्का, उगीच कटकट लावू नको!"

मीष्का म्हणाला: "तिच्या बदल्यात मी तुला एक ग्वाटेमाला आणि दोन बार्बाडोस देईन!"

मी म्हणालो: "बार्बाडोसची आणि मालमोटारीची तुलना तरी होऊ शकते का?"

मीष्का: "पोहण्याची रबरी ट्यूब हवी माझी?"

"ती फुटकी आहे!"

"तू चिकटव तिला!"

मी संतापलो. "आणि पोहू कुठं? न्हाणीघरातल्या टबात?"

मीष्काने परत गाल फुगवले. मग तो म्हणाला:

"ठीक आहे! एवढा चिकूपणा करतोस तर घे हे!"

त्याने माझ्यासमोर काड्यापेटी धरली. मी ती हातात घेतली.

"उघड तिला," मीष्का म्हणाला, "म्हणजे दिसेल!"

मी काड्यापेटी उघडली तेव्हा प्रथम मला काहीही दिसले नाही, मग छोटासा फिकट हिरवा उजेड दिसला. जणू माझ्यापासून खूप खूप दूर बारीक तारा लुकलुकत होता आणि त्याच-वेळी मी त्याला आता माझ्या हातात धरला होता.

"हे काय आहे, मीष्का," मी दबत्या आवाजात विचारले, "काय आहे हे?"

"काजवा," मीष्का म्हणाला. "काय, छान आहे ना? तो जिवंत आहे! समजलं?"

"मीष्का," मी म्हणालो, "घे माझी मालमोटार! कायमची! बक्षिस! आणि मला हा ताग दे मी त्याला घरी नेतो."

मीष्काने माझी मालमोटार उचलली व तो घरी पळाला. मी माझ्या काजव्याबरोबर तेथेच राहिलो, त्याला निरखून पहात राहिलो. त्याला कितीही वेळ पाहिले तरी माझे समाधान होत नव्हते. अगदी परीकथेतल्याप्रमाणे मला तो भासत होता: माझ्या हातांमध्ये त्याचा हिरवा प्रकाश उजळत होता, पण त्याचवेळी तो खूप दूरवरून लुकलुकत असल्याचा भास होत होता. माझा ऊर धपापू लागला, माझ्या काळजाचे ठोके मला ऐकू येऊ लागले, माझ्या नाकात झिण-झिण्या येऊ लागल्या आणि मला रडायची इच्छा होऊ लागली.

मी खूप वेळ तेथे बसून होतो, खूप वेळ. भोवती कुणीही नव्हते. जगातल्या सर्वांचा मला विसर पडला होता.

अखेरीस आई आली आणि मी खूप आनंदित झालो. आम्ही घरात गेलो. चहा प्यायला आणि पाव-चीज खायला सुरुवात केल्यावर आईने विचारले:

"तुझी मालमोटार कशी चालतेय?"

मी म्हणालो: "आई, मी तिच्या बदली दुसरी गोष्ट घेतली."

आई म्हणाली: "कमाल आहे! बदली काय घेतलंस?"

"काजवा!" मी उत्तरलो. "तो बघ – काड्यापेटीत राहतोय. दिवा विझव!"

आईने दिवा विझवला. अंधार झाला आणि आम्ही दोघे तो फिकट हिरवा तारा पाहू लागलो.

मग आईने परत दिवा पेटवला.

"खरंच, जादू आहे," ती म्हणाली. "पण तरीही, ह्या काजव्याच्या बरोबरीनं भारी किंमतीची मालमोटार कशी काय देऊन टाकलीस?"

"मी खूप खूप वेळ तुझी वाट पहात होतो," मी म्हणालो, "आणि मला फार उदास वाटत होतं. पण हा काजवा जगातल्या कुठल्याही उत्तम मालमोटारीपेक्षा जास्त चांगला आहे, असं मला आढळलं."

आईने माझ्याकडे निरखून पाहिले आणि विचारले:

"कोणत्या दृष्टीनं हा जास्त चांगला आहे?"

मी म्हणालो: "तुला एवढं कसं समजत नाही? तो जिवंत आहे! आणि चमकतोय!.."

जुना खलाशी

मार्या पेत्रोवना आमच्याकडे वारंवार चहा प्यायला येते. ती खूप लठ्ठ आहे आणि उशीवर आच्छादन घालावे तसा फ्रॉक तिच्या अंगावर गच्च ताणून बसलेला असतो. तिच्या कानांवर वेगवेगळी कर्णभूषणे लोंबत असतात आणि कसल्यातरी गोड वासाच्या अत्तराने ती घमघमत

असते. हा वास मला जाणवला की, एकदम माझा श्वास घुसमटतो. मी दृष्टीला पडताच मार्या पेत्रोवना नेहमी मला प्रश्न विचारून सतावते: मोठेपणी मला कोण व्हावेसे वाटते आणि माझ्या वर्गामधील कोणती मुलगी मला जास्त आवडते? मला कोणतीही मुलगी आवडत नाही! आत्तापर्यंत मी पाच वेळा मार्या पेत्रोवनाला समजावून सांगितले, पण ती खो खो हसते आणि बोटाने मला दटावते. विचित्र आहे! ती आमच्याकडे पहिल्यांदा आली तेव्हा वसंताचा मोसम होता. झाडांना पालवी फुटली होती, खिडक्यांमधून हिरव्या पानांचा वास दरवळत होता आणि संध्याकाळ असूनसुद्धा अजून उजेड होता. आई मला झोपायला सांगत होती, पण माझी झोपायला जायची इच्छा नव्हती. तेव्हा ही मार्या पेत्रोवना अचानक म्हणाली:

"शहाण्यासारखा वाग, झोपायला जा. मग पुढच्या रविवारी मी तुला क्ल्याझ्मावरच्या आमच्या दाचावर घेऊन जाईन. विजेच्या आगगाडीमधून आपण जाऊ. तिथं नदी आहे, आमचा कुत्रा आहे आणि आपण तिघं होडीमधून भटकू..."

मी ताबडतोब बिछान्यावर निजलो, डोक्यावरून पांघरूण ओढून घेतले आणि पुढील रविवार कसा घालवीन याबद्दल कल्पना रंगवू लागलो: मी तिच्या दाचावर जाईन, गवतावर अनवाणी धावेन, नदी पाहीन, कदाचित मला ती होडी वल्हवायला देईल, वल्ह्यांची कडी खणखण वाजतील, पाणी खळखळेल आणि काचेसारखे पारदर्शी पाण्याचे थेंब परत नदीत ठिपकतील. तेथे मी कुत्र्याबरोबर मैत्री करीन, त्याच्या पिवळ्या डोळ्यांमध्ये रोखून पाहीन आणि ऊष्म्यामुळे जेव्हा तो जीभ बाहेर काढून लाळ गाळू लागेल, तेव्हा त्याच्या सुंदर जिभेला मी स्पर्श करीन.

तर अशा कल्पना रंगवत मी पडून होतो, मार्या पेत्रोवनाचे हसणे ऐकत होतो आणि नकळत मला झोप लागली. नंतर सबंध आठवडाभर झोपायच्या वेळी माझ्या मनात हेच विचार पुनः-पुन्हा येत होते. जेव्हा शनिवार उजाडला, तेव्हा मी बूट स्वच्छ केले, दात घासले, माझ्या छोट्या चाकूला धार लावली, कारण जंगलात अगर खेड्यात स्वतःसाठी एखादी काठी तासावी लागली असती. सकाळी मी सर्वांआधी उठलो होतो, कपडे चढवून मार्या पेत्रोवनाची वाट पहात बसलो होतो. बाबांनी न्याहरी केल्यावर आणि वर्तमानपत्र वाचल्यावर मला म्हटले:

"चल देनीस, तळ्याकाठी फिरायला जाऊ!"

पण मी त्यांना म्हणालो:

"कमाल आहे तुमची, बाबा! मार्या पेत्रोवनाचं काय? आत्ता ती माझ्यासाठी येईल आणि आम्ही क्ल्याझ्माला जाऊ. तिथं कुत्रा आहे, होडी आहे. मला मार्या पेत्रोवनाची वाट पाहिली पाहिजे."

बाबा गप्प झाले, मग त्यांनी आईकडे पाहिले, नंतर खांदे उडवले आणि चहाचा दुसरा ग्लास प्यायला आरंभ केला. मी घाईघाईने न्याहारी आटोपून अंगणात गेलो. मार्या पेत्रोवना

येत असताना पटकन दिसावी म्हणून मी फाटकापाशीच फिरत होतो. पण तिचा खूप वेळ पत्ता नव्हता. तेवढ्यात मीष्का माझ्यापाशी आला. तो म्हणाला:

"चल, पोटमाळ्यावर चढू या! कबूतरांची पिल्लं जन्मली अथवा नाही, ते पाहू..."

"मला शक्य नाही... मी दिवसभरासाठी खेड्यात जातोय. तिथं कुत्रा आहे आणि होडी आहे. आत्ता माझ्यासाठी एक बाई येईल आणि मग आम्ही दोघं विजेच्या आगगाडीमधून जाणार आहोत."

तेव्हा मीष्का म्हणाला: "अरे वा! मग मलासुद्धा तुमच्याबरोबर घेऊन जाल का?"

मीष्का आमच्याबरोबर यायला तयार झाला ह्याचा मला खूप आनंद झाला, कारण एकट्या मार्या पेत्रोवनाबरोबर भटकण्यापेक्षा मीष्का संगतीला असला म्हणजे जास्त मजा येणार होती. मी म्हणालो:

"ह्यावर चर्चा करायचं कारणच नाही! अर्थात, आम्ही तुला आनंदानं आमच्याबरोबर घेऊन जाऊ! मार्या पेत्रोवना फार चांगली आहे!"

आम्ही दोघे तिची वाट पाहू लागलो. गल्लीत टोकाला उभे राहून खूप वेळपर्यंत आम्ही तिची वाट पाहिली. एखादी बाई रस्त्यावर दिसली म्हणजे दरवेळी मीष्का मला विचारायचा: "ही?"

मग मिनिटभरानंतर परत: "ती?"

पण त्या सर्व अनोळखी बायका होत्या. आम्हाला उदास वाटू लागले, उकडू लागले आणि खूप वेळ वाट पाहून पाहून आम्हाला कंटाळा आला.

मीष्का चिडून म्हणाला: "मला वीट आला!"

आणि तो निघून गेला.

पण मी वाट पहात राहिलो. दुपारच्या जेवणापर्यंत मी तिची वाट पाहिली. जेवणाच्या वेळी बाबा परत मला म्हणाले:

"तर मग येणार तळ्यावर फिरायला? ठरव लौकर, नाही तर मी आणि आई सिनेमाला जाऊ!"

मी म्हणालो: "मी वाट बघतो! कारण मी तिला वचन दिलंय – वाट पाहीन म्हणून! ती येणारच नाही असं होणार नाही!"

पण ती आली नाही. त्या दिवशी मी ना तळ्यावर गेलो, ना कबूतरे पहायला गेलो आणि बाबा जेव्हा सिनेमाहून परत आले, तेव्हा त्यांनी मला फाटकापासून दूर जायला सांगितले. आम्ही घराकडे निघालो तेव्हा माझ्या गळ्याभोवती हात टाकून बाबा म्हणाले:

"तुझ्या आयुष्यात अजून खूप गोष्टी व्हायच्या आहेत: खेड्यात जाशील, गवतावर अनवाणी

धावशील, नदीवर जाशील, होडीतून भटकशील, कुत्र्याशी मैत्री करशील... सगळं होईल! असा मान खाली घालून उदास राहू नको!"

पण मी जेव्हा बिछान्यावर निजलो, तेव्हा परत माझ्या मनात खेड्याविषयी, होडीविषयी आणि कुत्र्याविषयीचे विचार घोळू लागले. मात्र ह्यावेळी माझ्या कल्पनेत मी मार्या पेत्रोवना-बरोबर भटकत नव्हतो, तर मीष्का आणि बाबांबरोबर अथवा मीष्का आणि आईबरोबर भटकत होतो.

काळ उलटला आणि मार्या पेत्रोवनाबद्दल मी पूर्ण विसरून गेलो. पण एक दिवस अचानक दारात मार्या पेत्रोवना उभी! कानांमध्ये लोंबणारी कर्णफुले चमचमत होती, तिने आईचे मटामट मुके घेतले आणि सबंध घरभर अत्तराचा गोडूस वास घमघमला. टेबलापाशी सर्वांची बैठक भरली, हसण्याच्या आवाजांनी घर दुमदुमू लागले आणि चहापानाला सुरुवात झाली. पण मी मार्या पेत्रोवनापाशी न जाता कपाटामागे बसलो, कारण तिच्याविषयी माझ्या मनात राग होता. पण ती मात्र जणू काहीच घडले नव्हते अशा थाटात बसून होती ह्याचे मला आश्चर्य वाटले! जेव्हा तिचा आवडता चहा पिऊन झाला, तेव्हा तिने अचानक माझ्याकडे मोर्चा वळवला आणि माझ्या हनुवटीला धरत विचारले:

"तू असा उदास का?".

"मी मुळीच उदास नाही..." मी म्हणालो.

"चल, बाहेर ये," मार्या पेत्रोवना म्हणाली.

"मला इथंच छान वाटतंय!" मी.

तेव्हा ती खूप जोरजोरात हसली आणि तिच्या अंगावरील सर्व दागिने किणकिणले. भरपूर हसून झाल्यानंतर ती म्हणाली:

"मी तुला काय बक्षिस देऊ?"

"मला काहीही नको!" मी उत्तरलो.

"तलवार नको?"

"कोणती?"

"बुद्योन्नीची खरी! बाकदार!"

मी आनंदाने हरखलो.

"तुमच्यापाशी आहे?"

"आहे," ती म्हणाली.

"तुम्हाला स्वतःला नको?"

ती हसून म्हणाली: "मला काय करायची? मी बाईमाणूस, लष्करी काम मी शिकले नाही, मला काय करायची तलवार? त्यापेक्षा मी तुला ती बक्षिस देऊन टाकणं जास्त छान!"

"केव्हा ?" मी विचारले.

"उद्या," ती म्हणाली. तलवार देऊन टाकण्याबद्दल तिला मुळीच वाईट असे तिच्या एकूण चेहऱ्यावरून दिसत होते.

ज्याअर्थी ती स्वेच्छेने तलवार बक्षिस देऊन टाकायला तयार झाली, थोडी वेडपट बाई असावी, असा विचारसुद्धा माझ्या डोक्यात चमकून गे म्हणाली :

"तुझी शाळा सुटल्यावर तू घरी येशील, तेव्हा तलवार इथं असेल! ह पलंगावर ती तलवार मी तुझ्यासाठी ठेवून जाईन!"

"ठीक आहे," मी म्हणालो आणि कपाटामागून बाहेर आलो, टेबला तिच्याबरोबर चहासुद्धा प्यायलो व ती जायला निघाली तेव्हा दारापर्यंत तिला गेलो.

दुसऱ्या दिवशी शाळा संपेपर्यंत मी वर्गात कसाबसा बसलो आणि शाळा सु धूम ठोकली. धावताना मी उजवा हात हवेत फिरवत होतो. मी अजून न पा मी त्या हातात कल्पनेने धरली होती. त्या तलवारीने मी फॅसिस्टांची मुंडकी त्यांना भोसकत होतो, अल्जीअर्समधील काळ्या मुलांचे रक्षण करत होतो अ सगळ्या शत्रूंचा नायनाट करत होतो. अगदी कोबी चिरावा तसा मी त्यांना ह्या सगळ्या कल्पना घरापाशी पोहोचेपर्यंतच्या होत्या, पण घरी अस्सल तलव पहात होती – बुद्योन्नीची खरी तलवार! जर तसाच काही प्रसंग आला तर मी अ म्हणून दाखल होऊ शकलो असतो आणि माझी स्वतःची तलवार असल्यामुळे म दाखल करून घेतले असते. तेव्हा मी शूर वीर होईन, क्युबाला जाईन, फिडेल माझा फोटो वर्तमानपत्रात छापून येईल, आम्ही दोघे धीटपणे आणि हसऱ्या चेहऱ्य उभे राहू – मी माझ्या तलवारीसह आणि कॅस्ट्रो त्याच्या दाढीसह! घरात शिरताच माझ्या घडीच्या कॉटकडे धावलो. तेथे तलवार नव्हती. मी उशीखाली चा पांघरुणाखाली हात घालून पाहिला आणि पलंगाखाली वाकून पाहिले. पण तल नाही! नव्हतीच तलवार! मार्या पेत्रोवना शब्दाला जागली नव्हती. तलव मागमूस नव्हता आणि असणे शक्य नव्हते, कारण तलवारी काही आक नाहीत...

मी खिडकीपाशी गेलो. आई म्हणाली :

"कदाचित ती अजूनही येईल!"

मी म्हणालो : "नाही आई, ती नाही येणार. मला आधीच ठाऊक होतं.

आई म्हणाली : "मग तू घडीच्या कॉटखाली का बघत होतास?"

मी तिला खुलासा केला : "मला वाटलं, चुकून ती आली असली तर? समज यावेळी!"

ाली : "मला समजतं ! चल, खायला ये !"
ाशी आली . मी खाऊन घेतले आणि परत खिडकीत जाऊन बसलो .
ाण्याची मला इच्छा नव्हती .
आले तेव्हा आईने त्यांना सर्व हकीकत सांगितली . बाबांनी मला स्वत:पाशी
ी पुस्तकांच्या फडताळावरून एक पुस्तक काढले व ते म्हणाले :
, एका कुत्र्याबद्दलचं मस्त पुस्तक आपण वाचू ! पुस्तकाचं नांव आहे – 'माय-
माऊ ?' लेखक, जॅक लंडन ."

बाबांशेजारी आसन ठोकले आणि बाबा वाचू लागले . ते फार छान वाचतात !
ांगले होते . एवढे रंजक पुस्तक मी प्रथमच ऐकत होतो . कुत्र्याची साहसे त्यात
ो . एका जहाजाच्या अधिकाऱ्याने त्या कुत्र्याला चोरले आणि गुप्त खजिन्याच्या
ाा कुत्र्याला घेऊन जहाजामधून निघाला . त्यांचे जहाज तीन श्रीमंत माणसांचे
ाट दाखवत होता एक जुना खलाशी . तो आजारी, एकाकी म्हातारा होता .
ा कुठे होता हे आपल्याला माहीत आहे असे त्याने त्या तीन श्रीमंतांना सांगितले
हिऱ्यांचा आख्खा ढीग मिळेल असे आश्वासन दिले . त्याच्या ह्या आश्वासनाच्या
ंत लोक त्याला खाऊ-पिऊ घालत होते . मग अचानक असे आढळून आले की,
अपुरे असल्यामुळे त्या खजिन्याच्या ठिकाणापर्यंत पोहोचणे त्यांना अशक्य होते .
जुन्या खलाशाने त्यांना फसवले होते . त्याला उपासमारीने मरण्याची इच्छा
त्याने त्यांना फसवले .

ुस्तक वाचून संपवल्यानंतर परत जेव्हा त्यासंबंधी बोलू लागलो, तेव्हा बाबा
म्हणाले :

खलाशी भलताच नामी होता ! अट्टल फसव्या ! तुझ्या मार्या पेत्रोवनासारखा !"
ाणालो : "बाबा, तुम्ही भलतंच काहीतरी बोलता ! त्यांच्यात मुळीच साम्य
ाशानं निदान स्वत:चा जीव वाचवण्यासाठी त्या लोकांना फसवलं . तो एकटा
होता . पण मार्या पेत्रोवना ? ती काय आजारी आहे ?"

ाठणीत आहे !" बाबा म्हणाले .

!" मी म्हणालो . "जुना खलाशी जर खोटं बोलला नसता, तर तो बिचारा
ाकांच्या कपारींमध्ये वाऱ्या-पावसात मेला असता ! त्याच्या डोक्यावर निवारा
ार्या पेत्रोवनापाशी सर्व आधुनिक सोयींसकट मस्त घर आहे . शिवाय अनेक
ाच्या साखळ्या .. !"

ी कोत्या मनाची आहे !" बाबा म्हणाले .

ोरा देत मी म्हणालो : "पण जुना खलाशी उदार मनाचा होता . त्याने आपल्या
ा – त्या जहाजाच्या अधिकाऱ्याला – वाचवले . शिवाय त्यानं फक्त त्या दुष्ट

श्रीमंत माणसांना फसवलं. पण मार्या पेत्रोवनानं —मला! कशाला ती मला असं फसवते? मी काय श्रीमंत आहे?"

"तू विसरून जा रे देनीस," आई म्हणाली. "उगीच झुरत बसायचं कारण नाही."

बाबांनी तिच्याकडे पाहिले, मान हलवली व ते गप्प बसले. आम्ही दोघे दिवाणावर गप्प पडून होतो. बाबांच्या अंगाची ऊब मला जाणवत होती आणि मला झोप घेरत होती. पण झोप लागण्याच्या जरा आधी माझ्या मनात विचार आलाच:

"नाही, माझ्या प्रेमळ, उदार मनाच्या जुन्या खलाशाची त्या भयानक मार्या पेत्रोवनाबरोबर मुळीच तुलना होऊ शकत नाही!"

कलिंगडांची गल्ली.

अंगणात फुटबॉल खेळून झाल्यावर खूप दमून आणि मळक्या अवतारात मी घरी आलो होतो. मी आनंदात होतो कारण शेजारच्या घराच्या संघाविरुद्ध ४४:३७ असा प्रचंड विजय आम्ही मिळवला होता. सुदैवाने न्हाणीघर मोकळे होते. मी झटपट हात धुतले आणि धावत खोलीत जाऊन टेबलापाशी बसलो. मी म्हणालो:

"आई, आत्ता मी सबंध बैल खाऊ शकेन!"

आई हसून म्हणाली: "जिवंत बैल?"

"हो, हो, जिवंत!" मी म्हणालो.

आई लगबगीने खोलीतून बाहेर गेली व दुसऱ्याच क्षणी हातात मोठी बशी घेऊन आली. बशीमधून मस्त वाफा निघत होत्या आणि मी ताबडतोब जाणले की, तिच्यात माझे आवडते आंबट सार होते. आईने बशी माझ्यासमोर ठेवली.

"खा!" ती म्हणाली.

पण ती शेवयांची दुधातील खीर होती. सायीचा तवंग असलेली. मी साय नुसती बघितली तरी मला उलटी येते. खाण्याचे तर दूरच.

मी म्हणालो:

"मला खीर नको!"

"खा मुकाट!" आईने दटावले.

"तिच्यात साय आहे!"

"तू माझा जीव घेणार कारट्या! कुठं आहे साय? जरा आरशात बघ स्वतःला! नुसता हाडांचा सापळा!"

"त्यापेक्षा तू ठार मार मला!" मी म्हणालो.

आईचा चेहरा लालबुंद बनला आणि तळहात टेबलावर आपटून ती ओरडली:

"उलट तूच मला ठार मारतो आहेस!"

तेवढ्यात बाबा तेथे आले. त्यांनी आमच्याकडे पाहिले व विचारले:

"कशाबद्दल वाद चाललाय? एवढी खडाजंगी कशाबद्दल?"

"बघ जरा!" आई म्हणाली. "खायची इच्छा नाही म्हणतो! पोराला लौकरच अकरा वर्षं पुरी होतील, पण एखाद्या मुलीसारखे नखरे करतो!"

मला लौकरच नऊ वर्षे पुरी होतील. पण आई नेहमी म्हणते की, मला लौकरच अकरा पूर्ण होतील. जेव्हा मी आठ वर्षांचा होतो, तेव्हा ती म्हणायची – मला दहा!

बाबा म्हणाले: "का नको म्हणतोय? खीर जळलीय अथवा खारट झालीय?"

मी म्हणालो: "शेवयांच्या खिरीवर साय आहे..."

बाबांनी मान हलवली.

"अस्सं! ह्या महाराजांना दुधामधली शेवयांची खीर खायची इच्छा नाही! त्यांना बहुधा चांदीच्या तबकामधून बदामी हलवा खायला पाहिजे!"

मग ते मला दरडावून म्हणाले: "मुकाट खीर संपव!"

"पण, तिच्यावर साय आहे!" मी कुरकुरलो.

"बंधू, तुला खाण्याचं अजीर्ण झालंय!" बाबा म्हणाले आणि आईकडे वळले. "घेऊन जा त्याची बशी! मला बघवत नाही! त्याला हे नको – ते नको!... एकेक नखरे! अजिबात सहन होत नाही मला!"

ते खुर्चीवर बसले आणि माझ्याकडे टक लावून पाहू लागले. त्यांच्या चेहऱ्यावर असा भाव होता, जणू मी त्यांना परका होतो. काहीही न बोलता ते नुसते परक्या नजरेने पहात होते. मला ताबडतोब समजले – मामला गंभीर होता! खूप वेळ बाबा गप्प बसले. आम्ही सगळेच गप्प होतो. मग अचानक ते बोलू लागले – पण ना मला, ना आईला उद्देशून, तर त्यांच्या कुणातरी मित्राला:

"नाही, तो भयानक शरदाचा मोसम कदाचित मी कधीही विसरणार नाही... मॉस्कोत तेव्हा खूप उदास वातावरण होतं... आयुष्य अवघड होतं... युद्ध चालू होतं, फॅसिस्ट मॉस्कोवर चालून येत होते. कडाक्याचा गारठा, उपासमार, वडीलधारी माणसं कपाळाला आठ्या घालून वावरत होती... दर तासाला रेडिओवरच्या बातम्या ऐकत होती... मी तेव्हा अकरा-बारा वर्षांचा होतो. माझी झपाट्यानं वाढ होत होती, उंची भराभर वाढत होती आणि मला सतत भूक लागायची. खाणे अपुरे पडायचे. मी नेहमी पाव मागायचा, पण माझ्या आई-वडलांपाशी जादा पाव नव्हता. स्वतःच्या रेशनचा पाव ते मला देत, मला तो अपुरा पडायचा. मी भुकेला झोपायचा आणि स्वप्नात मला पाव दिसायचा... माझी एकट्याचीच अशी अवस्था नव्हती,

सर्वांचीच तशी होती. इतिहास सर्वांना माहीत आहे. अनेकदा लिहिला गेलाय, अनेकदा वाचला गेलाय ...

"तर एकदा एका छोटचा गल्लीमधून मी चाललो होतो ... आमच्या घरापासून जवळच. अचानक समोर एक अवजड मालवाहू मोटार उभी असलेली दिसली. तिच्यावर कलिंगडांची प्रचंड रास रचलेली. मॉस्कोत ती कलिंगडं कशी येऊन पोहोचली होती कोण जाणे! वाट चुकलेली कलिंगडं! बहुधा रेशनकार्डावर वाटण्यासाठी ती आणली होती. त्या कलिंगडांच्या राशीवर एक लुकडा, दाढी वाढलेला माणूस उभा होता. त्याच्या तोंडात दात नसावेत असं भासत होतं. तो एकेक कलिंगड उचलून खाली उभ्या असलेल्या माणसाकडं फेकत होता, तो माणूस दुकानातील विक्रेत्या बाईकडे फेकत होता आणि बाई आणखी कुणाकडे तरी फेकत होती ... त्यांची छान साखळी जमली होती. मोटारीपासून दुकानापर्यंत कलिंगडांची हवेतून पाठवणी होत होती. दूरवरून पाहताना भासत होते की, माणसे हिरवा पट्टयापट्टयांचा चेंडू फेकण्याचा खेळ खेळत होती व त्या खेळात छान रंग भरलेला होता. मी खूप वेळपर्यंत त्यांच्याकडे पहात उभा होतो आणि तो मोटारीवरचा लुकडा माणूसही माझ्याकडे पहात होता, बोळक्या तोंडाने हसत होता. नंतर उभा राहून राहून मी थकलो आणि घरी परतायच्या बेतात होतो, तेवढयात त्या साखळीमधील कुणाचीतरी चूक झाली, बहुधा नजर दुसरीकडे वळली अथवा नेम हुकला आणि – धप्प!.. एक भलेमोठे कलिंगड फूटपाथवर आपटले. अगदी माझ्यासमोर! त्याला वाकडी चीर पडून ते फुटले. आतील शुभ्र पातळ साल, मधला तांबडा गर आणि त्यातल्या काळया बिया स्पष्ट दिसत होत्या. जणू कलिंगडाचे डोळे हसून मला खुणावत होते. तोंडाला पाणी सोडणारे ते कलिंगड पाहताच मला प्रखरतेने माझ्या भुकेलेपणाची जाणीव झाली. पण मी तोंड फिरवले आणि घराकडे निघालो. तेवढयात कुणीतरी हाक मारलेली मी ऐकली :

'ए मुला! ए मुला!'

मी मागे वळून पाहिले. तो कामगार माझ्या दिशेने धावत येत होता आणि त्याच्या हातांमध्ये ते फुटलेले कलिंगड होते. तो म्हणाला :

'हे घे कलिंगड, घरी नेऊन खा!'

मला क्षणाचीही उसंत न देता त्याने माझ्या हातात ते कलिंगड खुपसले आणि आपले काम करण्यासाठी तो परत मालमोटारीकडे धावला. मी ते जड कलिंगड कसेबसे घरापर्यंत हातांमधून वाहून आणले. मग माझा मित्र वालेंतिन ह्याला बोलावले आणि आम्ही दोघांनी त्या प्रचंड कलिंगडाचा फडशा पाडला. किती चवदार! वर्णन करणं अशक्य! आम्ही प्रथम त्या कलिंगडाच्या फाका कापल्या. त्या फाका एवढया मोठया होत्या की खाताना त्यांच्या टोकांमुळं आमचे दोन्ही कान ओले बनले. कलिंगडाचा गुलाबी रस आमच्या हनुवटयांवरून ओघळत होता. आमची पोटे फुगली आणि थेट त्या कलिंगडासारखी दिसू लागली. तशा टम्म पोटावर बोटांचा आघात केला म्हणजे अगदी नगारा वाजत असल्यासारखं वाटतं! आम्हाला एकाच गोष्टीचं

वाईट वाटत होतं… आमच्यापाशी पाव नव्हता. जर पाव असता, तर फार मजा आली असती…"

बाबांनी तोंड फिरवले आणि ते खिडकीबाहेर पाहू लागले.

"पुढं मोसम आणखीच वाईट बनला," ते म्हणाले. "गारठा वाढला, आकाशातून कोरडा बर्फ कोसळू लागला, वाऱ्यानं तो बर्फ उडू लागला. आम्हाला खाण्याच्या वस्तूंचा आणखीच तुटवडा पडू लागला. फॅसिस्टांच्या झुंडी मॉस्कोच्या दिशेनं पुढं पुढं सरकत होत्या. मी सतत भुकेला होतो. स्वप्नात पावाशिवाय दुसरं काहीही दिसायचं नाही. त्याच्या जोडीला कलिंगडंही दिसायची. एके सकाळी तर भुकेपायी मला दुसरं काहीही सुचेना. मी वालेंतिनला बोलावून म्हटलं:

'चल वाल्या, त्या कलिंगडांच्या गल्लीत जाऊ. कदाचित तिथं परत कलिंगडांना मालमोटारीतून खाली उतरवत असतील. परत एखादं कलिंगड चुकून रस्त्यावर आपटून फुटेल आणि ती माणसं परत आपल्याला ते फुटकं कलिंगड देतील.'

"आम्ही दोघांनी आमच्या आजीबाईंच्या रुमालांनी डोकी गुंडाळून घेतली, कारण गारठा भयानक होता आणि कलिंगडांच्या गल्लीपर्यंत गेलो. रस्त्यावर कुंद वातावरण होते, माणसांची वर्दळ कमी होती, आतासारखा गोंगाट नव्हता. कलिंगडांच्या गल्लीत तर जवळजवळ कुणीच नव्हतं. दुकानाच्या दारासमोरच्या फुटपाथवर उभे राहून कलिंगडांनी भरलेल्या मालमोटारीची आम्ही वाट पाहू लागलो. पण काळोख पडला तरी मालमोटार आली नाही. मी म्हणालो: 'बहुधा उद्या येईल…' वाल्या म्हणाला: 'हो, बहुधा उद्या येईल!'

"आम्ही दोघं घरी परतलो. दुसऱ्या दिवशी परत गल्लीत गेलो, परत निराशा! आम्ही रोज तिथपर्यंत जात होतो, वाट पहात होतो, पण कलिंगडांनी लादलेली मालमोटार परत कधी आली नाही…"

बाबा गप्प झाले. त्यांनी खिडकीबाहेर नजर लावली. जणू मला आणि आईला दिसू शकत नव्हते असे काहीतरी त्यांना दिसत होते. आई त्यांच्यापाशी गेली, पण बाबा पटकन उठले आणि खोलीमधून बाहेर निघून गेले. आई त्यांच्या पाठोपाठ गेली. मी तेथे एकटाच उरलो. मीसुद्धा बसल्या बसल्या खिडकीबाहेर पाहू लागलो – जिकडे मघाशी बाबा पहात होते – आणि मला भास झाला की, बाबा आणि त्यांचा मित्र थंडीत कुडकुडत वाट पहात उभे असल्याचं मी पाहतोय. त्यांना वारा झोंबत होता, बर्फाचा त्यांच्यावर मारा होत होता, पण तशा त्या भयानक गारठ्यात कुडकुडत ते वाट पहात होते… मला कसेतरीच वाटू लागले आणि मी पटकन समोर बशी ओढून घेतली व चमच्यामागून चमचे पोटात ढकलले. मग उरलेली खीर बशी तिरकी करून संपवली, पावाने बशी पुसून पाव खाल्ला आणि चमचा जिभेने चाटून स्वच्छ केला.

निळी कटयार

ही हकीकत अशी घडली. आमचा हस्तव्यवसायाचा तास चालला होता. राईसा इवानोव-नांनी आम्हाला कॅलेंडर बनवायला सांगितले होते. रोजची तारीख फाडता येईल अशा तऱ्हेचे. आम्ही आपापली डोकी चालवायची होती. मी कार्डबोर्डाचा एक तुकडा घेतला, त्याच्यावर हिरवा कागद चिकटवला, त्याच्या मध्यभागी एक चीर पाडली व तिच्यात काड्यापेटी बसवली. मग काड्यापेटीच्या आकाराचा कागदांचा एक छोटा गठ्ठा कापला आणि ते कागद एका कडेशी एकत्र चिकटवले. पहिल्या कागदावर लिहिले: "मे दिनाच्या शुभेच्छा!"

छोटया मुलांसाठी ते फार सुंदर कॅलेंडर बनले होते. प्रत्यक्षात बाहुल्यांच्या घरासाठी ते बाहुल्यांचे कॅलेंडर होते. खेळातले. राईसा इवानोवनांनी ते बघून म्हटले: "मला खूप आवडलं!" त्यांनी मला "उत्तम" शेरा दिला.

मी स्वतःच्या जागेवर परत येऊन बसलो. दरम्यान ल्योवका बूरीन स्वतःचे कॅलेंडर दाख-वायला गेला. राईसा इवानोवनांनी त्याचे कॅलेंडर पाहून म्हटले: "अगदी गबाळं काम!" आणि त्यांनी ल्योवाला "बरा" शेरा दिला.

मधली सुटी झाली तेव्हा ल्योवा स्वतःच्याच बाकावर बसून राहिला. त्याचा चेहरा अगदी रडवा दिसत होता. दरम्यान शाईचा डाग पुसून काढण्यात मी गर्क होतो. जेव्हा ल्योवकाचा रडवा चेहरा मी बघितला, तेव्हा हातात टिपकागद तसाच धरून मी ल्योवकापाशी गेलो. त्याला परत आनंदी करायची माझी इच्छा होती, कारण आमची छान मैत्री आहे आणि एकदा त्याने मला भोकाचे एक नाणे बक्षिस दिले होते. शिवाय काडतूसाचे रिकामे टोपण आणून द्यायचे त्याने मला कबूल केले होते आणि त्या टोपणापासून मी अणु-दुर्बीण बनवणार होतो.

मी ल्योवकापाशी जाऊन म्हणालो: "काय रे, गबाळ्या!"

आणि त्याला चकणे डोळे करून दाखवले.

पण ल्योवकानें अचानक पेन्सिलीची पेटी माझ्या टाळक्यावर थाडदिशी मारली तेव्हा मला कळले — डोळयांसमोर ठिणग्या कशा चमकतात! मला ल्योवकाचा खूप राग आला आणि सगळी शक्ती एकवटून त्याच्या मानेवर मी टिपकागद घासला. अर्थात त्याला तो मुळीच जाणव-ला नाही आणि दप्तर उचलून तो घरी निघून गेला. माझ्या डोळयांमधून मात्र पाण्याच्या धारा वाहू लागल्या — ल्योवकाने मला सणसणून मारले होते. माझ्या हातामधील टिपकागदावर माझी आसवे टपटप गळत होती. बिनरंगाचे डाग त्यावर उमटत होते...

तेव्हा मी ल्योवकाला ठार मारायचे ठरवले. शाळा सुटल्यानंतर मी सबंध दिवसभर घरात बसून शस्त्र बनवत होतो. बाबांच्या लिहिण्याच्या टेबलावरची कागद कापण्याची प्ला-स्टिकची निळी सुरी मी घेतली होती आणि सबंध दिवसभर तिला धार काढत होतो. अगदी

मेज लावून मी तिला धार काढली. तिला धार खूप हळू हळू चढत होती. धार काढताना माझ्या मनात विचार येत होते: उद्या मी वर्गात जाईन, माझी विश्वासू निळी कटचार ल्योवकासमोर परजेन. मग ल्योवका माझ्यासमोर गुडघे टेकून जीवदानाची विनवणी करील आणि मी म्हणेन:

"माफी माग!"

तो म्हणेल: "माफ कर!"

मी प्रचंड गडगडाटी हास्य करीन: "हा-हा-हा-हा!"

त्या हसण्याचे प्रतिध्वनी दऱ्यांमध्ये खूप वेळ घुमत राहतील. मुली घाबरून बाकांखाली दडतील.

रात्री मी झोपलो तेव्हा सतत ह्या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत होतो, उसासे टाकत होतो. कारण ल्योवकाबद्दल मला वाईट वाटत होते. तसा तो चांगला माणूस होता, पण आता त्याला त्याच्या केल्या कर्माचे फळ भोगणे प्राप्त होते. माझ्या डोक्यावर पेटीचा तडाखा मारल्याबद्दल! निळी कटचार माझ्या उशीखाली होती आणि तिची मूठ पकडून मी जवळ जवळ कण्हत होतो. शेवटी आईने माझ्यापाशी येऊन विचारले:

"तू कण्हतोस कशाला?"

"काही नाही!" मी म्हणालो.

"तुझ्या पोटात दुखतंय?" आईने विचारले.

मी तिला काहीच उत्तर दिले नाही. नुसती भिंतीकडे कूस वळवली आणि गाढ झोपेत असल्याचा बहाणा करून खोल श्वास घेऊ लागलो.

सकाळी मला काहीही खाववेना. दोन कप चहा प्यायलो, लोणी-पाव आणि उकडलेले बटाटे व सॉसेज खाल्ले. मग शाळेत गेलो. निळी कटचार पटकन बाहेर काढता यावी म्हणून तिला मी दप्तराच्या वरच ठेवली.

वर्गात जाण्याआधी खूप वेळपर्यंत मी वर्गाच्या दारातच उभा राहिलो. छातीत विलक्षण धडधडत होते. शेवटी धीर करून मी दार लोटले व आत गेलो. वर्गात सर्व काही नेहमीप्रमाणे होते. ल्योवका खिडकीपाशी वालेराबरोबर उभा होता. त्याला पाहताच कटचार उपसण्यासाठी मी दप्तरात हात घातला. दरम्यान ल्योवका माझ्यापाशी धावत आला. मला वाटले की, परत तो माझ्यावर टाळक्यावर पेटी अथवा दुसरी काहीतरी वस्तू मारणार. म्हणून मी घाईघाईने दप्तर उघडू लागलो. पण ल्योवका माझ्यापाशी एकदम थांबला, पावलांची चाळवाचाळव करू लागला आणि नंतर माझ्या दिशेने झुकून म्हणाला:

"घे!"

त्याने माझ्यासमोर काडतूसाचे रिकामे पिवळे टोपण धरले. त्याला आणखी काहीतरी बोलायचे होते असे त्याच्या डोळ्यांवरून दिसत होते, पण तो लाजत होता. त्याने काही बोलावे

अशी माझी मुळीच अपेक्षा नव्हती. फक्त मी संपूर्ण विसरलो होतो की, मी त्याला ठार मारणार होतो! जणू काही तसा विचारसुद्धा माझ्या मनाला कधी शिवला नव्हता.

मी म्हणालो: "किती छान टोपण आहे!"

मी त्याच्याकडून ते टोपण घेतले. आणि स्वतःच्या जागेवर जाऊन बसलो.

निळ्या चेहऱ्याचा माणूस

वालोद्याकाकाच्या दाचाजवळ आम्ही ओंडक्यांवर बसलो होतो. बाबा माझ्या धनुष्यासाठी काठी तासत होते आणि मी दोरीला मेण लावत होतो.

सर्व काही शांत-निवांत होते. फक्त गल्लीत खडी दाबायच्या यंत्राचा आवाज होत होता. त्या यंत्राला चाकांऐवजी दोन मोठे रूळ होते आणि आमच्या वस्तीत अस्फाल्टचा रस्ता बनविण्याचे काम ते करत होते. ह्या यंत्रावर बसण्याची आसने खूप उंचावर होती. आमच्याजवळून जेव्हा ते यंत्र गेले, तेव्हा आमच्या कुंपणावरून रस्ताकामगाराचे डोके तरंगत जाताना दिसले. त्याचा चेहरा संपूर्ण निळा होता, कारण त्याची दाढी खूप वाढली होती. तो रोजच्या रोज दाढी घोटत होता. त्यामुळे त्याचा चेहरा नेहमी निळा दिसायचा. ह्या निळ्या चेहऱ्याशेजारी लाल गालांच्या एका मुलीचा चेहरा तरंगत गेला. ती त्याची मदतनीस होती. तिचे काळे डोळे सुंदर होते आणि पापण्या लांब होत्या.

मला ठाऊक होते की, ते कामगार जवळच्या सोसेन्कीमधल्या त्यांच्या तळावर जेवायला गेले होते. त्यांनी रात्रीच रस्त्याचे काम सुरू केले होते, जेव्हा सगळे झोपले होते आणि हवेत उकाडा नव्हता.

ह्या निळ्या चेहऱ्याच्या माणसाने एकदा माझ्या पायावर छडीचा सणसणीत फटकारा मारला होता, कारण तो थोडा दूर गेला असताना मी त्याचे यंत्र सुरू करायचा प्रयत्न केला होता. तेव्हा त्याने मला चांगलाच छडीचा प्रसाद दिला होता, म्हणून मला तो आवडत नव्हता. आता तो माझ्याबद्दल बाबांपाशी कदाचित तक्रार करील अशी मला भीती वाटली होती, पण देवाच्या कृपेने त्याचे माझ्याकडे लक्षच गेले नव्हते आणि तो पुढे निघून गेला होता.

मी आणि बाबा एकमेकांशेजारी ओंडक्यांवर बसलो होतो, मी शीळ घालत होतो, बाबा गप्प होते. आम्ही फक्त अधूनमधून एकमेकांकडे पाहून किंचित स्मित करत होतो, कारण आम्हाला उन्हाळयात ह्या वस्तीत रहायला खूप आवडत होते. आम्ही एव्हाना इथे सहा दिवस रहात होतो, माझी शेजारच्या मुलांशी मैत्री जमली होती, सर्व कुत्र्यांशी ओळख झाली होती आणि प्रत्येकाचे नांव-आडनांव ठाऊक झाले होते. आम्ही होडीतून भटकत होतो, शेकोट्या पेटवत होतो, अळंब्या गोळा करायला जात होतो आणि दूरच्या मैदानात एक सांबर-मादी व तिचे पिलू धावत जात असताना पाहिले होते.

45

आज मी आणि बाबांनी धनुष्यामधून तिरंदाजी करण्याचे ठरवले होते व नंतर खूप उंच आकाशात, अगदी सूर्यापर्यंत, पतंग उडवण्याचा बेत केला होता.

ह्या सगळ्या बेतांविषयी मी विचार करत असतानाच फाटकाचा आवाज झाला व आमचे शेजारी अलेक्सान्द्र सेम्योनिच आमच्यापाशी आले. त्यांची स्वतःची 'वोल्गा' मोटार होती. त्यांची आणि बाबांची मैत्री होती.

आमच्यापाशी बसत ते म्हणाले: "मोठी पंचाईत झालीय!"

बाबांनी विचारले: "काय झालं?"

अलेक्सान्द्र सेम्योनिच म्हणाले: "त्याचं आज लग्न आहे! पण माझा काय संबंध? आज लग्न, उद्या बारसं, परवा आणखी काही!... पण मी काय करायचं? ड्रायव्हरशिवाय बसून राहू?" त्यांनी हवेत मुठी वळवून कुणालातरी धमकावले. "तुमच्या लग्नापेक्षा माझी कामं जास्त महत्त्वाची आहेत!"

बाबा म्हणाले: "जरा स्पष्ट बोला!"

मग अलेक्सान्द्र सेम्योनिच म्हणाले की, त्यांचा ड्रायव्हर ल्योशा त्याच्या ओळखीच्या एका मुलीशी आज लग्न करणार होता.

"मग खुशाल करूं दे त्याला लग्न! तुम्हाला काय त्याचं?" बाबा म्हणाले.

पण अलेक्सांद्र सेम्योनिच संतापले होते.

"मला शहरात जाणं आवश्यक आहे," ते म्हणाले, "तातडीनं! समजलं?"

त्यांनी हातांनी स्वतःचा गळा चिरून दाखवला. पण बाबा गप्प बसले.

"अस्सं," दुष्ट सुरात अलेक्सान्द्र सेम्योनिच म्हणाले, "गप्प बसताय? काठचा तासताय? मैत्रीची भावना कुठं गेली?"

"मी सुटीवर आहे," बाबा म्हणाले. "मुलाबरोबर राहिलं पाहिजे."

"त्याचा प्रश्न नाही," असे म्हणून अलेक्सान्द्र सेम्योनिचनी माझ्या पाठीत धपका घातला. "त्याला आपण आपल्याबरोबर घेऊन जाऊ! पोराची मोटारीतून फिरण्याची हौस भागवली पाहिजे. खुशाल भटकूं दे आपल्याबरोबर!"

त्यांचा हेतू आता माझ्या लक्षात आला. मला ताबडतोब कसे बरे समजले नाही? कारण मोटार चालवायला त्यांना स्वतःला तर जमत नाही! स्वतःच्या मालकीची 'वोल्गा' त्यांना चालवता येत नव्हती. पण माझ्या बाबांना येत होती. 'वोल्गा', 'पबेदा', 'गाझ-५१' – कोणतीही मोटार ते चालवू शकत. बाबांपाशी मोटार चालवायचा परवाना आहे आणि मॉस्को – खाबारोवस्क मोटारशर्यतीत त्यांनी भागसुद्धा घेतला होता. मात्र त्यांची स्वतःच्या मालकीची मोटार नाही. पण ते मोटार चालवतात झकास! बाबांनी शहरापर्यंत मोटार नेऊन परत आणावी, म्हणून अलेक्सान्द्र सेम्योनिच आमच्यापाशी आले होते.

मला दिसत होते की, मोटार चालवण्याची बाबांची मुळीच इच्छा नव्हती, ऊन खात जुन्या विजारीत शांतपणे बसून काठी तासायला त्यांना आवडत होते, कुठेही जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण मोटारीतून भटकण्याच्या कल्पनेने मी मात्र हुरळून गेलो होतो, म्हणून मी ताबडतोब ओरडलो: "चला! उगीच चर्चा कसली करता?"

अलेक्सान्द्र सेम्योनिचसुद्धा ताडकन उठत मोठ्यांदा म्हणाले: "बरोबर! हुर्रा! चला! .."

आता बाबांचा नाइलाज झाला. मात्र विनंतीच्या सुरात ते म्हणाले: "पण बोलल्याप्रमाणं थेट जाऊन ताबडतोब परतायचं! पटकन! तीनच्या आत आपण इथं आलं पाहिजे!"

अलेक्सान्द्र सेम्योनिच गडगडाटी हसत स्वतःच्या छातीवर हात ठेवत म्हणाले: "दोनच्या आत परतू! जर दोनच्या आत आपण इथं नाही आलो, तर मी तात्काळ प्राण देईन!"

मी आणि बाबा कपडे बदलायला गेलो. मग अलेक्सान्द्र सेम्योनिचच्या अंगणामधून बाबांनी मोटार बाहेर काढली. ते दोघे पुढे बसले आणि मी पाठीमागे. समोरचा रस्ता दिसावा, स्पीडो-मीटर पाहता यावा, समोरून येणाऱ्या मोटारी पाहता याव्यात, बाबा नव्हेत तर मीच मोटार चालवतोय अशी ऐट मारता यावी, म्हणून मी ताबडतोब बाबांच्या पाठीशी उभा राहिलो. मी कल्पना केली की, मी मोटारीत बसलो नव्हतो, तर अंतराळयानात बसलो होतो आणि आकाशामधून उडत उडत थंड ताऱ्यांकडे जात होतो.

मला मोटारीतून जायला खूप मजा वाटत होती. भोवती हिरवेगार दिसत होते. गवत, मोठी झाडे, मडपातळ भोजाची झाडे – सगळी हिरवी हिरवी दिसत होती. वारा जोरात वाहात होता, उबदार होता आणि त्याच्यात पानांचा वास येत होता.

बाबांच्या पाठीशी उभा राहून शीळ घालत मी समोरचा रस्ता पहात होतो. रस्ता चांदी-सारखा चमकत होता आणि जरासा खाली झुकलो तर त्यावरची तापलेली हवा थरथरताना दिसत होती.

रस्त्यावर अधूनमधून पडलेल्या काही वस्तू मला दिसत होत्या: एखादी फळी – म्हणजे कुठल्यातरी ट्रकमधून पडली असावी; गवताची पेंडी – ती कशी तेथे पडली ह्याचा तर्क करणे सोपे होते; ड्रायव्हरांच्या हात पुसायच्या चिंध्या. आम्ही येण्याच्या आधी कोण कोण गेले होते ह्याची हकीकत जणू रस्ता सांगत होता.

आम्ही खूप वेगात जात होतो. स्पीडोमीटर सत्तरचा आकडा दाखवत होता. मी अंतराळयान चालवण्याचा खेळ खेळण्यात रमलो होतो. मी तरफा खेचत होतो, बटणे दावत होतो, मंगळाला आणि चंद्राला मागे टाकल्यानंतर पावंडा दाबून वेग वाढवत होतो. मग मी वजनरहित अवस्थेत होतो अशी कल्पना केली आणि खरोखर तसा वजनरहित होतो अथवा नाही ह्याची खात्री पटविण्यासाठी उड्या मारू लागलो.

मागे वळून न पाहता बाबांनी दटावले: "स्वस्थ उभा रहा!"

मी परत समोर पाहू लागलो. तेवढ्यात मला दिसले की, रस्त्यावरून एक मुलगी येत

होती! नेमकी आमच्या मोटारीसमोर आडवी धावत आली! अचानक कुठून आली कोण जाणे! जणू एकदम जमिनीतून वर आली! आमची मोटार जोरात उजवीकडे वळली आणि तिचा कर्णा कर्कश्य वाजू लागला... मला आठवते की, त्या मुलीनेही उजवीकडे उडी मारली आणि परत ती आमच्या मोटारीसमोर आली. मग भयानक घासण्याचे आणि खरवडण्याचे आवाज. जणू कुणीतरी शेपटीकडून मोटारीला जोरात धक्का मारल्याचा भास झाला. पुढे काही समजलेच नाही. माझ्या शरीरामधून विजेचा प्रवाह गेल्याचा मला भास झाला. मग मोटारीत कुणीतरी विव्हळले. त्यानंतर दातांचा कडकड आवाज झाला. मोटारीचा कर्णा अखंड वाजत होता. मी पुढच्या आसनाशी दाबला गेलो होतो आणि त्याला हातांनी घट्ट पकडून धरले होते. खिडकीमधून बाहेर पाहिले तेव्हा झाडे डावीकडे खाली कोसळल्यासारखी वाटली, परत सरळ उभी झाली व परत डावीकडे आडवी पडली... मग सर्व एकदम थांबले. मी हातां-पायांचा आधार घेतला होता. माझ्यावरची खिडकी उघडी होती... जणू मी पाणबुडीत होतो अथवा विहीरीच्या तळाशी. अचानक का कुणास ठाऊक पण मी मांजरासारखा वागू लागलो, हाताला येईल ती वस्तू ओरबाडू लागलो – आसनावरची आच्छादने, दाराच्या मुठी ... अखेर मी ताज्या हवेत बाहेर आलो. आमची मोटार एका कुशीवर कलंडली होती. सगळ्या खिडक्यांच्या काचा फुटल्या होत्या. इंजिनामधून थोडासा धूर येत होता. जुनी टोपी चेपावी तसे छप्पर चेपले होते. कर्णा सतत वाजत होता. किड्याला उलटे केल्यावर त्याचे पाय जसे वळवळताना दिसतात, तशी मोटारीची चाके फिरत होती.

दुसऱ्या खिडकीमधून एक माणूस बाहेर पडला. ते होते अलेक्सान्द्र सेम्योनिच. बाहेर पडताच ते थेट माझ्यापाशी आले. ते मला म्हणाले: "माझा डावा बूट कुठं आहे तुला ठाऊक आहे?"

खरेच त्यांच्या एका पायात बूट नव्हता. त्यांनी मोटारीकडे वळून पाहिले, हातांनी डोके गच्च पकडले व परत ते म्हणाले:

"मी बूट कुठं ठेवला आठवत नाही. शोध जरा!.."

मी गवतामध्ये बूट शोधू लागलो.

त्यांचा बूट कुठेच नव्हता, पण मोटारचा कर्णा कर्कश्यपणे वाजतच होता. मला तो भयानक आवाज ऐकवेना. माझ्या सबंध अंगावर शहारे उमटू लागले आणि मी मोटारपासून अधिक दूर गेलो.

रस्त्याच्या कडेपाशी एक ट्रक थांबला, त्यातून काही सैनिकांनी खाली उड्या मारल्या व ते खाली आमच्या दिशेने धावत आले. एका सैनिकाने मोटारीत डोकावून पाहिले व बाकीच्यांना उद्देशून तो ओरडला: "तिथं माणूस आहे! लौकर!.."

सैनिकांनी मोटार धरली व परत चाकांवर उभी केली. तिचा कर्णा अजूनही वाजत होता. जणू ती मदतीला हाक मारत होती. आणि आत्ता अचानक मला आठवण झाली की, मोटारीत चक्रापाशी माझे बाबा बसलेले होते!

असा कसा काय मी विसरलो! मला कसेतरीच वाटू लागले... मी मोटारीपाशी धावलो.

बाबांना काहीतरी विचित्र झाले होते. त्यांचे सबंध शरीर मागे वळले होते, जणू ते मागच्या खिडकीकडे पहात होते. वाकलेल्या चक्राखाली त्यांचा हात अडकला होता, त्यामुळे कर्णा वाजत होता. त्यांचा हात सुजला होता, काळा-निळा पडला होता आणि त्यातून रक्त वाहात होते.

सैनिकांनी चक्र सरळ करायला सुरुवात केली. त्यांनी पुढचे दार उघडले आणि बाबांना बाहेर यायला मदत केली. बाबांचा चेहरा फिकट पडला होता, त्यांचे डोळेसुद्धा फिके दिसत होते. त्यांचा हात लोंबत होता, जणू तो दुसऱ्या कुणा माणसाचा होता! मी धावत बाबांसमोर जाऊन उभा राहिलो, पण त्यांचे माझ्याकडे नीटसे लक्ष गेले नाही, कारण त्याचवेळी फटफटी-वरून दोन पोलीस आले. त्यांच्यापैकी एकाने म्हटले:

"परवाना दाखवा!"

बाबा त्या पोलीसाला तिरपे उभे होते, त्यामुळे त्यांचा रक्ताळलेला उजवा हात पोलीसाला दिसला नाही. बाबांनी डावा हात खिशात घालायचा प्रयत्न केला, पण त्यांना जमेना. मी त्यांच्या खिशातून त्यांचा परवाना काढून दिला. बाबांनी माझ्याकडे पाहिले. ते ज्या तऱ्हेने माझ्याकडे पहात होते त्यावरून मला जाणीव झाली की, हा सारा वेळ मी त्यांच्याबरोबरच होतो ह्या गोष्टीची त्यांना आत्ता कुठे आठवण झाली होती. त्यांनी डाव्या हाताने मला जवळ खेचले व माझ्यावर ओणवे होत ते बोलू लागले, तेव्हा त्यांचा आवाज खूप खूप लांबून येत असल्यासारखा भासत होता:

"तू आहेस?" त्यांनी मला गदगदा हलवले – आणि ते ओरडले: "कुठं दुखतंय? बोल..."

मी म्हणालो: "मला कुठंही दुखत नाही. मी संपूर्ण धडधाकट आहे..."

बाबा मटकन खाली बसले आणि चाकाला टेकले. त्यांचा चेहरा घामाने भिजला होता. त्यांच्या कपाळावरून घामाचे मोठमोठे थेंब निथळत होते. अचानक ते एका कुशीवर कलंडू लागले, जणू त्यांना झोपायची इच्छा होत होती. त्यांनी जमिनीवर झोपू नये म्हणून मी त्यांचा सदरा पकडून धरला. तेवढ्यात आमच्यापाशी पांढऱ्या अंगरख्यामधला एक माणूस आला. तो बाबांसमोर गुडघ्यांवर बसला आणि त्याने ताबडतोब बाबांचा उजवा हात धरला.

बाबा जोरात विव्हळले. डॉक्टर म्हणाले: "दुहेरी हाड मोडलंय!"

बाबांना उठवून त्यांनी मोठ्या मोटारीपाशी नेले. भोवती माणसांची खूप गर्दी जमली होती. रस्त्याच्या कडेला बसगाड्या, मोटारगाड्या, मालवाहू मोटारी उभ्या होत्या. आमच्या दाचासमोर रस्ता बनवणारे खडी दाबणारे रूळयंत्रसुद्धा तेथे उभे असल्याचे माझ्या ध्यानात आले.

डॉक्टरांच्या आणि बाबांच्या पाठीमागून मी जाऊ लागलो, पण लोकांच्या जमावाच्या धक्काबुक्कीत मी मागे पडलो. बाबा जेव्हा रस्त्याच्या चढाच्या टोकावर पोहोचले तेव्हा मी

पाहिले की, रस्ता-यंत्राचा निळ्या चेहऱ्याचा ड्रायव्हर त्यांच्यापाशी धावत गेला. त्याने काहीतरी बाबांना सांगितले आणि बाबांनी संमतीदर्शक मान हलवली. मग बाबा रुग्णवाहिकेत बसले. मी त्यांच्या पाठी धावून त्यांना गाठायचे ठरवले, पण बाबा मागे वळून मला उद्देशून काहीतरी ओरडले. मला त्यांचे शब्द समजले नाहीत. रुग्णवाहिका भर्र्रदिशी निघून गेली. मी तिच्या पाठी धावलो, पण वर पोहोचण्यात मला यश आले नाही, कारण चढ फार होता आणि छातीत जोराने धडधड वाजू लागले, म्हणून मी थांबलो.

वरून मी आमची 'वोल्गा' पाहिली. मोडून पडलेल्या रणगाड्यासारखी ती दिसत होती. तिच्यामागून अलेक्सान्द्र सेम्योनिच पुढे आले आणि म्हणाले:

"कमाल आहे! मोटारच्या डिकीमध्ये बूट पडला होता! आश्चर्य आहे!"

त्यांच्यापाशी पोलीस आला.

"तर...," असे म्हणून परत तो टिपणवहीत खरडू लागला, "आता आपलं काम पुढं सुरू करू... हा पोरगा नशीबवान म्हटला पाहिजे! साधा ओरखडा निघाला नाही त्याच्या अंगावर! ही तुमची मोटार आहे?"

माझ्या बाबांना परत केव्हा आणणार असे मी त्या पोलीसाला विचारणार होतो, पण तेवढ्यात वरून ओरडण्याचा आवाज आला:

"पोलीससाहेब! आम्ही त्या मुलाला आमच्याबरोबर घेऊन जातो. कशाला उगीच त्याला इथं उन्हात तापत ठेवायचा?.. आम्ही त्यांच्या घरासमोरच रस्ता बनवतोय. ये रे मुला, इकडं ये!"

रूळ-यंत्रावर बसलेला निळ्या चेहऱ्याचा माणूस हे ओरडला होता.

पोलीसाने विचारले. "जाणार?"

काय उत्तर द्यावे मला समजेना, कारण अलेक्सान्द्र सेम्योनिचना तेथे एकट्याला टाकणे मला प्रशस्त वाटत नव्हते. माझ्या मनातील विचार बहुधा त्यांनी जाणले असावेत, कारण ते म्हणाले:

"काही हरकत नाही! तू जा!"

मी विचारले: "माझ्याशिवाय तुम्ही जमवून घ्याल?"

ते म्हणाले: "प्रयत्न करतो. मला इथं दुसरी माणसं मदत करतील. तू जा..."

पण मी जागचा हललो नाही.

तेव्हा वरून ती सुंदर मुलगी खाली आली – निळ्या चेहऱ्याच्या माणसाची मदतनीस. तिने माझा हात धरून म्हटले: "आम्ही त्याला चाक हातात धरायला देऊ. होय ना वान्या?"

आणि पोलीसाला ती म्हणाली: "पोलीससाहेब, तुम्ही कृपा करून त्याला चाक हातात धरायला परवानगी द्या. तो स्वतः यंत्र छान चालवील, अगदी खरं! आणि त्याची इच्छा

असली तर तो शिटीसुद्धा वाजवील! होय ना वान्या? तो शिटी वाजवील आणि सर्वांना त्याचा हेवा वाटेल. पोलीससाहेब, तुम्हालासुद्धा त्याचा हेवा वाटेल ना?"

पोलीस गप्प बसला. ती म्हणाली:

"इकडे ये मुला, सोनुल्या तू माझा! पकड चाक! घट्ट पकड!"

एखाद्या लहान बाळाला गोडीगुलाबी दाखवतात, तशी ती मला वागवत होती. निळ्या चेहऱ्याच्या माणसासमोर तिने मला बसवले. त्या माणसाच्या अंगाला पेट्रोलचा जोरदार भपकारा येत होता. त्याने चाकावर स्वतःच्या हाताशेजारी माझा हात ठेवला आणि मोठ्या, काळ्या पडलेल्या नखांची त्यांची बोटे जाडजूड असल्याचे मला आढळले.

त्याने पावंडा दाबला, तरफा खेचल्या आणि त्या भयानक जागेपासून आम्ही तिघे दूर जाऊ लागलो. भोवती सर्व हिरवेगार होते – गवत, भोजाची मडपातळ झाडे – आणि वाऱ्या-बरोबर पानांचा गंध दरवळत होता. जणू मध्यंतरी काही घडलेच नव्हते.

आम्ही मुकाटपणे प्रवास करत होतो. जरी मी हातात चाक धरले होते, तरी कोणताही खेळ मी खेळत नव्हतो. माझी इच्छा नव्हती.

निळ्या चेहऱ्याचा माणूस अचानक त्याच्या मदतनीस मुलीला म्हणाला:

"ह्या पोराचा बाप किती शूर आहे बघ! प्रत्येकजण असा धोका नाही पत्करत... परक्या-च्या मुलीचा जीव त्यानं वाचवला! मोटार आपटून घेतली! मोटार तर पत्र्याची... ती दुरुस्त करता येईल! पण पोरीचा जीव वाचवायला धडपडला, हे जास्त महत्त्वाचं!... त्यापायी स्वतःच्या मुलाला त्यानं धोक्यात घातलं! मोठ्या मनाचा माणूस आहे... फार थोर मनाचा! अशा लोकांचा युद्धआघाडीवर आम्ही फार फार आदर केला..."

त्याने माझ्या नाकावर बोट ठेवले आणि दाराच्या घंटीचे बटण दाबावे तसे दाबले: "ट र्-र्-र्!"

माझ्या बाबांबद्दल तो असे चांगले शब्द बोलला, तेव्हा मी त्याचा जाड अंगठा जोरात पिळला आणि रडू लागलो.

सादोवाया रस्त्यावरील मोठी वाहतूक

वान्या दीखोवची एक सायकल होती. खूप खूप जुनी, पण तरीही ती होती हे महत्त्वाचे पूर्वी ही सायकल वान्याच्या बाबांची होती, पण जेव्हा सायकल मोडली, तेव्हा वान्याचे बाबा त्याला म्हणाले:

"हे बघ वान्या, सबंध दिवसभर उंडारण्यापेक्षा ही घे तुला सायकल, तिला दुरुस्त कर आणि तुला स्वतःची सायकल होईल. तशी ती अजून धडधाकट आहे. जेव्हा मी तिला विकत घेतली होती, तेव्हा ती नवीकोरी होती."

वान्याला ह्या सायकलबद्दल झालेल्या आनंदाचे वर्णन करणे अशक्य आहे. त्याने ती आमच्या आवाराच्या पार टोकाला नेऊन उभी केली व निष्कारण उंडारणे अजिबात बंद केले. उलट तो आख्खा दिवस त्या सायकलच्या दुरुस्तीमध्ये गुंतला. आमचा वान्या वंगणाने माखून निघायचा. सायकलच्या ठोकाठोकीत त्याची सर्व बोटे जखमांनी भरून गेली होती. पण तरीही त्याला त्याच्या दुरुस्तीकामात यश येत होते, कारण त्यांना पाचवीच्या वर्गात यंत्रशाळेत धातूकाम शिकवतात आणि वान्याला नेहमी त्या विषयात "उत्तम" शेरा मिळायचा. मीसुद्धा वान्याला त्याच्या दुरुस्तीमध्ये मदत करत होतो आणि दररोज तो मला म्हणायचा:

"जरा थांब, देनीस. जेव्हा ही सायकल मी पूर्ण दुरुस्त करीन, तेव्हा तुला तिच्यावरून फिरवीन. तू मागं कॅरीयरवर बसशील आणि आपण दोघं सबंध मॉस्कोभर भटकू!"

मी त्याला आणखी मदत करत होतो, कारण त्याची-माझी मैत्री होती, जरी मी फक्त दुसरीत होतो आणि तो पाचवीत होता. कॅरीयर अधिक सुंदर बनावी म्हणून मी मुख्यतः झटत होतो. मी कॅरीयरला चारदा काळया रंगाचे हात मारले होते, कारण ती जणू खास माझ्या मालकीची होती असे मला वाटत होते. माझी ती कॅरीयर नव्या 'वोल्गा' मोटारीसारखी चमकत होती. वान्याच्या कमरपट्ट्याला पकडून, त्या कॅरीयरवर बसून आम्ही दोघे सबंध जगभर कसे भटकू, ह्याच्या नुसत्या कल्पनेने मी फुलारत होतो.

शेवटी एके दिवशी वान्याने सायकल सरळ उभी केली, तिच्या धावांमध्ये हवा भरली, स्वच्छ चिंधीने तिला पुसून काढले, पिंपाच्या पाण्यात स्वतःचे हात स्वच्छ धुतले, विजारीच्या खालच्या टोकांना कपडे वाळत घालायचे चिमटे लावले. आमचा सणाचा क्षण जवळ आल्याचे मला समजले. वान्या सायकलवर बसला आणि पावटे मारू लागला. प्रथम त्याने सावकाशपणे आवारात फेरी मारली. चाके छान फिरत होती. जमिनीवर त्यांच्या मंद घासण्याचा आवाज ऐकू येत होता. वान्या जोराने पावंडे मारू लागला. चाकांमधल्या काड्या चमकत होत्या. तो नागमोडी वळणे घेऊ लागला, इंग्रजी आठाच्या आकड्यात सायकल फिरवू लागला. एखाद्या चाचणी वैमानिकाप्रमाणे वान्या सायकलचा प्रत्येक भाग तपासून पाहात होता. वेगात सायकल दामटून एकदम ब्रेक लावून जागच्या जागी थांबवत होता. विमानाचा मेकॅनिक स्वतःच्या वैमानिकाला हवेत पाहात असतो, त्याप्रमाणे मी उभा राहून वान्याच्या सायकलवरील करामती पाहात होतो. तो छान चालवत होता ह्याचा मला आनंद वाटत होता, पण मीसुद्धा त्याहून जास्त सफाईने सायकल चालवू शकेन अशी माझी खात्री होती. निदान त्याच्यापेक्षा वाईट नक्कीच नव्हे. पण ती सायकल माझी नव्हती, वान्याची होती, तेव्हा ह्यावर फार चर्चा करण्यात अर्थ नाही. खुशाल त्याला हवी तशी ती सायकल चालवू दे. सायकलची चमक बघायला छान वाटत होते आणि ती सायकल जुनी होती ह्यावर विश्वास ठेवणे अवघड होते. कोणत्याही नव्या सायकलपेक्षा ती जास्त छान होती. विशेषतः तिची कॅरीयर. तिच्याकडे डोळे भरून पहात असताना छातीत आनंद मावत नव्हता.

वान्या सुमारे अर्धा तास सायकलवरून फिरत होता. माझ्याबद्दल तो पूर्ण विसरून गेला

अशी मला भीती वाटू लागली होती. पण नाही, निष्कारण वान्याबद्दल मी तसा विचार केला. तो माझ्यापाशी आला, त्याने एक पाय कुंपणावर खाली टेकवला आणि तो म्हणाला :

"बैस मागं!"

मी चढण्याची धडपड करत विचारले : "कुठं जायचं ?"

वान्या म्हणाला : "काय फरक पडतो ? जगाच्या पाठीवर !"

मला एकदम वाटू लागले की जणू आपल्या जगात फक्त उल्हामी लोक ऱ्हात आहेत आणि ते सर्वजण दुसरे काहीही न करता केवळ आमच्या आगमनाची वाट पहात आहेत. आणि जेव्हा वान्या सायकलवरून व मी त्याच्या कॅरीयरवरून त्यांच्यापाशी पोहोचू, तेव्हा ताबडतोब मोठा उत्सव सुरू होईल, झेंडे फडकू लागतील, फुगे उडवतील, गाणी म्हणतील, काडीवरचे आईस्क्रीम खातील, बँड वाजू लागेल आणि विदूषक डोक्यांवर चालतील.

तर अशी माझी विलक्षण मनःस्थिती होती. मी कॅरीयरवर बैठक मारली व वान्याचा कमरपट्टा पकडला. वान्याने पावंडे फिरवले आणि ...अच्छा, बाबा! अच्छा, आई! अच्छा, आमचे जुने अंगण आणि कबूतरांनो, फिर मिलेंगे! आम्ही जगाच्या पाठीवर भटकायला निघालो!

वान्याने आवाराबाहेर सायकल नेली, मग कोपऱ्यावर वळवली आणि पूर्वी जेथे फक्त पायी भटकलो होतो अशा वेगवेगळ्या गल्ल्यांमधून आमचा सायकल-प्रवास चालला होता. सर्व गोष्टी आता वेगळ्या, अनोळखी भासत होत्या. वान्या सतत घंटी वाजवत होता – कुणी सायकलखाली सापडू नये म्हणून : ट्रिंग-ट्रिंग, ट्रिंग-ट्रिंग!

कोंबड्यांप्रमाणे उड्या मारत पादचारी आमच्या वाटेमधून बाजूला होत होते आणि आम्ही प्रचंड वेगाने जात होतो. मला खूप मजा वाटत होती, मनात फार मोकळे वाटत होते आणि बेंबीच्या देठापासून ओरडावेसे वाटत होते. तर मी 'आ' अक्षर ओरडू लागलो : आआआआआ! आमची सायकल जेव्हा झारकालीन फरसबंदी दगडांच्या गल्लीतून जाऊ लागली तेव्हा माझ्या ओरडण्यात एक वेगळीच गंमत निर्माण झाली. दगडांवरून जाताना सायकलला हिसके बसत होते आणि त्यामुळे धारदार कात्रीने माझा प्रत्येक 'आ' कापला जाऊन वाऱ्यावर फेकल्याप्रमाणे भासत होता : आ! आ! आ! आ! मग परत डांबरी गुळगुळीत रस्ता सुरू झाला व पुन्हा माझा सलग 'आ' कार उमटू लागला.

आम्ही खूप वेळपर्यंत गल्ल्या-बोळांमधून सायकलवरून भटकलो आणि शेवटी पार दमलो. वान्याने सायकल थांबवली आणि मी कॅरीयरवरून खाली उडी मारली. वान्याने विचारले :

"कसं काय ?"

"झकास!" मी.

"तुला आरामशीर बसता आलं ?"

"अगदी दिवाणावर बसल्यासारखं!" मी म्हणालो. "त्याहून जास्त आरामात. मस्त आहे सायकल! एकदम फर्स्ट-क्लास!!"

वान्या मनापासून हसला आणि त्याने स्वतःचे विस्कटलेले केस हाताने चोपून सरळ केले. त्याचा चेहरा धुळीने माखला होता, पण डोळे मात्र निळे-निळे दिसत होते आणि दात पांढरेशुभ्र चमकत होते.

तेवढ्यात आमच्यापाशी एक मुलगा आला. तो उंच होता आणि त्याचा एक दात सोनेरी होता. त्याने आखूड बाह्यांचा सदरा घातला होता आणि त्याच्या हातांवर वेगवेगळी चित्रे व निसर्गदृश्ये रंगवलेली होती. त्याच्या पाठीमागून एक छोटे केसाळ कुत्रे लटपटत येत होते. वेगवेगळ्या लोकरींच्या तुकड्यांपासून ते बनवले असल्याचा भास होत होता. काही तुकडे काळे होते, काही पांढरे, अधूनमधून पिंगट आणि एक तर हिरवा... त्याची शेपूट वाकडी वळलेली होती आणि एक पाय मोडका. तो मुलगा म्हणाला:

"पोरांनो, तुम्ही कुठले?"

आम्ही उत्तरलो: "तीन तळ्यांवरचे!"

तो म्हणाला: "अरे वा, शाबास! इतक्या लांब आलात? तुझी सायकल?"

"माझी. पूर्वी माझ्या वडलांची होती – आता माझी," वान्या म्हणाला. "मी स्वतः ती दुरुस्त केली. आणि त्यानं," वान्याने माझ्याकडे बोट दाखवले, "त्यानं मला मदत केली."

मुलगा म्हणाला: "अरे वा! एवढीशी पोरं, पण अस्सल मेकॅनिक!"

मी विचारले: "हा तुमचा कुत्रा?"

मुलग्याने मान डोलावली: "होय, माझा. फार मौल्यवान कुत्रा आहे. जातिवंत. स्पॅनिश दाशून्द!"

वान्या म्हणाला: "भलतंच! हा कुठला आलाय दाशून्द! दाशून्द लांबट आणि निमुळती असतात!"

"माहीत नाही तर गप्प बैस!" तो मुलगा म्हणाला. "मॉस्कोतली किंवा ऱ्याझानमधली दाशून्द कुत्री लांबट असतात, कारण ती सगळा वेळ कपाटाखाली बसून असतात, म्हणून लांबी वाढते. पण हा कुत्रा वेगळा आहे, फार भारी आहे, विश्वासू मित्र आहे. त्याचं नांव 'चोर'!"

मुलगा गप्प झाला. मग त्याने तीन वेळा सुस्कारे टाकले आणि तो म्हणाला:

"पण काय उपयोग? विश्वासू असला तरी शेवटी कुत्राच! माझ्या संकटात मला मदत करू शकत नाही..."

त्याच्या डोळ्यांमध्ये आसवे दिसू लागली. माझ्या छातीत धस्स झाले. काय झाले त्या मुलाला?

वान्याने घाबरून विचारले: "असं कोणतं संकट तुमच्यावर कोसळलंय?"

त्या मुलग्याचा एकदम झोक गेला आणि त्याने भिंतीचा आधार घेतला.

"आजी मरतेय," तो म्हणाला आणि हुंदके देऊ लागला. "मरतेय आजी... तिला दुहेरी ॲपेंडीसायटीस आहे..." त्याने आमच्याकडे तिरप्या नजरेने पाहिले व पुढे म्हटले: "दुहेरी ॲपेंडीसायटीस आणि गोवरसुद्धा!.."

त्याने एकदम मोठ्यांदा गळा काढला आणि तो हातांनी डोळे पुसू लागला. माझ्या छातीत धडधडू लागले. तो मुलगा भिंतीशी नीट रेलून उभा राहिला आणि मोठ्यांदा रडू लागला. त्याचा कुत्रा त्याच्याकडे बघून केकाटू लागला. त्या दोघांचे रडणे-विव्हळणे ऐकणे फार भयानक वाटू लागले. वान्याचा धुळकट चेहरासुद्धा फिकट दिसू लागला. त्याने त्या मुलग्याच्या खांद्यावर हात ठेवत कापऱ्या आवाजात म्हटले:

"कृपा करून रडू नका! कशाला रडता असं?"

"मग मी काय करू?" मान हलवत तो मुलगा म्हणाला. "औषधांच्या दुकानापर्यंत जाण्याचे त्राण माझ्यात नाहीत. अशा वेळी मी काय करू? तीन दिवसांचा उपाशी आहे! ॲ-ॲ-ॲ... अूं... अूं..."

तो आणखीच भयाण विव्हळू लागला. त्याचा मौल्यवान कुत्रासुद्धा. भोवती इतर कुणीही नव्हते. काय करावे ते मला सुचेना.

पण वान्या मुळीच गोंधळला नव्हता.

"डॉक्टरांनी लिहून दिलेला औषधाचा कागद तुमच्यापाशी आहे?" त्याने ओरडून विचारले. "जर असेल तर ताबडतोब माझ्यापाशी द्या. मी सायकलवरून पटकन औषधांच्या दुकानात जातो आणि तुम्हाला औषध आणून देतो. अगदी चटदिशी!"

मला एकदम आनंदाने उडी मारावीशी वाटली. वान्या किती चतुर! असा माणूस संगतीला असला म्हणजे कधीही मी पेचात सापडणार नाही. काय करायचे ते त्याला नेहमी माहीत असते! आता आम्ही ह्या मुलाला पटकन औषध आणून दिले असते आणि त्याच्या आजीला मरण्यापासून वाचवले असते!

मी ओरडलो: "लौकर दे कागद! वेळ दवडू नको!"

पण तो मुलगा जास्तच थरथरू लागला, हात झटकू लागला, रडायचा थांबला आणि आमच्यावर खेकसला:

"शक्य नाही! तुमची काय डोकी फिरलीत? सादोवाया रस्त्यावर तुमच्यासारख्या लहान मुलांना मी कसा पाठवू? आँ? सायकलवरून? तिथं किती प्रचंड वाहतूक असते, तुम्हाला ठाऊक आहे? आँ? एका सेकंदाच्या आत तिथं तुमची चटणी उडेल! हात इकडं तर पाय तिकडं... मुंडकं तिसऱ्याच दिशेला! पाच पाच टनी मालमोटारी धावतात तिथं! यात्र्या वाहून नेणाऱ्या मोठ्ठ्या मोटारी धावतात! तुम्ही तिथं मोटारींखाली चेंगराल आणि मला इथं उत्तर द्यावं लागेल तुमच्यासाठी! छेः छेः, अगदी मला ठार मारलंत तरी चालेल, पण मी तुम्हाला तिकडं जाऊ देणार नाही! त्यापेक्षा आजी मेली तरी हरकत नाही!.."

आणि तो परत भसाड्या आवाजात रडू लागला. त्याचा मौल्यवान कुत्रा तर अखंड कोकलत होता. मला सहन होईना की, केवळ आमचे काही वाईट घडू नये एवढ्यामाठी हा उदार मनाचा मुलगा स्वतःच्या आजीचा जीव धोक्यात घालत होता! माझ्या ओठांना मुरडी पडू लागल्या आणि मला समजले की, हे असेच आणखी थोडा वेळ चालले, तर त्या मौल्यवान कुत्र्यापेक्षा भयाण सुरात मी भोकाड पसरीन. वान्याच्या डोळ्यांमध्येसुद्धा पाणी तरारले आणि तो नाकाने सूं सूं करू लागला.

"आपण काय करायचं?" तो म्हणाला.

"अगदी सोप्पं आहे," तो मुलगा चटकन म्हणाला. "एकच मार्ग आहे. तुमची सायकल मला द्या आणि मी सायकलवरून जातो. ताबडतोब परत येईन. जर आलो नाही तर मला तुरुंगाची हवा खावी लागेल!.." त्याने गळ्यावर हात ठेवून दाखवले.

बहुतेक ही त्याची घोर शपथ असावी. त्याने सायकलच्या दिशेने हात पुढे केला. पण वान्याने सायकल घट्ट पकडून ठेवली होती. त्या मुलाने सायकल खेचण्याचा प्रयत्न केला, मग हात सोडला व परत विव्हळायला सुरुवात केली:

"ॲं... ॲं... ॲं! माझी आजी मरतेय, निष्कारण मरतेय... ॲं... ॲं... ॲं..."

तो स्वतःच्या झिंज्या उपटू लागला. अगदी दोन्ही हातांनी. मला तो भयानक प्रकार सहन होईना. मी रडत रडत वान्याला म्हटले:

"दे रे त्याला सायकल, बिचाऱ्याची आजी मरतेय! तुझ्या आजीचं तसं झालं असतं तर?"

वान्याने सायकल घट्ट धरत रडव्या आवाजात उत्तर दिले: "पण मी स्वतःच जाणं जास्त चांगलं..."

तेव्हा त्या मुलाने संतापाने वान्याकडे पाहिले आणि पिसाटासारखा तो ओरडला:

"माझ्यावर विश्वास नाही काय? नाही विश्वास? एक मिनिटभर स्वतःचा खटारा मला उसना द्यायला भितोस? म्हातारी खुशाल मरू देत? होय? बिचारी म्हातारी गोवरानं मरू देत? खुशाल? वा रे लाल रुमालातला बालवीर! तुला तुझ्या खटाऱ्याची चिंता? हात् तुमची! खुनी! लोभी!.."

त्याने स्वतःच्या सदऱ्याची एक गुंडी तोडली आणि तिला तो पायांखाली चेचू लागला. आम्ही अजिबात न हलता उभे होतो. आम्ही अक्षरशः थिजलो होतो. तेव्हा त्या मुलग्याने अचानक जमिनीवरून स्वतःचा कुत्रा उचलला आणि त्याला आमच्यापुढे धरत तो म्हणाला:

"घ्या! विसार म्हणून माझ्या मित्राला तुमच्यापाशी ठेवतो! माझ्या विश्वासू मित्राला देतो! आता तर विश्वास ठेवशील? होय किंवा नाही? मौल्यवान कुत्रा!"

त्याने वान्याच्या हातांमध्ये बळजबरीने त्या कुत्र्याला कोंबले. आता माझ्या मनात कोणताही संशय उरला नाही. मी म्हणालो:

"वान्या, तो आपल्यापाशी विसार म्हणून कुत्रा ठेवतोय! तो त्याचा मित्र आहे, शिवाय

मौल्यवान. त्याला टाकून तो कुठं जाईल? घाबरू नकोस. दे त्याला मायकल!"

वान्याने त्या मुलग्याला मायकल देत म्हटले:

"तुम्हाला पंधरा मिनिटं पुरतील?"

"खूप झाली!" मुलगा म्हणाला. "पाच मिनिटं पुरेशी आहेत! इथं माझी वाट बघा. मुळीच हलू नका!"

त्याने पटकन सायकलवर टांग मारली आणि मादोवाया रस्त्याकडे तो वळला. तो कोपऱ्यावर वळताच मौल्यवान कुत्र्याने वान्याच्या हातांमधून खाली उडी मारली आणि विजेच्या वेगाने तो मुलामागे धावला. वान्या मला ओरडून म्हणाला:

"पकड!"

"शक्य नाही त्याला पकडणं," मी म्हणालो. "तो स्वतःच्या मालकामागं धावला. त्याच्याशिवाय तो राहणार नाही! ह्याला म्हणतात विश्वासू मित्र. माझ्यापाशी तसा असता तर..."

वान्याने घाबरटपणे प्रश्न केला: "पण तो तर विसार होता?"

"घाबरू नको," मी म्हणालो, "दोघंही लौकरच परत येतील!"

आम्ही पाच मिनिटे वाट पाहिली.

"त्याचा अजून पत्ता नाही," वान्या म्हणाला.

"दुकानात लांब रांग असेल," मी म्हणालो.

नंतर आणखी दोन तास उलटले. त्या मुलाचा पत्ता नव्हता. आणि मौल्यवान कुत्र्याचासुद्धा. जेव्हा अंधार पडू लागला, तेव्हा माझा हात धरत वान्या म्हणाला:

"सगळं स्पष्ट आहे. चल घरी..."

"काय स्पष्ट... वान्या?" मी म्हणालो.

"मी मूर्ख आहे – महामूर्ख!" वान्या म्हणाला. "तो मुलगा कधीही परतणार नाही आणि सायकल कधी परत मिळणार नाही. मौल्यवान कुत्रासुद्धा!"

वान्या त्यावर एक शब्द बोलला नाही. कदाचित माझ्या डोक्यात भयानक विचार येऊ नयेत अशी त्याची इच्छा असावी. पण तरीही माझ्या मनात विचार आलेच...

मादोवाया रस्त्यावर फार वाहतूक असते...

चाके वाजतात खाड-खाड

यंदाच्या उन्हाळ्यात बाबांना काही कामासाठी यास्नोगोर्स्क शहरात जायचे होते. गावाला जाण्याच्या दिवशी ते म्हणाले:

"देनीसला मी बरोबर घेऊन जातो!"

मी पटकन आईकडे पाहिले. पण आई गप्प होती.

तेव्हा बाबा म्हणाले: "ठीक आहे, बांधून ठेव त्याला तुझ्या कमरेशी! त्याचं लग्न होई-पर्यंत त्याला तुझ्या पाठोपाठच फिरत राहू दे तशा बांधल्या अवस्थेत!"

आईचे डोळे संतापाने हिरवेगार बनले. ती म्हणाली: "काय पाहिजे ते करा! अगदी पार अंटार्क्टिकापर्यंत घेऊन जा!"

आणि ती खोलीमधून बाहेर गेली.

त्याच संध्याकाळी मी आणि बाबा आगगाडीमधून प्रवासाला निघालो. आमच्या डब्यात खूप वेगवेगळे लोक होते: म्हाताऱ्या बायका आणि सैनिक, तरुण मुलगे, कंडक्टर, एक छोटी मुलगी आणि टोपलीभर कोंबड्यासुद्धा. खूप गोंगाट-गडबड चालू होती. आम्ही खाण्याचे डबे उघडले, धातूच्या कपांमध्ये बसवलेल्या ग्लासांमधून चहा प्यायलो, मांसाच्या कबाबांचे मोठमोठे तुकडे खाल्ले. मग एका तरुणाने अंगातील कोट काढला व तो नुसत्या बनीयनवर बसला. त्याचे हात पांढरेशुभ्र होते आणि दंडाच्या बेटकुळ्या गोल गोल होत्या. त्याने तिसऱ्या फळीवरून ॲकॉर्डियन काढले व तो वाजवू लागला. तो वाजवत असलेले गाणे दुःखी होते. कम्सामोलचा* सदस्य असलेला एक तरुण घायाळ होऊन त्याच्या घोड्याच्या पायापाशी गवतावर कोसळला, त्याने आपले बदामी रंगाचे डोळे मिटले आणि हिरव्या गवतावर रक्ताचे लाल थेंब ओघळले, अशा त्या गाण्यात ओळी होत्या.

मी खिडकीपाशी गेलो आणि अंधारात चमकणाऱ्या छोट्या दिव्यांना पाहू लागलो. माझ्या मनात त्या कम्सामोल तरुणाबद्दल विचार येत होते: त्याच्याबरोबर मीसुद्धा शत्रूची टेहळणी करायला गेलो असतो आणि कदाचित तेव्हा तो ठार झाला नसता. मग बाबा माझ्यापाशी आले आणि आम्ही दोघेही गप्प बसून राहिलो. नंतर बाबा म्हणाले:

"असा उदास होऊ नको. आपण परवा परतू आणि तू आईला प्रवासातल्या गंमती-जमती सांगशील."

मग बाबांनी बिछाना घातला आणि मला हाक मारून विचारले:

"तू कुठं झोपणार? भिंतीशी?"

---

* कम्युनिस्ट युवक संघ.

पण मी म्हणालो: "तुम्हीच भिंतीशी झोपा. मी कडेशी झोपेन."

त्यांनी विचारले: "का?"

मी त्यांना हलक्या आवाजात म्हणालो: "कारण मी रात्रीचा कदाचित उठेन. मी चहाचे दोन ग्लास प्यायलोय. समजलं?"

त्यावर सगळेजण हसले. बाबा भिंतीशी कुशीवर झोपले आणि मीसुद्धा कडेशी कुशीवर झोपलो. चाकांचा आवाज येत होता: खाड-खाड...

अचानक मला जाग आली, कारण माझे अर्धे अंग अधांतरी लटकत होते आणि खाली पडू नये म्हणून मी टेबलाचा कोपरा हाताने धरला होता. बाबांनी गाढ झोपेत मला फळीच्या टोकाशी लोटून दिले होते. मी परत आरामशीर झोपण्याच्या तयारीत होतो, पण दरम्यान माझी झोप उडाली, तेव्हा बिछान्याच्या टोकाशी मी उठून बसलो व सभोवार पाहू लागलो.

डब्यामध्ये एव्हाना उजाडले होते आणि वेगवेगळे हात-पाय लोंबताना दिसत होते. पायांमध्ये वेगवेगळ्या रंगांचे मोजे दिसत होते, किंवा काही पाय चक्क अनवाणी होते. एका छोटचा मुलीचा पाय तपकिरी खडूसारखा दिसत होता.

आमची आगगाडी अगदी हळू जात होती आणि खिडकीपाशी चाकांचा खडखडाट ऐकू येत होता. झाडांच्या हिरव्या फांद्या आमच्या खिडक्यांच्या अगदी जवळून पसार होताना मला दिसत होत्या. जंगलामधल्या दुतर्फा झाडी असलेल्या वाटेने आम्ही जात होतो असे भासत होते. मला बाहेरचा देखावा पहायची इच्छा झाली, म्हणून मी तसाच अनवाणी डब्याच्या टोकाशी धावलो. तेथे दार सताड उघडे होते. मी दाराची मूठ घट्ट पकडली आणि सावकाशपणे पाय लोंबते सोडले.

तेथे बसायला थंडी वाजत होती, कारण माझ्या अंगावर फक्त चड्डी होती आणि लोखंडी फरशीमुळे मी पुरताच गारठलो. पण नंतर फरशी माझ्या उबेमुळे गरम झाली आणि मी काखांमध्ये हात खुपसून बसलो. माझ्या गुडघ्यांना हिरवी पाने घासत होती. वारा मंद वाहात होता आणि आगगाडी अगदी गोगलगायीच्या गतीने हळूहळू जात होती. ती चढण चढू लागली तेव्हा चाकांचा खडखडाट वाढला. मी त्यांच्या खडखडाटाच्या तालावर हळूच एक गाणे रचले:

आगीनगाडी सुंदर धावते धाड-धाड!
चाके तिची वाजतात खाड-खाड!

महज मी उजवीकडे नजर टाकली तेव्हा आमच्या आगगाडीचा शेवटचा डबा मला दिसला. आगगाडी शेपटीसारखी अर्धवर्तुळाकार दिसत होती. तेव्हा मी डावीकडे पाहिले, तर आमच्या आगगाडीचे इंजिन मला दिसले. एखाद्या किडचाप्रमाणे ते वरती सरपटत जात होते. तेथे वळण असल्याचे माझ्या ध्यानात आले.

आगगाडीच्या रूळांजवळून एक निमुळती पाऊलवाट जात होती आणि त्या पाऊलवाटेवरून पुढे एक माणूस चालत जात असलेला मला दिसला. लांबून तो मला अगदी छोटा भासला होता, पण आगगाडी अर्थातच त्याच्यापेक्षा जास्त वेगाने जात होती आणि टप्प्याटप्प्याने मला दिसले की, तो माणूस मोठा होता, त्याने फिकट निळा सदरा घातला होता आणि त्याच्या पायात गुडघ्यांपर्यंतचे जाडजूड बूट होते. त्याच्या बुटांवरून समजत होते की, चालून चालून तो दमला होता. त्याने हातांमध्ये काहीतरी धरले होते. जेव्हा आगगाडीने त्याला गाठले, तेव्हा त्या माणसाने आपली पायवाट सोडली आणि आगगाडीच्या जवळून तो धावू लागला. खडीवर त्याच्या बुटांचा आवाज होत होता आणि त्या अवजड बुटांखालून वेगवेगळ्या दिशांना खडी उडत होती. एवढ्यात माझा डबा त्याच्याशी समांतर आला. टॉवेलने झाकलेली हातातील करंडी त्याने माझ्यापुढे धरली आणि तो माझ्याजवळून धावत राहिला. त्याचा चेहरा लाल बनला होता आणि घामाने भिजला होता. तो ओरडला:

"धर करंडी, मुला!" आणि चपळपणे त्याने ती करंडी माझ्या गुडघ्यांवर सारली.

मी ती करंडी गच्च पकडून धरली आणि तो माणूस दांडचाला धरून डब्यात चढला व माझ्याशेजारी बसला. सदऱ्याने स्वतःचा चेहरा पुसत तो म्हणाला:

"कसाबसा चढलो... हुश्श!"

मी म्हणालो: "ही घ्या तुमची करंडी."

पण त्याने ती घेतली नाही. त्याने विचारले:

"तुझं नांव काय?"

मी उत्तरलो: "देनीस."

मान हलवत तो म्हणाला: "माझ्या मुलाचं – सेर्योझा."

मी विचारले: "तो कोणत्या वर्गात शिकतोय?"

माणूस म्हणाला: "दुसऱ्यात."

"दुसरीत म्हटलं पाहिजे." मी म्हणालो.

त्यावर तो किंचित रागाने हसला आणि करंडीवरचा टॉवेल काढू लागला. टॉवेलखाली रुपेरी रंगाची पाने पसरलेली होती आणि त्यांच्यामधून आलेल्या वासाने माझे डोके जवळजवळ फिरले. माणसाने काळजीपूर्वक एकेक पान बाजूला केले आणि मला दिसले की, करंडीमध्ये रासबेरी गच्च भरलेल्या होत्या. त्या जरी लालेलाल होत्या, तरी त्यांच्यावर हलकासा रुपेरी मुलामा होता. प्रत्येक फळ रसरशीत होते. मी डोळे फाडफाडून रासबेरी पहात होतो.

"त्यांच्यावर सकाळच्या थंडीचा थर बसलाय," माणूस म्हणाला. "खा!"

मी एक बेरी खाल्ली, मग आणखी एक खाल्ली, टाळूला जीभ लावून रासबेरी दाबली. मी एका वेळी एकच बेरी खात होतो. फळे तोंडात अक्षरशः विरघळत होती. तो माणूस माझ्याकडे टक लावून पहात होता. जणू मी आजारी होतो आणि त्याबद्दल त्याला वाईट वाटत होते, असे त्याची नजर बोलत होती. तो म्हणाला:

"एकेक खाऊ नको. मूठभर घेऊन खा."

आणि त्याने मान फिरवली. मी लाजू नये म्हणून कदाचित. पण मी त्याला मुळीच लाजत नव्हतो. प्रेमळ माणसांना मी लाजत नाही. मी तावडतोब मुठी भरून खाऊ लागलो आणि ठरवले की, पोट फुटले तरी हरकत नाही, पण त्या सगळ्या बेरी मी फस्त करीन. एवढा चवदार पदार्थ यापूर्वी मी कधी चाखला नव्हता आणि एवढा आनंद मला कधी झाला नव्हता. मग मला सेर्योझाची आठवण झाली आणि मी त्या माणसाला विचारले:

"तुमच्या सेर्योझानं बेरी खाल्ल्या?"

"अर्थात," तो म्हणाला, "होत्या तेव्हा खाल्ल्या!"

मी म्हणालो: "होत्या म्हणजे? आज त्यानं नाही खाल्ल्या?"

माणसाने पायातील बूट काढला व त्यातून एक बारीक खडा बाहेर काढला.

"मघापासून जीव कामावीस केला होता... आहे तर एवढासा बारीक खडा!"

तो थोडा वेळ गप्प बसला आणि मग म्हणाला:

"अशीच बारीक गोष्ट तुमच्या काळजाला भळभळा रक्त वाहायला लावते. बंधू, माझा सेर्योझा आता शहरात राहतो. मला तो सोडून गेला."

मला फार आश्चर्य वाटले. कमाल आहे त्या पोराची! अवघा दुसरीत आणि बापाला सोडून गेला! मी म्हणालो:

"तो एकटा पळाला किंवा त्याच्या मित्राबरोबर?"

माणूस रागावून म्हणाला: "एकटा कशाला जाईल? स्वतःच्या आईबरोबर गेला! तिला आणखी शिकायची इच्छा झाली! तिचे तिथं नातेवाईक, मित्र, ओळखीची माणसं... तर सेर्योझा शहरात राहतो आणि मी इथं. विचित्र आहे ना?"

मी म्हणालो: "चिंता करू नका. इंजिन ड्रायव्हर बनून येईल. काही दिवस थांबा."

"फार काळ वाट बघणं त्रासाचं जातं!"

मी विचारले: "तो कोणत्या शहरात राहतो?"

"कूर्स्क!"

"कूर्स्कमध्ये असं म्हटलं पाहिजे," मी म्हणालो.

तो माणूस परत हसला. थंडी बाधल्याप्रमाणे त्याचे हसणे घोगरे होते. मग माझ्यापाशी झुकून त्याने म्हटले:

"ठीक आहे, तू हुषार डोक्याचा आहेस. मीसुद्धा शिकीन. युद्धामुळं शाळा राहिली. तुझ्या वयाचा असताना कंदमुळं शिजवून खात होतो." तो एकदम विचारात गढला. नंतर भानावर येऊन समोरचे जंगल मला दाखवीत म्हणाला: "बंधू, ह्याच जंगलात बघ, त्याच्या-पलिकडं आता क्रास्नाया वस्ती दिसेल. माझ्या हातांनी ती परत वसवलीय. तिथं मी उतरून जाईन."

मी म्हणालो: "मी आणखी मूठभर खाईन आणि मग तुम्ही करंडीवर रुमाल बांधा."

त्याने करंडी माझ्या गुडघ्यांवर ठेवली.

"याबद्दल नाही म्हटलं मी. घे तुला."

माझ्या उघड्या पाठीवर त्याने हात ठेवला आणि मला जाणवले की, त्याचा हात कणखर, कोरडा, गरम आणि खरबरीत होता. त्याच्या निळ्या सदऱ्याशी त्याने मला घट्ट आवळले. त्याचे अंग खूप उबदार होते, त्याला पावाचा आणि तंबाखूचा वास येत होता. त्याचा मंद श्वास मला स्पष्ट ऐकू येत होता.

असे थोडा वेळपर्यंत मला धरून तो म्हणाला:

"अच्छा, मुला. चांगला वाग.."

त्याने माझ्या डोक्यावरून हात फिरवला आणि एकदम चालत्या गाडीतून खाली उडी मारली. मी स्वतःला सावरण्याच्या आत एव्हाना तो मागे पडला होता. त्याच्या जड बुटांखाली चुरडणाऱ्या खडीचा आवाज मी परत ऐकला.

माझ्यापासून तो दूर दूर जात होता. निळ्या सदऱ्यामधील आणि अवजड बुटांमधील तो माणूस खूप छान होता. आमची आगगाडी लौकरच वेगात धावू लागली, वारा झोंबू लागला आणि रासबेरींची करंडी घेऊन मी डब्यात बाबांपाशी आलो. रासबेरींवरची गोठलेली थंडी आता वितळली होती आणि त्यांच्यावरील रुपेरी मुलामा नाहीसा झाला होता. पण रासबेरींची आरखी बाग जवळ असावी असा त्यांचा घमघमाट मात्र दरवळत होता. बाबा सताड हात-पाय पसरून झोपले होते. मला तेथे जागाच नव्हती. रासबेरी दाखवायला आणि निळ्या सदऱ्या-तल्या त्या माणसाबद्दल अथवा त्याच्या मुलाबद्दल सांगायला कुणीच नव्हते. डब्यात सर्व लोक झोपले होते

मी करंडी खाली ठेवली आणि पाहिले की, माझ्या सबंध पोटावर, हातांवर, गुडघ्यांवर लाल लाल रक्ताचे डाग! रासबेरींच्या रसाचे ते डाग होते. पटकन जाऊन ते डाग धुण्याचा माझा विचार होता, पण अचानक मला गुंगी येऊ लागली.

कोपऱ्यात एक मोठी सूटकेस उभी होती. काल आम्ही तिचा टेबलासारखा उपयोग केला होता. मी तिच्यावर आडवा झालो. एकदम आगगाडीचा खडखडाट जोरात ऐकू येऊ लागला तो खडखडाट खूप वेळपर्यंत मी ऐकत होतो. माझ्या अंगात आता ऊब आली होती आणि परत माझ्या मनात गाण्याच्या ओळी घुमल्या.

आगीनगाडी सुंदर धावते धाड-धाड!
चाके तिची वाजतात खाड-खाड!

पाथरवट दगड तासतात

यंदा उन्हाळयाच्या सुरुवातीपासूनच आम्ही तिघे – मीष्का, कोस्त्या आणि मी – जवळजवळ रोज 'दीनामो' पोहण्याच्या तलावावर जाऊ लागलो होतो. पूर्वी आम्हाला पोहायला येत नव्हते, पण मग हळूहळू एकेकजण वेगवेगळ्या ठिकाणी पोहायला शिकला. कुणी खेडयात, तर कुणी बालवीर छावणीत. मी 'मस्क्वा' पोहण्याच्या तलावावर दोन महिने पोहण्याचे धडे घेतले होते. जेव्हा आम्ही सगळे पोहायला शिकलो, तेव्हा आम्हाला समजले की, 'दीनामो' तलावावर पोहण्याएवढी मजा जगात इतर कुठेही नव्हती. अगदी गप्पत!

छान सूर्यप्रकाशित सकाळी तेथील ओलसर लाकडी फळयांवर पालथे पडून नदीचा ताजा वास हुंगण्यात, उंच काठयांच्या टोकांवरच्या रंगीत झेंडयांची फडफड ऐकण्यात आणि लाकडी फळयांखाली कुठेतरी पाण्याच्या लाटांची मंद सळसळ ऐकण्यात फार गंमत होती. हात पसरून, गप्प पडून ऊन खायला छान वाटत होते. तलावापासून जवळच, किनाऱ्यापाशी काही पाथरवट छिन्नी मारून गुलाबी दगड तासताना दिसायचे. त्यांनी दगडावर प्रहार केल्यानंतर काही क्षणांनी त्याचा आवाज आमच्या कानांवर पोहोचायचा. तो आवाज मंद असायचा आणि जणू काचेच्या हातोडयाने लाकडी पियानोच्या पट्ट्यांवर आघात केल्याप्रमाणे किणकिण आवाज घुमायचा.

ऊन खाऊन झाल्यानंतर पाण्यात बुडी मारण्यात, मग मनसोक्त पोहण्यात आणि एक मीटर उंचीच्या फळीवरून पाण्यात सूर मारण्यात विशेष बहार यायची. अशा रीतीने खूप दमल्यावर, पोट आत घेऊन आणि छाती फुगवून, तापलेल्या लाकडी फळयांवरून चवडयांवर चालत आपल्या मित्रांपाशी जायचे. चवडयांवर तशा प्रकारे चालणे छान दिसते आणि तलावावर तशी चालण्याची फॅशन आहे. इथे काही घाणेरडया वाळूचा आणि कागदाचे कपटे विखुरलेला ओसाड किनारा नव्हता किंवा गवताचे रान माजलेला किनारा नव्हता. हा स्वच्छ, सुंदर, सुबक बांधलेला पोहण्याचा तलाव होता, इथे शिस्त होती, इथे सगळे पटाईत पोहणारे वावरत होते. काही लोक तर पोहण्यापेक्षा फॅशनेबल चालण्यातच जास्त पटाईत होते.

म्हणून आम्ही तिघेही सबंध उन्हाळाभर एकसुद्धा दिवस न चुकवता पोहायला जात होतो, उन्हात पडून पडून काळेकुट्ट बनलो होतो, पोहण्यात पटाईत बनलो होतो. आमचे स्नायू बळकट बनले होते. पोहण्याच्या तलावावरील कोपरा न कोपरा आम्हाला ठाऊक झाला होता – प्रथमोपचार केंद्र कुठे, खेळ कुठे, वगैरे. थोडक्यात आम्हाला ते ठिकाण घरच्यासारखे बनले होते. आम्हाला तेथे सवय झाली होती.

एकदा आम्ही नेहमीप्रमाणे फळयांवर पालथे पडून ऊन खात होतो, तेव्हा अचानक कोस्त्या म्हणाला :

"देनीस, तू त्या सर्वांत उंच फळीवरून पाण्यात उडी मारू शकशील?"

मी फळीकडे नजर टाकली तेव्हा मला ती फारशी उंचीवर असल्याचे वाटले नाही. भिण्याचे

कारण नव्हते. कारण दोन मजल्यांपेक्षा तिची उंची जास्त नव्हती असे मला भासले

मी ताबडतोब कोस्त्याला उत्तर दिले: "अर्थात, मी उडी मारू शकेन! अगदीच फालतू!"

मीष्का त्यासरशी म्हणाला: "तुला शक्य नाही!"

मी म्हणालो: "मीष्का, तू मूर्ख आहेस. तुला काही कळत नाही!"

कोस्त्या म्हणाला: "दहा मीटर उंच आहे!"

"मग काय झालं?" मी.

"तुला जमणार नाही!" कोस्त्या म्हणाला.

अर्थात मीष्काने त्याला दुजोरा दिला.

"खरं आहे, त्याला जमणार नाही!" आणि तो पुढे म्हणाला: "पैज लागली! नाही जमणार! नाही जमणार! पैज!"

मी म्हणालो: "तुम्ही दोघं मूर्ख आहात! समजलं!"

मी उठलो, छाती फुगवली आणि हात गरागरा फिरवून सर्वांत उंच फळीकडे निघालो. चालत असताना चवड्यांवर चालण्याची मी खबरदारी घेत होतो.

पाठीमागून कोस्त्या ओरडला: "पैज! पैज! पैज! तुला नाहीच जमणार!"

मी त्याला उत्तर द्यायच्या फंदात पडलो नाही. एव्हाना मी शिडी चढत होतो.

ह्या सर्वांत उंच फळीवरून मोठी माणसे पाण्यात सूर कसे मारीत ते मी जवळजवळ रोज पहात होतो. त्यांच्या पाठींच्या सुंदर कमानी होत, पाकोळीसारखा सूर मारीत तेव्हा हवेत कोलांटी उडी घेत अथवा पाण्यात तिरपा सूर मारीत. पाणी फारसे न उडवता सफाईदारपणे पाण्याला कापून जेव्हा वर येत, तेव्हा छात्या फुगवून हात गरागरा फिरवत.

ते सर्व पहायला खूप सुंदर आणि सोपे वाटत होते व त्या मोठ्या माणसांप्रमाणेच मी सफाईदारपणे पाण्यात सूर मारू शकतो अशी माझी मनाशी खात्री होती. पण आता पहिल्यांदाच शिडीवर चढलो तेव्हा मी मनाशी ठरवले की, आत्ता हवेमध्ये कोणत्याही कसरती करायच्या नाहीत, फक्त सरळ सूर मारून वर यायचे! तसे करणे सगळ्यात सोपे! प्रथम मी साधा सूर मारीन आणि नंतर खास मीष्कासाठी असे अवघड सूर मारीन की, मीष्का आ वासून बघत राहील. मग बघतो मीष्का आणि कोस्त्या माझ्याशी कशा पैजा लावतात! त्यांची बोलतीच बंद करीन!

माझ्या मनात असे विचार चालले होते तेव्हा मी एकूण उत्साही होतो. छोट्या शिडीवरून भराभरा वर चढत होतो आणि तलावापासून चक्क दहा मीटर उंचीपर्यंत मी केव्हा व कसा पोहोचलो ते लक्षातच आले नाही.

मात्र तेथे वर पोहोचताच माझ्या ध्यानात आले की, फळी फारच लहान होती. सभोवार नजर टाकावी तिथवर प्रचंड, सुंदर शहर पसरलेले दिसत होते. वरती फळीवर वारा जोरात शीळ घालत घुमत होता. मी त्याच्या झोताबरोबर उडून जाईन अशी क्षणभर भीतीसुद्धा वाटली.

पाथरवटांच्या दगड तासण्याचा आवाज अजिबात ऐकू येत नव्हता. त्यांच्या काचेच्या हातोड्यांची नाजुक किणकिण वाऱ्याच्या घूं घूं आवाजात बुडून गेली होती. जेव्हा मी खाली वाकून पाहिले तेव्हा आमचा पोहण्याचा तलाव निळा, एखाद्या छोटया सिगारेटच्या पाकीटाएवढा दिसत होता. मी मनाशी विचार केला की, जर मी सूर मारला तर कदाचित माझा नेम हुकेल, कारण वारा फार जोरदार होता आणि तलावातील पाण्यात पडण्याऐवजी मी भलतीकडेच नदीत जाऊन पडेन अथवा त्याहून वाईट म्हणजे नेमका कुणाच्या टाळक्यावर आपटेन! किंवा कुणाच्यातरी स्वयंपाकघरात सारांच्या पातेलीत जाऊन पडेन! ह्या विचारांसरशी माझ्या गुडघ्यांमध्ये खाज सुटली आणि अचानक अत्यंत इच्छा झाली की, निदान एकदा तरी किनाऱ्यावर काम करणाऱ्या पाथरवटांच्या छिन्नींचे आवाज ऐकावेत आणि माझे जिवलग मित्र असलेल्या मीष्का व कोम्स्त्याबरोबर थोडा वेळ बसावे...

मी हळूच काही पावले मागे सरलो, शिडीची दांडी पकडली व खाली उतरू लागलो. जेव्हा संपूर्ण खाली उतरलो, तेव्हा माझी मनःस्थिती परत उल्हसित बनली, छातीत हलके-हलके वाटू लागले, जणू खांद्यावरचे मणाचे ओझे उतरल्यासारखे वाटले. मीष्का आणि कोम्स्त्या दृष्टीस पडताच आनंदून मी त्यांच्याकडे धावलो. पण त्यांच्या जवळ जाताच पुतळ्यासारखा जागच्याजागी थांबलो!. ते मूर्ख पोट धरधरून हसत होते आणि माझ्याकडे बोटे करून इतरांचे लक्ष वेधवत होते. जणू काही हसून हसून ते आता पोट फुटून मरणार असे वाटत होते. ते ओरडत होते:

"बघा, त्यानं सूर मारला!"

"हा-हा-हा!"

"किती सुंदर सूर!"

"हो-हो-हो!"

"पाकोळीसारखा!"

"हे-हे-हे!"

"शूर वीर!"

"ही-ही-ही!"

"शाब्बास!"

"बढाईखोर!"

मी त्यांच्यापाशी बसत म्हणालो: "तुम्ही अगदी महामूर्ख आहात! मी घाबरलो असं खरंच वाटलं काय तुम्हाला?"

त्यावर तर त्यांचे आवाज आणखीच उंचावले.

"नाही रे बाबा! हा-हा-हा!"

"तसं मुळीच वाटत नाही! हो-हो-हो!"

"तू घाबरला नाहीस!"

"तुला नुसती भीती वाटली!"

"आता आम्ही तुझ्याबद्दल वर्तमानपत्रात लिहितो!"

"तुला पदक द्यावं अशी शिफारस करतो!"

"शिडीवरून सुंदर रीतीनं खाली उतरल्याबद्दल!"

माझ्यात संताप मावेना! किती नालायक होते हे लोक! हा लुकडा कोस्त्या आणि चिरक्या आवाजाचा मीष्का! मी घाबरलो असे त्यांना खरेच वाटत होते! किती बावळटपणा!

पण मी त्यांच्यावर चिडलो नाही किंवा ते माझा करत होते तसा मी त्यांचा अपमानही केला नाही कारण त्या उंच फळीवरून मी सूर मारू शकतो हे मला ठाऊक होते! म्हणून मी अत्यंत शांतपणे आणि नम्रपणे त्यांना म्हणालो:

"तुमची मला मुळीच पर्वा वाटत नाही!"

मी उंच फळीच्या दिशेने धावलो आणि पाच सेकंदात वरती पोहोचलो. ह्या दरम्यान सूर्य काळ्या ढगाखाली लपला होता. वरती थंडी वाढली होती आणि अंधारले होते. वारा घुमत होता व फळी थोडीशी करकरत होती आणि थरथरत होती. पण तरीही मी धीर धरला आणि थेट टोकापर्यंत गेलो, हात अंगासरशी ताठ धरले, डोळे घट्ट मिटले आणि सूर मारण्यापूर्वी गुडघे वाकवले... अगदी अचानक, अनपेक्षितपणे मला आईची आठवण झाली आणि बाबांचीसुद्धा. आणि आजीची मला आठवले की, आज सकाळी 'दीनामो' वर येण्यापूर्वी मी त्यांचा निरोप घेतला नव्हता आणि आता मी ठार मरण्याची शक्यता होती व त्यांच्या फार मोठ्या दुःखाला मी कारणीभूत ठरणार होतो. त्यांना फार वाईट वाटले असते. लाड करायला त्यांना आयुष्यात कुणीही असणार नाही माझ्या फोटोकडे पाहून आई कशी सतत रडत बसेल ह्याची मी कल्पना केली. कारण मी तिचा एकुलता एक मुलगा होतो आणि बाबांचासुद्धा. त्यांच्या मनात नेहमी शोक राहील, ते कुणाच्या भेटीला जाणार नाहीत, सिनेमाला जाणार नाहीत. ह्याला काय आयुष्य म्हणायचे? आणि ते म्हातारे होतील तेव्हा त्यांची काळजी कुणी वाहायची? मलासुद्धा त्यांच्याविना करमणार नाही, कारण माझंसुद्धा त्यांच्यावर प्रेम आहे! अर्थात उडी मारल्यानंतर मी जिवंत राहणार नव्हतो, मी मेलेला असणार होतो, मला त्यानंतर आकाश दिसणार नव्हते, नदीकिनाऱ्याशी पाथरवट दगड कसे तासतात त्यांचे आवाज मला ऐकू येणार नव्हते!

आणि हे सर्व त्या नतद्रष्ट कोस्त्या व मीष्कापायी?

अशा दोन मूर्खांपायी कित्येक लोकांना दुःख सहन करावे लागणार ह्या विचारासरशी मी कमालीचा संतापलो आणि ठरवले की, त्यापेक्षा ताबडतोब खाली जाऊन त्यांना खरपूस मार द्यायचा.

आणि मी परत शिडीवरून खाली उतरलो.

जेव्हा कोस्त्याने मला पाहिले, तेव्हा तो चक्क हात-पायांवर ओणवा झाला व त्याने डोके खाली खुपसले. तशा अवस्थेत त्याने एखाद्या किड्याप्रमाणे गोल चकरा मारल्या मीष्का संपूर्ण



निळा पडला होता आणि हसण्यापायी त्याचा श्वास घुसमटला होता. त्याला हसण्याचा झटका आला होता.

त्यांच्या जवळच वेगवेगळया मुलींचा आणि मुलांचा एक घोळका बसला होता. तेसुद्धा हसत होते. कोस्त्याने आणि मीष्काने त्यांना माझ्या सूर मारण्याविषयी सांगितले होते असे दिसत होते. ती अनोळखी माणसे खो खो हसत होती आणि त्यांच्याबरोबर माझे मित्रही मला हसत होते.

तेव्हा मात्र मी मनाचा ठाम निर्धार केला आणि जे घडले ते सर्व फालतू असे मानले! फक्त आत्तापर्यंत मला त्या सगळयाचा अर्थ समजला नव्हता, पण आता समजला होता! मी उंच फळीकडे परतलो. तिसऱ्यांदा! माझ्या पाठीशी ते लोक आरोळया ठोकत होते, शिट्या वाजवत होते, ख्यँ ख्यँ हसत होते. पण तिकडे लक्ष न देता मी थेट वर चढलो आणि फळीच्या टोकापर्यंत गेलो. माझे गुडघे थरथर कापत होते. मी त्यांना हातांनी पकडून दाबले आणि स्वतःशी हळूच बोललो. जेव्हा बोललो तेव्हा माझा आवाज कापत होता आणि दात कडकडा वाजत होते.

मी पुटपुटत होतो: "गाढवा! भित्र्या!! बावळटा!!! मार ताबडतोब उडी! मार! नाहीतर मी तुझ्याशी कध्धी कध्धी बोलणार नाही! तुझ्याशी हस्तांदोलन करणार नाही! मार उडी! अरे ठोक उडी! ढोल्या! नेभळटा! मार खाली उडी! झंप्या! गंप्या! डुकरा!"

जेव्हा मी स्वतःला अशी नांवे म्हणवून घेतली, तेव्हा मला अपमान सहन झाला नाही आणि मी पाऊल पुढे टाकले. माझे काळीज आणि जठर एकदम घशात आल्याचा मला भास झाला. जेव्हा मी हवेत उडी मारली तेव्हा मनात कसलाही विचार नव्हता – फक्त मी उडी मारली एवढीच जाणीव होती. मी सूर मारला! अखेर मी सूर मारला होता!!

जेव्हा मी पाण्यातून बाहेर आलो, तेव्हा कोस्त्याने आणि मीष्काने मला हातांचा आधार देऊन बाहेर काढले. आम्ही एकमेकांशेजारी फळयांवर आडवे पडलो. मीष्का आणि कोस्त्या गप्प बसले.

मी पडलो होतो आणि पाथरवटांच्या छिन्नींचे आवाज ऐकत होतो. गुलाबी दगडांना तासणाऱ्या त्यांच्या छिन्नींचे आवाज जणू लाकडी पियानोवरील पट्ट्यांवर काचेच्या हातोड्याने आघात केल्यासारखे मधुर किणकिणत होते.

बालपणचा मित्र

मी जेव्हा सहा अथवा साडेसहा वर्षांचा होतो तेव्हा मोठेपणी मी कोण होणार ह्याबद्दल मला मुळीच काही माहीत नव्हते. माझ्याभोवतालची सर्व माणसे मला खूप आवडत होती आणि त्यांची वेगवेगळी कामेसुद्धा आवडत होती. माझ्या डोक्यात त्यावेळी एकच गोंधळ माजला होता. मी काहीसा बावरलेला होतो आणि मोठेपणी नक्की कोण व्हायचे ते मला ठरवता येत नव्हते.

कधी मला वाटायचे की, खगोलशास्त्रज्ञ बनावे आणि रात्री न झोपता दुर्बीणीमधून दूरदूरचे निळे तारे न्याहाळत बसावेत. कधी वाटायचे की, लांबलांबच्या सफरी करणाऱ्या बोटीचा कप्तान व्हावे, पाय लांब फाकून कप्तानाच्या पुलावर उभे रहावे, खूप दूरच्या सिंगापूरला भेट द्यावी, तेथे मजेदार माकड विकत घ्यावे. तर कधी मेत्रो स्टेशनमास्तर व्हायची अत्यंत इच्छा व्हायची.

किंवा रस्त्यांवर धावणाऱ्या मोटारींना मार्गदर्शन करण्यासाठी पांढरे पट्टे रंगवणारा अफलातून चित्रकार होण्याचा कधी उमाळा यायचा. कधी वाटायचे की, अ‍ॅलेन बोम्बार्दप्रमाणे साहसी प्रवासी बनावे आणि फक्त कच्चे मासे खाऊन जगातील सर्व महासागर ओलांडावेत. एक खरे की, ह्या बोम्बार्दचे वजन त्याच्या प्रवासांनंतर पंचवीस किलोंनी कमी झाले होते आणि माझे एकूण वजनच सव्वीस किलो होते. म्हणजे जर मी सागरी प्रवास केला असता ता परतीच्या वेळी माझे वजन अवघे एक किलो भरले असते. पण त्याच्यापेक्षा कमी मासे मला सापडले तर? तर मात्र धुरासारखा मी हवेत विरून गेलो असतो!

ह्या सगळ्या गोष्टींचा जेव्हा मी विचार केला, तेव्हा त्यांचा नाद सोडून देण्याचे मी ठरवले. दुसऱ्या दिवशी मला मुष्टीयोद्धा होण्याचे स्वप्न पडले, कारण आदल्या संध्याकाळी टेलीव्हिजनवर युरोपीय मुष्टीयोद्धयांचे सामने मी पाहिले होते. काय त्यांनी एकमेकांना ठोसे हाणले – अरे बापरे! मग त्यांनी प्रशिक्षण कसे घेतले ते दाखवण्यात आले. ठोशांचा सराव करायला ते चामडी पिशव्यांना गुद्दे लगावत होते. एवढ्या मोठ्या थैलीला जोरदार ठोसे मारून मुष्टीयुद्धाचे कसब हस्तगत करावे लागते. मी ठरवले की, आमच्या आवारातील सर्वांत बलिष्ठ माणूस बनायचे आणि प्रसंग पडल्यास सगळ्यांना पिटून काढायचे.

मी बाबांना म्हणालो: "बाबा, मला गुद्दे मारायची थैली विकत घेऊन द्या!"

ते म्हणाले: "कशाला?"

"सराव करायला," मी म्हणालो. "मला मुष्टीयोद्धा बनायचंय, घेणार ना विकत?"

"काय किंमत पडते?" बाबांनी कुतूहलाने विचारले.

"काही विशेष महाग नाही," मी म्हणालो, "फक्त शंभर किंवा तीनशे रूबल!"

"बंधू, ह्या थैलीशिवायही तू चॅम्पियन होशील!" बाबा म्हणाले आणि कामाला निघून गेले.

त्यांनी माझी मागणी अशी सहज उडवून लावली ह्याचे मला वाईट वाटले. आईच्या ते चटकन लक्षात आले आणि ती म्हणाली:

"जरा थांब, मला एक युक्ती सुचलीय. एक मिनिटभर थांब!"

ती खाली वाकली आणि दिवाणाखालून तिने एक मोठी टोपली काढली. त्या टोपलीत माझी पूर्वीची जुनी खेळणी होती. आता मी मोठा झालो होतो, लौकरच शाळेत जाणार होतो.

आई त्या टोपलीमधील वस्तू धुंडाळू लागली. दरम्यान मी माझी जुनी ट्रामगाडी पाहिली – तिला चाके नव्हती, पण अजून दोरी तशीच बांधलेली होती. तेथे प्लॅस्टिकचा कर्णा होता, पोचे आलेला भोवरा होता, रबरी टोकाचा बाण होता, होडीचे शीड होते आणि इतर अनेक मटरफटर वस्तू होत्या. तेवढ्यात सर्वांत खाली पडलेले माझे जुने कापडी अस्वल आईने बाहेर काढले. त्या अस्वलाला दिवाणावर फेकत आई मला म्हणाली:

"हे बघ. तुला मीलामावशीनं भेट दिलं होतं. तेव्हा तुला दोन वर्षं पूर्ण झाली होती. छान आहे अस्वल. बघ कसं घट्ट आहे! आणि त्याचं ढेरपोट बघ! तुला ठोशांचा सराव करायला छान आहे ना? त्या थैलीपेक्षा जास्त चांगलं! आता ह्याच्यावर हव्वा तेवढा सराव कर!"

तेवढ्यात टेलीफोन वाजला आणि ती बाहेर गेली.

आईला एवढी छान कल्पना सुचलेली पाहून मी खूप खूष झालो होतो. व्यवस्थित ठोसे मारून माझे बळ वाढवता यावे अशा हेतूने मी त्या अस्वलाला दिवाणावर एका कोपऱ्यात नीट ठेवले.

माझ्यासमोर ते चॉकलेटी रंगाचे अस्वल बसले होते. त्याच्या नाकावरचा रंग उडाला होता. आणि त्याचे डोळे वेगवेगळे होते: एक त्याचा नेहमीचा पिवळ्या काचेचा डोळा होता आणि दुसऱ्या डोळ्याजागी पांढरे बटण होते. आईने ते केव्हा शिवले होते ह्याची मला आठवण नव्हती. पण ही गोष्ट महत्त्वाची नव्हती, कारण अस्वल माझ्याकडे त्या वेगवेगळ्या डोळ्यांनी मजेत पहात होते. त्याचे मागचे पंजे फाकलेले होते, त्याचे पोट छान गोल गरगरीत होते आणि पुढचे पंजे त्याने वर उचलले होते – जणू मी ठोसा मारण्यापूर्वीच त्याने शरणागती पत्करली होती

ते अस्वल माझा जिवलग मित्र होते तो काळ मला आठवला. तेव्हा मी त्याच्याशी खेळायचा, त्याच्याबरोबर झोपायचा, खाताना टेबलावर ठेवायचा आणि चमच्याने त्याला भरवायचा. त्याच्या तोंडाला खरकटे माखले म्हणजे ते फार मजेदार दिसायचे. आम्ही झोपलो म्हणजे त्याला जणू माझा धाकटा भाऊ समजून मी अंगाईगीत गायचा, त्याच्या कडक, मखमाली कानांमध्ये गोष्टी सांगायचा. त्यावेळी त्याच्यावर मनापासून प्रेम केले होते.

आणि माझा पूर्वीचा हा जिवलग मित्र आता दिवाणावर बसून आपल्या वेगवेगळया डोळयांनी माझ्याकडे पहात हसत होता. आणि ताकदवान बनण्यासाठी त्याच्या पोटावर ठोसे मारायला मी सज्ज होत होतो.

"काय झालं रे?" आईने खोलीत परत येत मला विचारले.

मला काय झाले होते ते मला समजत नव्हते, पण मी खूप वेळ गप्प राहिलो आणि तिच्या-पासून मान फिरवली. माझ्या आवाजावरून अगर कापऱ्या ओठांवरून मला काय होत होते ते तिला समजू नये म्हणून! डोळयांमधील आसवे परतावीत म्हणून मी वरती छताकडे पाहिले. मग थोडा सावरलो तेव्हा मी म्हणालो:

"काही नाही ग आई... फक्त मी विचार बदलला. मला मुष्टीयोद्धा व्हायची मुळीच इच्छा नाही."

माझी बहीण क्सेनिया

तो एक नेहमीसारखा दिवस होता. मी शाळेतून घरी आलो, खाल्ले आणि खिडकीच्या चौकटीत जाऊन बसलो. खिडकीत बसून रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्यांकडे पहावे आणि दुसरे काहीही करू नये, असे मला केव्हापासून वाटत होते. आत्ता ह्या गोष्टीला अगदी योग्य वेळ होती. मी खिडकीच्या चौकटीत जाऊन बसलो आणि काहीही न करण्याचा निर्णय घेतला. तेवढ्यात बाबा झपाट्याने खोलीत आले आणि त्यांनी विचारले:

"उदास वाटतंय?"

मी उत्तरलो: "तसं नाही... सहज बसलोय. आई शेवटी येणार तरी कधी? चक्क दहा दिवस ती घरात नाही!"

बाबा म्हणाले: "खिडकीला पकड! घट्ट पकड, नाही तर वरती उडशील छतावर!"

तसा काही प्रसंग येऊ नये म्हणून मी खिडकीला घट्ट धरले आणि विचारले:

"काय भानगड आहे?"

बाबांनी एक पाऊल मागे घेतले, खिशातून कसलातरी कागद बाहेर काढला व दुरूनच हातात फडफडवत जाहीर केले:

"आणखी एक तासानंतर आई येतेय! ही बघ तार! तुला बातमी सांगावी म्हणून मी थेट कामावरून घरी पळत आलोय! आता आपण जेवणार नाही, नंतर सारे एकत्र जेवू. तिला भेटायला मी आता पळतो, तोवर तू खोली आवर आणि आमची वाट पहा! ठरलं?"

मी ताडकन खिडकीतून खाली आलो.

"अर्थात, ठरलं! हुर्रा! बाबा, तुम्ही धावा लौकर! मी इथं आवराआवर करतो! अगदी झटपट! तुम्ही वेळ वाया घालवू नका. लौकर आईला घेऊन या!"

बाबा वेगाने निघून गेले आणि मी घरात कामाला लागलो. महासागरावर वादळात सापडलेल्या बोटीवरल्याप्रमाणे माझी धांदल चालली होती. पण वादळ लौकरच शमले आणि शांत पाण्यात आम्ही खलाशी प्रत्यक्ष कामाला लागलो.

"एक, दोन! झट-पट! खुर्च्या जागेवर आल्या! ताठ उभ्या एका रांगेत! झाडू फिरवा भराभरा! अरेच्चा, काय ही फरशीची दशा? आत्ता तिला पुसून चकाचक करतो! जेवण! माझा हुकूम! भांडं आणि तवा, ताबडतोब गॅसच्या शेगडीवर! एक-दोन! म्हणा गाणं:

फर्रदिशी काडी एक ओढता!
शेगडी पेटते बघता बघता!

जेवण गरम करा! ठीक. माझी पण किती कमाल! मदतनीस! अशा मुलाचा अभिमान वाटला पाहिजे! मी मोठेपणी कोण होणार माहीत आहे? मी होणार ... ओहो! मी ओहो-हो सुद्धा होणार! ओहोहोहो! तसा मी होणार!"

अशा रीतीने आई-बाबांची वाट पाहताना कंटाळा येऊ नये म्हणून मी मनाशी खेळत आणि फुशारक्या मारत वेळ घालवत होतो. अखेर दार सताड उघडले आणि परत बाबा वेगाने आत आले. ते खूप उत्तेजित झाले होते. त्यांच्या डोक्यावरील टोपी पार मागे सरकली होती. जणू आख्खा ब्रास बँड ते एकाचवेळी वाजवत होते आणि त्याचे संचलनही करत होते. बाबांचे जोरदार हातवारे चालले होते.

"झूम-झूम!" बाबा ओरडले. मला समजले की, आईच्या आगमनाप्रीत्यर्थ तुर्की नगाऱ्यांची ही सलामी होती.

"ठाण-ठणाण!" पितळी थाळ्यांनी वर्दी दिली. पुढे संगीताचा एकच गदारोळ उडाला. जवळजवळ शंभर लोकांचे प्रचंड वृंदगान सुरू झाले. त्या सगळ्या शंभरांच्या वतीने बाबा एकटे गात होते. बाबांच्या पाठी दार उघडे होते आणि आईला भेटण्यासाठी मी बाहेर धावलो.

हातात कसलेतरी गाठोडे धरून ती कोटांच्या स्टँडजवळ उभी होती. मला पाहताच ती गोड हसली आणि हळूच म्हणाली:

"काय रे माझ्या बाळा! माझ्याशिवाय कसा राहिलास?"

मी म्हणालो: "मला तुझी फार आठवण येत होती." आई म्हणाली: "मी तुझ्यासाठी एक गंमत आणलीय!"

मी विचारले: "विमान?"

आई म्हणाली: "बघ!"

आम्ही दोघे अगदी हळू आवाजात बोलत होतो. आईने माझ्या पुढ्यात ते गाठोडे धरले. मी ते हातात घेतले.

"हे काय आहे, आई ?" मी विचारले.

"ही तुझी बहीण क्सेनिया," तशाच हळू आवाजात आई म्हणाली.

मी गप्प राहिलो.

तेव्हा आईने विणलेल्या रुमालाचे टोक बाजूला सारले आणि मी माझ्या बहिणीचा चेहरा पाहिला. तो अगदी लहान होता आणि त्यावर मला काहीच दिसत नव्हते. अंगातील सर्व ताकद एकवटून मी तिला धरले होते.

"झूम-बूम-ब्रूम," अनपेक्षितपणे बाबा खोलीमधून माझ्यापाशी अवतरले होते.

त्यांचा वाद्यवृंद अजून वाजतच होता.

"ऐका," नभोवाणीवरील निवेदकाच्या आवाजात बाबा म्हणाले, "देनीस नांवाच्या मुलाला जिवंत, ताजी बहीण क्सेनिया देण्यात येत आहे. तिची लांबी अंगठ्यापासून डोक्यापर्यंत पन्नास सेंटीमीटर, डोक्यापासून अंगठ्यापर्यंत पंचावन्न! ठोक वजन तीन किलो दोनशेपन्नास ग्राम, वेष्टनाच्या वजनाशिवाय."

बाबा माझ्यापाशी गुडघ्यांवर बसले आणि माझ्या हातांखाली त्यांनी स्वतःचे हात धरले. क्सेनिया माझ्या हातून खाली पडेल अशी बहुधा त्यांना भीती वाटली असावी. मग नेहमीच्या आवाजात त्यांनी आईला विचारले:

"ती कुणासारखी दिसते?"

"तुमच्यासारखी," आई म्हणाली.

"नाही!" बाबा उद्‌गारले. "ह्या छोट्या रुमालात ती प्रसिद्ध नटी कोर्चागिना-अलेक्सान्द्रोव्स्कायासारखी दिसते. त्या नटीचा मी माझ्या तरुण वयात चाहता होतो. एकूण माझ्या ध्यानात आलंय की, नुकतीच जन्मलेली सर्व बाळं त्या नटीसारखी दिसतात. खास करून नाक. अगदी पाहिल्याक्षणी नाकाचं साम्य जाणवतं!"

हा सारा वेळ मी क्सेनियाला हातांमध्ये धरून होतो आणि वेडपटासारखा हसत होतो.

आई चिंतेच्या सुरात म्हणाली: "सांभाळून, देनीस, तिला खाली पाडू नकोस!"

मी म्हणालो: "अग आई, तू काळजी करू नकोस! मी तीन चाकी सायकल एकट्या डाव्या हातानं उचलून नेऊ शकतो! मग एवढ्याशा वजनाला खाली कसा टाकीन?"

बाबा म्हणाले: "संध्याकाळी आंघोळ घालायची! तयारी करा!"

त्यांनी माझ्या हातून क्सेनियाचे गाठोडे घेतले व ते खोलीत गेले. मी त्यांच्यापाठी गेलो आणि माझ्या पाठोपाठ आई. आम्ही क्सेनियाला चेस्ट ऑफ ड्रॉवरमधून काढलेल्या एका रिकाम्या कप्प्यात ठेवले. ती त्यात शांतपणे पडून राहिली.

बाबा म्हणाले: "ही व्यवस्था एका रात्रीपुरती. उद्या मी तिच्यासाठी छोटा पलंग विकत आणीन आणि नंतर ती पलंगावर झोपेल. देनीस, तू लक्ष ठेव किल्ल्यांवर, नाहीतर कुणीतरी तुझ्या बहिणीला कपाटात बंद करायचा! मग उगीच शोधायची धावाधाव..."

आम्ही जेवायला बसलो. मीं दर मिनिटाला जागेवरून उठून क्सेनियाला बघून येत होतो. ती सारा वेळ झोपून होती. मला आश्चर्य वाटले आणि तिच्या गालाला मी बोटांचा स्पर्श केला. तिचा गाल सायीसारखा मऊ मऊ होता. आता जेव्हा मी लक्षपूर्वक तिला निरखून पाहिले, तेव्हा मला दिसले की, तिच्या लांबसडक काळ्या पापण्या होत्या...

संध्याकाळी आम्ही तिला आंघोळ घालू लागलो. आम्ही बाबांच्या टेबलावर छोटा टब ठेवला आणि त्या टबात भांड्यांमधून गरम व गार पाणी आणून ओतले. क्सेनिया ड्रॉवरमध्ये पडून आंघोळीची वाट पहात होती. बहुधा ती घाबरली होती, कारण दाराच्या करकरीप्रमाणे ती अधूनमधून तोंडातून आवाज काढत होती आणि ती फार भिऊ नये म्हणून बाबा सतत तिला खुलवत होते. बाबा पाणी भरण्यासाठी इकडे-तिकडे धावपळ करत होते, त्यांनी अंगातील कोट काढला, सदऱ्याच्या बाह्या वर सारल्या आणि सबंध घरभर ऐकू जाईल अशा आवाजात लाडिकपणे ते बडबडत होते:

"आपल्या सर्वांत उत्तम कोण पोहतं? कोण सर्वांत छान सूर मारतं? कोण सर्वांत छान फुगे उडवतं?"

क्सेनियाचा चेहरा असा काही दिसत होता की, तीच सर्वांत उत्तम पोहणारी होती, सूर मारणारी होती. बाबांच्या स्तुतीचा परिणाम. पण प्रत्यक्षात जेव्हा तिची आंघोळ सुरू झाली, तेव्हा तिची भलतीच घाबरगुंडी उडाली होती. जणू तिचे जन्मदाते आई-बाप आपल्या मुलीला बुडवायला निघाले होते असा तिने टाहो फोडला. जेव्हा तिचे पाय टबाच्या तळाला टेकले, तेव्हा कुठे तिच्या जरासा जीवात जीव आला. पहिल्याइतका भेदरटपणा तिच्या चेहऱ्यावर उरला नाही आणि तिने अंगावर पाणी ओतून घेतले... पण तरीही तिला बाबांची पुरती खात्री वाटत नव्हती असे दिसत होते. तेवढ्यात मी आईच्या कोपराखालून पुढे घुसलो आणि क्सेनियासमोर माझे बोट धरले. माझा अंदाज बरोबर ठरला. तिने पटकन माझे बोट पकडले आणि ती पूर्ण शांत झाली. बुडणारा माणूस काडीचा आधार जेवढा गच्च पकडतो, तशा तऱ्हेने त्या छोट्या मुलीने माझे बोट गच्च पकडले होते. मला तिची दया आली. इतर सर्वांना सोडून ती आपल्या इवल्याशा बोटांनी माझा आधार धरत होती. फक्त माझ्यावरच तिचा विश्वास होता, फक्त माझ्यावर तिने आपला मौल्यवान जीव सोपवला होता. ही आंघोळ तिला छळवाद वाटत असावी. तिला ती भयानक आणि धोक्याची वाटत असावी. तिच्या सामर्थ्यवान, शूर मोठ्या भावाच्या बोटाला धरून ती स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होती. मला जेव्हा हे सर्व उमजले आणि ती बिचारी छोटी मुलगी किती घाबरली होती हे कळले, तेव्हा मी तात्काळ तिच्यावर प्रेम करू लागलो.

चेंडूवरील मुलगी

एकदा आमचा सगळा वर्ग सर्कसला गेला होता. मला तेथे गेल्यावर खूप आनंद झाला कारण लौकरच मला आठ वर्षे होतील आणि यापूर्वी फक्त एकदाच मी सर्कस पहायला गेलो होतो व त्याला फार काळ लोटला होता. गंमत म्हणजे आल्योन्का अवघी सहा वर्षांची आहे, पण ती एव्हाना तीनदा सर्कस बघून आलीय. मला हे जिव्हारी लागले. तर आता आमचा सबंध वर्ग सर्कस पहायला निघाला होता आणि मोठेपणी, व्यवस्थित सर्कस बघायला मिळणार ह्याचा मला आनंद झाला होता. पहिल्यावेळी मी लहान होतो आणि सर्कस म्हणजे काय, तेच मला समजले नव्हते. त्यावेळी सर्कसच्या रिंगणात जेव्हा कसरतपटू आले आणि एकजण दुसऱ्याच्या डोक्यावर चढला, तेव्हा मी खो खो हसलो, कारण मला वाटले की, लोकांनी हसावे म्हणून ते मुद्दाम तसे वागत होते आणि मोठी माणसे अशी एकमेकांच्या डोक्यांवर चढलेली मी कधी पाहिली नव्हती. रस्त्यावरसुद्धा असे दृश्य कधी दिसले नव्हते. तेव्हा मी पोट धरधरून हसलो होतो. कसरतपटू स्वत:ची चपळाई दाखवत होते हे मला समजले नव्हते. शिवाय त्यावेळी माझे जास्त लक्ष बॅंडकडेच होते – कोण ढोल वाजवतो, कोण शिंग वाजवतो, संचलन करणारा छडी कशी फिरवतो, कुणाचेही त्याच्याकडे कसे लक्ष नव्हते आणि प्रत्येकजण स्वत:च्या मनाप्रमाणे वाजवत होता, इत्यादी. मला तो प्रकार खूप आवडला होता आणि मी बॅंडवाल्यांकडे पहात होतो तोवर रिंगणात कसरतपटूंच्या कसरती संपल्या होत्या. म्हणजे मुख्य सर्कसच मी पाहिली नव्हती. अर्थात त्यावेळी मी अगदी बावळट होतो.

तर आमचा सगळा वर्ग सर्कस बघायला आला. सर्कसचा खास वास मला ताबडतोब आवडला. भिंतीवर लटकावलेली रंगीबेरंगी पोस्टर, सभोवती दिव्यांच्या उजेडाचा चकचकाट, रिंगणात सुंदर गालीचा, उंच घुमटाकार छत आणि तेथे लटकलेले वेगवेगळे चकाकते झोपाळे पाहून मी खूष झालो. दरम्यान बॅंड वाजत होता, माणसे आपापल्या जागांवर बसत होती. आम्ही आईस्क्रीम विकत घेतले आणि खाऊ लागलो. अचानक लाल पडद्यामागून सुंदर पोषाखां- गधली – पिवळ्या पट्ट्यांचे लाल पोषाख – माणसांची रांगच्या रांग बाहेर आली. ती पडद्याच्या दोन्ही बाजूंना उभी राहिली आणि त्यांचा मुख्य काळ्या सुटात त्यांच्या मधोमध चालत आला. तो मोठ्या आवाजात काहीसे न समजणारे ओरडला, बॅंडवर जलद संगीत मोठ्यांदा वाजू लागले आणि रिंगणात हातचलाखी करणारा माणूस आला. तो डझनावारी चेंडू उडवून झेलत होता. मग त्याने पट्ट्यापट्ट्यांच्या चेंडूच्या करामती सुरू केल्या. तो चेंडू अखंडपणे त्याच्या अंगावरून फिरत होता. जणू त्याला लोहचुंबक लावलेला होता. अचानक त्याने तो चेंडू प्रेक्षकां- मध्ये फेकला. तेव्हा खरी मजा सुरू झाली, कारण मी तो झेलला आणि वालेर्काकडे फेकला, वालेर्काने मीष्काकडे. मीष्काला तो बॅंडच्या संचलकाकडे फेकायचा होता, पण त्याचा नेम हुकला आणि चेंडू ढोलावर आपटला – ढम्म! ढोलवाल्याने चिडून तो चेंडू परत रिंगणातल्या

कलाकाराकडे फेकला, पण त्याची फेक कमी पडली आणि एका सुंदर बाईच्या केसांवर तो आपटला व तिचे केस एकदम मोकळे सुटले. आमची हसून हसून मुरकुंडी वळली.

तो कलावंत पडद्यामागे नाहीसा झाला तरी खूप वेळपर्यंत आमचा गोंगाट चालू होता. दरम्यान रिंगणात फिकट निळ्या रंगाचा एक प्रचंड चेंडू ढकलत आणण्यात आला. कार्यक्रमाची घोषणा करणाऱ्या माणसाने मला न समजण्यासारखे काहीतरी ओरडून सांगितले. बँडवर संगीत वाजू लागले, पण ते पूर्वीएवढे जलद नव्हते.

एक लहान मुलगी रिंगणात धावत आली. एवढी छोटी आणि सुंदर मुलगी यापूर्वी मी कधीही पाहिली नव्हती. तिचे डोळे निळे निळे होते आणि पापण्या लांब होत्या. तिचा फ्रॉक चंदेरी होता आणि खांद्यावर केप होती. तिचे हात लांब होते आणि एखाद्या पक्ष्याप्रमाणे ती हातांची हालचाल करत होती. तिच्यासाठी रिंगणात ढकलत आणलेल्या त्या फिकट निळ्या प्रचंड चेंडूवर उडी मारून ती चढली. प्रथम ती चेंडूवर उभी राहिली आणि नंतर ती धावू लागली. चेंडू तिच्या पायांखाली फिरत होता आणि अशा रीतीने तिने सबंध रिंगणाला फेरी मारली. अशा छोट्या मुली यापूर्वी मी कधीही पाहिल्या नव्हत्या. एकूण मुली साध्या होत्या, पण ही खास वेगळी होती. जणू सपाट फरशीवरून धावावे तशी ती त्या चेंडूवर धावत होती. फिकट निळा चेंडू तिला हवे त्याप्रमाणे फिरत होता – मागे, पुढे, उजवीकडे, डावीकडे! धावताना ती मजेने हसत होती आणि जणू ती तरंगत जात असल्याचा भास होत होता. थोड्या वेळाने ती थांबली आणि एका माणसाने तिला छोट्या घंटा लावलेल्या रिंगा दिल्या. तिने त्या हातांमध्ये आणि पायांमध्ये सरकवल्या व ती पुन्हा चेंडूवरून फेरी मारू लागली. बँडवर मंद संगीत वाजत होते. तिच्या लांब हातांवर किणकिणणाऱ्या घंटांचा नाद आम्हाला ऐकू येत होता. एखाद्या परीकथेप्रमाणे सर्व चालले होते. तेवढ्यात दिवे विझवण्यात आले. पण ती मुलगी मात्र प्रकाशाने उजळत राहिली. ती सावकाशपणे तरंगत जात होती, प्रकाशाने उजळत होती, घंटांचा मंजुळ आवाज करत होती. अगदी अद्‌भुत. माझ्या सबंध आयुष्यात ह्यासारखी गोष्ट मी कधीही पाहिली नव्हती.

जेव्हा परत दिवे पेटले तेव्हा सर्वांनी टाळ्या पिटल्या आणि "ब्राव्हो" अशा शाबासकीच्या आरोळ्या ठोकल्या. मुलीने चेंडूवरून खाली उडी मारली आणि धावत ती पुढे आमच्यापाशी आली आणि धावता धावता अचानक तिने तीन-चार कोलांट्या उड्या मारल्या. मला भीती वाटली की, चुकून ती कठड्याला आपटेल. म्हणून घाबरून मी उभा झालो आणि तिला वाचवण्यासाठी धावणार होतो, पण मुलगी एकदम पुतळ्यासारखी स्तब्ध झाली, तिने स्वतःचे लांब हात पसरले, बँड वाजायचा थांबला आणि हसऱ्या चेहऱ्याने ती उभी राहिली. सर्वांनी पूर्ण ताकदीनिशी टाळ्या पिटल्या आणि पायसुद्धा आपटले. त्या क्षणाला त्या मुलीने माझ्याकडे पाहिले. मला दिसत होते की, मी तिच्याकडे पाहतोय हे तिला समजत होते आणि मला समजत होते की, ती माझ्याकडे पहात होती. तिने माझ्या दिशेने हात हलवला आणि ती हसली. तिने फक्त मला एकट्याला हात हलवून दाखवला आणि ती हसली. मला परत

तिच्यापाशी धावत जावेसे वाटले आणि मी तिच्या दिशेने हात पुढे केले. तिने आम्हा सर्वांना उडते चुंबन दिले आणि ती लाल पडद्याआड धावत नाहीशी झाली. सगळे कलाकार त्याच पडद्यामागे जात. रिंगणात एक विदूषक एका कोंबडयाला घेऊन आला. तो फटाफट शिंकू लागला आणि धडाधड पडू लागला. पण मला त्यात रस वाटेना. सारा वेळ त्या चेंडूवरच्या मुलीबद्दल मी विचार करत होतो. तिने माझ्या दिशेने हात कसा हलवला आणि ती कशी गोड हसली, ह्याबद्दलच्या आठवणी मनात उजळत होतो. मला आता दुसरा कोणताही कार्यक्रम पहावासा वाटत नव्हता. तो मूर्ख विदूषक आणि त्याचे तांबडे नाक दिसू नये म्हणून मी डोळे गच्च मिटून घेतले, कारण त्या मुलीबद्दलच्या आठवणी काढण्यात मला तो अडचण आणत होता.

नंतर मध्यांतर झाले. सगळे लेमन प्यायला धावले, पण मी हळूच त्या रिंगणाच्या कडेच्या लाल पडद्यापाशी गेलो. त्या मुलीला परत एकदा पाहण्याची माझी इच्छा होती. अचानक ती तेथे येईल अशा अपेक्षेने मी पडद्याआड डोकावत होतो, पण अखेरपर्यंत ती काही आली नाही.

मध्यांतरानंतर सिंहांचा खेळ झाला, पण त्यांचा रिंगमास्तर हडकुळ्या मांजरांच्या शेपटया धरून ओढत न्यावे त्याप्रमाणे त्या सिंहांच्या शेपटया धरून त्यांना फरफटत नेत होता हे मला आवडले नाही. त्याने त्या सिंहांना सारख्या जागा बदलायला लावल्या, मग त्यांना जमिनीवर एकमेकांशेजारी झोपवले आणि जणू गालीचावरून चालत जावे, त्याप्रमाणे त्यांच्या अंगावरून तो चालत गेला. रिंगमास्तर त्या सिंहांना शांतपणे पडून रहायला देत नव्हता, अशा त्या सिंहांच्या त्रासिक मुद्रा होत्या. त्या खेळात मजा नव्हती, कारण सिंहाने शिकार केली पाहिजे, अफाट प्रेअरीमध्ये रानगव्यांचा पाठलाग केला पाहिजे आणि आपल्या गर्जनेने पृथ्वीला हादरवून सोडले पाहिजे. पण हे सिंह नव्हते आणि त्यांना काय म्हणावे ते मला समजत नव्हते.

सर्कस संपल्यानंतर घरी जाताना मी त्या चेंडूवरच्या मुलीबद्दल सतत विचार करत होतो.

संध्याकाळी बाबांनी विचारले: "मग, काय? आवडली सर्कस?"

मी म्हणालो: "बाबा! त्या सर्कसमध्ये एक छोटी मुलगी आहे. ती फिकट निळ्या चेंडूवर नाच करते. फारच छान! सर्वांपेक्षा छान! ती माझ्याकडं पाहून हसली आणि तिनं मला हात केला! फक्त मला एकटयाला, शप्पत! बाबा, पुढच्या रविवारी आपण सर्कसला जाऊ या का? मी तुम्हाला ती मुलगी दाखवीन!"

बाबा म्हणाले: "नक्की जाऊ. मला सर्कस फार आवडते!"

आईने आम्हा दोघांकडे अशा काही नजरेने पाहिले, जणू ती आम्हाला प्रथमच पहात होती.

...आणि तो सर्वांत लांब आठवडा सुरू झाला. मी खात होतो, अभ्यास करत होतो, झोपत होतो आणि उठत होतो, खेळत होतो आणि मारामारीसुद्धा केली, पण तरीही प्रत्येक दिवशी विचार करत होतो येणाऱ्या रविवारचा, बाबांबरोबर सर्कसला जाण्याचा! चेंडूवरच्या मुलीला मी परत पाहणार होतो, बाबांना ती दाखवणार होतो, कदाचित बाबा तिला आमच्या

घरी बोलावतील, मग मी तिला ब्राऊनिंग पिस्तूल भेट देईन आणि शिडांच्या जहाजाचे चित्र काढून देईन.

पण रविवारी बाबा सर्कसला येऊ शकले नाहीत. त्यांच्याकडे त्यांचे ऑफिसातील लोक आले, ते कसलेतरीं आराखडे काढत होते, आरडाओरडा करत होते, सिगारेटी फुंकत होते, चहा पीत होते, खूप उशीरापर्यंत ते बसले होते. शेवटी ते निघून गेल्यानंतर आईचे डोके खूप ठणकू लागले. आम्ही सगळा पसारा आवरल्यानंतर बाबा मला म्हणाले:

"पुढच्या रविवारी नक्की जाऊ सर्कसला. मी वचन देतो!"

पुढच्या रविवारची वाट पाहण्यात मी तो आठवडा कसा घालवला ते आठवत नाही. बाबांनी स्वतःचे वचन पाळले आणि ते माझ्याबरोबर सर्कस बघायला आले. त्यांनी दुसऱ्या रांगेतील तिकीटे विकत घेतली. रिंगणाच्या खूप जवळून बघायला मिळणार म्हणून मला आनंद झाला. कार्यक्रम सुरू झाला आणि चेंडूवरची मुलगी केव्हा येईल ह्याची मी आतूरतेने वाट पाहू लागलो. पण कार्यक्रम जाहीर करणारा माणूस सतत दुसरेच कलाकार रिंगणात बोलावीत होता, पण त्या मुलीला मात्र बोलावीत नव्हता. अधीरतेपायी माझे सगळे अंग कापत होते. माझी फार इच्छा होती की, ती खास मुलगी बाबांनी पहावी. रुपेरी पोषाखामधील त्या मुलीचा फिकट निळया चेंडूवरचा नाच पहावा. दरवेळी तो माणूस कार्यक्रम जाहीर करायला आला म्हणजे मी बाबांच्या कानांमध्ये पुटपुटायचा:

"आत्ता तो तिचं नांव घेईल!"

पण तो जणू दुष्टाव्यापायी दुसऱ्याच कुणाला तरी बोलावीत होता. मला त्या माणसाचा तिटकारा येऊ लागला आणि मी सतत बाबांना म्हणू लागलो:

"शी:! कसले फालतू कार्यक्रम जाहीर करतोय! ह्यात मजा नाही!"

पण माझ्याकडे न पाहताच बाबा म्हणत होते:

"अडथळा करू नको. हा खेळ फार छान आहे!"

मला वाटले की, बाबांना जर तो खेळ छान वाटतो, तर त्याचा अर्थ त्यांना सर्कसमधील फारसे कळत नव्हते. चेंडूवरच्या मुलीला पाहिल्यानंतर ते काय बोलतील ह्याबद्दल मला कल्पना करता येईना. बहुधा स्वतःच्या खुर्चीवरून वर छतापर्यंत उडतील.

तेवढ्यात निवेदक आला आणि आपल्या विचित्र आवाजात ओरडला: "म-ध्यां-त-र!"

माझा स्वतःच्या कानांवर विश्वास बसेना. मध्यांतर! का म्हणून? कारण दुसऱ्या भागात तर फक्त सिंहांचा खेळ! मग माझी चेंडूवरची मुलगी कुठे होती? कुठे? तिचा कार्यक्रम का नाही? कदाचित ती आजारी पडलीय? अथवा ती पडली आणि तिच्या मेंदूला धक्का बसलाय?

मी म्हणालो: "बाबा, लौकर चौकशी करू या, ती चेंडूवरची मुलगी कुठाय?"

बाबा म्हणाले: "अरे खरंच, कुठाय तुझी ती चेंडूवरची मुलगी? चल, कार्यक्रमपत्रिका विकत घेऊ!"

बाबा खूप मजेत आणि समाधानात होते. भोवती नजर टाकीत हसून ते म्हणाले:

"फार ... फार आवडते मला सर्कस ! हा खास वास ... मस्तकात भिनतो !"

आम्ही कॉरीडॉरमध्ये गेलो. तेथे लोकांची खूप गर्दी होती, टॉफी-बिस्कीटे विकत होते, भिंतींवर वेगवेगळ्या वाघांच्या तोंडांची चित्रे होती. आम्ही शेवटी कार्यक्रमपत्रिका विकणाऱ्या बाईला शोधून काढले. बाबांनी एक पत्रिका विकत घेतली आणि ते वाचू लागले. मी न राहवून त्या बाईला विचारले :

"त्या चेंडूवरच्या मुलीचा कार्यक्रम केव्हा होणार आहे ?"

बाई म्हणाली : "कुठली मुलगी ?"

बाबा म्हणाले : "कार्यक्रमात तिचं नांव छापलंय – तान्या वोरोन्त्सोवा. कुठं आहे ती ?"

मी गप्प उभा होतो.

बाई म्हणाली : "तान्या वोरोन्त्सोवाबद्दल तुम्ही विचारताय ? ती निघून गेली. दौऱ्यावर गेली. तुम्ही एवढा उशीर का केलात ?"

मी गप्प उभा होतो.

बाबा म्हणाले : "गेले दोन आठवडे आमच्या घरात शांतता नाही. चेंडूवर नाच करणाऱ्या मुलीचा कार्यक्रम बघायचा ध्यास घेतला होता. आणि आता तर ती नाही !"

बाई म्हणाली : "होय ... ती तिच्या आई-वडलांबरोबर गेली ... तिचे आई-वडील म्हणजे प्रसिद्ध 'उडते वोरोन्त्सोव' ! कधी ऐकलंत ? अरेरे, फार वाईट ... कालच ती सगळी निघून गेली !"

मी म्हणालो : "बघितलंत बाबा ..."

ते म्हणाले : "ती जाणार हे मला ठाऊक नव्हतं. फार वाईट झालं ... पण आता काय करणार !"

मी बाईला विचारले : "ती नक्की गेली ?"

बाई म्हणाली : "अगदी नक्की !"

मी : "कुठं ? माहीत नाही ?"

बाई : "व्लादीवस्तोकला."

अरे बापरे ! खूपच दूर ! व्लादीवस्तोक. मला माहीत आहे, नकाशाच्या अगदी पार टोकाला आहे ते शहर. मॉस्कोच्या उजव्या बाजूला.

मी म्हणालो : "फार लांब आहे."

बाई एकदम घाई करीत म्हणाली : "चला, तुमच्या जागांवर जाऊन बसा. दिवे विझवायला लागलेत !"

बाबा म्हणाले : "चल, देनीस ! आता सिंहांचा खेळ होईल ! त्यांच्या गर्जना इथपर्यंत ऐकू येताहेत. चल लौकर !"

मी म्हणालो : "आपण घरी जाऊ या !"

बाबा म्हणाले : "कमाल झाली ..."

बाई हसली. पण आम्ही आपापले कोट घेतले आणि सर्कसमधून बाहेर पडलो. बुलेवार्दवरून चालत चालत बरेच अंतर गेल्यानंतर मी म्हणालो:

"व्लादीवस्तोक – नकाशाच्या अगदी दुसऱ्या टोकाला आहे. तिथं आगगाडीमधून पोहचायला सबंध महिना लागेल..."

बाबा गप्प होते. त्यांच्या मनात काहीतरी दुसरेच विचार चालले असावेत. आम्ही आणखी काही अंतर चालून गेलो आणि मला अचानक विमानाबद्दल आठवण झाली व मी म्हणालो:

"पण 'तू-१०४' मधून तीन तासात!"

बाबा तरीही गप्प होते. मुकाट्याने ते चालत होते आणि माझा हात त्यांनी घट्ट पकडला होता. गोर्की रस्त्यापर्यंत पोहोचल्यावर ते म्हणाले:

"कॅफे 'मोरोझेनोये' मध्ये चल! दोन दोन आईस्क्रीम खाऊ! काय?"

मी म्हणालो: "मला इच्छा नाही."

ते म्हणाले: "तिथं एक मजेदार सरबत मिळतं. जगात त्याहून चांगलं सरबत नाही!"

मी म्हणालो: "मला इच्छा नाही."

त्यांनी मला आग्रह केला नाही. त्यांनी पावलांचा वेग वाढवला आणि माझा हात आणखी घट्ट आवळला. मला दुखू लागले. बाबा खूप जलद चालत होते आणि त्यांच्याबरोबरीने वेग राखायला मला अक्षरशः पळावे लागत होते. का बरे ते एवढे जलद चालत होते? माझ्याशी ते बोलत का नव्हते? मी त्यांच्याकडे पाहिले. त्यांचा चेहरा खूप गंभीर आणि दुःखी होता.

प्रिय वाचक,

ह्या पुस्तकाचा अनुवाद आणि त्याची सजावट ह्याबाबत 'रादुगा प्रकाशना'ला आपली मते अगत्यपूर्वक कळवावीत. पत्ता: १७ झूबोवस्की बुलेवार्द, मॉस्को, सोविएत संघ.

रादुगा प्रकाशन
मास्को

ISBN 5-05-00